१२५ इतिहास ९८८९

[illegible] मुसलमाना

[illegible]च्या इतिहास भा. ३रा.

# HISTORY

OF

## THE MAHOMEDAN KINGDOMS IN THE DECCAN

## VOL III.

History Of The Nizamshahi The Kutubshahi, Beridshahi And Imadshahi, Kingdoms Of Ahmadnagar, Golconda, Bedir And Berar With A Short History Of The Vijayanagar Kingdom.

BASED ON FERISTA AND OTHER PERSIAN AUTHORS.

BY

BALAJI PRABHAKAR MODAK.

*Professor of Physical Sciences, Rajaram College Kolhapur.*

Registered Under Act XXV of 1867.

AUGUST 1891.

*All rights reserved.*

Price Rupees 1½.

*POONA,*
*Printed at the "Chitrashalla" Press.*

Shri Lakshmi Keshav Mumbai
30-7-1900
मराठी ग्रंथ संग्रहालय
मराठी ग्रंथ संग्रहालय

# दक्षणेंतील मुसलमानी राज्यांचा इतिहास.

## भाग ३.

अहमदनगर, गोवळकोंडें, बेदर आणि वऱ्हाड
येथील निजामशाही, कुतुबशाही, बेरीद-
शाही आणि इमादशाही या मुसल-
मानी राज्यांचा इतिहास.

हा ग्रंथ

**बाळाजी प्रभाकर मोडक**

कोल्हापूर येथील राजाराम कालेजांतील
पदार्थविज्ञान शास्त्राचे गुरु,

यांनीं

फेरिस्ताव दुसरे पारशी ग्रंथ यांच्या आधारें रचिलें.

आगस्ट १८९१

हिंदुस्थानसरकारच्या १८६७ च्या २ ऱ्या आक्टाप्रमाणें सव
हक्क ठेविले आहेत.

किंमत दीड रुपया.

पुणें,
"चित्रशाळा" छापखान्यांत छापिला.

# प्रस्तावना.

दक्षणेंतील मुसलमानी राज्यांच्या इतिहासाचा हा तिसरा भाग प्रसिद्ध केला आहे. पहिले दोन भाग पूर्वींच प्रसिद्ध झाले असून त्यांत बाहामिनी (ब्राम्हणी) राज्याचा इतिहास व तें राज्य मोडून जीं पांच पृथक् राज्यें झालीं त्यांपैकीं विजापूरच्या+ आदिलशाही राज्याचा इतिहास असे आले आहेत. बाकी अहंमदनगर येथील निजामशाही, गोवळकोंडा येथील कुतुबशाही, बेदर येथील बेरीदशाही आणि वऱ्हाडांतील इमादशाही या चार राज्यांचा इतिहास या भागांत आला आहे. विजापूर आदिलशाहीचा 'बुसातिने सलातीन' हा जसा समग्र इतिहास मिळाला, तसे अहंमदनगर, गोवळकोंडें वगैरे राज्यांचे इतिहास मिळविण्यास खटपट केली; परंतु कांहीं ग्रंथ उपलब्ध झाले नाहींत. फेरिस्ता सन १५१६त मरण पावला, व त्यानें आपल्या मरणकालपर्यंतचा अहंमदनगर येथील निजामशाहीचा मात्र इतिहास लिहिला आहे. आणि गोवळकोंडें, बेदर व वऱ्हाड या तीन राज्यांचा फार त्रोटक इतिहास दिला आहे. परंतु ब्रिग यानें आपल्या फेरिस्ताच्या इतिहासाच्या भाषांतरांत दुसऱ्या एका फारसी ग्रंथाचें भाषांतर दिलें आहे. परंतु तेंही कुतुबशाहीच्या समाप्तीपर्यंत नाहीं. तत्राप फेरिस्ताचा इतिहास व हा इतिहास या दोहोंच्या आधारें अहंमदनगर व गोवळकोंडें यांचा इतिहास सुमारें इसवी सन १६०० अखेर तयार केला आणि हीं राज्यें मोगल बादशाहांनीं खालसा करीपर्यंतचा इतिहास मोंगलबादशाहांच्या एलफिन्स्टनकृत व टेलरकृत वगैरे इतिहासांतून जेवढी माहिती मिळाली तेवढी घेऊन पुरा केला आहे. बाकी बेरीदशाही व इमादशाही या दोन राज्यांचा चांगला इतिहास अद्याप मिळाला नाहीं. म्हणून यांविषयीं फेरिस्तानें जें थोडेंसें लिहिलें आहे, तेवढें घेतलें आहे.

---

+ विजापूरचा इतिहास फार साधारणपणे छापला गेला आहे. जमविलेली माहिती प्रसिद्ध करावी, एवढ्याच हेतूनें कसा बसा सन १८८६ साली छापून काढला. त्यास आश्रय मिळाल्यास तोही पुनः चांगला छापविण्याचा विचार आहे.

मुसलमानी अंमल दक्षणेंत पसरत चालला, तेव्हां बाहामिनीराज्याबरोबरच दक्षिणहिंदुस्थानांत विजयानगरास एक मोठें हिंदु राज्य स्थापन झालें होतें, व त्या राज्याचा अंमल दक्षणेंत बेळगांवापर्यंत व कोंकणांत गोव्यापर्यंत होता. मुसलमान राजांस येथील राजाशीं लढाई करून दक्षणेंतील व कर्नाटकांतील प्रदेश जिंकावा लागला. दक्षणेंत बाहामिनी राज्याच्या कारकीर्दींत जोंपर्यंत मुसलमानांचा एक छत्री अंमल होता, तोंपर्यंत विजयानगरकरांवर त्यांची छाप बसत असे. परंतु तें राज्य मोडून जेव्हां त्याचीं पांच पृथक राज्यें झालीं, तेव्हां तें राज्य एकेका राजास भारी झालें. व त्याचा सर्व दक्षिणहिंदुस्थानांत व पूर्व किनाऱ्यावर चांगलाअम्मल बसला. आणि दक्षणेंतील सर्व राजांस एकत्र होऊन त्यास जिंकावें लागलें. या राज्यांशीं ज्या लढाया व राजकारस्थानें झालीं त्यांचा उल्लेख मुसलमानी इतिहासांत अनेक वेळां आला असल्यानें याचा इतिहासही या पुस्तकांत द्यावा असा मनोदय होता. परंतु त्या राज्याचा इतिहास न मिळाल्यामुळें सिद्धीस गेला नाहीं. तथापि उपलब्ध माहितीवरून एक चोटक हकीकत जुळवून जोडली आहे. जो कोणी इतिहासप्रिय विद्वान् या घराण्याचा इतिहास लिहिण्याचा यत्न करील, त्यास तरी ती उपयोगीं पडेल व येणेंकरून या काळांत दक्षिणहिंदुस्थानांत एक हिंदु राज्य मोठ्या वैभवास चढलेलें असून मुसलमानाशीं टकरा देत होतें, एवढें तरी समजेल.

दक्षणचा या काळचा इतिहास फार महत्वाचा आहे. उत्तरहिंदुस्थानांत अटकेपासून किंवहुना काबुलापासून ते तहत कलकत्त्यापर्यंत मोंगलबादशाहाचा अंमल बसला होता. तसेंच राजपुताना, माळवा, वगैरे सर्व मध्यहिंदुस्थान गुजराथ इत्यादि मुलखांतही मोंगलबादशाहाचा करडा अंमल बसला होता. दक्षणेंत स्वतंत्र अशा दुसऱ्या मुसलमान राजांचा अंमल होता. म्हणून त्यांवरही मोंगलबादशाहांनीं छाप बसवून त्यांजवर प्रथम खंडणी बसविली, व मागाहून एकामागून एक अशीं तीं राज्यें खालसा करण्यास मोगलांच्या प्रचंड सेना दक्षणेंत येऊं लागल्या. ज्यावेळीं मोंगल बादशाही औरंगजेब बादशाहाच्या वेळीं वैभवाच्या व सार्वभौमत्वाच्या कळसास पोहोंचली होती त्या समयास खुद्द औरंगजेबाच्या हयातींतच मोंगलांच्या शक्तीस न जुमानतां मराठ्यांनीं दक्षणेंत मराठी राज्याची स्थापना केली, या-

चें आश्चर्य वाटल्यावांचून कधीं राहात नाहीं आणि मराठ्यांस एकाएकीं इतका जोर व नेट कशानें आला.व याचीं कारणें काय असावीं हे विचार सहजीं मनांत येतात. शिवाजीसारखा जरी महा गुणवान् व प्रतापी पुरुष निपजला तरी असें अचाट काम साध्य होण्यास अनुकूल गोष्टी असल्याशिवाय त्याच्या गुणाचें व प्रतापाचें चीज कधींही व्हावयाचें नाहीं. तर त्या अनुकूल गोष्टी मराठ्यांस कशा मिळाल्या हें दक्षणेंतील मुसलमानी राज्यांच्या इतिहासापासून समजतात.

दक्षणेंत मुसलमानांचा अंमल झाल्यापासून जरी हबशी, इराणी, मोंगल, अफगाण वगैरे अनेक जातीचे मुसलमान परदेशांतून येत व त्यांस ते राजे फौजेंत नोकरीस ठेवीत, तरी त्यांस दक्षणेंतील मराठे लोकांस फौजेंत ठेविल्याशिवाय त्यांचें चालत नसे. यांचा चपलपणा, साधेपणा व काटकपणा फार उपयोगी पडून यांची फौजेंत दिवसें दिवस जास्त भरती होत चालली. मुसलमान राज्यांच्या परस्पर लढाया एकसारख्या सुरू झाल्या, तेव्हां तर फौजेंत जास्तच मराठ्यांची भरती होत चालली. या राजांच्या पदरीं बर्गीस्वार, म्हणून जे असत ते तर बहुतेक मराठे असत. आणि मोठ्या मजला अल्पकाळांत करून एकाएकीं छापे घालण्यास, रसद बंद करण्यास, कहीकबाड मारण्यास यांचा फारच उपयोग होत असे.

या प्रमाणें दक्षणेंतील मराठ्यांस व मावळ्यांस या राजांच्या लष्करांत युद्धकला आयतीच येत जाऊन ते युद्धनिपुण बनत चालले. पुढें जसजसें या राजांचें राज्य वाढत चाललें, तसतसे त्यांचे जातभाई ऐषआरामी बनत जाऊन युद्धाचें काम अधिकाधिकच यांवर पडत चाललें. ऐषआरामाचे साहचारी आलस्य वाढत जाऊन वजीर, सुभेदार, सेनापति वगैरे मोठीं मुत्सद्दिपणाचीं कामेंही मराठ्यांस देण्याची कित्येक ठिकाणीं पाळी येऊं लागली, व येणेंकरून मराठ्यांच्या आंगीं स्वाभाविकच राज्य करण्याची योग्यता दिवसेंदिवस वाढत चालली. बाकी गोष्टी मुसलमान कारकीर्दीनें स्वाभाविकच अनुकूल केल्या होत्या. गोब्राम्हणाचा वध व छळ, हिंदूंस बाटविणें, त्यांचीं देवळें बाटविणें व पाडणें वगैरे गोष्टी सतत चालून हिंदुलोकांचीं मनें दूषित होऊन कोणी म्होरका मिळाल्यास मुसलमानांवर उठण्यास त्यांचे बाहु स्फुरण पावत होतेच. जेव्हां मुसलमान राजांच्या दरबारीं ऐषआराम व त्याची साहचारी ढिलाई वाढली, व घरभेद्यांप्रमाणें

खरी स्थिति मराठ्यांस समजली. अखेर शाहाजहानाची फौज व त्याचे मोठे सरदार यांनीं अहमदनगर खालसा करून मोगली अंमल स्थापिला असतां शिवाजीचा बाप शाहाजी यानें स्वपराक्रमानें मोगलांकडून कांहीं प्रदेश जिंकून नवीन राजा स्थापन करून कांहीं दिवस निजामशाहीची पुनः स्थापना केली. तेव्हां त्याचा गुणवान्, धाडसी व शूर पुत्र जो शिवाजी त्यास धीर येऊन या सर्व स्थितीचा सदुपयोग करून घ्यावा व स्वराज्याची स्थापना करावी, व ती स्थापना करण्यास लोकांस ईर्षा व स्फुरण आणण्यास, गोब्राम्हणाचें रक्षण करणें, व हिंदुधर्माची स्थापना करणें हाच उद्देश आहे, असें प्रसिद्ध करावें, असें शिवाजीसारख्या पुरुषांच्या मनांत यावें हें साहजीक होतें. भावीक व भोळ्या हिंदूंस आणखीं भरंवसा येण्यासाठीं रामदासासारख्या राजकारणी साधूची व भवानीदेवीचीही आपणास आज्ञा झाली आहे, असेंही प्रसिद्ध केलें. या प्रमाणें युद्ध निपुण झालेल्या मराठ्यांस पुढें करून व राजनीति निपुण ब्राम्हण मुत्सद्यांस कारभार करण्यास घेऊन शिवाजीनें स्वराज्याच्या स्थापनेचा पाया घातला, व पुढें औरंगजेबानें खुद्द येऊन शिवाजीच्या मुलास धरून सुळीं दिलें, तरी रामचंद्रपंत अमात्यानें पुढें सरून संताजी धनाजी वगैरेसारख्या मराठ्या वीरांस करांलेल्या व अनुभवशीर मोगली फौजेवर सोडून शिवाजीनें रुजून घालून उठविलेल्या बीजाचें झाड वाढविलें. जर मराठ्यांस दक्षणी मुसलमान राजांच्या लष्करांत व दरबारीं युद्ध नैपुण्य येऊन योग्यता आली नसती तर केवळ घोंगड्या कुणब्यांस व मावळ्यांस घेऊन शिवाजीसारख्या वीरास इतर गोष्टी अनुकूल असल्या तरी करसलेल्या मोगलांशीं टक्कर मारितां आली नसती. असो विषयांतर फार झालें. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, मराठ्यांची सरशी कशी झाली व ती होण्यास अनुकूल गोष्टी कशा आल्या, हें समजण्यास दक्षणचा या काळचा मुसलमानी कारकीर्दीचा इतिहास फार उपयोगी पडतो, व याकरितां हा इतिहास वाचकांनीं एकवार वाचावा, त्यांत मुख्यत्वें विजापूरचा तर अवश्य वाचावा.

या काळचा इतिहास जरी हिंदूंनीं लिहिलेला आढळत नाहीं तरी मुसलमानांनीं फारसींत लिहिलेल्या फारसी ग्रंथाचा फार संग्रह आहे. मात्र फारसी भाषेचें ज्ञान कमी होत गेल्यामुळें व फारसी ग्रंथ दुर्मिळ होत गेल्यानें अडचण पडत चालली आहे. फारसींतील ऐतिहासिक ग्रंथ फार महत्वाचे आ-

इतिहास १२५

## प्रस्तावना.

हेत, व त्यांचा शोध व संग्रह करणें जुन्या संस्कृत ग्रंथाच्या संग्रहाइतकें किंबहुना मध्यकाळच्या इतिहास दृष्टीनें जास्त महत्वाचें आहे, असें वाटतें. परंतु असा प्राचीन व जुन्या गोष्टींचा शोध व संग्रह राजाश्रयाशिवाय होत नाहीं. हा राजाश्रय आतां दिवसें दिवस बंद होऊं लागला आहे, ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. इंग्रजबहाद्दरांनीं पूर्वीची चांगली पद्धत सोडून शिक्षणाकडील हात तेआंखडता धरूं लागले आहेत. व मुसलमान राजांचाच कित्ता घेऊन केवळ राज्यकारभार व लष्कर या दोहोंकडेच बहुतेक वसुलाचा खर्च करण्याचा त्यांचा रोख दिवसेंदिवस वाढत चालला आहे. यामुळें आतां फारसी ग्रंथांचा संग्रह होईल, अशी आशा दिसत नाहीं. अद्याप जरी यत्न झाले, तरी हिंदुस्थानांत हा संग्रह चांगला होण्याजोगा आहे. परंतु हल्लीं संस्कृताशिवाय दुसऱ्या भाषेकडे एतद्देशीय विद्वानांचेंही लक्ष जात नाहीं. मुसलमान अद्याप या कामीं मागसच आहेत. तत्राप त्यांनीं तरी अभिमान धरून हें काम हातीं घेतलें तर कांहीं तरी बचाव होईल. हल्लीं प्रसिद्ध केलेला इतिहास तर एक दोन फारसी ग्रंथांतील आहे. असे इतिहास फारसींत जे अनेक आहेत त्यांच्या योग्यतेची कल्पना होईल. आतां प्रस्तावना फार लांबविल्यामुळें वाचकांची माफी मागून पुरे करितों, व यास आश्रय मिळेल अशी आशा बाळगितों.

आमचे मित्र मि. दिनकर गोविंद वझे मालवणकर यांनीं अहमदनगर व गोवळकोंडें यांचे इतिहास माझ्या मूळ प्रतीवरून पुनः शुद्ध लिहून काढण्यास वगैरे फार मदत केली याबद्दल मीं त्यांचा फार आभारी आहें.

कोल्हापूर तारीख ४ माहे
आक्टोबर सन १८९१ इ०

बा० प्र० मोडक.

20-7-1910

# अनुक्रमणिका.

## दक्षणेंतील मुसलमानी राज्यांचा इतिहास.

### भाग ३रा.

### निजामशाही घराण्याचा इतिहास.


| | पृष्ठें. |
|---|---|
| अहंमद निजामशाहा | १ — १६ |
| बुऱ्हाण निजामशाहा | १७ — ३६ |
| हुस्सेन निजामशाहा | ३७ — ४६ |
| मूर्तिजा निजामशाहा | ४६ — ६२ |
| मिरान हुस्सेन निजामशाहा | ६२ — ६७ |
| इस्माएल निजामशाहा | ६८ — ७२ |
| बुऱ्हाण निजामशाहा (दुसरा) | ७३ — ७६ |
| इब्राहीम निजामशाहा | ७७ — ८० |
| अहंमद निजामशाहा | ८१ — ९० |
| बहादूर निजामशाहा आणि चांदबिबी सुलताना | ९० — ९५ |
| मूर्तिजा निजामशाहा (दुसरा) वगैरे. मलिकंबर आणि शाहाजी | ९६ — ११२ |


### कुतुबशाही घराण्याचा इतिहास.


| | |
|---|---|
| कुली कुतुबशाहा | ११३ — १३० |
| जमशीद कुतुबशाहा | १३१ — १३५ |
| सुभान कुली कुतुबशाहा | १३६ — १३८ |
| इब्राहीम कुतुबशाहा | १३८ — १६० |
| महंमद कुली कुतुबशाहा | १६० — १७८ |
| अबदुल्ला हुस्सेन निजामशाहा | १७९ — १८२ |
| अबूहसन कुतुबशाहा | १८३ — १८५ |


अनुक्रमणिका.

बेरीदशाही घराण्याचा इतिहास... ... ... ... ... ... १८६ —१८८

इमादशाही घराण्याचा इतिहास... ... ... ... ... ... १८९ —१९३

विजयानगरचा इतिहास... ... ... ... ... ... ... ... १९४ — २१६

# अहंमदनगरच्या निजामशाही घराण्याचा वंशवृक्ष.




+ ज्या पुरुषांचे नांवापुढें कंसांत आकडे आहेत, ते पुरुष गादीवर बसले होते.

20-7-1900

# अहंमदनगरच्या निजामशाही घराण्याचा इतिहास.

---

## अहंमद निजामशाहा.

इ. स. १४८९ ते १५०८ पर्यंत.

---

अहंमदाची मूळपीठिका.— अहंमद शिवनेरी वगैरे किल्ले घेतो.— अहंमदाचा बाप निजाम याचा वध झाल्यावर अहंमद स्वतंत्र होतो.— याची राज्यशैली व बंदोबस्त.— यावर फौज पाठविण्याची तयारी.— अहंमदावर बाहामिनी फौज येते.— अहंमद चाकणावर छापा घालून बाहामिनी शाहाकडील झैनउद्दीन यास मारितो.— अहंमद बाहामिनी फौजेचा पराभव करितो.— बेदुराअर छापा घालून सरदारांच्या स्त्रियांस कैद करितो.— सरदारांस शाहाचें पत्र.— महंमूदशाहा बाहामिनी अहंमदावर जाहांगीरखानास नेमितो.— जाहांगीरखानावर छापा व त्याच्या फौजेची कत्तल.— अहंमद श्वेतछत्र धारण करितो.— अहंमद आपल्या नांवानें खुतबा पढवितो.— दौलताबादचा सुभेदार मलिकवज्जी.— त्याचें अहंमदशाहाच्या मुलीशीं लग्न.— त्याचा भाऊ अश्रफ वज्जीस मारून दौलताबाद घेतो, व स्वतंत्र होतो.— अहंमदनगर वसविलें जातें.— अश्रफावर स्वारी.— अश्रफास गुजराथचा महंमूदशाहा कुमक करितो.— गुजराथी फौज खानदेशावर स्वारी करिते.— अहंमदशाहा तिचा पराभव करितो.— अहंमद दौलताबादेस वेढा घालतो.— त्याचा मृत्यु.— त्याचा स्वभाव व त्याचे गुण.

---

विजयानगरच्या **तिमाप्पा बहिरू** नामक ब्राम्हणाचा मुलगा **मलिक नाईब निजाम उल्मुल्क बहिरी** हा असून त्याचा पुत्र **अहंमद निजामशाहा** हा अहंमदनगरच्या निजामशाही घराण्याचा मूळपुरूष होय. एकदां विजयानगराशीं लढाई चालली असतांना त्यांत

अहंमदशाहा बाहामिनी याच्या सैन्यांतील मुसलमानांनीं त्यास कैद करून बेदरास नेलें. तेथें तो मुसलमान होऊन त्यानें हस्सन हें नांव धारण केलें. तेव्हांपासून तो राजवाड्यांत जे इतर गुलाम होते, त्यांतच असे. नंतर शाहानें त्याची तैलबुद्धि पाहून त्यास आपला मुलगा जो महंमद याजकडे राहण्याची परवानगी दिली, आणि शाहाजाद्याबरोबर याचाही अभ्यास होऊन आरबी आणि फारसी भाषेंतील सर्व ग्रंथांत तो चांगला प्रवीण झाला. त्याच्या बापाच्या बहिरू या नांवावरून त्यासही लोक मलिक हसन बहिरू म्हणत असत. परंतु शाहाजाद्यास बहिरू या नांवाचा नीट उच्चार करितां येईना, म्हणून त्यानें यास बहिरी हें नांव दिलें. नंतर जेव्हां शाहाजादा गादीवर बसला, तेव्हां त्यानें या आपल्या स्नेह्यास एक हजार स्वारांच्या पथकाची सरदारी दिली; आणि त्याचें बहिरी हें नांव साजरें करण्यासाठीं त्यास सरकारी बहिरी ससाण्याच्या शिकारखान्याचें काम सांगितलें. कित्येकांनीं तर असेंच लिहिलें आहे कीं, या कामावरूनच त्यास बहिरी हें नांव मिळालें. असो, कांहीं काळानें तो दरबारांत मोठी योग्यता पावून पहिल्या प्रतीचीं कामें त्यास मिळालीं; आणि अश्रफ हुमायून आणि निजाम उल्मुल्क हे किताब त्यास प्राप्त झाले. शेवटीं महंमदशाहाचा दिवाण ख्वाजेखान महंमद गवान याची तर याजवर इतकी मर्जी बसली कीं, त्यानें याची शिफारस करून त्यास तेलंगणच्या सुभेदारीवर पाठवून राजमहेंद्री व कंडापिली या दोन प्रांताची जाहागिरी दिली. गवान याच्या वधानंतर त्याचें दिवाणगिरीचें काम व मलिकनायब हा किताब यासच मिळाला, आणि महंमदशाहा मरण पावल्यावर त्याचा पुत्र महंमूदशाहा याचाही दिवाण हाच झाला. त्यासमयीं त्यास शाहानें बीड व दौलताबाद नजीकचे प्रांत आणखी जाहागीर दिले. तेव्हां त्यानें या नूतनसंपादित जाहागिरीवर आपला मुलगा मलिक अहंमद यास नेमिलें. तो जुन्नरास राहून आपल्या जाहागिरीची व्यवस्था पाहात असे. जरी मलिक नाईबानें या जाहागिरीची सनद आपल्या पुत्राच्या नांवानें घेतली होती, तरी त्या प्रांतांत गवानानें नेमलेले मराठे अधिकारी ते महाल त्याच्या स्वाधीन करीनात. या करितां महंमूदशाहा जेव्हां प्रौढावस्थेंत आला, तेव्हां त्या-

नें शिवनेरी किल्यावर हल्ला केला.

शिवनेरी किल्ला डोंगराच्या अगदीं माथ्यावर असून मोठा बळकट आणि अवघड होता. त्यास पुष्कळ दिवस वेढा दिल्यानंतर आंतील मराठे शिबंदीनें कौलानें किल्ला स्वाधीन केला.तेव्हां त्यांत महाराष्ट्र आणि कोंकण या प्रांतांचा पांच वर्षांचा जमा केलेला वसूल सांपडला. इतकी रकम मलिक अहंमदाच्या हातीं येतांच तो आतां आपले इष्ट हेतु कोणत्या उपायानें सिद्धीस न्यावे, या विचारास लागला. त्यानें आपल्या हुद्देदारांस व शिपायांस पुष्कळ बक्षिसें दिलीं, व जे कित्येक दुसरे किल्ले स्वाधीन होत नव्हते ते घेण्यास तो निघाला. तेव्हां त्यानें चंदन, वंदन, लोहगड, तोरणा, सक्ती, तिकोना, कोंडाणा, पुरंदर, भांडुप, जावधन, कुहरदुर्ग, मनरंजन माहुली आणि पाली हे किल्ले केवळ आपल्या बाहुबलानें ताब्यांत घेतले. नंतर कोंकणप्रांतही सर करून दंडा राजापूर यास वेढा दिला. याच समयीं त्यास आपला बाप मलिक नाईब निजामउल्मुल्क बहिरी याचा वध झाल्याचें वर्तमान कळलें. त्याबरोबर तो एकदम वेढा उठवून जुन्नरास आला, आणि त्यानें आपल्या बापाचे सर्व किताब आपणास घेऊन अहंमद निजामउल्मुल्क बहिरी हें नांव धारण केलें. याच वेळीं जरी त्यानें शाहा म्हणजे राजा हा किताब धारण केला नाहीं, तरी तेव्हांपासून तो त्याच नांवानें विराजमान होऊं लागला.

अहंमद शिवनेरी व दुसरे किल्ले घेतो.

निजामाचा वध झाल्यावर अहंमद स्वतंत्र होतो.

जुन्नरास आल्यावर तो बापाचे प्रेतविधी वगैरे सर्व संस्कार करून आपल्या हाताखालील मुलखाची उत्कृष्ट व्यवस्था करण्यांत इतका गुंतला कीं, त्याच्या राज्यांतील एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत पाहिजे तिकडे काठीस सोनें बांधून फिरावें, इतका त्यानें सर्वोत्तम बंदोबस्त ठेविला. त्याच्या अमलांत त्याच्या हुकुमाशिवाय गवताची काडी देखील हालत नसे. इतकी त्याची सर्वांवर दहशत असे. तो तेलंगणच्या सुभेदारीवर असतांना ओरिसा प्रांतावर जी स्वारी झाली, तींत त्यानें मोठा पराक्रम केला, व लोकांनीं वाहवा करण्यासारखें शौर्य दाखविलें. बाह्मिनी शाहाची जरी त्यावर सैन्य पाठविण्याची उमेद होती, तरी कोणा सरदारास इतकी धमक नव्हती कीं, मी त्या-

याचा बंदोबस्त.

जवर चालून जाईन . यामुळें शाहानें कासिमबेरिदाच्या इतल्यानें

यावर फौजपाठविण्याची खटपट.

युसफ आदिलखान सवाईस दोन तीन हुकूम पाठविले कीं, ख्वाजा जाहान दक्षणी व झैनउद्दीन तालीश यांस बरोबर घेऊन जुन्नरावर स्वारीस जावें. आदिलखानानें हे हुकूम जुमानले नाहींच; परंतु उलटी अहंमद निजामशाहास त्याची खबर देऊन अहंमदाच्या प्रांतांत इंदापूर येथें जी त्याची कांहीं फौज होती, ती तेथून काढून विजापुरीं नेली.

अहंमद निजामशाहानें सरीफ उल्मुल्क या अफगाणास आपला 'अमीर उल्मुल्क' केलें आणि नसीर उल्मुल्क यास 'मीर जुमला'

अहंमदावर बाहामिनी फौज येते.

नेमिलें. नंतर तो झैनउद्दीन तालीश यास अनुकूळ करण्याच्या उद्योगास लागला. झैनउद्दिनानें प्रथमारंभीं त्याचें बोलणें मान्य केलें. परंतु जेव्हां शेख मोलीद या बाहामिनी सरदारानें अहंमदावरील स्वारीचें अधिपत्य घेतलें, आणि तो जुन्नराकडे येण्यास परिंड्यापर्यंत आला असें कळलें, तेव्हां आपला बेत फिरवून बाहामिनीशाहाकडून आलेल्या सैन्यास जाऊन मिळण्याचा त्यानें निश्चय केला. बाहामिनी फौज जवळ येतांच निजामशाहा आपल्या बायका मुलांस शिवनेरी किल्यांत ठेवून युद्धास निघाला, परंतु बाहामिनीशाहाकडील प्रचंड सैन्याशीं उघड मैदानांत आपला टिकाव लागणार नाहीं, हें तो पक्कें समजून आपल्या स्वारांसह शत्रूच्या सैन्याच्या आसपास हल्ले करीत फिरूं लागला. त्यांस त्यानें दाणापाणी कडीकबाड मिळण्याचें बंद केलें, आणि ८।१० मैलांचा छटादेऊन तळ देई, व आपल्यावर छापा न पडावा याबद्दल खबरदारी घेई. याच वेळीं झैनउद्दिनानें आपलें वचन मोडून बाहामिनीशाहाकडील फौजेस मिळण्याचा निश्चय केल्याचें समजलें. तेव्हां जर साधेल तर तसें न होऊं देण्याविषयीं यत्न करावा, असें अहंमदानें मनांत आणिलें, आणि ईश्वरकृपेनें त्यांत त्यास यशही आलें. तो आपल्या फौजेचा तळ एकाएकीं रात्रीचा सोडून निघाला, तो थेट चाकण किल्याशीं आला. झैनउद्दिनाचें जाहागिरीचें व राहण्याचेंही स्थान हेंच होतें. तेथें पोहोंचतांच क्षणभरही न विसंबतां शिड्या लावून स्वतः किल्यावर चढला.

त्याबरोबर चिलखतें घातलेले दहा असामी होते. यांच्या वरती येण्याची किल्यांतील शिबंदीस दाद लागेपर्यंत सर्वी असामी वर पोहोंचले. त्यांनीं शिबंदीवर एकदम हल्ला करून कत्तल उडविण्यास सुरुवात केली, तेव्हां तिनेंही बराच दम धरिला. परंतु तयारी नसल्या कारणानें तिचा उपाय चालला नाहीं. शेवटीं खुद्द झैनउद्दीन मारला जाऊन चाकण किल्ला अहंमदशाहास मिळाला, आणि शिबंदीचे सातशेंहून जास्त लोक ठार मारले गेले.

अहंमद चाकणावर छापा घालून झैनउद्दिनास मारितो.

अहंमदशाहा जेव्हां चाकणाकडे गेला, तेव्हां त्यानें आपलें रात्रीचें सैन्य नसीरउल्मुकाच्या ताब्यांत देऊन त्यास शेख मोलीदाच्या पाळतीवर राहण्याविषयीं बजाविलें होतें. परंतु त्यानें वेडेपणानें बाहामिनी फौजेवर दोन वेळ हल्ले केले, आणि दोन्ही वेळ तो पराभव पावला. ही बातमी अहंमदास समजतांच तो चाकणाहून मागें वळला व एके दिवशीं बाहामिनी फौजेस बेसावध पाहून त्यानें तिजवर हल्ला केला. त्यांत मात्र त्या फौजेची धांदल होऊन अहंमदास जय मिळाला. या चकमकींत शेख मोलीद व दुसरे मोठमोठे सरदार पडले, आणि त्यांचें सामान, हत्ती, तंबू, राहुट्या वगैरे अहंमदशाहास मिळालें. याप्रमाणें अहंमदशाहा जयवंत होऊन जुन्नरास आला, व आपल्या प्रजेच्या हिताकडे चांगली नजर पुरवूं लागला.

अहंमद बाहामिनी फौजेचा पराभव करितो.

शेख मोलीदाचा पराभव झाल्यानंतर महंमूदशाहा बाहामिनीनें अझमत उल्मुल्काकडे १८ हजार स्वार देऊन त्यास अहंमदशाहावर नेमिलें. तेव्हांही अहंमदशाहा शत्रु सैन्याशीं सामना न करितां अहंमदनगराजवळ कंदुराबादच्या पहाडांत सर्व सैन्य घेऊन गेला. त्याच्या मागें अझमतउल्मुल्क येत असतां तो मोठी घांटांत पोंहोंचण्याच्या सुमारास अहंमदानें मोठमोठ्या मजला करून तीन हजार स्वारांनिशीं बेदरावर छापा घातला, व पहारेकऱ्यांस वश करून एका रात्रींत शहरांत प्रवेश केला; आणि आपल्या वडिलांच्या कुटुंबांतील बायकांस रात्रीच्या रात्रीं हस्तगत करून घेऊन सुरक्षीतपणें जुन्नरास् रवाना केलें. दुसऱ्या दिवशीं जे सरदा-

अहंमद बेदराव-र छापा घालतो व सरदारांच्या स्त्रियांस कैद करूं न देतो.

र आपणावर स्वारी करण्यास आले होते, त्या सर्वांच्या बायकांस पकडून त्यांची चांगली अदब ठेवून कोणासही नांव ठेवण्यास जागा उरूं न देतां तो त्यांसह तेथून निघाला. बाहामिनी फौजेपाशीं अहंमदशाहा दाखल होतांच बाहामिनी सरदारांनीं त्यास असा निरोप पाठविला कीं, "जरी आमच्या स्त्रियांशीं आपण उत्तम रीतीचें वर्तन ठेविलें, तरी आपल्याशीं लढण्यास आम्हांस शरम वाटावी. परंतु चोरासारखें आम्हांपुढून पळून जाऊन आमच्या बायकांशीं तुम्हीं लढलां, याची खरोखरच तुम्हांस शरम वाटावी. निदान आमच्या मतें तरी तुम्हांसारख्यांस हें करणें शोभलें नाहीं." असो. अहंमदशाहानें बाहामिनी सरदारांच्या सर्व स्त्रियांस त्यांच्या नवऱ्याकडे पाठविलें, आणि तो परिंड्यास गेला. इतक्यांत बाहामिनी शाहाकडून बाहामिनी सरदारांस मोठ्या रागाचें पत्र येऊन पोहोंचलें कीं, "बहिरी ससाण्याच्या शिकारखान्यावरील जो यःकश्चि-

सरदारांस शाहाचें पत्र.

त निजाम त्याचा पुत्र अहंमद बहिरी त्यास बहिरी ससाण्याप्रमाणें माझ्या फौजेनें उच्च उड्डाण करूं दिलें, आणि तुम्हीं आपआपल्या घरट्यांत भयाभीत होऊन कांपत राहिलां. त्याच्या झडपेंतून तुम्हांस आपल्या बायकापोरांस देखील बचावतां आलें नाहीं, यामुळें तुमच्या शिपायगिरीस किती कालिमा आला! मला वाटतें यानंतर तुम्हांस लोकांत तोंड दाखविण्यास सुद्धां शरम वाटावी. आतां तरी तुम्हीं अहंमदास पकडून कैद केल्यास बरें. नाहीं तर उद्यां अवघे लोक तुम्हांस छिः थूः करितील!"

हें पत्र पाहतांच बाहामिनी सैन्यानें बीड येथें मुक्काम करून आपल्यावरील आरोप टाळण्याकरितां असें उत्तर पाठविलें कीं, "अहंमद जेथें असेल तेथें त्यावर घाला घालण्यास आम्ही तयार आहों; परंतु आमचे सेनापति अझ्मत उल् मुल्क यांनीं अहंमद जातो कोठें? करतो काय? व करणार काय? याची बातमीच बरोबर ठेविली नाहीं. जर त्यांच्या जागीं

महंमुदशाहा निजामावर जाहांगीरखानास नेमितो.

दुसऱ्या हुषार सरदाराची नेमणूक होईल तर आम्हांस आमची कर्तबगारी दाखविण्याचा प्रसंग सांपडून सरकारच्या पुण्यप्रतापानें यशच संपादन होईल." हें पत्र पोहोंचल्यावर महंमूदशाहानें तावडतोब अझमत उल् मुल्कास परत बोलावि-

लें, आणि त्याच्या जागीं तेलंगणचा सुभेदार जाहांगीरखान यास ने-मिलें. या पराक्रमी व नांवाजलेल्या सुभेदारानें बीड येथें जाऊन सैन्यासह परिंड्यावर कूच केलें. परिंड्याचा सुभेदार ख्वाजा जहान यास अहंमद निजामशाहावर शस्त्र उचलणें वाईट वाटून त्यानें आपला मुलगा अझीमखान यास निजामशाहाकडे पाठविलें, आणि आपण किल्याचे दरवाजे बंद करून बंदोबस्तानें आंत राहिला.

या अडचणीच्या प्रसंगीं अहंमद निजामशाहानें वऱ्हाडच्या इमाद उल्मुल्का पाशीं कुमक मागितली, आणि तो जुन्नराकडे मागें हटला. इतक्यांत जाहांगीरखानानें पैठण घेतलें. तेव्हां अहंमद जिहूरकडे वळला. तेथें त्यास जालन्या (कंदुराबाद) हून थोड्याशा फौजेनिशी नसीर उल् मुल्क गुजराथी येऊन मिळाला. त्यानें बरोबर बरीच सामुग्री आणिली होती, तरी जिहूर घांटाची नाकेबंदी करून अहंमद सैन्यासुद्धां पाहाडांतच राहिला. या अवसरांत जाहांगीर देउळगांवच्या घांटानें त्या पहाडापलीकडे गेला, आणि बिणगर (पुढें येथें अहंमदनगर शहर बसविलें.) येथें छावणी देऊन राहिला. अशीं दोन्हीं सैन्यें सामान करितां एक महिना आपापल्या तळावर पडून होतीं. कारण पर्जन्यकाळ सुरू झाला होता, आणि आपण मध्यें असल्यामुळें परिंड्याहून अहंमदशाहास मदत येण्यास वाटच राहिली नाहीं. आपण आतां अगदीं निर्भय आहों, असा जाहांगीरखानाचा समज होऊन पर्जन्यकाळ चैनींत घालविण्याचा त्यानें निश्चय करितांच सैन्यानेंही त्याचाच कित्ता वळविण्यास आरंभ केला.

अहंमदशाहानें पुष्कळ हेर ठेवून शत्रूपक्षांकडील यथातथ्य माहिती मिळविण्याची तजवीज राखिली होतीच, व तोही स्वतः फार सावधगिरीनें वागत असे. यामुळें शत्रूकडील बेसावधपणा पाहून त्यानें ख्वाजाजहान याचा मुलगा अझिमखान यास बरोबर घेऊन सन १४८९ (हि. स. ८९५) च्या रज्जब महिन्याच्या तिसऱ्या तारखेस शत्रुसैन्यावर एकदम छापा घातला. त्यावेळीं पहांट असून लोक साखर झोपेंत गुंग व बेसावध होते, यामुळें अहंमदशाहास चांगलें फावलें. त्यानें शत्रूच्या गोटांत शिरून बाहामिनी फौजेची कत्तल आरंभिली. जाहांगीरखान,

जाहांगीरखानावर छापा व त्याच्या फौजेची कत्तल.

सय्यद एझाक, सय्यद लुटफउल्ला, निजामखान, फत्तेखान इत्यादि बहुतेक सरदारांस ठार मारिलें. ज्यांस कैद केलें होतें, त्यांची रेड्यावर बसवून धिंड काढिली, आणि त्यांस वेदरास जाऊं दिलें. या प्रमाणें हिकमतीनें अहंमदानें जय मिळवून त्यास 'बागेचा जय' असें नांव दिलें. आणि तेथें एक शोभायमान वाडा बांधून त्या सभोंवती सुंदर बगिंचा केला. या जयाबद्दल अहंमदानें अल्लाचे फार आभार मानिले, व तेथें एक खेडें वसवून तें साधूंस राहण्यास इनाम देऊन तो स्वस्थपणें जुन्नरास आला. त्यानें युसफ आदिलशाहाच्या सल्यानें खुतब्यांतून बाहामिनी शाहाचें नांव गाळून आपल्या नांवानें खुतबा पढण्याचा हुकूम दिला, आणि श्वेतछत्र धारण केलें. परंतु ख्वाजा जहान व दुसऱ्या कांहीं अधिकाऱ्यांच्या आग्रहास्तव त्यानें खुतब्यांतून आपलें नांव गाळिलें, तरी श्वेतछत्र टाकिलें नाहीं. त्याजबद्दल त्यानें बाह्यतः लोकांस असें कळविलें कीं, राजाचा डौल मिरविण्याकरितां छत्र धारण केलें नसून सूर्याच्या तापापासून रक्षण व्हावें, एतदर्थ घेतलें आहे. त्यावरून त्याच्या सरदारांनीं त्यास विचारिलें कीं, जर असें आहे तर मग आम्हांसही छत्र धारण करण्यास हरकत नाहीं. त्यांसही त्यानें सल्ला दिली. त्या वेळेपासून दक्षणेंत छत्राच्या संबंधानें राजा व प्रजा यांचा भेद नाहींसा झाला. फक्त राजछत्राचा रंग आंतून लाल असे, व इतरांचा सफेत असे. ही चाल फेरिस्ताच्या वेळीं दक्षणेंत चालू झाली, परंतु हिंदुस्थानांत झाली नाहीं. पुढें त्याच्या कामगारांनीं आपण होऊनच अहंमदशाहास "शाहा" किताब धारण करण्यास आग्रह केला. तेव्हां केवळ तुमच्या आग्रहास्तव आतां मला तसें करणें भाग पडतें, असें म्हणून पुनः खुतब्यांत त्यानें आपलें नांव घातलें.

तो श्वेतछत्र धारण करितो.

अहंमद आपल्या नांवानें खुतबा पढवितो.

अहंमद निजामशाहानें चौल जवळचें राजपुरी बंदर घेण्याचा निश्चय केला, व त्यास पुष्कळ दिवस वेढा दिल्यावर तें स्वाधीन झालें. याप्रमाणें सर्व कोंकण प्रांत ताब्यांत घेतल्यावर तो दौलताबाद शहर क-

---

+ तो बाग त्याच्या मागून झालेल्या शाहांनीं उत्कृष्ट सुधारून त्यास "निजाम बाग" असें नांव दिलें.

सें हातारवाली घालावें; या विचारास लागून तेथील **सुभेदारास** अनुकूल करण्याच्या उद्योगास प्रथम लागला.

**मलिक वज्जी** व **मलिक अश्रफ** असे दोघे बंधु आरंभीं **महंमदगवानापाशीं** नोकर होते. तो मेल्यावर **महंमदशाहा** बाह्मिनीनें त्यांस शिलेदार केलें, आणि शेवटीं **अहंमद निजामशाहाचा** बाप **निजाम बहिरी** याच्या आश्रयानें त्यांस सरदारी मिळाली. त्यानें **मलिक वज्जीस** दौलताबादचा सुभेदार नेमिलें, आणि त्याचा भाऊ **मलिक अश्रफ** यास त्याखालील प्रांताची सुभेदारी दिली. याच संधीस बाह्मिनी दरबारच्या घालमेलींत एका मराठे सरदारानें जालंन्याचा किल्ला घेतला होता, तो **मलिक-अश्रफानें** घेऊन त्या प्रांतांतील मराठे पाळेगारांचा पुंडावा व लुटालूट अगदीं बंद केली. या दोघांनीं असा उत्तम बंदोबस्त ठेविला कीं, दौलताबादेच्या आसपास ज्या रामोशांनीं कितीएक वर्षें धुमाळी माजविली होती, त्यांची त्यांनीं पुरी खोड जिरविली. यामुळें इतकी स्वस्थता झाली कीं; सुलतानपुर, नंदुरबार, बागलाण आणि गुजराथ या प्रांताच्या सरहद्दीवरील रस्त्यांनीं हत्यारबंद लोकांचा पाहारा न घेतां व्यापारी व प्रवासी निर्भयपणें जाऊं येऊं लागले. त्यांच्या कारकीर्दींत लोक फार सुखी होऊन देश आबाद झाला. **निजामबहिरीच्या** आश्रयानें आपण इतक्या नांवारूपास आलो, हें स्मरून ते दोघेही बंधु **अहंमद निजामशाहा** याच्याशीं मोठ्या स्नेहानें वागत, आणि तो स्नेह कायम करण्यास्तव निजामबागच्या विजयानंतर **अहंमद निजामशाहानें** आपली बहीण **बिब्बीझीनत** इचें **मलिक वज्जीशीं** लग्न लाविलें, व त्यासून तीस एक पुत्रही झाला. तेव्हां **अश्रफानें** आपला भाऊ **वज्जी याची** सुभेदारी मिळवून स्वतंत्र राज्यस्थापनेची जी त्याची फार दिवसांची इच्छा होती; ती परिपूर्ण करून घेण्याकरितां त्यानें बाप व लेंक या उभयतांस क्रूरपणानें ठार मारिलें!! नंतर तो दौलताबाद घेऊन स्वतंत्रपणानें वागूं लागला, आणि बऱ्हाणपूर, वऱ्हाड व गुजराथ या देशांच्या राजांशीं त्यानें मित्रत्व जोडिलें. आपला नवरा व मुलगा यांचा वध होतांच **बि-**

दौलताबादचा सुभेदार मलिक-वज्जी.

त्याचें अहंमदशाहाच्या मुलीशीं लग्न

त्याचा भाऊ अश्रफ वर्जीस मारून दौलताबाद घेतो, व स्वतंत्र होतो. इ.स.१४९३.

**बीबीझीनत** आपल्या भावाकडे जुन्नरास गेली, आणि बहिणीच्या मुलाच्या वधाचा सूड उगविण्यास **अहंमद** सैन्य घेऊन दौलताबादेकडे **मलिक अश्रफा**वर स्वारी करण्यास इ.स. १४९३ सालीं निघाला. तो जों निजामबागेस पोहोंचला नाहीं. तोंच त्यास **कासिमबेरिदा**कडून पत्रें आली कीं, "**युसफ आदिलखाना**नें बेदरास वेढा दिला आहे, याकरितां तुम्हीं कुमकेस यावें; आणि या प्रसंगीं तुम्हीं आम्हांस सहाय्य केल्यास दौलताबाद सर करण्यास तुम्हांस आम्हांकडून मदत मिळेल." तेव्हां त्यानें दौलताबादचा रस्ता सोडून बेदरास प्रयाण केलें, आणि तेथून तो बेदरचा वेढा उठवून दवलताबादेकडे वळला. त्या किल्यास दोन महिने वेढा दिला तरी किल्ला दाद देईना. अशी त्याची खात्री होऊन तो पुनः जुन्नरास गेला. वाटेंत त्यानें बिंकर या गांवीं मुक्काम केला. तें खेडें दौलताबाद व जुन्नर यांच्या अगदीं मध्यभागीं आहे, असें पाहून येथेंच आपली राजधानी केल्यास दौलताबाद सर होईपर्यंत आसमंतात् सैन्य पाठवून आसपासचा मुलूख ओस पाडीत राहिल्यास खचित आपला फायदा होईल, असें त्यास दिसलें. आणि याच उद्देशानें तेथें शहर वसविण्याचा सन १४९४ सालीं त्यानें पाया घातला.

अहंमदनगर शहर वसवितो इ. स. १४९३

या शहरास त्यानें आपलें म्हणजे '**अहंमदनगर**' असें नांव दिलें. तेथें **अहंमदा**नें व त्याच्या हाताखालील मंडळीनें दोन वर्षें अश्रांत श्रम घेऊन सुरेख इमारती व वाडे उभारण्यांत इतकी मेहनत घेतली कीं, त्यापुढें बगदाद व कैरो हीं शहरें तुच्छ वाटूं लागलीं! यावेळेपासून अहंमदनगरच्या सैन्याचा दरसाल दोन वेळ दौलताबादेच्या आसपासचा मांत ओस पाडण्याचा पाठच पडून गेला. कारण जो दौलताबादचा किल्ला लढाईनें हातीं येईना, तो दुष्काळपाडून तरी सर करावा, अशी **अहंमदशाहा**ची उत्कटेच्छा होती.

**महंमद अश्रफा**नें गुजराथच्या **महंमूदशाहा**ची दोस्ती करून त्यापाशीं मदत मागितली. तेव्हां तो सैन्य घेऊन खानदेशचा सुलतान **आदिलखान फरूकी** यास जिंकण्याकरितां व **मलिक अश्रफास अहंमद निजामशाहा** विरुद्ध सहाय्य करण्यास इ. स. १४९४ सालीं नि-

घाला. जेव्हां महमुदशाहा बेगर सुलतानपुरास येऊन पोंचला, तेव्हां आदिलखान फरूकीनें इमाद उल्मुल्क आणि अहमद निजामशाहा या दोघांचेंही सहाय्य मागितलें. तेव्हां तूर्त दौलताबाद घेण्याचा नाद सोडून अहमद खानदेशची राजधानी बऱ्हाणपूर येथें १५,००० स्वारांसहीत गेला. बऱ्हाणपुरास आदिलखान, इमादखान व निजामशाहा या त्रिवर्गांची सैन्यें जमलीं. त्या संधीस महंमुदशाहा बेगरची अशरगडास छावणी होती. अहंमदानें आपला सरदार नसीर उल् मुल्क यास महंमुदशाहाच्या गोटांत वकिलीच्या नात्यानें कांहीं कामानिमित्त पाठविलें, आणि तितक्या मुदतींत गुजराथच्या एका महातास लांच देऊन एका मस्त हत्तीस सोडून देण्याचें कबूल करून घेतलें. नंतर नेमल्या रात्रीं बाणदार, तिरंदाज आणि बंदूकबारदार असें पांच हजार पायदळ व पांच हजार स्वार घेऊन अहंमदनिजामशाहानें गुजराथच्या फौजेवर एकदम छापा घातला. तितक्याच संधीस मस्त हस्तीही सुटला, यामुळें गुजराथ्यांमध्यें एकच गडबड उडाली. जरीं तिन्ही राजांच्या फौजा एकत्र झाल्या होत्या, तरी त्यांस गुजराथी फौज भारी होती. आपल्यावर हल्ला येणार नाहीं, अशी त्यांची समजूत होऊन गुजराथी लोक निधीस्त आपल्या तंबुराहुट्यांत घोरत पडले होते. परतु दंग्याची गडबड ऐकतांच ते दचकून जागे झाले, इतक्यांत मस्त हत्ती जनानखान्याच्या तंबूकडे घुसला. तेव्हां तेथें बायकांनीं एकच आकांत उडविला. तें ऐकतांच शत्रू गोटांत शिरून आपल्या बायकापोरांची कत्तल करीत असतील, अशा अटकळीवर महंमुदशाहा आपल्या डेऱ्यांतून पळाला, आणि पांच सहा मैलांवर जाऊन राहिला. इकडे दक्षणी शिपायांनीं बंदुकांचा एकसारखा भडिमार लाविलाच होता. शेवटीं जेव्हां गुजराथी सरदारांनीं आपली फौज तेथून काढिली, तेव्हां दक्षणी लोक मागें फिरले. गडबड थोडीशी कमी झाल्यावर गुजराथ्यांनीं शाहाच्या तंबूंत जाऊन पाहिलें, तों तो तेथें नाहीं. म्हणून सर्व सैन्य घेऊन त्याच्या मागून जाण्याचा त्यांनीं बेत केला, आणि ते जाऊन महंमुदशाहास मिळाल्यावर लौकरच तह होऊन अहंमदशाहा दौल-

गुजराथच्या शाहाची खानदेशावर स्वारी व त्याचा पराभव इसवी सन १४९४.

ताबादेकडे निघाला.

या प्रमाणें पुनरपि अडचणींत सांपडल्यावर **अश्रफखानानें महंमूदशाहाकडे** मदत मागितली, आणि त्यास असें वचन दिलें कीं, 'सहाय्य दिल्यास दौलताबादेस खुतबा आपल्या नांवानें वाचवीन, व दरसाल आपल्यास खंडणी देत जाईन.' या बोलण्यास भाळून **महंमूदशाहा** पुष्कळ सैन्यासंहीत तापी नदीच्या कांठीं येऊन उतरला. हें वर्तमान **अहंमदशाहा**स कळतांच तो दौलताबादचा वेढा उठवून अहंमदनगरास चालता झाला. तेव्हां **अश्रफखानानें** वचन दिल्या प्रमाणें गुजराथच्या **महंमूदशाहाचें** सार्वभौमत्व मान्य करून दौलताबादच्या **कुतुबुद्दीन** मशिदींत त्याच्या नांवानें खुतबा वाचविला, आणि त्याच्या छावणींत भेटीस जाऊन त्यास मोल्यवान नजर नजराणे दिले, व दरसाल खंडणी देण्याचेंही कबूल केलें. **महंमूदशाहानें** बऱ्हाणपूरच्या **आदिलखाना**कडील खंडणी वसूल करून परत गुजराथेकडे कूच केलें, ही खबर **अहंमदनिजामशाहा**स समजतांच तो पुनः दौलताबादेस वेढा घालण्यास निघाला. किल्यांतील लोकांस **अश्रफखानानें** गुजराथच्या राजाशीं जें आचरण ठेविलें, तें बिलकुल आवडलें नसल्यामुळें ते फार विथरून राहिले होते. त्यांस **अहंमदशाहाचें** वर्तमान समजतांच त्यांनीं त्यास निरोप पाठविला कीं, 'आम्हीं तुम्हांस मिळण्यास एका पायावर तयार आहों.' **अहंमदशाहा**स गोदातीरीं असतांना हा निरोप कळला. त्याबरोबर तो मजल दरमजल करीत तीन हजार लोकांनिशी दुसरे दिवशीं सकाळीं दौलताबादेस येऊन थडकला, आणि लगेच त्यानें किल्यास गराडा घातला. आपले लोक फितूर होऊन **अहंमदा**स मिळाफी झाले, हें पाहतांच **अश्रफखान** अगदीं गडबडून जाऊन कावराबावरा झाला. त्यास आतां काय करावें हेंही सुचेना. आणि तितक्यांतच त्याची प्रकृति एकाएकीं बिघडून तो पांचवे दिवशीं मरण पावला. नंतर आंतील लोकांनीं **अहंमदनिजामशाहा**च्या स्वाधीन किल्ला केला, आणि त्यानें त्याची डागडुजी करून आपली

अहंमद दौलताबादेस वेढा घालतो व उठवितो.

पुनः वेढा घालतो, व किल्ला घेतो.

फौज तेथील बंदोबस्तास ठेवून अहंमदनगरास प्रयाण केलें. या प्रमाणें त्याचा हेतु सिद्धीस गेल्यावर त्यानें निजामबागेजवळ एक किल्ला बांधून त्यांत हिरव्या व तांबड्या दगडांचा एक वाडा बांधिला. याच वर्षी त्यानें खानदेशांतील अंतूर व दुसरीं ठाणीं घेतलीं, आणि जालना व बागलाण या प्रांतांच्या राजांस जिंकून आपले मांडलिक केलें.

सन १५०७ सालीं बऱ्हाणपूरचा **दाऊदखान फरूकी** निवर्तला व गादीवर कोणास बसवावें, याजविषयीं तंटा उपस्थित झाला. त्यांत **अलमखाना**स गादीवर बसविण्याच्या कामीं बऱ्हाणपूरचा एक मुख्य सरदार **मलिक हीशमउद्दीन** यानें **अहंमद** निजामशाहाची मदत मागितली, आणि याच संधीस गुजराथच्या **महंमूदशाहाच्या** मनांत आपला भाचा **मिरान आदिलखान** जो **हसनखानफरुकी**चा मुलगा त्यास गादीवर बसविण्याचें येऊन तत्प्रीत्यर्थच तो सैन्यासह खानदेशाकडे निघाला होता. याच भानगडींत **मलिक लारम** हा एक तिसरा वारस असून त्याच्या ताब्यांत असरगड असे, व दोघां **फरूकी** शाहाजाद्यांचा माझ्याइतका खानदेशच्या गादीवर हक्क पोहोंचत नाहीं, असें त्याचें म्हणणें होतें. असो, जेव्हां **अहंमद निजामशाहा** व **इमादउल्मुल्क** बऱ्हाणपुरास गेले, तेव्हा त्यांस खरी हकीकत समजली, आणि तापीच्या कांठीं तालनेर येथें **महंमूदशाहा** येऊन दाखल झाल्याचें वर्तमानही कळलें. शेवटीं उभयतांनीं **अलमखाना**च्या मदतीस चार चार हजार स्वार ठेविले, आणि आपण गाविलगडास गेले; व त्यांचे लोकही **अलमखाना**स सोडून आले. तेव्हां दोन्ही राजे आपआपल्या राजधान्यांस जाऊन पोंहोचले. त्यांच्या मागोमाग **अलमखान**ही **अहंमदशाहा**कडे आश्रयार्थ आला. तों तिकडे **महंमूदशाहा**नें **मिरान आदिलखाना**स बऱ्हाणपूरच्या गादीवर बसवून परत गुजराथेंत पोहोंचल्यावर **अहंमद निजामशाहा** आपल्या फौजेसह गुजराथच्या सरहद्दीवर गेला, आणि **अलमखाना**स खानदेशच्या राज्यांतील कांहीं हिस्सा देण्याबद्दल बोलणें करण्यास त्यानें **महंमूदशाहा**कडे वकील पाठविले. गेलेल्या वकिलांची **महंमूदशाहा**नें फार निर्भर्त्सना करून म्हटलें. " बाहामिनी शाहाच्या गुलामास मला बरोबरीच्या नात्यानें लिहिण्यास आणि आपल्या घराबाहेरच्या कामांत ढवळा ढवळ करण्यास

खानदेशच्या गादीविषयीं तंटा.

कोणी अधिकार दिला! हें निंद्य वर्तन जर तुमचा धनी सोडणार नाहीं, तर त्यास मला शासन करणें भाग पडेल. अहंमदशाहाचा जरी इतका अपमान झाला, तरी त्यावेळीं तो तें काम तितकेंच टाकून अल्मरवानासह अहंमदनगरास आला.

सन १५०८ सालीं नसीरउल् मुल्क वजीर वारला त्याच्या जागीं मुकमल्रवान दक्षणी याची नेमणूक केली. नंतर लौकरच शाहाचीही प्रकृति फार बिघडली, आणि आपला ७ वर्षांचा पुत्र बुऱ्हाण निजामशाहा यास गादीचा मालक ठरवून अहंमद निजामशाहा मरण पावला.

अहंमदाचा मृत्यु इ. स. १५०८.

अहंमदाच्या आंगीं इतके सद्गुण होते कीं, त्याचें यथार्थ वर्णन करण्यास आपण असमर्थ आहों, असें फेरिस्ता म्हणतो. तो पहिल्या मतीचा मर्यादशील असून त्याचें एकपत्नीव्रत इतकें असे कीं त्याच्या जोडीचा दुसरा पुरुष मुसलमानांच्या इतिहासांत सांपडणें मुष्कील! रस्त्यानें जाऊं लागल्यास कदाचित् आपली नजर दुसऱ्याच्या स्त्रीवर जाईल, याजकरितां तो कधींही इकडे तिकडे पहात नसे. जेव्हां तो गाविलगड घेण्यास गेला होता, तेव्हां ज्यांस त्यानें कैद केलें होतें, त्यांत एक अति लावण्यवती स्त्री होती. तिजला त्याच्याच सैन्यांतील एका कामगारानें त्यास नजर केली. अहंमदही तिचें लावण्य पाहून मोहित झाला, परंतु जेव्हां तिनें त्यास सांगितलें कीं, मी सभ्रतार असून मला माझ्या कुटुंबासुद्धां कैद केलें आहे, तेव्हां लगेच त्यानें आपला मोह आवरिला. आणि तिला तिच्या आप्तांच्या स्वाधीन करविलें. जर लढाईंत त्याचे लोक लढण्यास मागेंपुढें पाहूं लागले, तर तो त्यांस कधींही अपशब्द न बोलतां बक्षिसाच्या लालुचीनें उमेद आणी. एकदां त्याच्या एका सरदारानें विनोदानें त्यास म्हटलें, 'अशा आचरणानें लोकांवर आपला दाब कधींही बसणार नाहीं.' अहंमदानें 'याबद्दल दुसऱ्या एखाद्या वेळीं बोलूं.' म्हणून म्हटलें, आणि नंतर लौकरच त्या सरदारानें जेव्हां मोठी मर्दुमकी व पराक्रम दाखविला, तेव्हां त्यानें त्यास सत्कारपूर्वक पोषाख देऊन त्याची फार वाहवा केली. आणि म्हटलें "पारध्यांप्रमाणें कुत्रे शिकारीस कसे सोडावे, हें राजाचें राजालाच माहीत.

अहंमदाचा स्वभाव व गुण.

असतें."

एकंगबझीची म्हणजे द्वंद्वयुद्धाची चाल यानेंच प्रथम दक्षणेंत चालू केली. हा स्वतः एका तलवारीनें उत्कृष्ट पट्टा खेळत असे; आणि हाच खेळ त्यास विशेष आवडे. कोणतीही गोष्ट राजास आवडली म्हणजे प्रजा ताबडतोब तिचें अनुकरण करूं लागते, याच नियमास अनुसरून त्यावेळीं लहान थोर लोकांत याच खेळाची अभिरुचि वाढून बहुतेक शहरांत तलवारीचा पट्टा व बोथाटी खेळण्यास शिकण्याचे आखाडे व शाळा स्थापन झाल्या. नगर शहरांत तर गल्लोगल्ली हेच आखाडे प्राधान्य होऊन राहिले होते. जिकडे जावें तिकडे लोक याच गोष्टी बोलत असलेले ऐकूं येई. मोठमोठीं मैदानें चालू होऊन तेथें निरनिराळ्या आखाड्यांतील लोकांची दमचाखी होऊं लागून ज्याचा जय होईल त्यास मोठ मोठीं बक्षिसें मिळूं लागलीं. या प्रमाणें हा खेळ फार वाढून त्यांत मोठे वस्ताद निपजूं लागले. असें होतां होतां या खेळाचा इतका कळस झाला कीं; कोणा दोघांत यःकश्चित् तंटा उपस्थित झाला कीं, त्या उभयतांनीं मिशांवर ताव देऊन म्हणावें "चल, दोन हात करूं, आणि जो हटेल त्याचा पक्ष खोटा असें समजूं." या कृत्यास राजाचेंही उत्तेजन असे. कोणत्याही दोघां अविचारी व हूड मनुष्यांत कलह लागला पुरे कीं; त्यांनीं राजाकडे यावें, व त्या समोर तलवारीनें खेळावें आणि ज्यास प्रथम जखम लागली, तो हरला असा त्या तंट्याचा राजानें निकाल लावावा! बहुतेक लोकांस उत्तेजन मिळत चालल्यामुळें शेंकडों लोक दरदिवस राजापुढें येऊन आपआपलें कसब दाखवूं लागले. शेवटीं शेवटीं एक दोन मनुष्य मरण पावल्याविना दिवसच सुनका जाईनासा झाला, तेव्हां या कुरत्या आपल्या समक्ष करण्याची राजानें मनाई केली. परंतु ज्यांची खुषी असेल त्यांनीं शहरा बाहेर मैदानांत चार हात करून आपले कज्जे मिटवावे, व त्यांत योग्य रीतीनें झुंजत असतां कोणाचा जीव गेल्यास त्याजबद्दल मात्र फिर्याद घेतली जाणार नाही; असा अहंमदानें जाहीरनामा लाविला. ही चाल दिवसांनुदिवस दक्षणेंतील मुसलमानांस इतकी प्रिय झाली कीं, अहंमदनगराहून लौकरच चोंहोंकडे पसरली, आणि बडेबडे काजी, मौ-

द्वंद्वयुद्ध.

लवी, शास्त्री, पंडित, तसेच थोर थोर लोक, सरदार, राजे आपआपले तंटे द्वंद्वयुद्ध करून तोडूं लागले। ज्यांची मुलें या कृत्यास माघार घेत, त्यांस पाजी समजलें जाई. खुद्द विजापूर शहरांत प्रत्यक्ष फेरिस्तानें पाहिलेली अशी एक गोष्ट लिहिली आहे कीं, सय्यद मूर्तिझा व सय्यद हसन हे दोघे बंधु वृद्ध असून त्यांचा विजापूर दरबारीं मोठा मान असे. यांचा दुसऱ्या तीन वृद्ध व दरबारीं हंमेष येणाऱ्या दक्षणीशीं एका क्षुल्लक गोष्टीबद्दल मतभेद पडून तंटा जुंपला. तेव्हां त्याचा निकाल द्वंद्वयुद्धानें करण्याचें ठरलें. प्रथमतः सय्यद मुर्तिझाचा वीस वर्षांचा मुलगा त्या दक्षणीवर चढाव करून गेला, त्यांत दक्षणी मरण पावला. नंतर त्याचा बाप व चुलता असे उभयतां बाकी दोघां दक्षणीशीं लढले;त्यांतही ते दोघे दक्षणी पाडाव होऊन मृत्युपंथास गेले. त्यांस जों मूठमाती देतात, तों हे बापलेंक व भाऊ युद्धांत ज्या जखमा लागल्या होत्या, त्यांनीं मरण पावले!! याप्रमाणें अशा अल्प काळांत ज्यांचें वस्तुतः कांहीं वैमनस्य नाहीं, असे सहा उत्तम गृहस्थ निष्कारणी यमसदनीं गेले.

दक्षणेंतील मुसलमान तरवारीचा पट्टा खेळण्यांत व बोथाटीच्या द्वंद्वयुद्धांत फार तरबेज असतात, व दक्षणेंतील कित्येक संस्थानांत या मतीचे मुसलमान व मराठे लोक अद्याप बरेच आढळतात. घोड्यावर बसून भाला मारण्याचें कसब त्यावेळीं इतकें उदयास आलें नव्हतें. यामुळें मोठमोठ्या लढायांत या कसबाचा कांहींच उपयोग होत नसे.

# बुऱ्हाण निजामशाहा.

इ॰ स॰ १५०८ ते १५५३ प॰

बुऱ्हाण निजामशाहा अल्पवयी गादीवर बसतो.— राज्यकारभाराची व्यवस्था.— कारभाऱ्यांस सरदार त्रासतात.— बुऱ्हाणास पदच्युत करण्याचा यत्न.— बुऱ्हाणाचा विद्याभ्यास.— इमाद उल्मुल्क अहंमदनगरावर स्वारी करितो.— त्याचा पराभव व त्याशीं तह.— पात्री परगण्याबद्दल कलह.— शेख जाफर पेशवा होतो.— बुऱ्हाण याचें विजापूरच्या शाहाजादीशीं लग्न होतें.— विजापुरच्या एस्माएलावर स्वारी.— इमादशाहा पात्री घेतो.— बुऱ्हाण पुनः परत घेतो.— बुऱ्हाण एलिचपुरावर स्वारी करितो.— गुजराथचा बाहादूरशाहा इमादाच्या मदतीस येतो.— बुऱ्हाण याचा पराभव होतो.— बाहादूरशाहा नगरास येतो.— त्यास दुष्ट स्वप्न पडतें व तो निघून जातो.— बुऱ्हाण एस्माएलास कुमकेस बोलावितो.— कंवरसेन ब्राह्मण पेशवा होतो.— गुजराथच्या शाहाशीं तह.— शाहा ताहीर नजरा घेऊन गुजराथेंत जातो.— बुऱ्हाण बाहादूरशाहाची भेट घेतो— मराठे राजांवर हल्ले.— विजापुराशीं लढाई, शाहाचा पराभव व दोहोंचा तह.— सुनी धर्माची स्थापना.— बुऱ्हाण सोलापूर व बेळगांव घेऊन विजापुरावर जातो व पराभव पावतो.— बेदरावर स्वारी करून जय पावतो— बुऱ्हाण रामराजाशीं तह करून कल्याणीस वेढा घालतो.— बुऱ्हाण व रामराजा यांचा विजापूर जिंकण्याचा बेत.— बुऱ्हाणाचा मृत्यु— त्याचीं आपत्यें.

---

बुऱ्हाण निजाम यांच्या अल्पवयांत राज्याची व्यवस्था.

बुऱ्हाण निजामशाहा गादीवर बसला तेव्हां त्याचें वय अवघें सात वर्षांचें होतें. म्हणून **अहंमद निजामशाहा**नें त्याचा पेशवा व अमीर जुमला **मुकमलखान दक्षणी** यासच राज्यकारभार चालविण्यास नेमून त्याचा मुलगा **मिआन जमानउद्दीन** ह्यास **'अझीझ् उल्मुल्क'** हा किताब दिला आणि सरनोबत केले. मु-

**कमलखान** हुषार, चतुर, मसलती, व राजकार्यधुरंधर असून मोठा शूर असे. या बापलेकांनीं **बुऱ्हाण निजामशाहाचा** राज्यकारभार उत्तम रीतीनें चालवून चांगला बंदोबस्त ठेविला, यामुळें या राज्याचें वजन दिवसानुदिवस विशेष वाढूं लागलें. परंतु तें इतर सरदारांस असह्य होऊन त्यांतूनच **अझीज उल्मुल्क** हा फारच बेपर्वाईनें वागूं लागला. यामुळें दरबारचे कितीएक

कारभाऱ्यांस सरदार त्रासतात.

सरदार फार त्रासले, आणि **रूमीखान**, **करीमखान**, व **मीरखान** यांनीं **मुकमलखान** आणि **मिआनजमाल** यांजकडील अधिकार काढून घेण्याचें मनांत आणिलें. त्यांनीं असा विचार केला कीं, **बुऱ्हाणशाहास** पदच्युत करून त्याचा धाकटा भाऊ **राजाजु** यास गादीवर बसवावें, म्हणजे आपोआपच **मुकमलखानाचा** नाश होईल? याकरितां **बुऱ्हाणाच्या** आईजवळ तिच्या वहाल मर्जीतील **बिब्बी ऐशा** म्हणून एक दाई होती, तिला वश करून **राजाजूस** आपल्या स्वाधीन करण्याविषयीं त्रिवर्ग सरदारांनीं तिची कबुली घेतली, आणि ती राजपुत्रास मुलीचा वेष देऊन मेण्यांत घालून शहराकडे निघाली. ती गेली मात्र इतक्यांत राणी मुलास घेण्यास म्हणून गेली, तों मुलगा कोठें नाहीं. सर्व नोकर ही खबर ऐकतांच फार गडबडून गेले. राजवाड्यावरील

बुऱ्हाणास पदच्युत करण्याचा यत्न.

पहारेकऱ्यांस याजविषयीं कांहीं माहीत नव्हतें. जिकडे तिकडे राजपुत्रास लोक शोधूं लागले. कोणीं म्हणाले विहिरींत पडला असेल, कोणी तर्क केला हौदांत असेल, तेव्हां हौद व विहिरी यांची शोधाशोध सुरू झाली.

**राजाजु बिब्बि ऐशास** आपली आजी असें समजे. ती त्यास आपणाबरोबर नेहमीं शहरांत नेई, व कधीं कधीं दोन तीन दिवस त्यास घेऊन शहरांतच राही. यामुळें कितीएक जासूद तिचा शोध करीत गेले, आणि त्यांनीं तिला व राजपुत्रास परत आणिलें. तेव्हां दाईनें लगेच सांगितलें कीं, मी नित्याप्रमाणें राजपुत्रास घेऊन सहज शहरांत जात होत्यें. पुढें कांहीं दिवसांनतर ती राजपुत्रास सरदारांच्या मसलतीनें शहरांत नेत होती, ही गुप्त बातमी जेव्हां उघडकीस आली, तेव्हांपासून दिवाणानें राजपुत्रावर चौकी पाहारा ठेवून त्याजविषयीं बंदोबस्त ठेविला.

**बुऱ्हाण निजामशाहास** विद्या शिकविण्याची फार चांगली तजवीज केली होती. त्यास १० व्या वर्षींच कविता चांगली सुरावर म्हणतां व

ऊन वाचतां येऊं लागलें; आणि मजकूर जुळविण्याचेंही बरेंच सामर्थ्य आलें. अहंमदनगर येथील पुस्तकसंग्रहालयांत **बुऱ्हाण-शाहानें** त्या वेळच्या राजांचें कर्तव्यकर्मांवर लिहिलेला निबंध **फेरिस्ता** इतिहासकारानें स्वतः पाहिल्याबद्दल लिहिलें आहे. यानंतर कांहीं वर्षांनीं **मुकमलखान** पेशव्याचे शत्रु आठ हजार लोकांनिशीं अहंमदनगर सोडून चालते झाले, आणि **अल्लाउद्दीन इमाद-उल्मुल्क** याचे दरबारीं नोकरीस राहिले. त्यांनीं त्यास **बुऱ्हाण निजामशाहाच्या** मुलखावर स्वारी करण्यास चेतविलें. अहंमदनगरचें राज्य घेण्यास ही संधि चांगली आहे, असें पाहून **अल्लाउद्दिनानें** मोठी फौज घेऊन एलिचपुराहून निजामशाही सरहद्दीवर कूच केलें. **मुकमलखानानें** परिंड्याचा सुभेदार **ख्वाजाजहान** दक्षणी याची कुमक घेऊन, बालराजासह त्याच्याशीं सामना करण्याची तयारी केली, आणि सन १५१० त दोन्ही सैन्यांची **राणुरी** शहरापाशीं चकमक झाली. तींत **इमाद-उल्मुल्काचा** पराभव झाला, व त्यास आपले हत्ती, घोडे व बाजारबुणगे मागें टाकून एलिचपुरास पळून जावें लागलें. या लढाईंत **बुऱ्हाण निजामशाहा** आपला शिक्षक **अरदुखान** याच्या पुढें घोड्यावर बसून हजर होता. निजामशाही फौज **इमाद-उल्मुल्काच्या** मागें लागून एलिच-पुराकडे गेली, तेव्हां तो बऱ्हाणपुरास आला. आणि मध्यस्ती करून तह ठरविण्यास खानदेशच्या सुलतानास त्यानें भीड घातली. मुसलमानांनीं परस्परांत लढणें हें **पैगंबरी** धर्मविरुद्ध आहे, यास्तव तह करणें योग्य, म्हणून खानदेशच्या सुलतानानें **मुकमलखानास** कांहीं विद्वानांबरोबर सांगून पाठविलें, व शेवटीं तह ठरला.

बुऱ्हाणाचा विद्याभ्यास.

इमाद-उल्मुल्काची अहंमदनगरावर स्वारी.

त्याचा पराभव व तह.

असें सांगतात कीं, निजामशाही घराण्याचे मूळ वंशज पाथ्री गांवीं राहात असत. पुढें कांहीं कारणानें या वंशांतील पाथ्री गांवचा एक कुळकरणी विजयानगरास जाऊन राहिला. तेथून त्याचा एक वंशज **निजाम** बेदरास आला, व त्याचा पुत्र **अहंमद** यानें निजामशाही राज्य संपादिलें. याप्रमाणें जेव्हां त्या घराण्यांतील पुरुष राज्यपद पावला, तेव्हां त्याचे आप्त अहंमदनगरास आले, आणि त्यांनीं निजामशाही सरकारास अशी विनंति केली कीं, पाथ्री गांवचे आपले पुरातन हक्क

आपणास मिळावे, अशी आमची इच्छा आहे. पाथ्री गांव हा जरी व-ऱ्हाडच्या राज्यांत होता, तरी निजामशाही सरहद्दीवरच होता. त्यांचें मा-गणें मुकमलखानास योग्य वाटून त्यानें बुऱ्हाणशाहाच्या वतीनें इ-माद उल्मुल्कास असें पत्र लिहिलें कीं; "पाथ्री परगण्यांत निजामशा-ही घराण्याचे पुरातन हक्क असल्या कारणानें तो परगणा मेहेरबानीनें आ-

पाथ्री परगण्या- बद्दल कलह.

म्हांस देऊन दुसरा पाहिजे तो परगणा तेवढ्याच किंवा त्याहून जास्त वसुलाचा मोबदला घ्यावा." इमादशाहा-नें ही गोष्ट नाकारिली, आणि कदाचित् याच कारणावरून लढाईचा म-संग आल्यास आपली तयारी असावी, एतदर्थ पाथ्री गांवीं एक म-जबूत किल्ला बांधण्याचें काम सुरू केलें. जरी आपलें करणें रास्त ना-हीं असें मुकमलखानानें त्यास कळविलें, तरी त्याचा कांहीं एक उ-पयोग झाला नाहीं, किल्ला पुरा झाल्यावर मुकमलखान त्यानजीकचीं वेरूळचीं लेणीं पाहण्याच्या मिषानें दौलताबादेस गेला, आणि पाथ्रीव-र छापा घालून त्यानें तो किल्ला घेतला, व मिआन महंमद घोरी या-स 'कमालखान' हा किताब देऊन त्याच्या ताब्यांत तो दिला.

बुऱ्हाणशाहा मोठा झाल्यावर अमीना या नांवच्या एका कलावंति-णीच्या सुस्वीवर त्याची प्रीति बसून तिशीं त्यानें लग्न केलें, आणि ति-ला सर्व जनानखान्यांत प्रमुख स्थान दिलें. तिच्या सहवासानें त्याला दा-रू पिण्याचें व्यसन लागलें. आपला राजा असा बिघडत चालला, हें पा-हून मुकमलखानानें त्याजकडे जाऊन त्याच्या पुढें निजामशाही सर-कारचे शिक्के मोर्तबें ठेवून, "सरकार लहान होते तेथपर्यंत यादासानुदा-सानें इमानें इतबारें नोकरी करून राज्यकारभार पाहिला, आतां आप-ण राज्यभार वाहण्यास सामर्थ्यवान् झालां, करितां मला सरकारच्या का-मांतून मुक्त करण्याची मेहेरबानी करावी," असें म्हटलें. तेव्हां बुऱ्हा-

शेख जाफर पे- शवा होतो.

णशाहानें त्यास रजा देऊन त्याच्या पुत्रास मोठ्या प-दवीस चढविलें, आणि शेख जाफर दक्षणी यास आपला पेशवा केलें.

सन १५२३ त शाहा ताहीर या पंडिताच्या मध्यस्थीनें बुऱ्हाण नि-जामशाहा व इस्माएल आदिलशाहा यांची सोलापूरच्या किल्यांत मुलाखत झाली. त्या भेटींत इस्माएल आदिलशाहाची बहीण बि-

र्बी मरीयम सुलताना इचें बुऱ्हाणशाहाशीं लग्न ठरून समारंभ मोठ्या थाटमाटानें झाला. असें दिसतें कीं; लग्नाचा ठराव करते वेळीं आसदखान बेळगांवकर यानें बुऱ्हाणशाहास सोलापूरचा किल्ला वर दक्षणेंत देण्याचें वचन दिलें असावें, परंतु इस्माएलानें त्यास रुकार दिला नव्हता. आणि असा ठराव करण्याचा अधिकार मी आसदखानास दिला नव्हता, असेंही तो म्हणाला. तेव्हां शाहा ताहीर याच्या आग्रहास्तव बुऱ्हाणशाहा तें मागणें सोडून अहंमदनगरास गेला. बुऱ्हाणाच्या अमीना पट्टराणीचें जनानखान्यावरील वर्चस्व विजापूरच्या राजकन्येस असह्य होऊन त्याजबद्दल तिनें आपल्या भावाकडे कागाळी केली. तेव्हां इस्माएलानें अहंमदनगरच्या वकिलास सांगितलें कीं, "असें करणें अगदीं गैरशिस्त असून या पासून दोन्ही सरकारांत विनाकारण वैमनस्य उद्भवेल." हा निरोप बुऱ्हाणशाहास बिलकूल रुचला नाहीं. त्यानें बेदरचा बेरीदशाहा व वऱ्हाडचा इमादशाहा यांशीं स्नेह संपादून सन १५२८ सालीं इस्माएलावर स्वारी करण्यास तो सोलापूरच्या रोखानें आला. तेव्हां इस्माएलही नऊ हजार स्वार घेऊन त्यावर गेला. सरहद्दीवर उभय सैन्याची मोठी लढाई होऊन अंगावर शाहारे उठण्यासारखा रक्तस्राव झाला. आसदखानानें इमादशाहाची फळी फोडून कत्तल आरंभिली, तेव्हां त्यानें पळ काढला. बुऱ्हाणशाहासही उष्मा अति दुःसह होऊन पालखींत घालून समरभूमीवरून न्यावें लागलें. या प्रमाणें बुऱ्हाणशाहाच्या पहिल्याच मोहिमेंत त्यास असें अपयश आलें. इस्माएलशाहानें बुऱ्हाणशाहाचा आणखी सूड घेण्याकरितां इमादशाहास पात्रीचा किल्ला घेण्यास चिंतविलें. त्याप्रमाणें त्यानें पात्रीचा किल्ला घेतलाच; परंतु बुऱ्हाणशाहानें कांहीं दिवसांनंतर त्यास दोन महिने कडेकोट वेढा देऊन तो परत घेतला. यावेळीं इमादशाहानें बांधलेला किल्ला पाडून टाकून बुऱ्हाणशाहानें आपले आप्त ब्राम्हण यांस तो इनाम करून दिला. तो अकबर बादशाहाच्या वेळेपर्यंत त्यांजकडेच चालला होता.

बुऱ्हाण याचें विजापुरच्या शाहाजादीशीं लग्न.

विजापूरचा एसमाएल यावर स्वारी.

इमादशाहा पात्री घेतो, व बुऱ्हाणशाहा परत घेतो.

पात्री घेतल्यावर बुऱ्हाणशाहानें माहूरचा किल्ला घेतला, आणि ते-

थून एलिचपुरावर चाल केली. याच्याशीं आपला टिकाव लागणार नाहीं, असें इमादशाहास वाटून तो वऱ्हाणपुरास पळून गेला; आणि त्यानें खानदेशचा सुलतान महंमदखान फरूकी याजकडून कुमक मिळविली. जेव्हां या दोघांचींही सैन्यें बुऱ्हाणशाहावर आलीं. तेव्हां त्याचा बुऱ्हाणशाहानें असा पराभव केला कीं, त्यांचे ३०० हत्ती, तंबू, निशाणें व बाजार बुणगे याच्या हातीं सांपडले. नंतर इमादशाहाचीं कांहीं ठाणींही बुऱ्हाणशाहानें घेतलीं.तेव्हां इमादशाहा व महंमदखान फरूकी यांनीं गुजराथचा बाहादूरशाहा याजकडे सहाय्य मागण्यास वकील पाठविले. त्यानें ती गोष्ट लगेच कबूल केली; आणि सन १५२९ सालीं आपल्या बरोबर जंगी फौज घेऊन सुलतानपूर व नंदूरबार या वाटेनें दक्षणेंत येण्यास निघाला. शत्रूंनीं बहादूरशाहास आपल्या पक्षास मिळविला, असें ऐकतांचे बुऱ्हाणशाहास भीति पडून त्यानें दिल्लीस बाबराकडे पत्रें देऊन वकील पाठविले; आणि या शत्रुत्रयास घालविण्याकरितां मदत करण्याकरितां इस्माएल आदिलशाहा, अमीर बेरीदशाहा व सुलतान कुली कुतुबशाहा यांसही पत्रें रवाना केलीं. यां पैकीं फक्त सहा हजार स्वारांनिशी अमीर बेरीद मात्र बुऱ्हाणशाहास येऊन मिळाला.

बुऱ्हाण एलिचपुरावर स्वारी करितो.

गुजराथचा बाहादूरशाहा इमादाच्या मदतीस येतो.

माहूर आणि पाथ्री हे दोन किल्ले घेण्याच्या उद्देशानें जेव्हां बाहादूरशाहा गुजराथेंतून वऱ्हाडांत आला, तेव्हां त्यास तो देश आवडून त्यानें तेथेंच कांहीं दिवस मुक्काम केला. यामुळें इमादशाहास भीति पडली कीं, न जाणो आपला देश शत्रू लुटतील। त्यानें बाहादूरशाहास असें कळविलें कीं, जर आपलें लष्कर बुऱ्हाणशाहाच्या राज्यांत जाईल, आणि त्या मुलखांतील कांहीं प्रांत काबीज करून माझ्या ताब्यांत देईल, तर मी मोठ्या खुषीनें गावळ सोडून जाईन, व तो किल्ला आपल्या हवालीं करून सर्वदां चरणापासीं सेवेस हजर राहीन. हें म्हणणें बाहादूरशाहानें मान्य केलें; आणि बुऱ्हाणशाहा सैन्यासहीत बिडाजवळच्या पहाडांत तळ देऊन होता, त्याजवर कूच केलें. अमीर बेरिदानें आपले ३,००० स्वार व कांहीं आ-

**दिलशाहा**कडील लष्कर यांस घेऊन गुजराथच्या सैन्याच्या एका फळीवर बी-ड आणि पैठण यांच्या दरम्यान एकाएकीं छापा घालून तोडून काढिलें. त्या-वेळीं सुमारें ३,००० हून जास्त गुजराथी लोक मारले जाऊन त्यांचे खजिना लादलेले उंट **बेरिदा**च्या हातीं लागले. या पराभवाचें वर्तमान **बाहादूर-शाहा**स समजतांच त्यानें आपला वजीर **खुदावंतखान** यास २०,००० स्वारांनिशी **बेरिदा**वर पाठविलें. एका घळींत दबा धरून राहिलेल्या **बे-रिदा**नें या सैन्याचाही पराभव केला, परंतु इतक्यांतवीस हजार स्वार घेऊन **खुदावंतखाना**च्या कुमकेस **इ-मादशाहा** आल्यामुळें **बुऱ्हाणशाहा**स परिंड्याकडे मागें हटावें ला-गलें; आणि तेथूनही तो मागें सरून जुन्नरास गेला.

बुऱ्हाणाचा पराभव.

नंतर **बहादूरशाहा** अहंमदनगरास जाऊन राजवाड्यांत व त्याचे उ-मराव शहरांत राहिले. इमारती बांधण्यास जो चुना व दगड जमविले होते, त्याचा एक मनोरा बांधण्यास त्यानें हुकूम केला. त्याच्या लोकांनीं म-नोऱ्याचें काम एका रात्रींत तयार करून त्यास '**काळा म-नोरा**' असें नांव दिलें. येथें सुलतान **बाहादूरशाहा** चाळीस दिवस लोकांच्या भेटी घेत व हत्तींच्या आणि दुसऱ्या जनावरां-च्या टकरा पाहात मोठ्या मौजेनें होता. **बुऱ्हाणशाहा** व त्याचे दोस्त यांनीं आसपासचा देश उद्ध्वस्त करून **बहादूरशाहा**ची रसद बंद के-ली, यामुळें त्याच्या सैन्यांत धान्याचा तोटा पडला. याच समयास एके रात्रीं त्यास असें दुष्ट स्वप्न पडलें कीं, "कांहीं भयं-कर भुतें व पिशाचें हातांत जळतीं कोलितें व दगड घेऊन बिछान्यासभोंवतीं आलीं, आणि आतां त्यास द-गड मारणार, असें त्यानें पाहिलें!" त्याबरोबर भयानें दचकून तो जा-गा झाला, आणि आपल्या अमीरउमरावांस बोलावून त्यांस त्यानें आपल्या स्वप्नाचा अर्थ विचारिला. तेव्हां ते म्हणाले "या स्थळीं **अहं-मदशाहा**नें एका लढाईत दारूनें गुंग झालेले असे पुष्कळ हिंदु व मुसलमान यांस मारिलें असून त्यांचे आत्मे स्वर्गास जाण्यास अ-पवित्र असल्या कारणानें घिरट्या घालीत आहेत, असें वाटतें!" हें ऐकतांच बाहादूरशाहा फारच भयाभीत झाला, आणि दुसऱ्या दिव-शीं वाडा सोडून तंबूंत निजला. नंतर त्यानें थोड्याच अवकाशांत अ-

बाहादूरशाहा नगरास येतो.

त्यास दुष्ट स्वप्न पडतें, व तो नगराहून जातो.

हमदनगर सोडून दौलताबाद गांठिली. इमादउल्मुल्क आणि गुजराथचे उमराव यांस दौलताबाद घेण्यास मागें ठेवून आपण महंमदशाहा फरूकीसह बालेघाटांत छावणी देऊन राहिला.

जेव्हां या थरास गोष्ट आली; तेव्हां बुऱ्हाणनिजामशाहानें इस्माएल आदिलशाहास पत्र लिहिलें कीं; "जर या आणीबाणीच्या प्रसंगीं आपण स्वतः येऊन मदत करणार नाहीं, तरमी खचित शत्रूच्या दाढेंत

बुऱ्हाण एस्माएलास बोलावितो.

चिरडून जाईन"तेव्हां"विजयानगरच्या राजाच्या सैन्याचा तळ रायचुरास आहे, आणि मी जर यावेळीं आपला मुलूख सोडून जाईन, तर तो लागलाच माझ्या प्रांतावर स्वारी करील. या कारणाकरितां मला तूर्त येथून हालतां येत नाहीं. परंतु हैदर मुल्क या सरदाराबरोबर जी पांच हजार स्वारांची कुमक पाठविली आहे, तिच्या सहाय्यानें लौकरच शत्रूंस मागें हटवाल अशी मला उमेद आहे." असें इस्माएलानें उत्तर पाठविलें. तेव्हां सहजच बुऱ्हाणशाहा इस्माएलास समरंगणीं आणण्यांत निराश झाला. असो. शेख जाफर पेशव्यास सर्व प्रजा अगदीं कंटाळली होती; यास्तव त्यास दूर करून कंबरसेन या

कंबरसेन ब्राम्हण पेशवा होतो.

नांवाच्या ब्राम्हणास त्यानें तें पद दिलें. हा गृहस्थ फार हुषार, शाहाणा, प्रामाणीक, दूरदर्शी आणि मसलतीअसे. याच्या सल्या प्रमाणें सर्व सैन्य जमा करून बुऱ्हाणशाहा जुन्नराहून अहंमदनगरास आला, आणि फार थोड्या अवकाशांत त्यानें मोठ्या सावधगिरीनें आपला तळ सोडून गुजराथच्या सैन्यापासून चार कोशांच्या अंतरावर दौलतावादेजवळच्या पहाडांत एका बळकट ठिकाणीं तळ दिला. तेथून निजामशाहानें चहूंकडे लहान लहान टोळ्या पाठवून रात्रीचे शत्रुसैन्यावर छापे घालून उपद्रव देण्याचा क्रम सतत तीन महिने आरंभिला. परंतु येणेंकरून गुजराथी फौज धैर्य सोडीत नाहीं;असें पांहून कंबरसेन याच्या सल्यानें बुऱ्हाणानें गुप्तपणें इमादशाहा व महंमदशाहा फरूकी यांच्याशीं तहाचें बोलणें लाविलें. आणि लढाईंत घेतलेले हत्ती व किल्ले त्यांचे त्यांस परत देण्याचें निजामशाहानें उभयतांसही वचन दिलें. तेव्हां ते उभयतां खुदावंतखान वजीरास असें सांगूं लागले कीं, माहूर व पात्री हे दोन किल्ले घेण्यास बाहादूरशाहाचें सहाय्य मागितलें असून, त्याबद्दल वऱ्हाड व

अहंमदनगर येथें त्याच्या नांवानें खुतबा वाचण्याचें व दरसाल नजराणा देण्याचें कबूल केलें होतें, परंतु आतां आमचा सर्वच प्रांत हातारवालीं घालण्याचा शाहाचा रंग दिसतो! खुदावंतखान म्हणाला ही सर्व तुमचीच चूक आहे. तुम्हां दक्षणेंतील राजांची जर एक वाक्यता असेल, तर सर्व यथास्थित होईल. खानाच्या बोलण्याचा लगेच त्यांनीं भावार्थ ताडिला, आणि कूट मोडण्याचा निश्चय केला. इमादशाहानें आपल्या छावणींतून दौलताबादेस पुष्कळ धान्यसामग्री रवाना केली, व आपण पर्जन्यकाळ सुरू होतांच एलिचपुरास चालता झाला.

इमादशाहा जातो.

बाहादूरशाहा व मीरान महंमदशाहा फरूकी यांनीं पुढें येथें राहावें किंवा जावें, याजबद्दल विचार चालविला. तेव्हां दोहोंकडील दिवाणांनीं अभिप्राय दिला कीं; बरसात सुरू होऊन नद्या भरल्या म्हणजे गुजराथेंतून किंवा खानदेशांतून सामान आणण्याची पंचाईत पडेल, आणि अजूनही दक्षणच्या राजांची ऐक्यता होण्याचा संभव आहे. याकरितां इमादशाहा व बुऱ्हाणशाहा यांस त्यांचे मुलूख सोडावे, आणि ते जें आपलें सार्वभौमत्व कबूल करीत आहेत, त्यांत भूषण मानून तृप्त असावें. ही सूचना बाहादूरशाहास पसंत पडून त्यानें बुऱ्हाण निजामशाहाकडे या मतलबाचें पत्र देऊन वकील पाठविले. बुऱ्हाणशाहानें लगेच नजरनजराणे देऊन वकिलांस निरोप दिला, आणि गुजराथच्या बाहादूरशाहाच्या नांवानें खुतबा वाचविला. तेव्हां बाहादूरशाहा परत गुजराथेंत गेला. मिरान महंमदानें हत्तींबद्दल मागणी करितांच निजामशाहानें ते पोंचते केले, परंतु इमादशाहानें पाथ्री व माहूर या दोन किल्यांबद्दल जेव्हां मागणें केलें, तेव्हां त्यास टाळाटाळीचें उत्तर पाठवून किल्ले दिले नाहींत.

गुजराथच्या शाहाशीं तह.

पुढील सालीं बुऱ्हाण निजामशाहानें मोठे मौल्यवान् कपडे, घोडे, व हत्ती अशा नजरा देऊन शाहा ताहीर यास गुजराथेंत पाठविलें. परंतु बाहादूरशाहानें त्याची पुष्कळ दिवस भेटच घेतली नाहीं, व मिरान महंमदखान फरूकी यास लिहिलें कीं, "बुऱ्हाणशाहानें फक्त एकदांच आमच्या नांवानें खुतबा वाचवून पुढें बंद केलें. असें आपण ऐकतों, हें खरें की काय?" त्यावर महंमदखान फरूकीनें "बुऱ्हाणशाहा हा

शाहा ताहीर नजरा घेऊन गुजराथेंत जातो.

तुमचा राजनिष्ठ सेवक असून दक्षिणेंतील इतर राजांत आपली थोरवी राह-ण्याकरितां तुमच्या नांवानें नेहमीं खुतबा वाचण्याचें त्यानें बंद केलें असे-ल, एरवीं त्याजकडून आपल्याविरुद्ध कांहींच झालें नसेल. एतदर्थ त्या-च्या वकिलाची आपण भेट घ्याल अशी मला उमेद आहे." असें उत्त-र पाठविलें. तेव्हां **बाहादूरशाहानें शाहा ताहीरची** भेट घेतली, त-री बरेच दिवस पर्यंत त्यानें त्याचा योग्य मान ठेविला नाहींच. पुढें **शाहा ताहीरची** अलौकिक बुद्धिमता व विद्वत्ता पाहून **बाहादूरशा-हाचें शाहा ताहीरवर** इतकें प्रेम बसलें कीं, त्यानें त्याचा उत्तम सत्कार करून सुमारें तीन महिन्यांनीं त्यास निरोप दिला.

सन १५३० सालीं **बाहादूरशाहानें** जेव्हां माळवा प्रांत सर के-ला, तेव्हां त्याजबद्दल आपल्यास झालेला आनंद प्रदर्शित करण्याक-रितां **बुऱ्हाण निजामशाहानें शाहा ताहीर** व **नरसोपंडित** यां-स **बाहादूरशाहाकडे** पाठविलें. **बाहादूरशाहा** बऱ्हाणपुरास असतां **मीरान महंमदखान फरूकी** यानें आलेल्या वकिलांच्या भेटी करविल्या, आणि "हिंदुस्थानचें सार्वभौमत्व **तैमूरलंगा**च्या वंशास प्राप्त होऊन त्या-ची दिवसें दिवस चढती कळा होत चालली आहे, याकरितां **बुऱ्हाण शाहा**स पक्का दोस्त केल्यापासून फार हीत होईल," असें सुचविलें. **बा-हादूरशाहा** फार महत्वाकांक्षी असून दिल्लीच्या बादशाहाशीं आ-पली बरोबरी आहे असें समजे. त्यांत खानानें दिल्लीपतीशीं त्याची तुलना करितांच तो फार चढला. त्यानें लागलाच **ताहिरा**चा बहुमान केला, आणि याच स्थळीं **बुऱ्हाणशाहा**ची भेट करण्याकरितां आण-ण्यास त्यास अहंमदनगरीं जाण्यास निरोप दिला.

*बुऱ्हाण बाहादूरशाहाकडे वकील पाठवितो.*

**बुऱ्हाण निजामशाहानें** जरी हें म्हणणें प्रथम नाकबूल केलें, तरी **शाहा ताहीर** व **कंबरसेन पेशवा** यांच्या अत्याग्रहास्तव शेवटीं भे-टीस जाण्याचें मान्य केलें. आपला पुत्र **शाहाजादा हुसेन** व **कंबरसेन** यांच्या हवालीं राज्य करून सात हजार स्वारांनिशी बऱ्हाणपुरास जाण्यास **बुऱ्हाणशाहा** निघाला, आणि आपल्या आदरातिथ्याची बचबच नव्हावी, म्ह-णून पुढें आगाऊ सूचना देण्यास **संभाजी चिटणवीस** व **ख्वाजा**

*बुऱ्हाण बाहादूरशाहाच्या भेटीस जातो.*

इब्राहीम या वकिलास त्यानें पाठविलें. बुऱ्हाणशाहा तापी नदीच्या कांठीं चंगदेवी येथें पोहोंचतांच मिरान महंमदखान त्यास येऊन भेटला, आणि सांगूं लागला कीं, "बाहादूरशाहा मसनदीवर बसूनच सर्वांच्या भेटी घेतो. त्याच्या दोहों बाजूंस दोन साधु असतात. बाकी सर्व सरदार, अमीर उमराव, मानकरी व राजे यांस हात जोडून उभें राहावें लागतें." या बोलण्याचा मतलब समजून बुऱ्हाणशाहानें त्यास कांहीं एक उत्तर दिलें नाहीं. परंतु खान निघून गेल्यावर त्यानें आपल्या सर्व सरदार व कामगारास बोलावून सांगितलें कीं, बाहामिनी शाहापासून एकवार स्वतंत्र झाल्यावर बाहादूरशाहाच्या मसनदीपुढें उभें राहण्याचा अपमान मी कधींही सहन करणार नाहीं. याकरितां बाहादुरशाहाच्या भेटीस जाण्याचा विचार सोडून ईश्वरावर भरंवसा ठेवून स्वस्थ राहावें, हें मला बरें वाटतें. त्यावर शाहा ताहीर म्हणाला परमेश्वर मोठा दयाळु आहे, तो आपल्या इच्छेप्रमाणें सर्व गोष्टी घडवील. परंतु आपण मात्र उतावीळपणानें कोणतीही गोष्ट प्रसिद्धपणें बोलून दाखविण्याची घाई करूं नये. आजन्म अधिकार सुखाचा अनुभव घेण्यास जर एक दिवस अपमान सोसावा लागला, तर तसें करणें राजनीतिविरुद्ध नाहीं; असें मला वाटतें. बुऱ्हाणशाहा हा जात्या सदसद्विचारी होता. यामुळें त्यानें शाहा ताहीरच्या म्हणण्यास कांहींसा रुकार दिला. तेव्हां शाहा ताहीर म्हणाला "बाहादूरशाहा बसला असतां उभें राहण्याचा अपमान टाळण्याची युक्ति मीं अशी काढली आहे कीं, मजजवळ अल्लीच्या हातची कुराणाची प्रत आहे, आणि ती पाहण्याची बाहादूरशाहाची इच्छा आहे. भेटीस जातांना ती मी बरोबर घेतों, म्हणजे तिच्या सन्मानार्थ बाहादूरशाहा मसनदीवरून आपोआप खालीं येईल." दुसरे दिवशीं जेव्हां बुऱ्हाणशाहा भेटीस निघाला, तेव्हां शाहा ताहिरानें कुराणाची प्रत डोक्यावर घेतली, आणि ते निघाले. त्यांस पाहतांच खुदावंतखानास शाहा ताहीरच्या डोक्यावर काय आहे, तें विचार म्हणून बाहादूरशाहानें सांगितलें. तेव्हां अल्लीनें स्वतः लिहिलेली कुराणाची प्रत आहे, असें समजतांच तो मसनदीवरून उतरून पुढें गेला, आणि त्या प्रतीस तीन वेळ नमन करून डोळ्यांस व कपाळास तिचा स्पर्श केला. त्याच वेळीं बुऱ्हाण निजामशाहाचा मुजरा घे-

ऊन त्याच्याशीं गुजराथी भाषेंत बाहादूरशाहा चार शब्द बोलला. त्यास बुऱ्हाणशाहानें फारसीभाषेंत उत्तरें दिलें. नंतर बाहादूरशाहा मसनदीवर चढला, व बुऱ्हाणशाहा आणि शाहा ताहीर पुढें उभें राहिले. शाहा ताहिरासारखा साधु व पंडित उभा राहिलेला पाहून त्यास बसण्यास सांगितलें, परंतु आपला धनी उभा असतां आपण बसणें योग्य नव्हे, असें त्यानें म्हटल्यावरून दोघांसही बसण्यास सांगितलें. नंतर फारशी भाषेंत बाहादूरशाहानें बुऱ्हाणशाहास विचारिलें कीं, 'आपणावर जो विकट प्रसंग आला होता, त्यांतून तुम्हीं चांगल्या प्रकारें पार पडलां ना?' बुऱ्हाणशाहानें उत्तर दिलें, 'दुःखाच्या परिणामीं सुख झालें, आणि अशा आनंदकारक भेटी झाल्या, म्हणजे त्या गतगोष्टींचें सहज विस्मरण पडतें. तसेंच या प्रसंगानें तर कित्येक वर्षें सोसलेल्या संकटाचा परिहार झाला.' हें ऐकतांच बहादूरशाहा मीरान महंमद फरूकीकडे वळून म्हणाला. 'बुऱ्हाण निजाम उल्मुल्काचें उत्तर ऐकिलें का? फरूकीनें ऐकिलें नाहीं' असें उत्तर दिलें. तेव्हां बुऱ्हाणशाहास बाहादूरशाहानें पुनः तोच प्रश्न केला, व त्याचें त्यानें पहिलेंच उत्तर दिलें. असो नंतर सर्वांस ऐकतां येईल अशा उच्च स्वरानें बाहादुरशाहानें बुऱ्हाणशाहाची वाहवा केली. तेव्हां शाहा ताहीर उठून म्हणाला, 'सरकारच्या अनुग्रहाची अशीच वृद्धि होत जावो.' तेव्हां बाहादुरशाहानें आपल्य कंबरेची तलवार आणि रत्नजडित जंबिया काढून बुऱ्हाणशाहाच्या कंबरेस बांधून "शाहा" हा किताब तुला यशस्वी व मंगलदायक होवो;" असें म्हटलें, आणि माळव्याच्या राजाकडून घेतलेलें राजछत्र बुऱ्हाणशाहास नजर करून माळव्याचा राजा सुलतान महंमद खिलजी याचाच तंबू बुऱ्हाणशाहास उतरण्यास तयार केला होता, त्यांत त्यास पोहोंचविण्यास खुदावंतखान व महंमदखान फरूकी यांस आज्ञा केली. दुसऱ्या दिवशीं बाहादूरशाहानें बुऱ्हाणशाहास मेजवानी केली, आणि आपल्या मसनदीपुढें सुवर्णांच्या खुर्च्यांवर बुऱ्हाणशाहा व मीरान महंमदखान यां-

+ हा वेळपर्यंत बुऱ्हाणशाहास बाहादूरशाहा "शाहा" असें म्हणत नसे.

स बसविलें. आणि हे सर्व सन्मान आटपून जेव्हां **बुऱ्हाणशाहा** निघाला, तेव्हां **बाहादूरशाहानें** त्यास पांच घोडे, दोन हत्ती, व बारा लढाऊ हरणें बक्षीस दिलीं. दुसरे दिवशीं उभयतां राजे खेळले. **बुऱ्हाणशाहानेंही बाहादूरशाहास** नजराणे दिले, त्यांपैकीं कुराण, **खलीफाचें** नांव कोरलेली एक तलवार, चार हत्ती, व दोन आरबी घोडे, ठेवून घेऊन बाकी सर्व **बाहादूरशाहानें** परत करतांना म्हटलें कीं, "मी या वस्तुबरोबर सर्व दक्षण देश तुम्हांस परत दिला आहे." याप्रमाणें परस्परांचीं भाषणें होऊन **बुऱ्हाणशाहानें बाहादूरशाहाचा** निरोप घेतला, आणि तो दौलताबादेच्या वाटेनें येत असतां तेथें ज्या साधूंच्या कबरी होत्या, त्यांचें त्यानें दर्शन घेतलें. तेथून निघाल्यानंतर त्याचा मुलगा **हुसेन निजामशाहा** आणि **कंबरसेन पेशवा**, विजापूर व गोंवळकोंडें या दरबारचे वकील त्यास सामोरे आले, व त्यांनीं त्यास मोठ्या समारंभानें शहरांत नेलें.

मराठे राजांवर हल्ले.

**बुऱ्हाणशाहा व बाहादूरशाहा** यांचें या प्रमाणें ऐक्य झाल्यावर **बुऱ्हाणशाहा** आपल्या मुलखाच्या बंदोबस्तास व व्यवस्थेस लागला, आणि **कंबरसेन दिवाणाच्या** सहाय्यानें मराठे राजांकडील सुमारें तीस किल्ले त्यानें आपल्या ताब्यांत घेतले. या मराठे लोकांनीं **अहमद निजामशाहा** वारल्यापासून खंडणी न देतां बंडाळी आरंभिली होती. त्यांची खोड मोडल्यावर गरज पडेल तेव्हां नोकरी करण्याच्या करारानें **निजामशाहानें** त्यांच्या जाहागिरी त्यांस परत दिल्या. **खवाजा इब्राहीम** व **संभाजी चिटणवीस** हे दोघे वकील **बाहादूरशाहाकडे** जातांना पुढें पाठविले होते, त्यांनीं आपलें काम चांगलें बजाविल्यामुळें त्यांस अनुक्रमें '**लाटीफखान**' व '**प्रतापराव**' असे किताब देऊन त्यांचीं नांवें सरकारच्या प्रमुख व भरंवशांच्या कामगारांत दाखल केलीं.

सन १५३१ त **इस्माएल आदिलशाहानें अमीर बेरीदशाहापासून** कल्याणी व कंधार हे किल्ले घेण्याचा विचार चालविला, तेव्हां **बेरीदानें बुऱ्हाणशाहापाशीं** सहाय्य मागितलें यामुळें **बुऱ्हाणानें** तो एकदम विचार सोडून देण्याविषयीं बे अदबीचे शब्द घालून **इस्माएल आदिलशाहास** पत्र लिहिलें, आणि असें कळ-

विलें कीं, " तुम्हीं आपल्या मुलखीं राहून आपल्या राज्याची व्यवस्था पाहावी, तें सोडून उगाच ढवळाढवळी करितां हें अयोग्य आहे." यावर इस्माएल आदिलशाहानें जें उत्तर लिहिलें आहे, तें फेरिस्तानें आपल्या ग्रंथांत दिलें आहे. त्यांतील भावार्थ इतकाच आहे कीं, " अहंमदनगरची हल्लींच्या हल्लीं काय अवस्था होत होती, हें आपण इतक्यांतच विसरलां काय? माळव्याच्या राजाच्या अंगावरील फाटक्या चिंध्या मिळाल्या; त्याची जर तुम्हांस घमेंडी वाटत असेल, तर ती अगदीं हास्यास्पद आहे. तसेंच गुजराथच्या राजानें दिलेल्या 'शाहा' या पदास जर तुम्हीं मिरवीत असाल तर तेंही व्यर्थ होय. कारण ज्या वंशाच्या पिढ्यानपिढ्यांनीं राज्य केलें त्या राजवंशांत (रूमशामच्या) माझा जन्म झाला असून पैगंबराचे वंशज जे इराणचे राजे ते सुद्धां मला 'शाहा' म्हणतात. म्हणून आपण आपला उद्धटपणा व मूर्खत्व टाकून द्या, असें माझें आपणांस सांगणें आहे. नाहीं तर निजामबागेचीं सौख्यें टाकून तलवारीशीं प्रसंग आणण्यास आपल्यास लौकरच यावें लागेल.

बुऱ्हाणशाहास इस्माएलशाहाचें पत्र.

बुऱ्हाणशाहास जरी आपलें पत्र मागाहून लज्जास्पद वाटलें, तरी विजापुराहून अशा धमकीचें पत्र येतांच तो अमीरपुरास गेला, आणि तेथें कांहीं दिवस राहून त्यानें सर्व फौज एकत्र करून सरहद्द वलांडून विजापूर प्रांतांत पाय ठेविला. परंतु इस्माएलानें पराभव करून त्यास अहंमदनगरास मागें हटविलें, व त्याचें अवघें सामान सुमान हस्तगत केलें. व सुमारें चार हजार लोक ठार मारिले. यामुळें बुऱ्हाणशाहाचा बराच गर्व परिहार झाला.

विजापुराशीं लढाई व बुऱ्हाणाचा पराभव.

सन १५३२ त निजामशाही व आदिलशाही वकिलांच्या द्वारें बुऱ्हाणशाहा व इस्माएलशाहा यांच्या भेटी होऊन असें ठरलें कीं, बुऱ्हाणशाहानें वऱ्हाड व इस्माएलशाहानें तेलंगण जिंकून उभयतांनीं बंधूप्रमाणें अवघा दक्षण प्रांत वांटून घ्यावा. परंतु याच संधीस इस्माएल आदिलशाहा निवर्तला, व त्याचा मुलगा आणि बुऱ्हाणशाहा या उभयतांमध्यें तक्रारी उपस्थित झाल्या कारणानें हा ठराव तसाच राहिला.

तह. सन १५३२.

सन १५३७ त शाहा ताहीर याच्या सल्यानें बुऱ्हाण निजामशाहानें आबुबेकर, ओमर आणि आथमन या खलीपांचीं नांवें खुत-

त्यांतून गाळून इमामाच्या नांवानें खुतबा वाचण्यास सुरुवात केली, व आपल्या निशाणाचा आणि छत्राचा रंग बदलून तीं हिरवीं करून खलीफांस रस्त्यांत व मशीदींत शिव्या व शाप देण्यासा- ठीं वेतनें देऊन लोक ठेविले. या प्रमाणें यूसफ आदि- लशाहास जी इष्ट गोष्ट आपल्या सरदारांच्या हरकतीमुळें करितां आली नाहीं, ती यानें सिद्धीस नेली. सुनी लोकांनीं हा फेरफार निमूटपणें स्वीकारि- ला नाहीं, यामुळें बुऱ्हाणशाहास थोडासा त्रास सोसावा लागला, आणि पीर महंमद नामक मुल्लानें अशा नियमास नाखुष झालेल्या सर्व सुनी- पंथांतील लोकांस जमवून बुऱ्हाणशाहाच्या वाड्या भोंवतीं गराडा घा- लून त्यास आंत कोंडिलें. परंतु त्या मुल्लास लौकरच कैदी केलें, तेणें- करून हा दंगा मोडला. सुनी लोकांच्या अशा अपमानाबद्दल गुजरा- थ, खानदेश विजापूर येथील राजांस भारी राग आला. ते तिघे एकत्र होऊन निजामशाही राज्य तिघांनीं वांटून घेण्याचा निश्चय केला. ही तयारी बुऱ्हाणशाहास कळतांच त्यानें हुमायून बादशाहाकडे वकील पा- ठविला, आणि "गुजराथेवर मोंगलांची फौज रवाना झाल्यास मी त्यांस चां- गली मदत करीन," असें कळविलें. परंतु शीरशाहाच्या बंडामुळें हुमायु- नाचीच स्थिति गडबडली होती, म्हणून त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां बुऱ्हाणशाहानें गुजराथ व खानदेश येथीलच आपल्या जुन्या दो- स्तांशीं संधान बांधून त्यांस घरीं बसविलें, व इब्राहिमानें सोडून दिले- ल्या सर्व परदेशीय शिपायांस आपल्या चाकरीस ठेवून विजापुरावर स्वा- री केली. दैवयोगानें या मोहिमेंत त्यास चांगलें यश आलें, आणि शंभ- र हत्ती व चार तोफा हस्तगत करून त्यांसह बुऱ्हाणशाहा मोठ्या था- टमाटानें व विजयानें अहमदनगरास गेला.

शिया धर्माची स्थापना.

सन १५४२त विजापुरचा शाहा व त्याचा प्रधान आसदखान यां- मध्यें वितुष्ट पडून आसदखान इब्राहिमाच्या मनांतून अगदीं उत- रला. कारण आसदखान हा मूळचा शिया अस- ल्यामुळें त्यास इब्राहिमाचें सुनी धर्मांतर मुळींचआ- वडलें नव्हतें. असो. या विजापूरच्या राजा प्रधानाच्या बेबनावाचा व प्रधानाच्या आपल्या धन्याच्या धर्मांतराच्या नावडीचा आ- पल्या कार्यसिद्धीस उपयोग करून घेण्याचें कपट बुऱ्हाणशाहानें म-

आसदखान व इब्राहिम यांमध्यें वितुष्ट.

नांत आणिलें त्यानें अमीर बेरिदाशीं स्नेह करून अशी कंडी पिकविली कीं, आपल्या धर्मास अनुसरून आम्हां दोघां सुनीपंथी राजांस आसदरवानानें विजापूर प्रांतांत बोलाविलें असून बेळगांव बुऱ्हाणशाहास देण्याचें वचन दिलें आहे. या कंडींत तीळभर देखील तथ्यांश नव्हता, तरी विजापूरकरांच्या हितशत्रूंनीं ती इतक्या हिकमतीनें फैलाविली कीं, तेणेंकरून आसदरवानाचा इब्राहिमास अतिशय संशय वाटून जगभर पसरलेल्या या मसलतींत त्याचें खरोखरच अंग असावें, असें दिसूं लागलें. आपण उडविलेल्या ठिणगीनें इतका पेट घेतला आहे, असें समजतांच बुऱ्हाणशाहानें सोलापुरावर स्वारी करून तें घेतलें; आणि त्या खालील साडेपांच महाल खवाजा जहान दक्षणी याच्या हवालीं केले. तेथून तो बेळगांवास गेला, व तेंही शहर घेऊन त्याखालील ज्या शहरांतील लोकांनीं त्यास अडथळा केला होता, तीं लुटून फस्त केलीं. आसदरवानानें होता तितका प्रयत्न करून पाहिला, तरी इब्राहीम शत्रूवर चालून येईना. त्याला वाटे कीं, आपल्यास पाशांत धरण्याकरितां आसदरवान बोलावीत आहे. असो शेवटीं निरूपाय होऊन बुऱ्हाणशाहास सामील होण्याविना दुसरा स्वसंरक्षणास उपाय उरला नाहीं, असें पाहून आसदरवान सहा हजार स्वारांनिशी निजामशाहास जाऊन मिळाला. तेव्हां बुऱ्हाणशाहानें थेट विजापुरावर कूच केलें. इब्राहीमशाहाचा दिवाण गेला, दुसरे जे कामगार त्याकडे होते, त्यांवर त्याचा विश्वास नव्हता, यामुळें आतां पुढें काय करावें, हें त्यास सुचेना. शेवटीं त्यानें इमादशाहास कुमकेस येण्याविषयीं पत्र लिहून तो येऊन पोहोंचेपर्यंत विजापूर सोडून कलबुर्ग्याच्या किल्ल्यांत जाऊन राहण्याचा त्यानें बेत केला. इमादशाहा फौजेनिशी लौकरच आला, त्याबरोबर आसदरवान निजामास सोडून त्यास मिळाला. असें होतांच बुऱ्हाणशाहा घाबरला, आणि परत अहंमदनगराकडे वळला. त्याच्या मागें वऱ्हाडची व विजापुरची फौज लागली. तिनें त्याचा इतका पिच्छा पुरविला कीं, त्यास अहमदनगर

बुऱ्हाण सोलापूर घेतो व बेळगांवावर हल्ला करितो.

बुऱ्हाण विजापुरावर स्वारी करितो.

त्याचा पराजय होऊन परत जावें लागतें, व सोलापूर परत द्यावें लागतें.

सोडून दौलताबादच्या मजबूत किल्ल्यांत जाऊन आश्रय घेणें भाग पाडिलें. याच ठिकाणीं **अमीर बेरिदशाहा** मरण पावला. तेव्हां अखेरीस **बुऱ्हाणशाहानें** तह करून **इब्राहीम** आदिलशाहास सोलापूर व त्याखालील साडेपांच महाल सोडून दिले.

पुढील सालीं **बुऱ्हाणशाहानें शाहा ताहीर** यास **जमशीद कुतुबशाहाकडे** वकील पाठवून विजयानगरचा **रामराजा** व **कुतुबशाहा** या उभयतांनीं विजापुरावर स्वारी करण्यास सहाय्य व्हावें, असें बोलणें लाविलें. सन १५४६ त **बुऱ्हाणशाहा** आणि **रामराजा** या दोघांनीं कलबुर्ग्यावर स्वारी केली, तेव्हां **इब्राहीम आदिलशाहा** विजापुराहून कलबुर्ग्याच्या संरक्षणास निघाला. तो हुरचीन शहरानजीक येऊन पोहोंचल्यावर त्यास समजलें कीं, **बुऱ्हाणशाहा** भीमेच्या पूर्व कांठीं एका वळकट जागीं उतरला आहे. परंतु नदीस उतार नसल्यामुळें **इब्राहिमानें** आलीकडच्या तीरीं छावणी दिली. बरसात संपेपर्यंत दोन्हीं सैन्यें नदीच्या दोन्हीं तीरीं उगीच पडून राहिलीं होतीं. शेवटीं **इब्राहिमानें** एक उताराची जागा शोधून काढून नदी वलांडिली, आणि निजामशाहीफौजेवर चाल केली. या लढाईंत **निजामशाहाचा** सर्वथैव पराभव होऊन २५० हत्ती व १७० तोफा **इब्राहिमास** मिळाल्या. या समर प्रसंगांत **इब्राहिमानें** तिघां शत्रूंस आपल्या हातानें मारून मोठी मर्दुमकी केली. तथापि **असदखानाच्या** सहाय्यानें आपल्यास हा जय मिळाला, असें म्हणून त्यानें त्यास आणखीं मुलूख दिला.

*बुऱ्हाण विजापूर मुलखावर स्वारी करितो, व पराभव पावतो. इ० स० १५४६*

**शाहा ताहिरास अल्ली बेरिदशाहाकडे** कुमक मागण्यास पाठविलें असून त्यानें कुमक केली नाहीं, यामुळें त्यावर रागावून पुढील सालीं **बुऱ्हाण निजामशाहानें** बेदरावर स्वारी केली, आणि आवशास वेढा दिला. तेव्हां **अमीर बेरिदशाहानें** कल्याणीचा किल्ला **इब्राहीम आदिलशाहास** देण्याचें कबूल करून फौजेसह कुमकेस आणिलें. आवशाच्या नजीक दोन्हीं सैन्यांची जी लढाई झाली, तींत विजापूर व बेदरच्या फौजा पराभव पावून तो किल्ला निजामशाहानें घेतला. नंतर तो उदगीर घेऊन कंदारास वेढा देण्यास गेला. तेथेंही बेदर व विजापुरच्या फौजा परा-

*बुऱ्हाण बेदरावर स्वारी करितो व जय पावतो.*

भवच पावल्या, आणि कंधारचा किल्ला निजामशाहाच्या हातीं आला. या प्रमाणें **निजामशाहा** विजयी होऊन परत राजधानीस जात असतां मार्गांत त्यास विजापूरच्या मतलबी लोकांची एक टोळी भेटली. तिनें त्यास कळविलें कीं, विजापुरचे लोक **इब्राहिमाच्या** जुलमास व अव्यवस्थेस कंटाळून राहिले असून त्यांच्या मनांत त्यास पदच्युत करून त्याच्या **अबदुल्ला** नामक धाकट्या भावास गादीवर बसविण्याचें आहे. त्यानें जरी गोंव्यास पोर्तुगीज लोकांकडे आश्रय घेतला आहे, तरी आपल्या सहाय्याविना त्याचें कांहीं चालावयाचें नाहीं. यापूर्वी **अबदुल्लाच्या** मिलाफी लोकांनीं गोवळकोंडच्या **जमसीद कुतुबशाहासही** वश केलें होतें. नंतर **निजामशाहा** व **कुतुबशाहा** यांनीं विजापुरावर स्वारी केली. प्रथमतः त्यांनीं बेळगांव घेण्याचा यत्न केला, परंतु तो निष्फळ झाला. असो. याच संधीस **शाहा ताहीर** मरण पावला. तेणेंकरून निजामशाहास फार दुःख झालें, आणि तो लढाई टाकून राजधानीस निघून गेला, व **शाहा ताहीरचें** काम त्यानें **कासीम बेग हकीम** आणि **गोपाळराव** यांजकडे सांगून शिक्के मोर्तबेंही दिलीं.

विजापुरावर स्वारी.

इतक्यांत बेळगांवचा **आसदखान** निवर्तला. आतां आदिलशाहाचा एक जबरदस्त स्तंभच बसला, असें बुऱ्हाणशाहास वाटून त्यानें विजापुरावर पुन्हा स्वारी करण्याचा निश्चय करून तत्सहायार्थ नजर नजराणे वगैरे पाठवून विजयानगरच्या **रामराजाशीं** तह केला. हें वर्तमान **इब्राहिमास** कळतांच त्यानें विजयानगरच्या वकिलांची कशी बेअदबी केली, व ते तेथून निरोप न घेतां एकदम कसे निघून गेले? त्यांनीं आपल्या धन्यास काय काय मजकूर सांगून चेतविलें, इत्यादि हकीकत विजापूरच्या इतिहासांत आलीच आहे, याकरितां या स्थळीं त्याचा विशेष पाल्हाळ करीत नाहीं.

रामराजांशीं तह.

रामराजाच्या सांगण्यावरून **बुऱ्हाणशाहानें अल्ली बेरिदाच्या** कल्याणी किल्यास वेढा दिला, व चोहींकडून घेरा घालून बाहेरील घांस दाणा देखील आंत जाण्याचें बंद केलें. तेव्हां **इब्राहीम** त्याच्या कुमकेस येऊन शत्रूसैन्यासमीपच त्यानें आपली छावणी ठोकि-

ली, आणि सभोंवार खंदक खणला. निजामशाहाही तटाची व खंदकाची तयारी करून होता. इतक्यांत विजापूरकरांनीं मराठे, धांडेस्वार चोहोंकडे पाठवून निजामशाही सैन्यास धान्य मिळूं नयेसें केलें. त्यामुळें त्या लष्करांत दुष्काळ पडून निजामशाहा विचारांत पडला. त्यानें आपल्या सरदारांची सभा जमविली, आणि पुढें काय करावें? हा प्रश्न त्यास विचारिला. तेव्हां कांहींचें मत पडलें कीं, वेढा उठवून तह करावा व अहमदनगरास जावें, व कोणी म्हणूं लागले एकदम शत्रूवर छापा घालावा. त्यांतून दुसरी मसलत निजामशाहास पसंत पडून रमजानचे रोजे संपून सवालच्या पहिल्या तारखेस विजापूरचे लोक पारणें सोडण्याच्या तयारींत असतां पाहांटेस **सैफउद्दीन ऐनउल्मुल्क** व दुसऱ्या तुर्की सरदारांनीं त्यांवर हल्ला केला. या छाप्याच्या वेळीं **इब्राहीम आदिलशाहा** स्नान करीत होता, तो ही गर्दी उसळतांच बीड आणि परांड्याकडे पळाला. त्याच्या फौजेची सारी दाणादाण उडून सर्व लोक सामान, सरंजाम, तोफा, तंबू वगैरे टाकून पळाले. तेव्हां निजामशाहानें कल्याणीवरही हल्ला करून तो किल्ला घेतला. **इब्राहीम आदिलशाहा** निजामशाहाच्या मुलखांतून निघाला, तो वाटेंत परांड्याचा किल्ला घेऊन दक्षणी कामगारांच्या हवालीं करून आसपासचा प्रांत ओस पाडीत जबर खंडण्या घेत चालला. परंतु मागाहून **बुऱ्हाणशाहा** येत आहे, अशी खबर कळतांच थेट विजापुरीं पोहोंचला. निजामशाही फौज परांड्याच्या रोखानें चालली असतां परांड्याहून ४० मैलांवर येऊन पोहोंचली असेल नसेल, इतक्यांत **इब्राहीमशाहानें** ठेवलेला कामगार रात्रीच्या रात्रीं पळून गेला. तिसऱ्या दिवशीं निजामशाही फौज तेथें येऊन पोहोंचली; आणि तिनें रिकामा किल्ला खुशालपणें ताब्यांत घेतला. आणि **खवाजा जहान** याच्या स्वाधीन करून **बुऱ्हाण निजामशाहा** अहंमदनगरास आला.

बुऱ्हाण कल्याणीस वेढा घालतो.

इब्राहीम वेरिदाच्या मदतीस येतो व पराभव पावतो.

पुढील सालीं **बुऱ्हाण निजामशाहा** फौजेसह विजापूर प्रांतांतून बिन हरकत रायचुरास गेला. तेथें **रामराजाची** मुलाखत होऊन उभयतांनीं विजापूर प्रांत जिंकून घ्यावा, व त्यांतून **रामराजानें** रायचूर, **मुद्गल**, हे किल्ले व त्या खालील कृष्णेच्या दक्षिणकांठचा दरोबस्त मुलूख घ्यावा, आणि **निजामशाहानें** सोलापूर व कलबुर्गी हे प्रां-

त घ्यावे, असें ठरून त्याप्रमाणें बुऱ्हाणशाहानें तीन महिने वेढा दिल्यावर एकाएकीं छापा घालून सोलापूर घेतलें. तेथून तो कलबुर्ग्यास जाणार होता. इतक्यांत त्यास समजलें कीं; रामराजानें रायचूर व मुदगल घेऊन तो विजयानगरास गेला. तेव्हां बुऱ्हाणशाहाही परत अहंमदनगरास आला. सन १५५३ त रामराजाची कुमक घेऊन पुनः त्यानें विजापुरावर स्वारी केली, तेव्हां याशीं झुंजण्यास तूर्त आपण असमर्थ आहों, असें समजून इब्राहीम आदिलशाहा कोल्हापुरा नजीक पन्हाळा येथें आश्रयास गेला. बुऱ्हाणशाहानें जरी विजापुरास वेढा दिला, तरी त्यास एकाएकीं पोटशुळाची जबरदस्त व्यथा होऊन प्रकृति फार बिघडली. या कारणानें तो अहंमदनगरास परत गेला, आणि थोड्याच दिवसांत मृत्यु पावला. नंतर त्याचें प्रेत मसाल्यांत घालून करबाला येथें पाठविलें, व पैगंबराचा नातु जो अल्ली याचा पुत्र हस्सन याच्या कबरेपाशीं पुरलें.

बुऱ्हाणव रामराजा यांचा विजापूर जिंकण्याचा बेत.

विजापुरावरची स्वारी. इ० स० १५५३

बुऱ्हाणाचा मृत्यु. इ. स. १५५३

बुऱ्हाण निजामशाहाचें वय मरणसमयीं ५८ वर्षांचें होतें. त्यानें एकंदर ४७ वर्षें राज्य केलें. त्याची प्रियकर पत्नी जी अमीना तिच्या पोटीं हुस्सेन व अबदुल कादर असे दोन आणि युसफ आदिलशाहाची मुलगी जी बिबी मरियम इच्या पोटचे शाहा अल्ली व मिरान महंमद बाहीर हे दोन असे चार पुत्र त्यास असून आणखीं शाहा हैदर म्हणूनही त्यास एक पुत्र असे पांच पुत्र होते.

# हुस्सेन निजामशाहा.

इ० स० १५५३ ते १५६५ पर्यंत.

हुस्सेन गादीवर बसतो. —— त्याचे भाऊ पळून जातात; व राज्यांत फळ्या होतात. —— इब्राहीमशाहा अल्लीचा पक्ष घेऊन सोलापुरावर स्वारी करितो. —— सैफ उल्मुकाचा वध. —— हुस्सेन विजापुरावर स्वारी करितो. —— विजापूर, गोवळकोंडें व विजयानगर या तीन देशच्या फौजा निजामशाहावर येतात. —— तह ठरतो. — आदिलशाहा व रामराजा निजामशाहावर पुनः स्वारी करितात. —— निजामशाहाचा पराभव. —— अहंमदनगरास वेढा. —— वेढा उठवून शत्रु जातात. —— सर्व मुसलमान राजे एकत्र होऊन विजयानगरावर स्वारी करितात, व राजास मारून त्याचें राज्य घेतात. —— हुस्सेनाचा मृत्यु.

---

हुस्सेन गादीवर बसतो. त्याचे भाऊ पळून जातात व राज्यांत फळ्या होतात.

**हुस्सेन निजामशाहा** सिंहासनारूढ झाला, त्यावेळीं त्याचें वय अवघें तेरा वर्षांचें होतें. ज्या दिवशीं **हुस्सेन** गादीवर बसला, त्याच दिवशीं त्याचा सख्खा भाऊ **अबदुलकादर.** व दुसरे सावत्र बंधु अहंमदनगरास पळून गेले; यामुळें साहजीकच राज्यांत दोन फळ्या झाल्या. परदेशी व हबशी यांनीं **हुस्सेनाचा** पक्ष स्वीकारला, आणि सर्व दक्षणी लोक (हिंदु व मुसलमान) **अबदुलकादर** याच्या पक्षास मिळाले. कांहीं दिवस असे गेल्यावर त्यांनीं **कादराचा** पक्ष सोडला, व तो वऱ्हाडांत **इमाद उल्मुल्काच्या** आश्रयास जाऊन राहिला. **शाहा अल्ली** व **मिरान महंमद बाहिर** विजापुरास आपला मामा **इब्राहीम आदिलशाहा** याकडे गेले. **शाहा हैदर** परिंड्यास **ख्वाजा जहान** याजकडे जाऊन तेथून त्यानें गादीकरितां प्रयत्न चालविला. **हुस्सेन निजामशाहानें शाहा हैदरावर** स्वारी केली, तेव्हां तो व त्याचा सासरा विजापुरीं जाऊन आदिलशाहाच्या दरबारीं राहिले. यामुळें परिंडा निजामशाहास मिळाला. **इब्राहीम आदिलशाहानें** उघडपणें **शाहा हैदर** याचा पक्ष स्वीकारून **हुस्से-**

न निजामशाहाबरोबर लढाई करण्याचा बेत केला, आणि मागील राज्यांत निजामशाहानें घेतलेला सोलापुरचा किल्ला घेण्यास तो फौजेनिशीं निघाला. हें वर्तमान निजामशाहास समजतांच त्यानें इमादशाहाशीं दोस्ती जोडून त्याजकडून सात हजार स्वारांची मदत मिळविली; आणि इब्राहीम आदिलशाहाचा सोलापूर येथील वेढा उठविण्यास तो निघाला. याजबद्दलची सविस्तर हकीगत इब्राहीम आदिलशाहाच्या प्रकरणांत आलीच आहे.

इब्राहीम सोलापुरावर स्वारी करितो.

**सैफ उल्मुल्क** निजामशाहाची नोकरी सोडून विजापूरकरांकडे गेला होता, त्यास जेव्हां तिकडून विजापूरकरांनीं घालविलें, तेव्हां तो निजामशाहाकडे पुनः नोकरी मागूं लागला. यास्तव त्यास त्यानें नोकरीस ठेवून लौकरच विश्वासघातानें ठार मारविलें. त्या बिचाऱ्याच्या कुटुंबाची दशाही तीच होत होती, परंतु **कबूलखान** म्हणून त्याचा एक शूर आश्रित होता, त्यानें त्यास सुरक्षित गोवळकोंड्यास पोहोंचविलें, व आपण **इब्राहीम कुतुबशाहा**पाशीं नोकरीस राहिला. **सैफउल्मुल्का**च्या अलौकिक धैर्याबद्दल त्याची कीर्ति सर्व दक्षणेंत गाजत होती, व त्याचे स्वार फार हुपार असून त्याचें धाडस व करामत अप्रतीम असे. तो आपल्या स्वारांस केवळ आपल्या बंधूंप्रमाणें वागवी. याच संधीस **इब्राहीम** आदिलशाहा मरण पावला, तेव्हां **हुस्सेन** निजामशाहानें **इब्राहीम कुतुबशाहा**ची मदत घेऊन विजापुरावर स्वारी केली. परंतु **कुतुबशाहा** मनापासून सहाय्य न करितां एकाएकीं परत आपल्या राजधानीस गेला, तेव्हां **हुस्सेन** निजामशाहासही अहंमदनगरास जाणें भाग पडलें.

सैफ उल्मुल्क.

हुस्सेन विजापुरावर स्वारी करितो.

**अली** आदिलशाहानें विजयानगरचा **रामराजा** व **इब्राहीम** कुतुबशाहा यांशीं स्नेह केला. **हुस्सेन** निजामशाहानें सन १५५९ सालीं गोदा तीरीं सोनपत गांवीं वऱ्हाडच्या **इमाद उल्मुल्का**ची भेट घेऊन त्याच्या मुलीशीं लग्न केलें, आणि त्यास अनुकूल करून ठेविलें. त्याचसालीं **हुस्सेनानें महंमद वस्ताद निशापुरी** व **चलीबीरुमीखान** यांस पोर्तुगीज लोकांनीं पश्चिम किनाऱ्यावर बांधलेला रेवदंडा किल्ला घेण्यास पाठविलें; परंतु पोर्तुगिजांनीं लढ करून अहंमदनगरच्या प्रजेस व प्रांतास कोणताही शिलशिला करणार नाहीं, असें कबूल केलें. नंतर त्यानें खानदेशांत फौज पाठवून जालना किल्ला घेतला. इतक्यांत विजापूर, गोवळकोंडें व विजयानगर ये-

थील राजांनीं आपलीं सैन्यें एकत्र करून निजामशाही प्रांतावर चाल केली, व कल्याणी आणि सोलापूर हे किल्ले स्वाधीन करण्याविषयीं निजामशाहास पत्र लिहिलें. परंतु हें म्हणणें निजामशाहानें अमान्य केल्यामुळें, सुमारें एक लाख स्वार व नऊ लाख पायदळ अहंमद नगरावर येऊन भिडलें. या प्रचंड सैन्याबरोबर लढाई करण्याचें आपल्या आंगीं सामर्थ्य नाहीं, असें समजून हुस्सेन निजामशाहा अहंमदनगर सोडून पैठणास गेला, आणि त्यानें तेथून वऱ्हाडचा **इमाद उल्मुल्क**, खानदेशचा **मिरान मुबारीक शाहा फरुकी** व बेदरचा **बेरीदशाहा** यांजकडे मदत मागण्यास वकील पाठविले. **अल्ली बेरिदाचा भाऊ खानजहान** यानें कांहीं दिवसांपूर्वीं बेदर सोडून **दुरिया इमाद उल्मुल्काकडे** चाकरी धरिली होती, त्यानें निजामशाहास सहाय्य न करण्याविषयीं **इमादशाहास** शिकविलें, आणि आपण सहा हजार स्वार घेऊन निजामशाही सरहद्दीवर देश उद्ध्वस्त करण्यास गेला. निजामशाही स्वारांनीं **खानजहाना**चा असा अजमास पूर्वींच ताडला होता. यामुळें ते आपल्या तयारींत होतेच. **खानजहानाशीं** लढण्याचा प्रसंग येतांच त्यांनीं त्याचा पराजय केला, तेव्हां त्यास **इमादउल्मुल्कास** तोंड दाखविण्याचीही शरम वाटूं लागली. शेवटीं तो आदिलशाहाकडे गेला.

विजापूर गोंवळकोंडें व विजयानगर येथील फौजा निजामशाहावर स्वारी करितात.

त्रिवर्गींच्या अफाट सैन्यानें अहंमदनगर वेढिलें. परंतु **अल्ली** आदिलशाहानें आपल्या राज्यास हा किल्ला सामील करावा, ही गोष्ट **इब्राहीम**-कुतुबशाहास इष्ट नव्हती. याकरितां तो आपल्या छावणींतून किल्ल्यावर कोणी धान्य सामग्री रवाना केल्यास मनाई करीनासा झाला, तसेंच त्याचा सरदार **मुल्ला इनायत उल्ला निवायत** यानेंही पैठण येथें निजामशाहासीं किल्ल्यांतील लोकांमार्फत पत्रव्यवहार चालविला. हीं कृत्यें लौकरच उघडकीस आलीं, तेव्हां **अल्ली** आदिलशाहा व **रामराजा** यांनीं **इब्राहीम** कुतुबशाहास असें करण्याचें कारण विचारिलें. परंतु त्याजबद्दल उत्तर न देतां **कुतुबशाहा** एके दिवशीं रात्रीं तळ उठवून गोंवळकोंड्यास गेला, व **मुल्ला इनायत उल्ला** किल्ल्यांतील लोकांस अगोदर भेटला, आणि **हुस्सेन** निजामशाहाकडे पैठणास जाऊन मिळाला. **खान जहानाचा** पराभव झाल्यावर **इमाद उल्मुल्कानें हुस्सेन** नि-

जामशाहाकडे जाहांगीररवानाबरोबर जंगी फौज पाठवून वेढा देणाऱ्या फौजेस रसद पोहोंचण्याचें बंद करण्याच्या कामगिरीस ही लोक नेमिलें. या कारणानें तिन्ही राजांच्या सैन्यांत अन्नाचा दुष्काळ पडला. त्यासरसा त्यांनीं वेढा उठवून अष्ट्यास नळ नेला. तेथून कांहीं फौज परांड्यावर व कांहीं आवशावर पाठवून सामान सरंजाम जमवून अहंमदनगरास वेढा द्यावा, असा विचार ठरला. ही बातमी निजामशाहास दाखल होतांच त्यानें कासीमबेग व मुल्ला इनायतउल्ला यांस रामराजाकडे तह ठरविण्यास पाठविलें. तेव्हां " निजामशाहानें कल्याणी किल्ला अल्ली आदिलशाहास द्यावा; इमाद उल्मुल्काकडील ज्या जाहांगीररवानानें शत्रूची रसद बंद करून शत्रूच्या फौजेस फार उपद्रव दिला व वेढा उठविण्याचें भाग पाडिलें, त्यास निजामशाहानें ठार मारावें, निजामशाहानें रामराजाची भेट घेऊन त्याजकडून विडा घ्यावा, अशा शर्तीवर तह ठरला.

तह ठरतो.

**हुस्सेन** निजामशाहानें निरुपायास्तव हीं तहाचीं कलमें मान्य केलीं, व जाहांगीररवानास मारेकऱ्यांकडून त्याच्याच तंबूंत जिवें मारविलें.+ नंतर रामराजाची भेट घेण्यास तो त्याच्या तंबूंत गेला; तेव्हां रामराजा डेऱ्याच्या बाहेर येऊन त्यानें त्याचा हात धरून त्यास आंत नेलें. निजामशाहा जरी मानी होता, तरी करतो काय? रामराजाच्या स्पर्शानें आपले हात विटाळले, असें समजून पाणी मागून घेऊन त्यानें आपले हात धुतले. हें पाहातांच रामराजा म्हणाला. " जर तुम्हीं माझे तंबूंत भेटीस आलेले नसतां तर हेच हात कापून गळ्यांत बांधले असते." असो. नंतर रामराजानेंही आपले हात धुतले. या बोलाचालीनें दगा होण्याचाच समय आला होता, परंतु थांबला निजामशाहानें कल्याणी किल्ल्याच्या किल्ल्या रामराजाच्या हवालीं करतांना म्हटलें, " या मी तुम्हांस नजर करितों." त-

निजामशाहा रामराजाची भेट घेतो.

---

+ एका हिंदूच्या चिथावणीवरून निजामशाहानें जाहांगीर सारख्या शूर व स्वधर्मी मुसलमानाचा कृतघ्नपणानें वध केला! यावरून राज्यकारस्थानें किती कठीण आहेत, किंवा राजावर कधींही विश्वास ठेवूंनये ही म्हण खरी आहे, याचा वाचकांनींच विचार करावा.

री तिकडे लक्ष न देतां **रामराजानें** त्या लागल्याच **अल्ली** आदिलशाहाकडे पाठविल्या, व **हुस्सेन** निजामशाहास विडा दिला. त्याबरोबर तो आदिलशाहाची भेट देखील न घेतां अहंमदनगरास चालता झाला. निजामशाहानें अहमदनगरास जे मातीचे तट व बुरूज होते, ते पाडून नवीन दगडाचे बांधिले, व सभोंवार भारी खोल खंदक खणला. वरील तहावर **हुस्सेन** निजामशाहाच्या तर्फे **कासीमबेग** व **मुल्ला इनायत उल्ला** आणि **रामराजाच्या** तर्फे **व्यंकटाद्री** व **येलतमराज** यांनीं सह्या केल्या होत्या.

हुस्सेन कल्याणीस वेढा घालतो.

इसवी सन १५६२त **हुस्सेन** निजामशाहा व **इब्राहीम** कुतुबशाहा यांची कल्याणी जवळ भेट झाली, तींत निजामशाहाची ज्येष्ठ कन्या **बिबीजमाली** इचा **इब्राहीम** कुतुबशाहाशीं विवाह ठरून मोठ्या कडाक्यानें थाटमाट झाला. आणि लगेच त्या उभयतांनीं कल्याणीस वेढा दिला. त्याच ठिकाणीं **अल्ली** आदिलशाहा व **रामराजा** यांनीं त्यावर हल्ला केला, इतक्यांत बेदरहून **अल्ली** बेरीदशाहा व वऱ्हांडांतून **बुऱ्हाण** इमादशाहा हेही त्यास येऊन मिळाले. **दुरियारखान** मरण पावून या संधीस **बुऱ्हाण** हा त्याचा पुत्र गादीवर बसला होता, आणि तो **खानजहानास** निष्कारणी मारल्याबद्दल निजामशाहावर फार रागावला होता. ही फौज समीप येतांच निजामशाहानें आपलीं बायका मुलें बंदोबस्तानें आवशाच्या किल्ल्यांत ठेवून आपण कुतुबशाहासह जंगी सातशें तोफा, पांचशें हत्ती व पुष्कळ सैन्य घेऊन निघाला, आणि शत्रु सैन्यापासून सहा कोसांच्या अंतरावर तळ देऊन राहिला. इतक्यांत एकाएकीं भयंकर वादळ सुटून मोठा पर्जन्य पडला. यामुळें त्यांचे सर्व तंबू उडून गेले, व जिकडे तिकडे पाणीच पाणी होऊन चिखल झाला. बैल चालण्यास हरकत येऊन साऱ्या अवजड तोफा चिखलांत रुतून निरुपयोगीं झाल्या, आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं विजापूरच्या बर्गी सरदारांनीं **इब्राहीम** कुतुबशाहाच्या छावणीवर हल्ला करून लोकांस कापून टाकण्याचा सपाटा लाविला. त्याबरोबर सर्व फौज घाबरून चारी दिशांनीं पळाली. त्यांतून निजामशाहा

आदिलशाहा व रामराजा निजामशाहावर स्वारी करितात.

ही सातशें पैकीं लहानशा चाळीस तोफा घेऊन मागें हटला. याच वेळीं विजापुरास जी जंगी तोफ आहे, ती निजामशाहाकडून विजापूरकरांनीं घेतली आणि विजापुरास नेली, असें कित्येकांचें मत असून कोणी असेंही म्हणतात कीं, ही तोफ परिंड्याच्या किल्यावर असून तो किल्ला कांहीं काळ विजापूरकरांच्या ताब्यांत होता. तेव्हांच त्यांनीं ती विजापुरीं नेली. ही तोफ **बुऱ्हाण** निजामशाहाच्या कारकीर्दींत **चलीबी रुमीखान** यानें पितळ ओतून केली. हिचें वजन पन्नास खंडीवर असून तिचा गाभा इतका रुंद आहे कीं, त्यांत बसून पागोटें सहज बांधतां येतें. या तोफे एवढी तोफ पृथ्वींत दुसरी नाहीं. असो. निजामशाहाच्या मागें शत्रूंचे लोक लागले, त्यामुळें ज्या थोड्याशा तोफा तो आपल्याबरोबर घेऊन जात होता, त्याही त्यास टाकून देणें भाग पडलें. जरी यावेळीं त्याजकडे अवघे एक हजार लोक होते, तरी शत्रूंच्या सहा हजार लोकांच्या कचाट्यांतून तो सुरक्षित निशाण व छत्रासह अहंमदनगरास जाऊन पोहोंचला. नियमित वेळीं निमाज पढण्याचें निजामशाहा कधींही चुकवीत नसे. एके दिवशीं शत्रूंचे लोक लगट करून मागें लागले होते, यामुळें घोड्यावरून खालीं उतरूं नये, असें जवळच्या लोकांनीं सांगितलें असतां तें न जुमानतां तो खालीं उतरून माध्यान्हकाळचा निमाज पढला. हें त्याचें धारिष्ट पाहून लोकांनीं तोंडांत बोटें घातलीं! आणि त्याची फार तारीफ केली! निमाज पढल्यावर कमरेंतील सोन्याचा पट्टा न काढल्याचें त्यास स्मरण झालें म्हणून तो पुनः पट्टा काढून निमाज पढला. तेव्हां तर 'शाहानें शर्थ केली! शर्थ केली!! असें म्हणून लोकांनीं टाळ्या पिटून शाबासकीचा एकच घोष केला! हा प्रकार असा चालला असतां मागें लागलेल्या लोकांनीं या फंदांत पडणें व्यर्थ आहे, असें समजून शत्रूपक्षाचे लोक परत गेले होते. असो.

निजामशाहाचा पराभव व पाठलाग.

अहंमदनगरास गेल्यावर किल्यांत सामग्री भरून निजामशाहा जुन्नरास गेला. शत्रूंनीं पुनः अहंमदनगरास वेढा दिला. या प्रसंगीं रामराजाकडील हिंदूलोकांनीं मशिदी बाटविण्यांत, स्त्रियांची विटंबना करण्यांत, मुसलमानांची जिनगी लुटून त्यांशीं क्रूरत्वानें वागण्यांत आणि त्यांचा अपमान करण्यांत अगदीं

अहंमदनगरास वेढा.

कमाल केली! त्यांच्या या कृत्याची **अल्ली** आदिलशाहास देखील शरम वाटली! परंतु तो प्रकार बंद करण्याचा उपाय नाहींसें पाहून वेढा उठवून निजामशाहावर जुन्नराकडे जावें, अशी **रामराजापाशीं** मसलत कादिली. त्याप्रमाणें ते जुन्नराकडे निघाले. हें वर्तमान निजामशाहास समजतांच तो जवळच्या पहाडांत गेला, आणि **हुसेन रुस्तुमखान** दक्षणी, **अधमखान** हबसी व **साबाजी** कोळी यांस फौजा देऊन शत्रूंच्या सभोंवतीं हल्ले करून त्यांची रसद बंद करण्यास पाठविलें. त्यांनीं तें काम इतक्या उत्तम रीतीनें बजाविलें कीं, शत्रूंचा पुढें जाण्याचा मार्गच खुंटला! **हुस्सेन रुस्तुमखानानें** कोणूर गांवापाशीं शत्रु सैन्यास अडविलें, आणि **अल्ली** आदिलशाहा शिकारीस गेल्याची संधि पाहून विजापूरच्या फौजेवर एकाएकीं छापा घातला. त्यांत **अल्लीचा** चुलता ठार झाला! इतक्यांत आदिलशाही लष्करानें अशी लगट केली कीं, **रुस्तुमखान** व त्याचे दोन हजार लोक यांस तेथेंच कापून काढिले. पुढें बरसात सुरू झाल्यामुळें शत्रूंनीं मोर्चा फिरविला आणि अहंमदनगरास वेढा दिला. अहंमदनगरच्या दक्षणेस शिना नदी कांठीं **रामराजाचा** तळ होता. एके दिवशीं पहाडांत पर्जन्य पडून नदीस रात्रीचा असा पूर आला कीं, तेणेंकरून त्याचे ३०० घोडे व शेंकडों बैल बुडून मेले! आणि वीस सरदार व पंचवीस हजार लोक वाहून गेले!! या जबर हानीमुळें **रामराजानें** वेढा उठविला, आणि तो कर्नाटकांत गेला. **अल्ली** आदिलशाहानें नळदुर्गास जाऊन त्या किल्याची बंदोबस्ती केली. **रामराजा** कर्नाटकांत जात असतां गुतगी शहरीं घांस दाण्याचा बंदोबस्त करण्याच्या मिषानें उतरला, आणि त्यानें जवळचे विजापूरकरांचे व गोंवळकोंडकरांचें बरेच प्रांत लुटून फस्त केले, व त्या दोन्ही प्रांतांतील कांहीं मुलूख घेऊन तो परत गेला.

रामराजाच्या सैन्यास पुरापासून अपाय.

**मूर्तिझाखान** अंजूस नळदुर्ग+ येथें ठेवून **अल्ली आदिलशाहा** विजापुरास गेला. त्याचे सरदार सोलापूर प्रांतीं वारंवार स्वाऱ्या करूं ला-

---

+ याची दुरुस्ती करून त्यास शाहादुर्ग असें अल्ली आदिलशाहानें नांव दिलें. बुसातिने सलातीन.

गले, यास्तव जर सोलापुरास वेढा पडला तर टिकाव धरितां यावा, म्हणून हुस्सेन निजामशाहानें एक हजार बैल धान्यानें भरून बरोबर फौज देऊन पाठविले. ही खबर मूर्तिजारवानास कळतांच त्यानें आपले बर्गी बरोबर घेऊन सोलापूर व परिंडें यांच्या दरम्यान त्या बैलांस गांठिलें. तेव्हां तेथें एक छोटीशी लढाई होऊन तींत निजामशाही लोकांचा पराभव झाला, आणि त्यांचे दीडशें हत्ती मूर्तिजारवानास मिळाले. या जयानें बर्गी लोक चढून जाऊन आसपासचा देश बेधडक लुटूं लागले. मूर्तिजारवानानें ते हत्ती विजापुरास पाठविले, आणि आपण नळदुर्गास आला. आपल्या फौजेची अशी वाताहात झाल्याचें वर्तमान निजामशाहास समजतांच त्यानें दोन हजार स्वार आदिलशाही लष्करामागें लाविले. त्यांनीं मूर्तिजारवानावर एकदम हल्ला करून त्यास कैद करून अहंमदनगरास पाठविलें. नंतर हुस्सेननिजामशाहानें स्वतः सैन्य घेऊन बारा हजार धान्याचें गोण सोलापुरास पोहोंचविलें.

सोलापुरास रसद जात असतां विजापूरचे लोक अडवितात.

या प्रमाणें निजामशाहा व आदिलशाहा यांचीं युद्धें चालली असतां सन १५६४ सालीं दक्षणेंतील सर्व मुसलमान रामराजावर स्वारी करण्याकरितां एकत्र झाले. अहंमदनगर, विजापूर, बेदर व गोवळकोंडें या चारी राजांचें सैन्य दक्षणेकडे गेलें, आणि कृष्णा उतरून हुकेरीगांवाजवळ त्यांचा तळ पडला. तेव्हां विजयानगरचा राजा सात हजार स्वार व नऊ हजार पायदळ घेऊन त्यांवर चालून आला. तुमच्या प्रचंड सैन्याशीं टक्कर मारण्यास आमच्या आंगीं सामर्थ्य नाहीं, याकरितां आम्ही इकडे येतांना जे महाल घेतले आहेत, ते तुमच्या स्वाधीन करून परत जाण्यास आम्हीं कबूल आहों. असें मुसलमान राजांनीं रामराजाकडे बोलणें लाविलें. तें त्यानें नाकबूल करून लढाईची तयारी केली. डावीकडे अल्ली आदिलशाहावर हल्ला करण्यास रामराजानें वीस हजार स्वार, दोन लाख पायदळ व पांचशें हत्ती आपला भाऊ व्यंकटाद्री याच्या ताब्यांत दिले. उजवीकडे आपला दुसरा भाऊ येलतमराज यासही व्यंकटाद्रीइतकीच फौज देऊन नेमिलें, आणि आपण स्वतः पंधरा हजार निवडक स्वार, एक हजार हत्ती,

रामराजावर स्वारी. इ. स. १५६४

तहाविषयीं बोलणें

रामराजाची तयारी.

पांच लक्ष पायदळ अशा सैन्यानिशीं निजामशाहावर हल्ला करण्यास मध्यभागीं राहिला. **इब्राहीम** कुतुबशाहा व **अली** बेरिदशाहा यांस जिवंत धरून आणण्याविषयीं आपल्या लोकांस **रामराजा**नें सक्त ताकीद केली होती. कारण त्यांस आमरण लोखंडी पिंजऱ्यांत घालून ठेवण्याची त्याची फार इच्छा होती.+

तह करण्याची मुसलमानांची आशा व्यर्थ जातांच त्यांनीं मारीन किंवा मरेन, अशा निर्वाणानें लढाई करण्याचा निश्चय केला. उजव्या बाजूस **अली** आदिलशाहा, **हुस्सेन** निजामशाहा, मध्यभागीं **इब्राहीम** कुतुबशाहा व **अली** बेरीदशाहा डावीकडे याप्रमाणें सैन्य उभें राहिलें होतें. त्रिवर्गांनींही बारा इमामांचीं बारा निशाणें उभारलीं. आपल्या आघाडीस निजामशाहानें सहाशें तोफांची रांग लाविली. प्रत्येक रांगेंत दोनशें तोफा या प्रमाणें एकाबाहेर एक अशा तीन रांगा केल्या होत्या. अगदीं बाहेरच्या रांगेंत अवजड तोफा असून त्याच्या आंतील रांगेंत त्याहून लहान व अगदीं आंतील रांगेंत त्याहून लहान तोफा लाविल्या, व सर्वांवर **चलीबीरवान** यास मुख्य नेमिलें. हा खान मूळचा आशियामैनरचा राहणारा असून त्यानें युरोपांत सुद्धां लष्करीखात्यांत नोकरी केली होती. आपल्याकडील व्यवस्था स्वस्थपणें करितां यावी; एतदर्थ शत्रूंवर दोन हजार तिरंदाजांकडून एकसारखा बाणांचा वर्षाव चालविला होता, आणि तोफांची तयारी होतांच तिरंदाज मागें सरले. त्याबरोबर शत्रूनें घाला घातला. इतक्यांत तोफांस सरबत्ती दिल्यामुळें त्यांच्या भडिमारानें त्यांस मागें हटावें लागलें. **रामराजा**नें आपल्या लोकांस बक्षिसें देऊन आणखीं मोठमोठ्या बक्षिसांची लालूच दाखवून ईर्षा आणिली, आणि पुनः मुसलमानांवर हल्ला करविला. यावेळीं हिंदु लोक अशा वीरश्रीनें त्यांवर तुटून पडले कीं; मुसलमानांच्या दोन फळ्या फोडून मध्यभागीं निजामशाही फळीवर त्यांनीं हल्ला केला. शत्रू जवळ आल्यास त्यांवर सोडण्याकरितां **रुमीरवाना**नें तांब्याच्या नाण्यानें भरून पिशव्या ठेविल्या होत्या. त्या त्यानें तोफांत भरून सोडिल्या, त्या कडा-

मुसलमानी फौजेची व्यवस्था.

---

+ निजामशाहास मारून त्याचें फक्त डोकें आणण्यास सांगितलें होतें.

वयांत तोफांच्या अगदीं तोंडाजवळ पांच हजारांहून जास्त लोक मरून पडले, आणि बाकीचे मागें हटले. या गडबडींत किश्वररवान या नांवाच्या एका विजापूरच्या सरदारानें रामराजावर मध्यभागीं हल्ला केला, व तो पळत असतां निजामशाहाकडील एका हत्तीनें त्यांस पकडून सोडेंतून निजामशाहाकडे आणिलें. आणि त्याच्या हुकमानें त्याचें शीर उडविलें. तेव्हां त्याचे सारे लोक विजयानगरास पळून गेले. नंतर मुसलमानांनीं विजयानगर घेतलें, वगैरे साद्यंत हकीगत विजापूरच्या इतिहासांत आलीच आहे, एतदर्थ या स्थळीं द्विरुक्ति करीत नाहीं. ह्याप्रमाणें मुसलमान विजयी झाल्यावर हुस्सेन निजामशाहा अहंमदनगरास परत आला, आणि थोड्याच दिवसांत खाण्याच्या अनियमितपणामुळें व अव्यवस्थित विहारामुळें प्रकृति बिघडून सन १५६५ च्या जून महिन्याच्या ७ वे तारखेस मरण पावला. हुस्सेन निजामशाहास चार पुत्र व चार कंन्या अशीं आठ आपत्यें होतीं.

रामराजाचा पराभव व वध.

हुस्सेनाचा मृत्यु. इ. स. १५६५.

---

+ बुसातीनें सलातीनकार म्हणतात कीं; “ प्रत्यक्ष चलीवी रुमीखान ज्या हत्तीवर बसला होता, त्या हत्तीनेंच रामराजास पकडून रुमीखानाकडे दिलें, व खानानें त्यास निजामशाहाकडे नेलें. तेव्हां दोघे मार्मिक संभाषणें करीत असतां हकीम कासम बेगमबरजी यानें निजामास सांगितलें कीं; आदिलशाहाचें व रामराजाचें फार सख्य आहे, आणि आतां तो आल्यास ह्यास तुम्हांकडून सोडवील, व हा फार मळय करील. करितां यास आतांच्या आतां ठार मारावें. तेव्हां निजामशाहानें त्यास ठार मारून त्याचें मस्तक स्खावर टोंचून तें विजयानगरच्या सेनाग्रभागीं नेऊन ठेविलें. आणि तें पाहतांच विजयानगरची फौज राजा मेला असें समजून पळाली. ती जर त्यावेळीं पळाली नसती तर खचित जय पावती.

# मूर्तिजा निजामशाहा
## ऊर्फ दिवाणा.
इ॰ स॰ १५६५ ते १५८६प॰

शाहाच्या राज्यकारभाराची व्यवस्था.—— आदिलशाही व निजामशाही वऱ्हाडावर स्वारी करितात.—— आदिलशाहा निजामशाही मांतावर हल्ला करितो.—— राणीस राज्यकारभारांतून काढण्याविषयींचा कट होतो व फसतो.—— शाहा कारभार हातीं घेतो व कीश्वररखानावर चाल करितो.—— तो धारूरास वेढा घालतो, व कीश्वररखानास ठार मारून धारूर घेतो.—— विजापूरकरांशीं तह.—— पोर्तुगीज लोकांच्या रेवदंडा ठाण्यास वेढा घालतात, व वेढा उठतो.—— विजापूरकरांशीं नवा तह.—— तो वऱ्हाडावर स्वारी करितो व वऱ्हाड घेतो.—— खानदेशची फौज वऱ्हाडच्या गादीवर एका तोतयास बसविण्यास वऱ्हाडास येते.—— तिचा पराभव होऊन शाहा बऱ्हाणपुरापर्यंत मुलूख लुटतो व खंडणी घेतो.—— चंगिजखानावर खोटा आरोप व त्याचा वध. मूर्तिजास पश्चात्ताप होतो, व तो राज्य सोडितो.—— अकबर बादशाहा दक्षणेंत येतो.—— साहेबखान अनावर होतो.—— साहेबखान रुसून जातो.—— त्यास ठार मारतात.—— विजापुरावर स्वारी व पराभव.—— शाहाजादा हुस्सेन याचें लग्न.—— बुऱ्हाणखानास गादीवर बसविण्याचा कट.—— अकबराची फौज दक्षणेवर येते.—— फत्तेशाहा या फकिरावर शाहाची मर्जी बसते.—— शाहा जवाहीर अग्नींत टाकितो.—— शाहाजादा हुस्सेन यास मारण्यास शाहा यत्न करितो.—— सलाबतखान कैद होतो.—— शाहाजाद्याच्या वधाचा पुनः यत्न.—— शाहाजाद्याच्या बिछान्यास आग लावून त्यास खोलींत कोंडतात.—— त्याचा बचाव व त्यास दौलताबादेस दिवाण पोहोंचवितो.—— दिवाण कैद होतो व मिरझाखानास त्या जागीं नेमतात.—— मिरझाखान शाहाजाद्यास गादीवर बसविण्यास जातो.—— फेरिस्ताच्या सल्यानें सलाबतखानास शाहा बोलावतो.—— सलाबतखान येण्यापूर्वी शाहाजादा शहरांत येतो.—— शाहाचा वध.

---

**मूर्तिजा** लहान असतानांच गादीवर बसला, म्हणून त्याची आई **खुजा सुलताना** ही सर्व राज्याचा कारभार करूं लागली. **ऐन उल्मुल्क, ताजखान** व **ऐतेबारखान** या आपल्या तिघां भावांस ति-

नें पहिल्या प्रतीचे सरदार करून सहा वर्षेपर्यंत दौलतीचें काम पाहिलें. मुल्ला इनायत उल्ला यास तिनेंच पेशवा नेमिलें, आणि दररोज दरबारांत पडद्याच्या आंत बसून ती कारभार पाहूं लागली. त्यावेळीं तिचा मुलगा मूर्तिजा लहानपणाच्या आपल्या खेळांत काळ घालवीत असे.

राज्यकारभाराची व्यवस्था.

निजामशाही राज्याची अशी स्थिति असल्या कारणानें अल्ली आदिलशाहा, सर्व मुसलमानांनीं मिळून रसातळास नेलेल्या विजयानगरच्या राज्याचे प्रांत आपल्या मुलखास जोडण्याचें मनांत आणून सैन्य घेऊन अनिगुंडीस गेला. त्यावेळीं रामराजाचा भाऊ पेणकोंड्यास राहात असे. त्यास आपणावर विजापूरचें सैन्य येत आहे असें समजतांच खुजा सुलताना राणीस सहाय्य करण्याविषयीं त्यानें विनंति केली. सर्वांच्या सहाय्यानें जें राज्य मोडलें त्यांतील मुलूख एकट्यानेंच बळकवावा, हें तिला न आवडून तिनें मुलासह आपलें सर्व सैन्य घेऊन विजापूर प्रांतावर चाल केली. तेव्हां अल्ली आदिलशाहास आपल्या प्रांताच्या संरक्षणार्थ अनिगुंडीहून परत यावें लागलें. त्यानें येतांच अहंमदनगरच्या राणीची समजूत घालून उभयतांनीं मिळून बुऱ्हाण इमादशाहाचा दिवाण तोफालखान यानें वऱ्हाडचें राज्य बळकाविलें आहे, त्यावर स्वारी करावी, असा ठराव केला. त्याप्रमाणें निजामशाही आणि आदिलशाही फौजा वऱ्हाडांत शिरून व कांहीं देश लुटून पर्जन्यकाळ लागण्याच्या सुमारास परत येण्यास निघाल्या. मार्गांतच अल्लीआदिलशाहानें अहंमदनगरच्या बालराजास पकडून कैद करण्याचा बेत केला. ही गुणगुण खुजा सुलताना हीस समजतांच रात्रीं एकाएकी फौज घेऊन तिनें कूच केलें. अल्लीच्या तळापासून बऱ्याच अंतरावर एक नदी असून ती उल्लंघन करून निजामशाहाची फौज गेली, इतक्यांत त्या नदीस अतिशय पूर आला. यामुळें आदिलशाही फौजेस त्यांचा पाठलाग करण्यास सवड राहिली नाहीं. निजामशाही फौज मात्र सुरक्षितपणानें अहंमदनगरास येऊन दाखल झाली.

आदिलशाही व निजामशाही वऱ्हाडावर स्वारी करितात.

सन १५६७ सालांत अल्ली आदिलशाहानें निजामशाही प्रांतावर स्वारी करून त्यांचा पराभव केला, व पुष्कळ ठाणीं घेतलीं. खुजा सुलताना इणें दरबारच्या खानदानींतील व योग्य अशा चार जुन्या सरदारांस व बडे-

लोकांस एकीकडे ठेवून आपल्या आप्तांस दरबारांतील सर्व जागा देण्याचा क्रम चालविला होता, यामुळें सर्व सरदारांचीं मनें तिजविषयीं विटलीं होतीं. त्यांनीं निजामशाही फौजेच्या पराभवाची वार्ता येतांच, **शाहा जमालउद्दीन, हुस्सेन अंजू, कासीमबेग हकीम** आणि दुसरे राजाचे सोबती यांनीं राणीच्या अयोग्य वर्तनाबद्दल राजाकडे कुरकूर केली. तेव्हां राजा त्यांस म्हणाला. " माझे सर्व मंत्री राणीस अनुकूल असतां मला तिच्या हातचा अधिकार कसा काढून घेतां येईल?" त्यांनीं उत्तर दिलें, ' जर आपला हुकूम होईल तर आम्हीं मुख्य सरदारांपैकीं कितीएकांस अनुकूल करून आपला हेतु सिद्धीस नेऊं!'

आदिलशाहा निजामशाही मांतावर स्वारी करितो.

त्यांच्या ह्या म्हणण्यास मूर्तिजा निजामशाहानें अनुमोदन दिलें, आणि कांहीं दिवस गेल्यावर वरील सरदार व त्याचे दुसरे कांहीं मित्र वाड्यांत गेले. तेव्हां राणीजवळच राजा बसला होता. राजाची पोरबुद्धीच त्यानें त्यांस पाहतांच अनुमान केलें कीं, आपला गुप्त बेत फुटला! आतां आपल्यास राणी खचीत शासन करील! या भीतीनें आपला बचाव करण्याकरितां त्यानें राणीस सांगितलें," अमच्या सरदारांनीं तुला पकडण्याचा बेत केला आहे." यावरून तिनें चौकशी करून मुख्य अपराध्यास पकडलें.

राणीस कारभारांतून काढण्याविषयींचा कट फसतो.

विजापूरचा सरदार **किश्वरखान** निजामशाही मांतास उपद्रव देतच होता. त्याच्या शासनार्थ सन १५६१ त राणी फौज घेऊन मुलासह गेली. तिचा धामणगांवीं मुक्काम असतां **मूर्तिजा** निजामशाहास वाटलें कीं," आतां आपण प्रौढावस्थेंत आलों, सबब राज्यकारभार हातीं घेण्यास कांहीं हरकत नाहीं." म्हणून मुख्य मुख्य सरदारांस वश करून **हबषखानास** राणीकडे ' आपण राज्यकारभाराचीं सूत्रें आमच्या हवालीं करून **ईश्वर** भजनीं काळ घालवून इतर राण्याप्रमाणें राहावें.' असा निरोप सांगून पाठविलें. या सांगण्याचा तिला फार राग आला, आणि ती आपण वाढविलेल्या अशा कितीएक विश्वासू सरदारांस बरोबर घेऊन हत्यारबंद झाली, व तोंडावर बुरखा घेऊन घोड्यावर बसून राजाकडे आली. आणि इतक्यांत राजाकडील लोकांनीं तिला पक-

राजा कारभार हातीं घेतो व किश्वरखानावर जातो.

डलें, आणि तिच्या बरोबरचे लोक पळून गेले. नंतर राजानें सर्व कारभार आपल्या हातीं घेतला, व आणखी कांहीं फौज वाढवून किश्वरखानावर धारूरकडे चाल केली.

मूर्तिजा निजामशाहा किश्वरखानाच्या तळानजीक पोहोंचल्यावर त्याजकडे खानाकडून एक मोहोरबंद लखोटा घेऊन जासूद आला. तो उघडून पाहतांच त्यांत अशीं निर्लज्जपणाचीं वाक्यें लिहिलीं होतीं कीं, तेणेंकरून निजामशाहाचें मस्तक अगदीं फिरून गेलें. तो लागलाच घोड्यावर बसला. आणि 'धारूरच्या किल्यांत प्रवेश केल्याशिवाय घोड्यावरून उतरणार नाहीं,' अशी प्रतिज्ञा करून त्यानें घोडा भरधांव सोडिला. त्याच्या लोकांनीं त्याला सांगितलें, "अशा सडेस्वारांस किल्ले घेतां येत नाहींत. आपल्याकडे थोडी फौज आहे, आपण अशा वेडेपणानें जीव धोक्यांत घालण्यास जाऊं नये." राजानें उत्तर दिलें "ईश्वर कृपेनें मी वेशी तरवारीनें तोडून किल्यांत प्रवेश करीन. आतां जर माझें मरणच तेथें नेमिलें असेल, तर तें चुकविण्यास प्रयत्न करणें व्यर्थ आहे." राजाचा पक्का निश्चय पाहून त्यास चिलखत घालण्याविषयीं सरदारांनीं विनंति केली. कारण असें करण्यास पैगंबराची आज्ञा आहे. राजानें चिलखत चढविलें, आणि घोड्यास टांच मारिली. तो किल्याजवळ पोहोंचतांच त्यावर गोळ्यांचा, बाणाचा आणि अग्नीबाणाचा वर्षाव झाला; त्यामुळें शाहाकडील शेंकडों लोक मेले. कांहीं हत्ती व घोडेही पाडाव झाले. तथापि न डगमगतां निजामशाहानें तसाच हल्ला चालविला. दैवयोगानें त्यास कांहींएक इजा झाली नाहीं. इतक्या संधीस किल्यांतील भडिमार एकदम आपोआप बंद झाला, तेव्हां शाहास फार आश्चर्य वाटलें; तपासा अंतीं समजलें कीं, निजामशाही फौजेचा किल्यांत प्रवेश झाला, व आंतील लोक पळून गेले. किश्वरखानाच्या उरांत बाण लागून तो मरण पावला, तेव्हांच त्याच्या लोकांनीं लढाई सोडून पळ काढला! खानाचें शीर तोडून निजामशाहानें बुरजावर लाविलें, आणि या जयप्राप्तीबद्दल परमेश्वराचे फार फार आभार मानिले. नंतर इब्राहीम कुतुबशाहाची मदत घेऊन त्यानें विजापुरावर स्वारी केली. या दोघांमध्यें शाहा अबुहुस्सेन यानें इतकें वैमनस्य पाडिलें कीं, कुतुबशाहास निजामशाही

धारूरास वेढा.

तो कीश्वरखानास मारून धारूर घेतो.

फौजेनें आपली छावणी लुटण्यास मागें टाकून पळून जावें लागलें. पुढें लौकरच अली आदिलशाहा व मूर्तिजा नि- विजापुराशीं तह. जामशाहा ह्यांत तह झाला, आणि निजामशाहा अहंमदनगरास आला.

मूर्तिजानें जमालउद्दीन हुसेनास आपला दिवाण केला, आणि पोर्तुगीज लोकांकडून रेवदंडा किल्ला घेण्यास कूच करून त्यास कडेकोट वेढा दिला. यासमयीं पोर्तुगीज लोक समुद्रांतू- रेवदंड्यास वेढा. न धान्यसामुग्री आणूं लागले, आणि निजामशाहाकडील सरदारांस दारूच्या बाटल्या नजर करून वेढ्याचें काम बरोबर चालूं देईनात. तेव्हां कांहीं महिने लोटल्यावर निजामशाहा परत गेला. पुढें त्यानें किती एक कामगारांस व दिवाणास दूर करून चंगीजखान ह्या हुषार सरदारास दिवाण नेमिलें. ह्यानें चोहोंकडे चांगली व्यवस्था ठेवून अली आदिलशाहा व इब्राहीम कुतुबशाहा यांमध्यें जडलेल्या स्नेहांत युक्तीनें बिघाड आणून आदिलशाहाची व मूर्तिजा शाहाची सरहद्दीवर मुलाखत करवून सख्य जोडिलें. ह्या भेटींत उभयतांचा असा ठराव झाला कीं, मूर्तिजा निजामशाहानें तोफालखान व अली बेरीदशाहा विजापुराशीं न- यांचीं वऱ्हाड आणि बेदरचीं राज्यें घ्यावीं, व अली- वीन तह. आदिलशाहानें त्या दोहों राज्यांच्या बरोबरीचा कर्नाटकांतील मुलूख सर करावा. ह्या नियमा अन्वयें सन १५७२ त मूर्तिजा निजामशाहानें वऱ्हाडावर स्वारी केली. त्यांत चंगीजखानाच्या पराक्रमानें तोफालखानास निजामशाही फौजेनें एलिचपुराहून हांकून लाविलें. मूर्तिजा वऱ्हा- तेव्हां तो व त्याचा मुलगा समशेर उल्मुल्क सुमारें दो- डावर स्वारी करितो. नशें हत्ती व कांहीं सामान सुमान घेऊन पाहाडांत आश्रयास गेले. तरीत्यांच्या मागें निजामशाहा लागलाच होता. तेव्हां तें या जंगलांतून त्या पाहाडांत आणि त्या पाहाडांतून दुसऱ्या जंगलांत सहा महिने लपून होते. परंतु त्यांचा पिच्छा निजामशाहानें सोडिला नाहीं. शेवटीं जेव्हां ते एका अरुंद अशा बारींत लपले होते. तेव्हां एका वेड्या फकिराच्या नादीं लागून निजामशाहानें त्यांवर हल्लड करण्यास त्वरा केली नाहीं. त्या फकिराचें नांव मीर मोला मझिंदराणी असून तो मार्गांतच निजामशाहास भेटला. तो बारा इमामाचा भक्त होता, आणि सांगूं लागला कीं, बारा हजार होन दिल्याशिवाय तूं पुढें जाऊं नकोस. व

जाशील तर तुला बारा इमामांची शपथ आहे. निजामशाहाही बारा इमामांचा भक्तच होता, या कारणानें त्यांची शपथ मोडून पुढें जाणें त्याच्या जिवावर आलें. **चंगीजखान** दिवाणानें त्याला पुष्कळ प्रकारें सांगितलें कीं, मुक्कामास गेल्यावर त्यास पैसा देतां येईल. परंतु शाहा तें न ऐकतां त्याच्या रकमेचा भरणा होईपर्यंत तेथेंच थांबला. या विलंबामुळें **तोफालखाना**स तेथून निसटतां आलें. तो तेथून बऱ्हाणपुरास गेला आणि खानदेशच्या राजाकडे आश्रय मागूं लागला. परंतु न जाणों आपणावर उगाच निजामशाहाची धाड येईल, या भितीनें त्यानें आश्रय दिला नाहीं. तेव्हां तो फिरून वऱ्हाडांत येऊन नर्नाळा किल्ल्यांत राहिला. तेथून त्यानें **अकबर** पादशाहाकडे कुमकेचा अर्ज केला. परंतु **अकबरानें मूर्तिजा** निजामशाहाकडे वकील पाठवून वऱ्हा-

तो वऱ्हाड घेतो.

डच्या वाटेस न जाण्याविषयीं सांगून पाठविलें. तें निजामशाहानें जुमानलें नाहीं, आणि नर्नाळा व वऱ्हाडचे मुख्य किल्ले घेऊन त्यानें आपला अम्मल बसविला. **तोफालखान** व इमादशाही वंशाचा राजा खानानें येथें कैदेंत ठेविला होता. त्या सर्वांस निजामशाहानें आपल्या प्रतिबंधांत ठेविलें, परंतु, दोघेही तेथें लौकरच एकाएकीं मरण पावले. यावरून त्यांस बहुधा विषप्रयोग झाला असावा असा लोक तर्क करितात.

**मूर्तिजा** निजामशाहाच्या मनांत तेथून अहंमदनगरास जावयाचें होतें. परंतु **चंगीजखाना**नें सांगितलें कीं, ज्यापेक्षां विजापुराधिपति **अल्ली** आदिलशाहा विजयानगरचा प्रांत हस्तगत करून राज्य वाढवीत आहे, त्यापेक्षां तूर्त परत न जातां बेदरही हस्तगत करून टाकावें. त्याप्रमाणें ते बेदरच्या रोखानें निघाले. इतक्यांत खानदेशचा राजा **मिरान महंमदशाहा** यानें वऱ्हाडचा माजी राजा **दुरिया इमाद उल्मुल्क** याचा पुत्र असें सोंग करून एका पुरुषास वऱ्हाडच्या गादीवर बसविण्याकरितां तीन हजार स्वार व आठ हजार पायदळ पाठविलें. या फौजेनें निजामशाहाचीं कित्येक ठाणीं उठवून तेथें आपला अंमल बसविला. हें कृत्य ऐकतांच **मूर्तिजा** निजामशाहा मागें फिरला, आणि सर्व फौज घेऊन **चंगीजखाना**नें मागाहून यावें, असें त्यानें सांगितलें. **सय्यद मूर्तिजा** या निजामशाही सरदारानें आठ हजार स्वारांनिशीं गांठून त्या तोतयास पळविलें, तेव्हां त्याची फौजही जिकडे तिकडे पळत सुटली! नंतर **मूर्तिजा**शाहानें रोहणखेडा घांटानें खानदेशांत शिरून तहत बऱ्हाणपुरा-

खानदेशची फौज एका तोतयास वऱ्हाडच्या गादीवर बसविण्यास येते.

पर्यंत मांत लुटिला.

**मिरान महंमदखान फरूकी**नें ज्या अशरगड किल्यांत आश्रा घेतला होता, तो किल्ला पाहण्याच्या इच्छेनें **चंगीजखान** आठ-हजार स्वारांनिशीं तिकडे गेला. तो जवळ आला असें कळल्यावर **महंमदखाना**नें त्यास परत जातां येऊनये म्हणून कांहीं फौज पाठविली, परंतु तिचा **चंगीजखाना**नें पराभव करून कित्येकांस ठार मारिलें व कांहीस कैद केलें. इतक्यात निजामशाहा स्वतः अशरगडावर चालून आला. त्यानें आसपास इतक्या टोळ्या पाठविल्या कीं, त्यांनीं आसमंतात एकही मनुष्य जिवंत ठेविलें नाहीं. शेवटीं **मिरान महंमदा**नें निजामशाहास मोठी खंडणी देण्याचें कबूल करून मार्गस्थ केलें.

तिचा पराभव करून निजामशाहा ब्ऱ्हाणपुरापर्यंत मांत लुटतो, व खंडणी घेतो.

यानंतर लौकरच **इब्राहीम** कुतुबशाहाकडून **मिरजाखान इस्पाहनी** या नांवचा वकील निजामशाही लष्करांत आला. त्याचा हेतु इतकाच होता कीं, **चंगीजखाना**स लांच देऊन बेदरावरील स्वारीची तहकुबी करावी. त्यांचाबद्दल **चंगीजखाना**कडे गोष्ट निघतांच त्यानें त्या वकिलाची निर्भर्त्सना करून सांगितलें, " मला निजामशाही खजिना वस्स आहे." बेदर सर झाल्यावर **मूर्तिजा निजामशाहा, अली आदिलशाहा** व **इब्राहिमकुतुब शाहा** या तिघांनीं एकत्र होऊन **अकबर पादशाहा**चा दक्षणेवरील शिलशिला चालूं देऊंनये." असो. **चंगीजखान** त्यांचानें वश होईना, तेव्हां त्या वकिलानें निजामशाहाच्या मर्जीतील **साहेबखान** या नोकरास वश केला. त्याचें व **चंगीजखाना**चें बरें नव्हतें. वकिलानें शाहास सांगण्याकरितां खानास असें शिकविलें कीं, " **चंगीजखाना**चा बेत वऱ्हाडचें राज्य हाताखालीं घालण्याचा आहे." **साहेबखाना**नें ही कामगिरी मोठ्या खुषीनें पतकरून शाहाकडे सदरहू मजकूर कळविला; परंतु शाहा त्यास म्हणाला; "तुझ्या चुरशीमुळें तूं हा बनावट मजकूर सांगत आहेस" दिवाणाबद्दल आपल्या सांगण्यावर राजाचा कोणत्याच प्रकारें भरंवसा ठरत नाहीं, हें पाहून **साहेबखाना**नें डोळ्यांतून पाणी काढिलें आणि म्हटलें " सरकार जर माझ्यासारख्या इमानी मनुष्याच्या सांगण्यावर आपला विश्वास नसेल, तर **चंगीजखाना**च्या गांवचाच **मिरजाखान इस्पाहनी** आहे, त्यास आणून विचारा. **इस्पाहनी**स विचारतांच त्यानें शाहाच्या मनांत **चंगीजखा-**

ना विरुद्ध मजकूर सोळा आणे भरवून दिला. तरी आणखी पुरावा मिळेपर्यंत वाट पाहण्याचा शाहानें निश्चय केला. शेवटीं त्यानें चंगीजखानास बोलावून सांगितलें, "मला आतां लष्करांत रा हण्याचा कंटाळा आला आहे, याजकरितां आपण अहंमदनगरीं परत जाऊं" दिवाण म्हणाला, 'नूतन संपादन केलेल्या प्रांतांत तेथील लोकांचें प्रेम जडण्याकरितां सरकारांनीं निदान पांच सहा महिने तरी राहावें, असें मला वाटतें. परंतु तशी सवड नसेल तर मला तरी सैन्यासह मागें राहण्याचा हुकूम करावा.' या भाषणावरून निजामशाहाच्या मनांत लागलाच संशय उत्पन्न झाला, आणि तेव्हांपासून त्याचा खानावरील विश्वास उडाला. चंगीजखानासही शाहाच्या चलबिचल वृत्तीवरून वाटलें कीं, 'आतां आपलें येथें राहणें चांगलें नव्हे?' म्हणून प्रकृति बिघडल्याचें ढोंग करून तो कांहीं दिवस दरबारीं गेलाच नाहीं. यामुळें शाहास त्याचा अधीकच वहीम आला, व तो दिवसानु दिवस इतका वाढत गेला कीं, अखेरीस शाहानें दरबारच्या वैद्यांकडून त्यास विषप्रयोग करून ठार मारण्याचा निश्चय केला. तो चंगीजखानास कळतांच त्यानें वैद्यांकडून कांहींएक न घेण्याचा संकल्प केला. परंतु असें करण्यानें होणारी गोष्ट चुकते असा अर्थ नाहीं. असें मनांत आणून शेवटीं त्यानें वैद्याकडून आलेला मरणाचा घोट घेतला, व एक पत्र लिहून सय्यद मुर्तिजाकडे देऊन तें शाहाकडे पोंहोंचतें करण्यास सांगितलें, आणि दुसरे दिवशीं प्राण सोडिला.

*चंगीजखानावर खोटा आरोप व त्याचा वध.*

त्याप्रमाणें प्रामाणिक, राजनिष्ठ व निस्पृही दिवाण चंगीजखान मृत्यु पावल्यानंतर निजामशाहास साऱ्या खऱ्या गोष्टी कळल्या, आणि मग त्यास पश्चाताप झाला. परंतु उपयोग काय? तरी त्यास इतका विवेक झाला कीं, अहंमदनगरास परत आल्यावर ईश्वरभजनांत काळ घालविण्याचा त्यानें निश्चय करून अहंमदनगरच्या सर्व प्रमुख लोकांस दरबारीं बोलावून सांगितलें कीं, 'मी आतां राज्यभार वाहण्यास अयोग्य होत चाललों आहें. माझी सदसद्विचार शक्ति नष्ट होऊन न्यायान्यायाची, खऱ्या खोट्याची, चांगल्या वाइटाची, सदाचार दुराचाराची पारख करण्याचें सामर्थ्य मजमध्यें कमी झाल्यामुळें न्यायाच्या कामीं मजकडून अन्याय होतो. खऱ्यास मी खोटा समजतों, आणि मागाहून माझ्या नजरेस समयविशेषीं खरा प्रकार आल्यास मा-

*मूर्तिजास पश्चाताप होतो, व तो राज्यकारभार सोडितो.*

ह्या अविचारीपणाचा मला पश्चात्ताप होतो. यास्तव तुम्हां सर्वांसमक्ष **पैगंबरा**चा वंशज **मीरकाझी बेग** यास मी आपल्या वकील मुतल्लक नेमिला आहे. तो यथाशास्त्र राज्यकारभार चालवील, व खासगी गोष्टींचा विचार बिलकुल मनांत न आणितां दुर्बलांवर बलिष्ट लोकांचा कटाव चालूं देणार नाहीं, अशी मला उमेद आहे, आणि याजबद्दल तुम्हांस **परमेश्वरा**जवळ साक्ष द्यावी लागेल. जर यानंतर कोणाएकाद्या वृद्ध अबलेचा सुतळीचा तोडा अन्यायानें घेतला आणि त्याविषयीं **ईश्वरा**जवळ माझ्या पापपुण्याचा झाडा देतांना विचारिलें, तर मी स्पष्ट सांगेन कीं, त्याजविषयीं मी जबाबदार नसून **काझी बेगा**कडे सर्व कारभार सोंपविला होता. असें मुखांस सांगून झाल्यावर **काझीबेगा**कडे वळून शाहा म्हणाला " सर्व राज्य म्यां आज तुझ्या हातीं दिलें आहे. जर तें तुझ्या एकट्याच्या हातून निभावणार नाहीं, असें तुला वाटत असेल तर **अमीर उल्मुल्क, मिरजा महंमद नकी** व **कासीम बेग हकीम** यांस मदतीस घेऊन व्यवस्थेनें राज्य चालीव. मी निरपराधी **चंगीजखाना**स अन्यायानें जें शासन केलें, त्याचा मला भारी पश्चात्ताप झाला आहे, आणि कोपायमान परमेश्वराची मला फार भीति वाटत आहे. यास्तव मी हीं राज्यसूत्रें सोडून एकांतवासांत राहून क्षमाशील **परमेश्वरा**च्या भजनांत व प्रायश्चित्तें घेऊन पाप क्षालनांत काळ घालविण्याचा निश्चय केला आहे. याप्रमाणें सांगून झाल्यावर **मूर्तिजा** निजामशाहानें अहंमदनगरच्या वाड्यांतील बगदाद या नांवाच्या एका चौकांत वास केला. तेथें **साहेबखानाशि**वाय स्त्री किंवा पुरुष यांतून कोणाचाही प्रवेश नव्हता.

**मूर्तिजाशाहा** याप्रमाणें सन्मार्गी काळ घालवीत असतां सन १५७६ सालीं महाप्रतापी **अकबर पादशाहा** दक्षणेच्या सरहद्दीवर शिकारीस आला. तेव्हां **अकबर** काय करितो, कोठें जातो, हें पाहण्यासाठीं थोडीशी फौज घेऊन गुप्तपणें निजामशाहा उत्तरेकडे आला. आणि दिल्लीपतीनें आपल्या राज्यावर जर स्वारी केली, तर आपलीही तयारी असावी, म्हणून सैन्याची तयारी करीत असतां एकदां त्याला वाटलें कीं, **अकबरा**वर हल्ला करावा परंतु सरदारांच्या अत्याग्रहास्तव त्यानें तसें केलें नाहीं. **अकबर** परत जाईपर्यंत तो तेथेंच होता, आणि जेव्हां त्यास तो गेल्याचें स-

अकबर दक्षणेंत येतो.

मजलें, तेव्हां निजामशाहा आपल्या एकांतवासांत आला. पर्जन्यकाळीं तो दौलताबादेस गेला, व तेथील साधु संतांच्या कबरींचें दर्शन घेऊन त्याच्या अंगीं स्वधर्माचें असें कांहीं स्फुरण आलें कीं, तो कोणास नकळत एके दिवशीं **इमाम रेझा** या साधूच्या कबरेच्या दर्शनार्थ एकटाच पायीं गेला. त्याची एकासही खबर नव्हती. प्रत्यक्ष **साहेबखाना** पाशींही याजबद्दल तो बिल्कुल बोलला नाहीं. निजामशाहास कोणी मुशाफरानें जेव्हां ओळखून दिवाणास जाऊन सांगितलें, तेव्हां महत्प्रयासानें त्याला माघारें आणिलें. अहंमदनगरास आल्यावर निजामशाहा बहिस्ती बागेंत राहूं लागला. त्याचा प्यारा काय तो **साहेबखान**. त्याशिवाय तो कोणाशीं बोलत देखील नव्हता. यामुळें खान इतका चढून गेला होता कीं, त्यानें सुमारें तीनशें बदमाष दक्षणी लोकांस जमवून अव्वानव्वा आचरणास आरंभ केला. अनाचार, दुर्व्यसनें आणि सुरापान यांची सीमाच राहिलीनाहीं. त्या बदमाष लोकांनीं नेशक लोकांच्या मुली जबरीनें धरून आणून त्यांशीं अति निंद्य व्यवहार करावे!! एके दिवशीं **मीरमहिदी** या सूज्ञ गृहस्थाच्या मुलीस ते लोक जबरदस्तीनें नेऊं लागले. त्यांस **महिदी** तसें करूं देईना. या कारणानें जो तंटा झाला, त्यांत त्या मुलीच्या अब्रु रक्षणास्तव त्यास प्राण द्यावा लागला. या सर्व गोष्टी जरी दिवाणाच्या कानावर येत, व त्यांबद्दल त्या दुष्ट लोकांचें पारिपत्य करावें असें त्यास वाटे, तरी शाहाजवळ **साहेबखानाचें** वजन फार असे, यामुळें तो भीत असे. शेवटीं **साहेबखानाच्या** निंद्यकर्माची कमाल झाली. एका सरदाराचें नांव **साहेबखान** च होतें, त्यास तो म्हणाला, तूं आपलें नांव बदल. तें त्यानें नाकारिलें. त्यावरून **साहेबखानानें** त्याचा नाश करण्याचा निश्चय केला, परंतु **सल्लाबतखानानें** ही गोष्ट शाहाच्या कानावर घालून त्या सरदारास वांचविलें. तेव्हां **साहेबखान** रुसून दरबारांतून निघून गेला. शाहास त्याच्यावांचून करमेना, म्हणून तोही त्याच्या मागून निघाला. शेवटीं शाहानें त्यास बेदर येथें गांठिलें. तेव्हां त्यानें परत न येण्याविषयीं खूब ओढून धरिलें, आणि **सलाबतखाना**स कामावरून बडतर्फ करावें, व बेदर शहर घेऊन आपल्यास द्यावें, असा आग्रह धरिला. शाहानें या दोनही गोष्टी मान्य केल्या. तेव्हां तो परत आला.

साहेबखान अनावर होतो.

साहेबखान रुसून जातो.

नंतर **मूर्तिजा** निजामशाहानें वेदरास वेढा घालतांच **अल्ली** वेरिदशाहानें **अल्ली** आदिलशाहाकडून कुमक मिळविली.

त्याच संधीस राजाचा बंधु **बुऱ्हाण** निजामशाहा जुंनर किल्यांत कैदेंत होता तो तेथून पळाला, आणि त्यानें बंड केलें. यामुळें **मूर्तिजा**शाहास वेदरचा वेढा उठवून अहंमदनगरास यावें लागलें. इतकेंच नव्हे तर **सलाबतखाना**सही कामावर घेणें भाग पडलें त्यावरावर **साहेबखाना**नें **मूर्तिजा**शाहास पुनः सोडिलें **बुऱ्हाण** निजामशाहाचा पराभव होऊन त्यास विजापुरीं पळून जावें लागलें. शाहा **साहेबखाना**स परत येण्याविषयीं फारच आग्रह करूं लागला, आणि तो कांहीं केल्या येईना. शेवटीं त्याची समजूत घालण्यास ज्या सरदारांस नेमिलें होतें, त्यांनींच त्यास ठार मारिलें! आणि आपल्याशीं दंगा केला त्यांत तो मरण पावला, असें **मूर्तिजा** शाहास कळविलें. नंतर राजाची मर्जी **सलाबतखाना**वर बसली. त्यानें मात्र तिचा वाईट उपयोग न करितां लोकांस सुख दिलें.

साहेबखानास ठार मारतात.

सन १५८० त **अल्ली** आदिलशाहा मरण पावल्यावर त्याचा ल्हान पुतण्या गादीवर बसला. तेव्हां विजापूरचा मुलूख सर करण्यास ही संधि चांगली आहे, असें समजून **मूर्तिजा** निजामशाहास **सलाबतखाना**नें भर देतांच **बेहझाद उल्मुल्क** याजबरोबर निजामशाही फौज विजापूर प्रांतांत शिरली. परंतु तिचा अगदीं पराभव होऊन तिचे सर्व हत्ती विजापूरकरांस मिळाले. यावर्षीं ज्या गोष्टी घडल्या, त्यांचें सविस्तर वर्णन आदिलशाही राजांच्या इतिहासांत दिलें असल्याकारणानें येथें द्विरुक्ति करण्याचें कारण आहे, असें वाटत नाहीं.

विजापुरावर स्वारी व पराभव.

इसवी सन १५८४ सालीं निजामशाहानें आपला मुलगा **मिरान हुस्सेन** यास **इब्राहीम** आदिलशाहाची बहीण वधु मागण्याकरितां विजापुरास वकील पाठविले. ती मागणी विजापूरकरांनीं मान्य केल्यावर राजकन्येस मोठ्या समारंभानें अहंमदनगरीं आणून लग्नसोहळा झाला. त्यागडबडींत कित्येक सरदारांनीं **सलाबतखाना**स दिवाणगिरीवरून काढण्याचा कट केला होता, परंतु शाहास किल्यांत ठेवून त्यानें त्या कटांतील लोकांवर हल्ला करून त्यांची खोड मोडिली. नंतर दुसऱ्या एका तटाच्या लोकांनीं शाहाचा भाऊ **बुऱ्हाण** यास फकिराच्या वेषानें अहंमदनगरास आणून गादीवर बसविण्याचा

शाहाजादा हुस्सेन याचें लग्न

वेत केला. परंतु ज्या दिवशीं त्यास शहरांत आणणार होते त्याच दि-

बुऱ्हाण यास गादीवर बसवि-ण्याचा कट

वशीं **सलाबतखाना**स त्याची गुणगुण कळल्यामुळें त्या-नें बंदोबस्त ठेविला. तेव्हां **बुऱ्हाण** कोंकणांत पळाला, त-री तेथें राहण्यास भय आहे, असें वाटल्यामुळें **अकबर** पादशाहाकडे दिल्लीस गेला. आणि पादशाहाकडून **मिरजा अझीज** या स-रदारास सैन्यासह घेऊन **मूर्तिजा** निजामशाहावर स्वारी करण्यास दक्षणें-त आला. ही खबर निजामशाहास कळतांच त्यानें **मिरझा महंमद तु-र्की** या सरदाराकडे वीस हजार लष्कर देऊन त्यास सरहद्दीवर पाठविलें. **बु-ऱ्हाणा**स खानदेशचा राजा **अल्लीखान** मिळतांच तो नर्मदेच्या कांठीं

अकबराची फौ-ज दक्षणेवर येते.

हुंडिया शहरीं येऊन पोंहोंचला. परंतु त्यापूर्वींच **मिर-झा अझीज** नर्मदा उतरून पलीकडे गेला होता. दक्ष-णी सैन्याशीं आपल्याकडील थोडयाशा फौजेनें टक्कर मारतां येणार नाहीं, असें पाहून त्यांनीं एकाएकीं आपला मोहोरा वऱ्हाडाकडे फिरविला, आणि एलिचपूर व बाळापूर हीं शहरें घेतलीं. इतक्यांत त्यांस बातमी लागली कीं. दक्षणी सैन्य आपल्या मागें लागलें असून उत्तरेकडे परत जाण्याची ही वाट त्यानें अडविली आहे. तेव्हां पश्चिमेकडे वळून सुलतानपूर आणि नंदुरबार या शहरांवर त्यांनीं छापा घातला, व तीं लुटून ते माळव्यांत नि-घून गेल्यावर निजामशाही व खानदेशची फौज आपापल्या स्थानीं आली.

ह्या समयीं निजामशाहाची मर्जी **साहेबखाना**प्रमाणें **फत्तेशाहा** या नांवच्या एका फकिरावर बसली. शाहानें त्यास पुष्कळ जमीन इनाम देऊ-

फत्तेशाहा फकि-रावर शाहाची म-र्जी बसते.

न सरकारी तिजोरींतील मोल्यवान् हिरे व रत्नें मन मा-नेल तशीं बक्षीस दिलीं. ह्यामुळें तो फारच चढून गेला, आ-णि संपत्तीच्या व राजाश्रयाच्या मदानें अंध होऊन बेप-र्वाईनें वागूं लागला. एके दिवशीं त्यानें **रामराजा**कडील लुटींपैकीं हिरे,पा-च, मोतीं यांनीं बांधलेल्या दोन कंठ्या होत्या, त्या निजामशाहाकडे मागि-तल्या. तेव्हां शाहानें त्या त्यास देण्याविषयीं हुकूम केला. अशा अमोल वस्तु खजिन्यांतून जाऊंनयेत, म्हणून **सलाबतखान** दिवाणानें **फत्तेशा-हा**स दोन खोट्या कंठ्या दिल्या. पुढें ही लबाडी **फत्तेशाहा**स समजतांच त्यानें तो मजकूर निजामशाहास कळविला. तेव्हां त्यानें असा हुकूम दि-ला कीं, सर्व सरकारी जडजवाहीर आपणास पाहण्याकरितां एका खो-

ळींत मांडावें. **सल्लाबतखानानें** कांहीं बहुमोल रत्नें लपवून बाकीचीं आज्ञेप्रमाणें मांडिलीं. तेव्हां त्यांत त्याच्या माहितीचीं कित्येक रत्नें नाहींत, असें पाहून तो फार रागावला, आणि त्या त्वेषांत त्यानें तीं सर्व रत्नें मोठा अग्नी पेटवून त्यांत टाकिलीं. शाहा महालांत गेल्यावर प्रधानानें मोठ्या प्रयत्नानें तीं रत्नें विस्तवांतून काढिलीं. त्यांत कांहीं मोत्यें मात्र खराब झालीं. असो. ह्या वेळेपासून राजा दिवाणा झाला, असें लोक म्हणूं लागले.

शाहा जवाहीर अग्नींत टाकितो.

असें असतां निजामशाहाच्या मनांत कोणी असें भरविलें कीं, “आपला पुत्र **मिरान हुस्सेन** आपणास पदच्युत करणार आहे.” तेव्हां त्यानें आपल्या पुत्राचा वध करण्याचा उद्योग आरंभिला. परंतु **सलाबतखानानें** शाहाजाद्याच्या रक्षणाची फार खबरदारी घेतली होती. ह्या सुमारास **इब्राहीम** आदिलशाहानें **मूर्तिजा** निजामशाहास लिहिलें कीं, ‘**मिरान हुस्सेनाशीं** आपल्या बहिणीचें लग्न लावावें, नाहींपेक्षां शाहाजादीस विजापुरीं परत पाठवावें.’ याविषयीं **सलाबतखानानें** “सोलापूरचा किल्ला स्वाधीन केल्याशिवाय या दोहोंतून एकही होणार नाहीं,” असा स्पष्ट जबाब पाठविला. त्याबरोबर आदिलशाहानें निजामाच्या प्रांतावर चाल करून आवशाच्या किल्यास वेढा दिला. दिवाणाच्या कृत्याचा निजामशाहास फार राग आला, व त्यानें त्याजवर फितुरीचा आरोप आणून त्यास काम सोडण्यास सांगितलें. “मला माझ्या कैदेची जागा दाखवावी म्हणजे मी आपल्या हातानें आपल्या पायांत शृंखळा घालून तेथें जातों.” असें आपली राजनिष्ठा प्रदर्शित करण्याकरितां **सलाबतखानानें** सांगतांच राजानें “दंडाराजपुरीस जावें” असें बजाविलें. त्याबराबर तो आपल्या मित्रांचें न ऐकतां तिकडे चालता झाला. **सलाबतखानाची** अशी दशा झाल्यावर निजामानें **कासीम बेग** हकीमास आपली दिवाणगिरी व **मिरजा महंमद तुर्की** यास वजिरी देऊन उभयतांस **इब्राहीम** आदिलशाहाशीं तह करण्यास हुकूम केला. त्याप्रमाणें तह झाल्यानंतर **खुदिजा** शाहाजादीचें मिरान हुस्सेनाशीं मोठ्या थाटानें लग्न झालें. या कृत्यास फार थोडा अवकाश झाला नाहीं, तोंच शाहास आपल्या पुत्राचा संशय येऊन त्यानें त्याचा जीव घेण्याचा विचार मनांत आणिला. शाहा दि-

शाहाजादा हुस्सेन पास शाहा मारण्याचा यत्न करितो.

सलाबतखान कैद होतो.

वागास म्हणाला," आपला पुत्र आपल्या जवळ असावा अशी मला इच्छा झाली आहे." शाहाचें पुत्रावर पुनः प्रेम जडल्याचें नजरेस येतांच त्यास फार आनंद झाला, आणि त्यांनीं त्यास किल्ल्यांत पाठविलें. जणूं काय शाहा प्रेमानें अगदीं पाघळत आहे, असें दाखवून निजामशाहानें आपल्या खोलीजवळ पुत्रास राहण्यास जागा दिली, आणि दुसऱ्याच दिवशीं शाहाजादा निजला असता त्याच्या बिछान्यास त्यानें आग लावून बाहेर येऊन खोलीचें दार बंद केलें. धूर निघतांच शाहाजादा जागा झाला, आणि पेटलेलीं वस्त्रें टाकून बाहेर पडण्यासाठीं दरवाजाकडे आला. परंतु त्यास कडी लाविलेली होती, म्हणून तो ओरडून हाका मारूं लागला. तरी कोणी दार उघडीना. खोलींत कोंडलेल्या धुरानें गुदमरून त्याचे प्राण व्याकूळ झाले. या संकटांत बहुधा तो मरावयाचाच. परंतु शाहाचा प्यारा **फत्तेशाहा** यास दया येऊन त्यानें दार उघडून शाहाजाद्यास दिवाणाकडे पोहोंचविलें,आणि त्यानें त्यास गुप्तपणें दौलताबादेस रवाना केलें. आपला मुलगा जळून मेला असेल, असें समजून **मूर्तिजा** शाहा कांहीं वेळानें त्या खोलींत रक्षेंतील हाडें पहावयास गेला. परंतु तसें कांहींच दिसेना! यामुळें त्यास फार कांप आला. तेव्हां **फत्तेशाहा** म्हणाला," शाहाजाद्याची जळून रक्षा झाली असेल." तरी तें त्यास खरें वाटेना. **फत्तेशाहानें** बहुधा पुत्रास वांचविलें असेल, म्हणून त्याकडे तो त्यास मागूं लागला. शेवटीं त्यानें शाहास खरा मजकूर निवेदन केला. त्यासरसें त्यानें दिवाणास बोलावून आणिलें व कैद केलें, आणि दिवाणगिरीवर दुसऱ्याची नेमणूक केली. परंतु यानेंही शाहाजाद्याचा वध करण्याचें काम नाकारिलें. तेव्हां त्यासही दिवाणगिरीच्या कामावरून दूर करून **मिरझाखानास** दिवाण नेमिलें. असें शाहाचें माथें फिरलेलें पाहून तो जेंजें सांगे, तें तें **मिरझाखान** मान्य केलें असें दर्शवी. त्यानें **फत्तेशाहा** व दुसरे शाहाजवळचे नोकर यास वारवार बक्षिसें देऊन खुष ठेविलें, आणि गुप्तपणें विजापुरास असें पत्र लिहिलें कीं," शाहास वेड लागून तो आपल्या पोटच्या पुत्रास मारण्यास टपला आहे, या-

पुनः शाहा पुत्राचा जीव घेण्यास टपतो.

शाहाजाद्याच्या बिछान्यास आग लावून त्यास खोलींत कोंडितात.

फत्तेशाहा त्यास वांचवितो, व दिवाण त्यास दौलताबादेस पोंहोंचवितो.

मिरझाखान दिवाण होतो.

करितां जर तुम्हीं थोडेंसें सैन्य सरहद्दीवर पाठवाल, तर तुम्हांवर जाण्याच्या मिषानें मी सैन्य जमा करीन, आणि नंतर उघडपणें शाहाजाद्याचा पक्ष स्वीकारीन." ह्या प्रमाणें आदिलशाहाचा दिवाण **दिलावरखान** ह्यानें थोडेंसें सरहद्दीवर सैन्य पाठविलें. तेव्हां **मिरझाखान** म्हणाला "आतां कसें करावयाचें?" "ठीक दिसेल तसें करावें." असें निजामशाहाचें उत्तर निघतांच **मिरझाखानानें** सैन्य जमवून अहंमदनगराहून कूच केलें, आणि राणुरी येथें मुक्काम केला. तेव्हां निजामशाहानें **मिरझाखानास** "तेथें मुक्काम करण्याचें कारण काय?" हें विचारण्यास **फेरिस्ता** इतिहासकारास पाठविलें. हा शाहाच्या पक्षाचा आहे, हें दिवाण जाणून होता. म्हणून जर आपला खरा बेत यास समजला, तर हा शाहास खचित जाऊन सांगेल, यास्तव फौजेस पुढें कूच करण्यास शाहाचा हुकूम घेऊन खुद्द **फत्तेशाहानें** छावणींत यावें, म्हणून **मिरझाखानानें फत्तेशाहास** पुष्कळ लांच दिला. आणि त्यास अनुकूल करून घेतलें. त्या प्रमाणें **फत्तेशाहा** आला, तेव्हां **फेरिस्ता** छावणींतच होता, व त्यास दिवाणाचा अंतरंग बेत समजलाच होता. त्याचा **फेरिस्तास** पकडण्याचा हुकूम सुटतांच तो रात्रींच पळून गेला. अहंमदनगरास पोहोंचल्यावर त्यानें **फत्तेशाहास** सर्व मजकूर कळविला, परंतु **फत्तेशाहानें** तो खरा मानला नाहीं. तेव्हां **फेरिस्तानें** सांगितलें "माझें व दिवाणाचें कांहीं वांकडें नाहीं. त्यावर खोटा आरोप आणून आणि त्यास दोष देऊन मला कोणाचा सूडही उगवावयाचा नाहीं. परंतु मी म्हणतों याची लौकरच प्रचीति येईल." असें त्यांचें संभाषण चाललें आहे, तोंच बातमी आली कीं, "शाहाजादा **मिरा हुस्सेन** ह्यास आणून गादीवर बसविण्यासाठींच **मिरझाखानानें** दौलताबादेस कूच केलें आहे." 'तेव्हां या अरिष्टांतून बचाव करण्यास काय सदुपाय योजावा?' असें शाहानें **फेरिस्तास** विचारिलें. त्यावर फेरिस्ता म्हणाला "आपण आपला एकांतवास सोडून आपल्या खासकील शिपायांसह शहराबाहेर जावें, म्हणजे बहुतेक सरदार दिवाणास सोडून आपल्यास येऊन मिळतील." "वृत्त शरीरीं असमाधान असल्यामुळें घोड्यावर बसण्यास सामर्थ्य नाहीं." असें शाहानें उत्तर देतांच **फेरिस्तानें** सांगितलें "तर दुसरा उपाय इतकाच कीं, **सलाबतखानास**

मिरझाखान शाहाजाद्यास गादीवर बसविण्याकरितां आणण्यास जातो.

फेरिस्ताच्या सल्ल्यानें सलाबतखानास शाहा बोलावितो.

कैदेंतून सोडवून आणून दिवाणगिरीचें कामावर नेमावें, म्हणजे सर्व पदवीच्या लोकांचें त्यावर प्रेम आहे, म्हणून ते येऊन भराभर त्यास मिळतील. मर्जी असेल तर सरकारांनीं मेण्यांतून जुन्नरापर्यंत त्यांचे मुलाखतीस जावें." हा सल्ला निजामशाहास पसंत पडून त्यानें **सलाबतखाना**स देखत हुकूम बंदमुक्त करून रवाना करण्याविषयीं हुकूम पाठविला, आणि स्वतः जुन्नरापर्यंत जाण्याची तयारी केली. तेव्हां **फत्तेशाहा**नें रडत रडत शाहाच्या पायांवर घालून घेऊन म्हटलें. "सरकार जर वाडा सोडतील तर पाहारेकरीच नवीन शाहाची मर्जी संपादन करण्याकरितां आपणांस कैद करून शाहाजाद्याकडे पाठवितील. त्याबरोबर आपल्या जाण्याचा बेत शाहानें तहकूब करून वाड्यांतच **सलाबतखाना**ची वाट पाहात राहण्याचें ठरविलें. किल्यांतील फौजेनें निजामशाहाचें असें अस्थिर व बदलणारें आचरण पाहून **मिरझाखाना**स मिळण्याचा निश्चय ठरविला, आणि **सलाबतखान** अहंमदनगरास येऊन दाखल होण्यापूर्वींच सर्व फौज दौलताबादेस गेली, व शाहाजाद्यास घेऊन आली. **मिरझाखान** जेव्हां शाहाजाद्यासह येऊन पोंहोंचला, तेव्हां **फेरिस्ता**कडे राजवाड्याचा पाहारा होता. त्यानें त्यांचा आंत प्रवेश न होऊं देण्याची खटपट केली, परंतु सर्व लोक बिथरलेले! शाहाकडे **फेरिस्ता, फत्तेशाहा** व दुसरे पांचचार लोक शिल्लक! यामुळें त्यांचा कांहींच इलाज चालेना! **मिरझाखान** चाळीस हजार सैन्य घेऊन शाहाजाद्यासह किल्यांत घुसला, आणि जो सांपडेल त्याची कत्तल उडवीत दोघे चालले. शाहाजाद्याची व **फेरिस्ता**ची शाळेंतील ओळख होती, म्हणून शाहाजाद्यानें त्यास मात्र जीवदान दिलें. शाहाजादा **मूर्तिजा**शाहापाशीं जातांच बापास अद्वातद्वा बोलला, आणि शब्द प्रहारांप्रमाणेंच त्यानें त्यास मुष्टिप्रहार केला. निजामशाहा त्याजकडे मुकाट्यानें तुच्छवत् नजरेनें पाहात होता शेवटीं जेव्हां मुलानें तरवार उपसून बापाच्या उरावर ठेविली, व "मी आतां तुझा जीव घेणार" असें म्हटलें, त्याबरोबर **मूर्तिजाशाहा** मोठा सुस्कारा टाकून ओरडला, "अरे दुष्टा, अधमा, तुझ्या बापास आयुष्याचे राहिलेले चार दिवस पाहुण्या प्रमाणें आदरसत्कारानें राहूं देणें, हें अशा या कृत्याहून तुला अधिक शोभेल." किती झालें तरी त्याचा लेंकच तो! हे बापाचे शब्द ऐकून तो खचला! आणि त्यास करुणा येऊन तो बाहेर पडला. जरी बाप एका दुःसाध्य रोगानें मरणो-

सलाबतखान येण्यापूर्वी शाहाजादा शहरांत येतो.

सुख झाला होता, तरी त्यास आपोआप मृत्यु येईपर्यंत वाट पाहण्याचा त्यास धीर होईना! त्यानें बापास एका न्हाणीगृहांत घातलें, व दरवाजे बंद करून न्हाणींत मोठा विस्तव पेटविला, व त्यास आंत कोंडिलें. तेव्हां धूर, वाफ व उष्णता यांचे योगानें गुदमरून जाऊन शाहाचे प्राण लौकरच व्याकुळ झाले, आणि त्यानें सन १५८६त देह सोडिला. नंतर त्याचें प्रेत मोठ्या समारंभानें रोझाबागेंत पुरिलें, व पुढें त्याच्या अस्थि त्याचा बाप व आजा यांच्या समीप करबालास नेऊन पुरिल्या. **मूर्तिजा** निजामशाहानें एकंदर २४ वर्षें आणि कांहीं महिने राज्य केलें.

शाहाचा वध

# मिरान हुस्सेन निजामशाहा.

इ० स० १५८६ ते १५८८ पर्यंत.

—:०✻०:—

मिरान हुस्सेन गादीवर बसतो, व मिरझाखान दिवाण होतो.—शाहाचें क्रूर व वाईट वर्तन.— त्याच्या सरदारांचा मिरझाखानास मारण्याचा यत्न होतो व तो फसतो.— मिरजाखान शाहास कैद करितो.— शाहाजादा इस्माएल यास गादीवर बसवितात.— जमालखान व दक्षणी लोक यांचा दंगा.— मिरझाखान शाहास मारितो व त्याचें शीर बुरजावर टांगून ठेवितो.— दक्षणी लोक चवताळून परदेशी लोकांवर तुटून पडतात.—मिरजाखान पळून जातो.—परदेशी लोकांची कत्तल.—मिरजाखानाचा वध.

---

**मिरान हुस्सेन** आपल्या बापाचा वध करून इ० स० १५८७त अहंमदनगरच्या गादीवर बसला. हा स्वभावानें फार कडक व क्रूर असल्यामुळें त्यानें आरंभापासूनच लोकांवर जुलूम चालविला. जरी त्यानें **मिरझाखानास** दिवाणगिरीवर कायम केलें, तरी तो त्याचें कांहींएक ऐकत नसे. या-

मिरान हुस्सेन गादीवर बसतो व मिरझाखान दिवाण होतो.

यामुळें शाहास वाहुल्याप्रमाणें गादीवर बसवून सर्व राज्यसूत्रें आपल्या हातीं ठेवण्याचा जो खानाचा विचार होता, तो अगदीं निष्फळ झाला. **हुस्सेना**नें आपल्या वयाचे बार सोळ वर्षे तरुण मुलगे जमवून त्यांस मोठमोठ्या पदव्या देण्याचा क्रम आरंभून त्यांच्या बरोबर सुरापानांत व चैनींत तो आपला वेळ घालवूं लागला. दारू पिऊन गुंग झाल्यावर घोड्यावर बसून शहरांतून हिंडावें, वाटेंत कोणी निरपराधी मनुष्य सांपडल्यास त्यास जिवें मारावें, असा त्याचा परिपाठच पडला. **मूर्तिजा** निजामशाहाचा भाऊ **शाहा कासीम** शिवनेरी किल्यावर बंदींत असून त्यास **मिरजाखाना**नें गुप्तपणें आपल्या घरीं आणून ठेविलें होतें, आणि त्याच्या तर्फेनें राज्यांत बखेडा माजविण्याचा **मिरझाखाना**चा बेत आहे, असें **हुस्सेना**स समजतांच त्यानें खानास कैदेंत टाकिलें. दुसरे दिवशीं त्याच्यावरील आरोप खोटा आहे, अशी राजाची खातरी होतांच त्यास सोडून कामावर रुजू केलें, व पूर्ववत तो त्यावर भरंवसा ठेवूं लागला. तेव्हां आगें मागें आपणावर संशय येण्यास जागा राहूं नये म्हणून खानानें त्यास अशी सल्ला दिली कीं, "राजवंशांतील सर्व जिवंत असलेल्या पुरुषांचा वध करावा." त्याप्रमाणें एका दिवसांत त्या घराण्यांतील पंधरा पुरुषांचा वध झाला! नंतर लौकरच **मिरझाखाना**चा शाहाच्या सोवत्यांस कंटाळा येऊं लागला, आणि त्याच्या विरुद्ध ते शाहापाशीं कागाळ्या करूं लागले. त्यावर विश्वास ठेवून दारूच्या लहरींत **हुस्सेन** शाहा त्यास सांगे, "तुम्हीं दम धरा, मी त्याचें शीर माझ्या हातानें कापीन किंवा त्यास मस्त हत्तीच्या पायांखालीं तुडवून मारीन." हें वर्तमान **मिरझाखाना**स समजलें, तेव्हां त्यानें शाहास पदच्युत करून पकडण्याचा व आपलें संरक्षण करण्याचा उद्योग चालविला. इ. स. १५८८ त जमादिलावलच्या १० व्या तारखेस शाहा आपला प्यारा जो **बंगषखान** त्याच्या घरीं मेजवानीस गेला. तेथें त्यांनीं **मिरझाखाना**चा वध करण्याचा बेत करून त्यास मेजवानीस बोलाविलें. खान पूर्वीपासून सावध होताच. त्यानें एकाएकीं प्रकृति बिघडल्याचें मिष करून माफी मागण्यास आपला मित्र **आघामीर** यास पाठविलें. **आघामीर बंगषखाना**च्या घरीं गेला, तेव्हां शाहा जेऊनही उठला होता. तरी त्याच्या समाधानीकरितां खानाबरोबर जेवण्याकरि-

*शाहाचें क्रूर व वाईट वर्तन.*

*मिरझाखानास मारण्याचा यत्न फसतो.*

तां **बंगषखान** वाट पाहात राहिला होता. म्हणून **आघारखान** त्याबरोबर जेवावयास वसला; आणि कांहीं पदार्थ खाल्यावर एकाएकीं पोटांत कळा येऊं लागल्याचें ढोंग करून आपणास वीष घातलें, असा बहाणा करून तेथून निघून घरीं आला. नंतर लौकरच शाहास **मिरझाखाना**नें निरोप पाठविला कीं, **आघारखान** मरणोन्मुख झाला आहे, यास्तव त्याची सरकारांनीं शेवटील भेट घ्यावी. कांहीं एक संशय मनांत न आणितां शाहा त्याच्या मुलाखतीस गेला. तेव्हां तेथेंच त्यास धरून **मिरझाखाना**नें कैद करविलें, आणि शाहाचा चुलता **बुऱ्हाण** निजामशाहा याचे दोन पुत्र लोहगडावर कैदेंत होते. त्यांस अहंमदनगरास आणण्याकरितां **मीर ताहीर निशापुरी**स पाठविलें. ते येईपर्यंत शाहा कैद आहे, हें कोणास कळूं न देतां ते पुत्र आल्यावर त्यांतून हवा तो पसंत करून त्यास गादीवर बसवावें, असा **मिरझाखाना**नें बेत केला होता.

खान शाहास कैद करितो.

गेल्यापासून तिसरे दिवशीं **इब्राहीम** व **एइमाएल** या शाहाजाद्यांस घेऊन **मीर ताहीर** आला. तेव्हां **मिरझाखाना**नें मुख्य मुख्य सरदार व वडेलोकांस सांगितलें कीं, **मिरान हुस्सेना**स पदभ्रष्ट करून **इस्माएल** (**बुऱ्हाण**शाहाचा अगदीं धाकटा मुलगा) निजामशाही गादीवर बसला आहे. त्यावेळीं **एइमाएला**चें वय अवघें बारा वर्षांचें होतें. असो. अमीर उमराव, सरदार वगैरे बडे लोक नव्या शाहास मुजरा करिताहेत, नजर नजराणे चालले आहेत, तोंच किल्याच्या वेशींत वखेडा झाल्याचें वर्तमान आलें. चौकशी करितां त्याजबद्दल असें समजलें कीं, **जमालखान** हा सरदार सर्व दक्षणी व हबशी शिपायांस जमवून आपला शाहा **मिरान हुस्सेन** यास दाखवा, असें म्हणून दंगल उडवीत आहे. **मिरझाखाना**नें "**मिरान हुस्सेन** राज्य चालविण्यास अयोग्य आहे, एतदर्थ त्यास पदच्युत करून त्याचा चुलत भाऊ **इस्माएल** हा गादीवर बसला आहे; त्यास पाहिजे तर भेटा." असा **जमालखाना**स निरोप पाठवितांच तो जास्तच खवळला. त्यानें शहरांत प्रसिद्ध केलें कीं, दिवाणानें परदेशीय शिपायांच्या सहाय्यानें शाहास पदभ्रष्ट करून दुस-

एइमाएल शाहाजाद्यास गादीवर बसवितो.

जमालखान व दक्षणी लोक दंगा करितात.

ज्या शाहाजाद्यास गादीवर बसविलें आहे. त्याप्रमाणें जर यास पाहिजे त्यास काढून हवें त्यास गादीवर बसविण्यास मोकळीक दिली, तर स्वदेशीय सरदार व लोक यांस परदेशी यांचे गुलाम होऊन राहावें लागेल. दक्षणी लोक या म्हणण्यानें फार चवताळले, आणि हत्यारबंद होऊन जमालखानास मिळतांना हबशांनींही त्यांचेंच अनुकरण केलें.

मिरझारखानास वाटलें कीं, मिरान हुस्सेनास मारिलें म्हणजे सहजींच हा दंगा मिटेल. म्हणून त्यानें हुस्सेनाचें शीर कापून एका उंच काठीच्या टोंकावर लावून किल्यांतील एका बुरजावर टांगून ठेवण्याचा हुकूम दिला. तें शीर बुरजावर लावतांना तो खालील लोकांस म्हणाला, "आतां हुस्सेनशाहा मेल्याबद्दल तुमची खात्री होऊन जर घरीं जाल, तर इस्माएलाच्या कृपेस पात्र व्हाल." तेव्हां कित्येक म्हणाले आतां मागें परतावें. इतक्यांत जमालखान ओरडून म्हणाला " जर मिरान हुस्सेनास मारिलें आहे, तर त्याच्या मृत्यूबद्दल परदेशी लोकांस शासन केलेंच पाहिजे. आणि इस्माएल निजामशाहाचा कारभार परक्या लोकांच्या हातीं न राहूं देतां आपल्या हातीं घेतला पाहिजे. यावरून किल्यावर हल्ला करण्याचा निश्चय ठरला. वेशींत लांकडें व गवत यांचा ढीग करून अग्नि लावून सायंकाळच्या सुमारास त्या जाळून टाकिल्या. परंतु रस्त्यांत निखारे व राख पडली होती; यामुळें किल्यांत जातां येतां येत नव्हतें. मध्यरात्र होण्याच्या सुमारास तो ढीग निवाल्यावर मिरझारखान व त्याचे कित्येक स्नेही बाहेर पळून जाण्याच्या बेतानें निघाले. दुसऱ्याही शेकडों लोकांनीं पळण्याचा प्रयत्न केला, व त्यांत शेकडों लोक प्राणास मुकले. परंतु मिरझारखान सुरक्षित जुन्नरच्या किल्यांत जाऊन पोहोंचला. दक्षणी, हबशी, आणि दुसरे बाजार बुणगे लोक किल्यांत शिरून आंतील परदेशीय लोकांस त्यांनीं ठार मारिलें. या तडाक्यांत सुमारें तीन हजार लोक मरण पावले; आणि पुष्कळ सरदार, बडे लोक, मानकरीही मृत्युमुखीं पडले. त्यांचीं प्रेतें बाहेर ओढून आणिलीं, आणि तशींच न पुरतां उघडीं ठेवण्याविषयीं जमालखानानें हुकू-

खान शाहास मारून त्याचें शीर बुरजावर टांगितो.

दक्षणी चवताळून परदेशीयांवर तुटून पडतात.

मिरझारखान पळून जातो.

म केला. एवढ्या रक्तस्रावानें तृप्त न होतां शहरांत जे परदेशीय (मग ते कोणीही असोत.) सांपडतील, त्यांस मारून त्यांचीं घरें दारें लुटून व जाळून टाकण्याचा जमालखानानें आपल्या लोकांस हुकूम केला. त्या तडाक्यांत धनी, नोकर, व्यापारी, यात्रेकरू मुशाफर यांत कांहीं एक भेदाभेद न पाहतां जो परदेशी मनुष्य सांपडेल, त्याचें डोकें उडवावें, या प्रमाणें जमालखानाच्या लोकांनीं कहर करून सोडिला! त्यांचीं घरेंदारें जाळिलीं; ज्यांस हुस्सेनानें फार चढविलें होतें, त्यांचीं शिरें उडवून चूर करून सोडिलीं! ज्या स्त्रियांनीं मर्यादेमुळें सूर्य चंद्र कधीं पाहिला नसेल, त्यांस त्यांच्या केंसट्या धरून दारू पिऊन गुंग झालेल्या लोकांत फरफरां ओढीत आणिलें, आणि त्यांची त्या भामट्यांनीं नाहीं नाहीं ती विटंबना केली!! चवथ्या दिवशीं मिरझाखानासही त्यांनीं जुन्नराहून पकडून आणिलें. आणि गाढवावर बसवून प्रथम त्याची धिंड काढवून त्याच्या शरीराचे तुकडे तुकडे करवून शहरांतील निरनिराळ्या इमारतींवर लावून ठेविले. त्याच्या बरोबर ज्या त्याच्या कित्येक मित्रांस धरून आणिलें होतें, त्यांस ठार मारून त्यांचीं शिरें तोफेंत घालून उडविलीं!! असो ह्या प्रमाणें एका आठवड्यांत त्यांनीं एक हजार परदेशी लोकांस वर्णन करण्यासही कठीण अशा दुष्ट रीतींनीं दुनयेंतून उठविलें!!! दक्षणी व हबशी लोकांनींच आश्रय देऊन ज्या कित्येकांस वांचविलें, असे थोडे लोक मात्र बचावले. असो मिरान हुस्सेन अवघा दाहा महिने तीन दिवस गादीवर होता. फेरिस्ता इतिहासकार म्हणतो! ज्यांनीं पित्यास मारून गादी संपादन केली, अशा राजांचीं राज्यें एका वर्षाहून अधिक काळपर्यंत राहिलेलीं आपल्या पाहण्यांतील इतिहासांत कोठेंही आढळलीं नाहींत.

परदेशीयांची कत्तल व मिरझाखानाचा वध.

# इस्माएल निजामशाहा.

इ० स० १५८८ ते १५९१ पर्यंत.

इस्माएल जमालखानास दिवाणगिरीवर नेमितो.—— मेहदी पंथ.—— जमालखानाचा मेहेदी पंथाच्या प्रसाराकरितां यत्न.—— सलाबतखानास मुक्त करून मेहेदी लोकांस हांकून लावण्याचा यत्न.—— सलाबतखानाचा पराभव.—— विजापुरच्या फौजेवर हल्ला व त्यांशीं तह.—— सलाबतखानाचा मृत्यु.—— इस्माएल याचा बाप बुऱ्हाण दक्षणेंत येतो व पराभव पावतो.—— बुऱ्हाणाचा राज्य मिळविण्याबद्दल पुनः यत्न.—— त्यास सर्व फौज मिळते.—— जमालखानाच्या सैन्याची दुर्दशा.—— जमालखान लढाईंत पडतो व इस्माएल कैद होऊन बुऱ्हाणशाहा गादीवर बसतो.

---

**मूर्तिजा** निजामशाहाच्या वर्णनांत मागें सांगितलेंच आहे कीं, त्याचा भाऊ **बुऱ्हाण** याचा गादी प्राप्त करून घेण्याचा यत्न निर्फळ झाल्यावर तो **अकबर** पादशाहाच्या दरबारीं गेला, आणि त्याचे दोघे मुलगे **इब्राहीम** आणि **इस्माएल** लोहगडीं कैदेंत होते, त्यांतून तरूण जो **इस्माएल** त्यास गादी प्राप्त झाली. त्यानें आपणास **इस्माएल निजामशाहा** असें नांव धारण केलें, व त्यास **जमालखानानें** शाहा असें कबूल केलें.

इस्माएल गादीवर बसल्यावर जमालखान दिवाण होतो.

**जमालखान** मेहेदी पंथाचा असून त्याचें राज्यांत वर्चस्व चालूं लागतांच त्यानें शाहाकडूनही तो पंथ स्वीकारविला. व दरबारचीं मुख्य मुख्य कामें त्याचे पंथांतील लोकांस देवविलीं. जे कांहीं परदेशी लोक मागील कत्तलींतून बचावले होते, त्यांस आपल्या कारकीर्दीच्या आरंभींच खानानें अहमदनगरांतून घालविलें, येणेंकरून त्या लोकांचा उपद्रव अगदीं नाहींसा झाला. हांकून दिलेल्या लोकांपैकीं कितीएकांनीं विजापूर दरबारीं नोकरी धरिली, आणि त्यांतूनच **फेरिस्ता** इतिहासकारही त्यावेळीं अहमदनगराहून विजापुरीं गेला व **इब्राहीम** आदिलशाहाच्या पदरीं नोकरीस राहिला.

हनफी पंथांतील **सय्यद महंमद** या नांवाचा एक पुरुष **इमाम मेहदी** हें नांव धारण करून आपणास एक नवीन पंथ काढण्यास **ईश्वरानें** प्रेरणा केली आहे, असें थोतांड करून आपल्या पंथाचा प्रसार करण्यास खटपट करूं लागला. आणि त्यावेळीं ज्या कित्येक गोष्टी घडल्या, त्या त्यास अनुकूल होऊन हिंदुस्थानच्या पुष्कळ लोकांचा हा खरा नवीन **इमाम** मेहदी **ईश्वरानेच पाठविला** आहे, असा त्यावर विश्वास बसला. त्यांतीलच **जमालखान** हाही एक होता. त्यानें या पंथाचा स्वतः पुढारीपणा घेतला, आणि त्याची वृद्धी करण्याचें मनावर घेतलें. **जमालखान** हा जात्या फार शूर असून त्यानें कित्येक प्रसंगीं मोठे पराक्रम केले होते. त्यांत मुख्यत्वें **इस्माएला**च्या राज्य प्राप्तीचे वेळीं तर त्याचें शौर्य, पराक्रम व दृढनिश्चय हे गुण सर्वांस मशहूर झाले होते, आणि आतां तर **इस्माएल** निजामशाहा बाहुल्याप्रमाणें त्याच्या मुठींत असे. त्या योगानें ही नूतन संधि त्यास आपला पंथ वृद्धिंगत करण्यास चांगलीच सांपडली. सर्व अधिकार हातीं, फौज आज्ञेंत आणि शाहा मुठींत, स्वतः मोठा कारभारी; याहून ती आणखीं सामग्री कोणती पाहिजे? असो त्यानें आपल्या नव्या पंथा व्यतिरिक्त इतर पंथाच्या लोकांचा छळ आरंभिला. दरबारचीं सर्व मोठमोठीं कामें मेहदी पंथांतील लोकांस दिलीं. शाहाजवळ व आपल्याजवळ त्याच पंथांतील लोकांस चाकरीस ठेविलें, यामुळें सरदार लोक बिघडले. त्यांतच वऱ्हाडचे सरदार व बडेलोकही होते. त्यांनीं **सलाबतखानास** वऱ्हाडच्या जवळच्याच खेरला किल्ल्यांतून सोडविलें, आणि सर्व सरदार व बडेलोक त्यास सामील होऊन त्यांनीं झाडून साऱ्या मेहदींस अहंमदनगरांतून हांकून लावण्याचा बेत करून तिकडे **कूच** केलें. या समयीं विजापुरचा कारभारी **दिलावरखान** यानेंही फौज तयार करून दक्षिणेकडून त्याच उद्देशानें चाल केली होती.

मेहदी पंथ.

जमालखान मेहदी पंथाच्या वृध्यर्थ यत्न करितो.

सलाबतखानास मुक्त करून मेहदींस हांकून लावण्याचा यत्न.

असा दोहींकडून हल्ला आला तरी **जमालखान** **मुळींच** डगमगला

---

\+ मेहदी पंथ हा महंमदी पंथाचाच एक भेद आहे.

नाहीं. त्याच्या नूतनपंथी लोकांनीं त्यास यशप्राप्तीचें आश्वासन दिलें. असो. **सलाबतखानावर** हल्ला करून **जमालखानानें** त्याचा अगदीं पराभव केला, आणि त्यास बऱ्हाणपुरास पिटाळून लावून तो विजापुरच्या फौजेकडे वळला. तेव्हां दोन्ही सैन्यांची अष्टी गांवीं गांठ पडली. परंतु सामना न करितां दोन्हीं सैन्यें एकमेकांजवळ पंधरा दिवस तळ देऊन स्वस्थ होतीं. शेवटीं उभयतां शाहांमध्यें तह ठरला कीं, " **अल्ली** आदिलशाहाची विधवा राणी व हल्लींच्या नगरच्या राजाची चुलती हिला विजापूरकरांकडे पाठवावें, आणि निजामशाही सरकारानें लढाईच्या खर्चाबद्दल २,७०,००० दोन लक्ष सत्तर हजार होन विजापूरकरांस द्यावे."

सलाबतखानाचा पराभव.

विजापूरच्या फौजेवर हल्ला व तह.

सन १५८९ सालीं **सलाबतखान** अगदीं मरावयास टेंकला होता. आणि आपलीं हाडें स्वगांवीं पडावीं, असा त्याचा मनोदय होता, म्हणून त्यानें बऱ्हाणपुराहून अहंमदनगरास येण्याची परवानगी मिळावी, अशा अर्थाचा अर्ज केला. तो मान्य होऊन आपण वसविलेल्या तळेगांवीं+ तो येऊन राहिल्यावर त्याच वर्षीं मरण पावला! तेव्हां अहंमदनगरच्या दक्षिणेस एका टेंकडीवर त्यानें आपल्या कारकीर्दींत बांधलेल्या कबरींतच त्यास पुरिलें.

सलाबतखान मरण पावतो.

निजामशाही राज्यांत अशी अंदाधुंद चालली आहे, असें **अकबर** पादशाहास समजतांच त्यानें आपल्या आश्रयास असलेल्या **बुऱ्हाण** निजामशाहास सैन्य देऊन जें राज्य वलिष्ट व जुलमी दिवाणाच्या सहाय्यानें पुत्रानें बळकाविलें आहे, तें हस्तगत करून घेण्यास पाठविलें. **बुऱ्हाणशाहानें अकबरास** सांगितलें, जर मी मोंगलांचें सहाय्य स्विकारिलें, तर तें दक्षणी लोकांस नीट वाटणार नाहीं, आणि ते मला यथास्थित टिकूं देणार नाहींत. याकरितां आपल्या सरहद्दीवर स्वतःच्या थोड्या लोकांनिशी जाण्या-

---

+ ह्या गांवास हल्लीं दाभाड्यांचें तळेगांव म्हणतात. येथें सन १७७९ च्या जानेवारीच्या १२ व्या तारखेस मराठ्यांनीं इंग्रजांचा पराभव केला.

स मला परवानगी द्यावी. म्हणजे मी आर्जवानें आपल्या प्रजेस वश करीन. हें त्याचें म्हणणें **अकबरा**नें मान्य करून निजामशाही राज्य प्राप्त होईपर्यंत त्याच्या खर्चीस सरहद्दीवरील ह्ंदिया महाल दिला, व त्यास सहाय्य करण्याबद्दल खानदेशचा राजा **अलीखान** यास लिहिलें. असो. बुऱ्हाणास कित्येक सरदार येऊन मिळाले, तेव्हां त्यानें आपल्या पुत्रावर स्वारी केली. परंतु तींत त्याचा पराभव झाला. यानंतर बरीच निजामशाही फौज जेव्हां त्यास येऊन मिळाली; व विजापूर करांकडूनही कांहीं सैन्य मदतीस आलें, तेव्हां त्यानें पुनः यत्न करण्याचें मनांत आणिलें.

इस्माएलाचा बाप बुऱ्हाण दक्षणेंत येतो व पराभव पावतो.

**बुऱ्हाणा**शीं लढण्यास **जमालखाना**नेंही तयारी केली. तींत दहा हजार लोक मेहदी पंथाचे होते. त्यानें वऱ्हाडचा सुभेदार **सय्यद उमजुद उल्मुल्क** यास उत्तर सरहद्दीवर **राजा अलीखान** व **बुऱ्हाण** निजामशाहा यांवर जाण्याचा हुकूम केला, आणि आपण विजापुरच्या लष्करावर निघाला. विजापूरकरांची व **जमालखाना**ची दाराशन येथें गांठ पडली. ह्या लढाईंत विजापूरच्या सैन्याचा पराभव होऊन त्याचे तीनशें हत्ती **जमालखाना**नें घेतले. चार दिवसांनीं त्यास खबर समजली कीं, वऱ्हाडची अवघी फौज **बुऱ्हाण**शाहास मिळाली! तेव्हां तो आपली फौज घेऊन वऱ्हाडांत **बुऱ्हाण**शाहास मागें हटविण्यास निघाला. इतक्यांत **इब्राहिम** आदिलशाहानें आपले बर्गी स्वार त्याच्या पाठीस लावून त्यास दाणा वैरण मिळण्याचें बंद केलें. जमालखानाचा सारा भरंवसा सैन्यांतील मेहदी पंथी लोकांवर असे, आणि त्या पंथाचें अस्तित्व व बरेंवाईट **जमालखाना**वर अवलंबून होतें. असो. त्याचे लोक जरी त्यास सोडून जाऊं लागले, तरी मेहदीपंथी लोकांच्या विश्वासावर त्यानें रोहणखेडा घांटाची वाट धरिली. परंतु तिकडे गेल्यावर तो घांट शत्रूंनीं अडविला आहे, असें त्यास कळलें. त्यांच्याशीं लढून घांट उतरण्याचा प्रयत्न केल्यास फार लोक मरतील, व जाया होतील. ह्या विचार मनांत आणून दुसऱ्या एका रस्त्यानें जाण्याचा त्यानें निश्चय केला. परंतु त्या रस्त्यानें सैन्याचें अवडंबर जाण्याजोगें नव्हतें; व त्या वाटेंत पाण्याची टंचाई फार होती. असो. तिक-

बुऱ्हाण पुनः यत्न करितो व जमालखानास मारून राज्य हस्तगत करितो.

सारी फौज बुऱ्हाणास मिळते.

डे निघाल्यावर तृषेनें लोक व्याकूळ होऊं लागले, आणि थकून एका ठिकाणीं मुक्कामास उतरले. इतक्यांत त्यांना कोणी सांगितलें कीं, तेथून तीन कोसांवर पाणी पुष्कळ आहे, तेव्हां ते तिकडे निघाले. तेथें जातांच ती जागा शत्रूंनीं अडविली आहे, असें त्यांच्या नजरेस आलें. यामुळें जेथें होतों तेंच ठिकाण बरें, असें त्यांस झालें. शेवटीं त्यांच्या लोकांनीं थोडें पाणी मिळवून आणिलें, आणि रस्त्याच्या अडचणीमुळें, उष्णतेनें पाण्याच्या टंचाईमुळें आपले लोक फार व्याकूळ झाले आहेत. त्यांस मागें किंवा पुढें जाण्याचीही पंचाईतच आहे. असा विचार पाहून जमालखानानें मरावें, किंवा मारावें पण एकदां लढाई करून नशिबाची तरी परीक्षा पाहावी, असा निश्चय करून पाणी आणलेल्या लोकांस हुकूम केला कीं, "पाणी ठेवा, व हत्यारबंद होऊन शत्रूवर हल्ला करा."

*जमालखान व त्याचे लोक यांचे हाल.*

या निर्वाणांत त्यास जय प्राप्ति होण्याचा संभव दिसत होता, परंतु अकस्मात् जमालखानास एक गोळी लागून तो मरण पावला. आणि त्याच्या फौजेस कोणी आवरता नाहीं, असें होतांच ती दाही दिशा पळाली! त्या पळापळींत इस्माएलही होता. नंतर बुऱ्हाणाच्या लोकांनीं त्यास एका खेड्यांतून पकडून आणिलें, आणि कैदेंत टाकून त्याचा बाप गादीवर बसला. इस्माएलानें अवघें दोन वर्षें राज्य केलें.

*जमालखान पडतो; इस्माएल कैद होतो, व बुऱ्हाण गादीवर बसतो.*

# बुऱ्हाण निजामशाहा.(दुसरा).

इ० स० १५११ ते १५१४ प०

बुऱ्हाणशाहाची मूळची हकिकत.— निजामशाही लोकांवर जुलूम.— खेळदंड्यावर स्वारी.— विजापूरकरांची नगरावर स्वारी.— बुऱ्हाणशाहाचा मृत्यु.

**बुऱ्हाण**शाहाचा भाऊ **मूर्तिजा** अहंमदनगरचें राज्य चालवीत असतां तो लोहगडावर कैदेंत होता. परंतु त्याच्या खर्चास मोठी नेमणूक असल्याकारणानें तो तेथें सुखानें असे. जेव्हां **मूर्तिजा** निजामशाहास कंटाळून **साहेबखानानें** अहंमदनगर सोडिलें, आणि त्याच्या मागून त्यास परत आणण्यास **मूर्तिजा** बेदरास गेला, तेव्हां तो राज्य करण्यास अयोग्य आहे, अशा सबबीवरून दरबारच्या कितीएक खटपटी लोकांनीं अहंमदनगरच्या गादीवर आपला हक्क सांगण्याकरितां **बुऱ्हाण निजामशाहा**स बोलाविलें. तेव्हां त्यानें किल्लेदारास अनुकूल केलें व आपली मुक्तता करून सहा हजार स्वार जमविले, आणि अहंमदनगराकडे गमन केलें. हें वर्तमान **मूर्तिजा** निजामशाहास कळतांच तो बेदराहून नगरास आला. शहरच्या रस्त्यानें राजवाड्यांत जात असतां त्यास एक औषधी विकणाराचें दुकान लागलें. त्यास तो विचारूं लागला, "तुजकडे एखादें वेड जाण्याचें औषध आहे काय? परंतु मी संन्याशाप्रमाणें एकांतवासांत राहूं इच्छित असून मला राज्य करण्याची आशा सुटत नाहीं, असा मी वेडा आहें! आणि माझा भाऊ सुखोपभोग टाकून राज्याच्या दगदगींत शिरूं इच्छितो. या आम्हां उभयतांपैकीं अधिक वेडा कोण? आणि वेडेपणा जाण्याच्या औषधाची अतीशय गरज कोणास आहे? हें कांहीं मला समजत नाहीं!!" त्यापाऱ्यानें उत्तर दिलें, 'आपला भाऊच जास्त वेडा यांत शंका नाहीं; कारण जो आपल्या सारख्या दयाळू भावाविरुद्ध कृतघ्नपणानें बंड करण्यास सिद्ध झाला!!! **मूर्तिजा** निजामशाहा ताबडतोब आल्यामुळें **बुऱ्हाणा**चा यत्न निष्फळ झाला. यानंतर **बुऱ्हाणा**नें आणखी दोन वर्षांनीं राज्यप्राप्तीचा उद्योग केला. परंतु तोही पहिल्याप्र-

बुऱ्हाणाची मूळ हकीगत.

माणेंच सिद्धीस गेला नाहीं. शेवटीं तो जाऊन **अकबर** पादशाहाकडे राहिला, तो त्याचा मुलगा गादीवर बसेपर्यंत तेथेंच होता. आणि वरतीं सांगितल्याप्रमाणें आपल्या मुलास पदच्युत करून निजामशाही गादीवर बसला.

इतक्या प्रयत्नांनीं **बुऱ्हाणशाहा** जरी अहंमदनगरच्या निजामशाही गादीवर विराजमान झाला, तरी आपल्या पदवीस व वयास अयोग्य अशा उपभोगांत तो निमग्न असे. मेहदीपंथाविषयीं जे हुकूम **जमालखानानें** प्रसिद्ध केले होते, ते यानें चट् सारे रद्द केले! इतकेंच नव्हे तर त्या पंथांतील मतांविषयीं जे दुराग्रह दाखवितील, त्यांस देहांत शासन करण्याचे हुकूम दिले. ह्यामुळें **बुऱ्हाण** निजामशाहाच्या राज्यांतून त्या पंथांतील सर्व लोक निघून गेले. त्यानें शियापंथाची पूर्णपणें प्रवृत्ति केली. **मिरझाखाना**च्या बंडाच्या वेळीं जे परदेशीय लोक हद्दपार झाले होते, ते परत येऊं लागले. विजापुरचा माजी दिवाण **दिलावरखान** हबशी विजापुराहून पळून बेदरास गेला होता, त्यास निजामशाही दरबारीं येण्यास परवानगी मिळाली; आणि तो येतांच त्याचा सत्कार झाला. त्यावरोबर "**दिलावरखाना**स काय कारणानें आश्रय दिला?" म्हणून **इब्राहीम** आदिलशाहानें **बुऱ्हाण** शाहास पत्र लिहिलें. त्याचें **बुऱ्हाणशाहानें** फारच बेअदबीनें उत्तर पाठविलें, ह्यामुळें दोन्हीं राजांत लढाई जुंपली. त्याचें वर्णन विजापुरच्या इतिहासांत आलेंच आहे.

मेहदी पंथी लोकांवर जुलूम.

सन १५९२ त **बुऱ्हाण**शाहानें रेवदंड्याच्या **पोर्तुगीज** लोकांवर स्वारी केली; आणि चौल बंदरीं फौज पाठवून हुकूम केला कीं रेवदंडाबंदरीं **पोर्तुगीज** लोकांच्या प्रवेशास हरकत करितां येण्याजोगा एक नवीन किल्ला बांधावा. त्यास त्यानें कुरला असें नांव दिलें. त्यावेळीं **पोर्तुगीज** लोक रात्रीं जहाजांतून पळून दुसरीं त्यांच्या स्वाधीन जीं बंदरें होतीं, त्यांतून कुमक घेऊन पुनः परत आले, आणि त्यांनीं मुसलमानांवर दोन रात्रीं छापे घालून प्रत्येक वेळीं तीनपासून चार हजार पर्यंत दक्षणी मुसलमानांची कत्तल केली। नंतर **बुऱ्हाण**शाहानें कुरल्यास चार हजार स्वारांची **फरहादखाना**बरोबर कुमक पाठविली, आणि वसई व दमण या बंदरांहून फौज यावयाची होती, म्हणून **बहादूरखान** गि-

लनीस कुरल्याचा सुभेदार व परदेशीय सैन्याचा मुख्याधिकारी नेमून रेवदंड्याची नाकेबंदी करण्याचा हुकूम दिला. मुसलमान लोक असे सावध राहूं लागले कीं, त्यांवर छापे घालण्याचा उपायच राहिला नाहीं. तशांत पोर्तुगीज लोकांनीं एकदां हिय्या धरून रेवदंड्यावर हल्ला केला, त्यांत त्यांचे ७०० युरोपियन व दोनशें एतद्देशीय मरण पावले. यानंतर मुसलमानांनीं रेवदंड्यास कडेकोट वेढा दिला, आणि कुरल्यावरील तोफांच्या मारापुढें समुद्रांतून पोर्तुगीज लोकांस कुमक मिळण्याचा अगदीं मार्ग राहिला नाहीं. याप्रमाणें पोर्तुगीज लोक दोहोंकडून कोंडल्यामुळें कैलास येण्याच्या लागांत आले होते, परंतु इतक्यांत अहंमदनगर येथें निजामशाहानें फारच जुलूम मांडल्याची वार्ता निजामशाही छावणींत पसरल्यामुळें एकाएकीं काम सोडून कितीएक निजामशाही सरदार दरबारीं गेले. यामुळें मुसलमानांची ढिलाई पडून पोर्तुगीज लोकांचे शिपाई दारू गोळा वगैरे लष्करी सामान भरलेलें सात जहाजांचें आरमार कुरल्यानजीक आलें होतें, त्यास रात्रीं रेवदंड्याच्या बंदरांत नांगर मारण्यास सांपडला. त्यांतून चार हजार लोक उतरले, आणि उजाडतांच पोर्तुगिजांनीं कुरल्यावर हल्ला केला. त्याबरोबर बाहेरील सर्व मुसलमान आंत शिरले, परंतु पोर्तुगीजही त्यांच्या मागोमाग लगट करीत गेले. यामुळें मुसलमानास किल्ल्याचे दरवाजे बंद करितां आले नाहींत, व युरोपियन आंत घुसले. त्यांनीं मुसलमानांची सफाई उडविण्यास प्रारंभ केला. मुसलमानांची संख्या जरी त्यांच्या दुप्पट होती, तरी युरोपियनांनीं सुमारें बारा हजार मुसलमान मारिले! आणि किल्ल्याचें जाळून पोळून भस्म केलें. इतक्या दक्षणी मुसलमानांचा जरी नाश झाला, तरी बुऱ्हाणशाहानें त्याजबद्दल आनंदच मानिला! व दरबारच्या सर्व प्रमुख जागा परदेशी यांस देऊन त्यांस चौल बंदरीं जाण्याची आज्ञा केली. इतक्यांत इब्राहीम आदिलशाहास पदभ्रष्ट करण्यास त्याचा भाऊ इस्माएल यास सहाय्य करण्याचें मनांत आल्यावरून चौल बंदरीं सैन्य पाठविण्याचें काम तितकेंच राहिलें.

रेवदंड्यावर स्वारी.

इस्माएलास कुमक करण्याच्या उद्देशानें बुऱ्हाण निजामशाहा अहंमदनगराहून बेळगांवाकडे निघाला, परंतु तो परांड्यास पोहोंचल्या-

वर त्यास बातमी समजली कीं, शाहाजादा इस्माएल यास इब्राहिमाच्या लोकांनीं पकडून मारिलें. तेव्हां हिरमुसून तो माघारा गेला. नंतर लौकरच त्याची प्रकृति फार बिघडली. आपल्या भावास सहाय्य केल्याबद्दल निजामशाहाची खोड मोडण्याकरितां अहंमदनगरची सरहद्द ओस पाडण्यास **इब्राहीम** आदिलशाहानें फौज पाठविली, तेव्हां निजामशाहानें पेणकोंडचास **व्यंकटाद्री**कडे वकील पाठवून त्याशीं असा ठराव केला कीं, **व्यंकटाद्रीनें** दक्षिणेकडून विजापुरावर स्वारी करून बंकापुरचा किल्ला घ्यावा, व **बुऱ्हाण**शाहानें सोलापूर घ्यावें. याप्रमाणें संकेत ठरून उभयतांनीं युद्धास सुरुवात केली. त्यांत सोलापूर किल्या नजीक **उझबक बाहाद्दूर** निजामशाहाकडील सरदार पराभव पावून मारला गेला! हें वर्तमान निजामशाहास समजतांच त्याची प्रकृति फारच ढांसळली, आणि जेव्हां त्यास बिछान्यावरून देखील हालतां येईना, तेव्हां त्यानें आपला मुलगा **इब्राहीम** त्यास बोलावूं पाठविलें, व आपल्यामागून त्यानेंच गादीवर बसावें, असा ठराव केला. पूर्वीं ज्या **इस्माएल** निजामशाहानें गादीचा कांहीं दिवस उपभोग घेतला होता, त्याच्या हक्काकडे त्यानें बिलकूल लक्ष दिलें नाहीं. कारण तो मेहदी-पंथाचा असून शिया पंथाचा द्वेषी होता. असो. शाहानें देह ठेवण्यापूर्वीं अशी कंडी पिकविली कीं "इस्माएल गादीवर बसणार." यामुळें सर्व परदेशी लोकांनीं आपापलीं कामें सोडून विजापुरास गमन केलें. **एकलासखान मोलीद** ह्या नांवाच्या एका सरदारानें इस्माएलास गादीवर बसविण्याकरितां म्हणून फौज जमा करून अहंमदनगरावर चाल केली होती, आणि तेव्हां जरी **बुऱ्हाण** निजामशाहा अगदीं मरणोन्मुख झाला होता, तरी फौज घेऊन त्यावर पालखींतून गेला. आणि शाहाजादा **इस्माएलाचा** हुमायूनपुरा जवळ त्यानें पराभव केला. तेव्हां **इस्माएल** परांड्यास पळून गेला. असो. ह्या श्रमामुळें **बुऱ्हाण** निजामशाहा फारच थकला, आणि सन १५९४त शाबान महिन्याचे १८ वे तारखेस त्यानें परलोकीं गमन केलें. या निजामशाहानें अवघा ४ वर्षें ४ महिने १६ दिवस अहंमदनगरच्या निजामशाही राज्यावर अम्मल चालविला.

*(विजापूरकरांची नगरावर स्वारी.)*

*(बुऱ्हाण मरण पावतो व इब्राहिमास वारस ठरवितो.)*

# इब्राहीम निजामशाहा.

इ० स० १५९४.

——:◎✽◎:——

इब्राहीम गादीवर बसतो, व मिआन मंजूस दिवाण नेमितो.—— एकलासखानास माफी मिळते.—— राज्यांत दोन फळ्या.—— विजापूरच्या वकिलाचा अपमान.—विजापूरची फौज शाहाचे राज्यावर स्वारी करिते.—निजामशाही फौजेचा पराभव.—लढाईंत शाहास गोळी लागून शाहा मरण पावतो.

---

आपल्या बापाच्या मरणानंतर **इब्राहीम** निजामशाहा अहंमदनगरच्या गादीवर बसला, आणि **बुऱ्हाण** निजामशाहानें अंतकाळीं सांगितल्याप्रमाणें **मिआन मंजू** दक्षणीस त्यानें दिवाण नेमिलें. **एकलास खानानें** जरी मागील शाहाच्या कारकीर्दींत शाहावर शस्त्र धरिलें होतें, तरी आपणास क्षमा होण्याविषयीं त्यानें अर्ज केला. शाहा व दिवाण यांनीं त्याचा धाडशी व महत्वाकांक्षी स्वभाव मनांत आणून मान्य करणें राजनीतीस सोडून नाहीं, असा विचार करून तो अर्ज कबूल केला. त्यानें अहंमदनगरीं येतांच आपल्या पदरीं हबशी व मौलीद+ यांस जमविण्याचा सपाटा लाविला. हें पाहून दिवाणानेंही आपल्या पक्षाचे लोक गोळा केले, यामुळें राज्यांत सहजींच दोन फळ्या झाल्या. आणि प्रत्येकींतील लोक प्रमुखता मिळविण्याचा यत्न करूं लागले. हळू हळू कारभारांत अव्यवस्था माजूं लागली, आणि दरबारांत वाद पडून तंटा लागण्याचा रंग दिसूं लागतांच कित्येक विजापुरावर स्वारी करण्याबद्दल बोलूं लागले, व कांहींचें त्यास अनुमोदन पडेनासें झालें. शेवटीं दोन्ही पक्षांतील लोक **इब्राहीम** आदिलशाहाकडील वकिलास भर दरबारांत दुर्भाषणें बोलले, आणि त्यांनीं वकिलाची फारच बेअदबी केली. खानदानी घराण्यांतील शाहाजादा गादीवर बसला म्हणजे आनंद प्रदर्शित करण्यास स्नेही राजांकडून वकील वगैरे येण्याची पद्धत असे, आणि ह्याही प्रसं-

इब्राहीम गादीवर बसतो; व मिआन मंजूस दिवाण नेमितो.

एकलासखानास माफी मिळते.

राज्यांत दोन फळ्या.

---

+ परदेशी यांच्या पोटीं हिंदुस्थानांत जन्मलेल्यांस मौलीद म्हणत.

गीं **मीर सफवी** हा सय्यद घराण्यांतील गृहस्थ आदिलशाहाकडून अहंमदनगरास आला. तेव्हां हे दोन्ही पक्षाचे लोक त्यास दुर्वाक्यें बोलण्यास व त्याची बेअब्रू करण्यास चुकले नाहींत. सय्यद (पैगंबराच्या) घराण्यांतील त्याची निर्विवाद उत्पत्ति असल्यामुळें ही वर्तणुक फार निंदास्पद होती. असो. आपल्या वकिलाचा झालेला अपमान ऐकून आदिलशाहास स्वाभावीकच राग आला. त्यानें अनुमान केलें कीं, **इब्राहीम** निजामशाहास बाहुल्यासारखें बसवून दरबारच्या खटपटी व मसलती लोकांनीं सर्व अधिकार बळकाविला असावा, तरी आपण कांहीं उद्योग केल्यास निजामशाहाचा अधिकार सहजीं त्यास मिळेल. ह्या उद्देशानें आदिलशाहानें शाहादुर्गीस कूच केलें. त्याबरोबर लढण्याची **एकलासखाना**नें तयारी चालविली. **मिआन मंजूचें** असें मत होतें कीं, **इब्राहीम** आदिलशाहाशीं तह करावा, आणि **अकबर** पादशाहाची दक्षणेवर धाड येत आहे, ती टाळण्यासाठीं सर्व दक्षणेंतील फौज एकत्र करून कंबर बांधावी. कांहीं केल्या **एकलासखान** ऐकेना. सर्वस्व गेलें, तरी आदिलशाहाशीं दोन हात करण्याचा त्यानें आपला कृतसंकल्प शाहास कळविला. त्यावर **मिआन मंजूनें** बिलकुल उत्तरच दिलें नाहीं. तेव्हां शाहानें **एकलासखाना**च्या म्हणण्यास रुकार दिला, व निजामशाही सैन्य सरहद्दीवर गेलें. **इब्राहीम** आदिलशाहानें ह्या वेळपर्यंत निजामशाही मानावर हल्ला केला नव्हता. याकरितां **मिआन मंजूनें** पुनः सुचविलें कीं, प्रथम आपण तहाचें बोलणें लावूं, परंतु **इब्राहीम** निजामशाहानें एका स्त्रीशीं रममाण असतां त्या भरांत सांगितलें " आतां मागें फिरावयाचें नाहीं." तेव्हां निजामशाही फौजेनें सरहद्द उल्लंघन करून विजापुरच्या कित्येक खेड्यांपासून खंडणी घेतली. त्याबरोबर आदिलशाही सरदार **हामीदखान** पुढें सरसावला. आतां खरोखरचा बिकट प्रसंग येईल, असें समजून **मिआन मंजूनें** शाहाच्या कृत्याबद्दल क्षमा मागण्यास कांहीं विश्वासू मनुष्य पाठविले, व त्यांबरोबर असा निरोप पाठविला कीं," शाहाचा अद्याप मूलस्वभाव असून त्यास सुरापानाचें व्यसन फार लागलें आहे. दुष्ट व स्वकार्य साधू लोकांच्या संगतीस असल्यामुळें त्यांच्याच ओंजळीनें तो पाणी पीत असतो. एतदर्थ त्याचें करणें

विजापुरच्या वकिलाचा अपमान.

विजापुरची फौज निजामशाहावर स्वारी करिते.

आपण फारसें मनास न आणितां हल्लीं जिल्हेज महिना चालला असून त्यांत लढाई करणें हें महत्पाप आहे. हेंही लक्षांत आणावें. आपण मजवर जर कृपा कराल, आणि कांहीं दिवस लढाई तहकूब कराल, तर मी खात्रीपूर्वक सांगतों कीं, तितक्या अवधींत मी शाहास ताब्यावर आणून त्याची तहास शपथपूर्वक कबूली घेईन." हमिदखानानें निजामशाही फौजेस टाकून दुसरीकडे दोन मैलांचे अंतरावर तळ दिला. विजापुरचे लोक आपणास भिऊन पळाले, असें निजामशाही फौजेनें अनुमान करून त्यांवर दुसरे दिवशीं हल्ला करण्याचा निश्चय केला. आणि मिआन मंजू व दुसरे बरेच सरदार शाहाकडे हें वेडें कृत्य न करण्याविषयीं रात्रभर कपाळकूट करीत होते, तरी त्यानें त्यांचें मुळींच न ऐकतां अधिकाधिक दारू पिऊन हमीदखानावर हल्ला केला. तेव्हां दोन्हीं सैन्यांत मिळून पायदळाशिवाय पन्नास हजार स्वार होते. उभय सैन्याच्या चकमकींत एक विलक्षण व चमत्कारिक गोष्ट घडली ती अशी:– निजामशाही सैन्यांतील उजवे फळीनें आदिलशाही फौजेची डावी फळी फोडून त्यांस पळविलें, व आदिलशाहाच्या उजव्या फळीनें निजामशाही डाव्या फळीस मागें हटवून तिचा सहा मैल पाठलाग केला. इब्राहीम निजामशाहा उजव्या फळींतच होता, म्हणून आपणासच जय मिळाला, असा त्यानें तर्क केला. परंतु आदिलशाहाकडील उजव्या फळीचा सरदार सोहलखान रात्रभर आपल्या जाग्यावरून हालला नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं दोन्हीं सैन्यांतील उजव्या फळ्या आपापल्या जाग्यावर उभ्या आहेत, असें पाहून उभयतांस आश्चर्य वाटलें. इब्राहीम निजामशाहा रात्रभर आपल्या जनानखान्यांत गर्क होऊन पडला होता. सकाळीं उठतांच त्यानें आणखीं दारू झोंकली, व आपल्या लोकांस युद्धास सज्ज होण्याचा हुकूम दिला! निजामशाहाकडील पुष्कळ लोक आदिलशाही फौजेच्या डाव्या फळीच्या मागें लागले होते. ते तिकडेच गुंतले, व दुसरे कित्येक लुटालुटीच्या नादांत निमग्न होते, तरी त्याचा कांहींच विचार न करितां निजामशाहानें विजापुरच्या फौजेवर हल्ला केला. सोहलखानानें विजापुरची सर्व फौज एकत्र करून निजामशाही फौजेस बरेंच आपल्या अंगावर घेतलें, आणि मोठ्या पराक्रमानें तिचें निवा-

रण केलें. अशी दोन्हीं लष्करांची तारांबळ उडाली असतां एकाए-
निजामशाहीफौ- कीं, निजामशाहास डोक्यांत अचानक गोळी लागून तो
जेचा पराभव. मेला! त्याबरोबर त्याच्या फौजेस कोणी जोमदा-
र आवरता नाहीं, असें पाहून ती सर्व अहंमदनगरास पळून गेली.
त्यांतून मिआन मंजूही गेला. नगरास पोहोंचतांच मंजूनें दौल-
शाहा गोळी ताबादेहून अहंमद या नांवाचा एक बारा वर्षांचा मु-
लागून पडतो. लगा आणिला. (हा राजवंशांतील आहे, अशा मि-
षानें त्यास कैदेंत टाकिलें होतें.) त्यावेळीं इब्राहीम निजामशा-
हाच्या बाहादूर नामक तान्ह्या मुलास जावंद किल्ल्यांत ठेविलें हो-
तें. सारांश चार महिने राज्य केल्यावर इब्राहीम निजामशा-
हाचा शेवट झाला.

+ बुसातिने सलातीन म्हणतो कीं, त्याच्या रवांद्यास तीर लागून तो पा-
र गेल्यामुळें निजामशाहा मरण पावला.

# अहंमद निजामशाहा.

इ० स० १५९४.

---

गादीवर कोणास बसवावें, याबद्दल विचार.—— अहंमदास गादीवर बसवितात.—त्याची हकीकत.—— एकलासखान आणि मंजू यांमध्यें कलह.—— अकबराचा पुत्र मुराद याजकडे मंजू कुमक मागतो.— शाहाजादा मुराद फौजेसह दक्षणेंत येतो.— चांदबिबी सर्व कारभार बळकाविते.—— शाहाजादा मुराद अहंमदनगरावर येतो.—— शहर लुटलें जातें.—— राज्यांतील फळ्या.— नेहंगखान चांदबिबीकडे मदतीस जातो— शाहादुर्गीस आदिलशाही व निजामशाही फौज जाते.—— मुराद याचा सुरुंग उडविण्याचा बेत.——हा बेत चांदबिबीस कळतो.— ती दोन भुयारें रिकामीं करिते.— तिसऱ्या भुयारांतील सुरुंग उडून पुष्कळ लोक मरतात.—— चांदबिबी शत्रूचा शिरकाव होऊं देत नाहीं.—— चांदबिबीचें शौर्य.—— ती दक्षणी शाहाकडे कुमक मागते.—— मोगलांशीं तह होतो.—— बाहादूर शाहास आणण्यास फौज पाठवितात. अहंमदास नेमणूक करून देतात.

---

**इब्राहीम** निजामशाहास **एकलासखान** व त्याचे इतर स्नेही यांनीं नाहीं नाहीं ते भलभलते सल्ले देऊन राज्याची खराबी केली होती म्हणून **मिआनमंजूनें** राजधानीस येतांच प्रथम अहंमदनगरचा किल्ला व निजामशाही तिजोरी आपल्या ताब्यांत घेतली. **एकलासखान** व दुसरे कामगार आल्यावर त्यांस मंजूनें किल्ल्यांत बोलावून आतां राज्य चालविण्याचा विचार काय करावा! ह्याविषयीं खलबत करण्यासाठीं दरबार भरविलें. पुष्कळानीं माजी राजाची चुलती **चांदबिबी** इचा पक्ष स्वीकारून असें सुचविलें कीं; माजी शाहाचा एकुलता एक पुत्र **बहादूर** यास गादीवर बसवून **चांदबिबीच्या** हवालीं राज्यकारभार करावा. **मिआनमंजूनें** ती गोष्ट नाकबूल केली. तेव्हां असें ठरलें कीं, निजामशाही वंशांतील **अहंमद** या नांवचा पुरुष **दौलताबादच्या** किल्ल्यावर आहे, त्यास आणून गादीवर बसवावें. त्या प्रमाणें त्यास मोठ्या समारंभानें इसवी सन १५९४ सालीं जिल्हेज महिन्याच्या १७ व्या तारखेस गादीवर बस-

गादीवर कोणास बसवावें याबद्दल विचार.

अहंमद यास गादीवर बसवितात.

विलें, आणि त्याच्या नांवानें बारा इमामांचा खुतबा वाचविला. पुढें राज्यांतील सर्व सरदार आपापल्या जाहागिरींत स्वतंत्रपणें वागूं लागले. माजी शाहाचा अर्भक मूल **बहादूर** यास त्याच्या चुलतीपासून बळजोरीनें काढून चावंद किल्यावर ठेविलें. पुढें थोडे दिवसांनंतर असें उघडकीस आलें कीं, **अहंमद** हा अस्सल निजामशाही वंशांतील नसून त्याचा निजामशाही राज्यावर बिलकूल हक्क नाहीं. तेव्हां एकलासखान व दुसरे हबशी सरदार त्यास राज्याभिषेक करण्याविषयीं अनुमत दिल्याचा पस्तावा करूं लागले. ह्या **अहंमदाच्या** वंशाची विर्त्तीम खरी हकीगत अशी आहेः—

**अहंमद** निजामशाहाचा पुत्र बुऱ्हाण निजामशाहा निवर्तला तेव्हां त्याचा एक पुत्र **हुस्सेन** निजामशाही गादीवर बसला. त्याचे **महंमद खुदबंद, शाहा अली, महंमद बकर, अबदूलकादर** व **शाहा हैदर** असे पांच भाऊ होते. कदाचित आपण आपल्या भावाच्या रागास कधीं तरी बळी पडूं. असें समजून ते पांचही निजामशाही राज्यांतून पळून गेले होते. मूर्तिजा निजामशाहाच्या कारकीर्दीच्या अखेरीस **शाहा ताहीर** ह्या नांवचा एक पुरुष दौलताबादेस येऊन सांगूं लागला कीं, **महंमद खुदबंदखान** बंगाल्यांत असतां मरण पावला, व त्याच्या पोटचा पुत्र मी तिकडे अन्नास महाग झाल्यामुळें इकडे दक्षणेंत आलों आहें. **मूर्तिजा** निजामशाहाच्या सरदारांनीं खरी हकीकत समजण्याच्या हेतूनें ती बिना शाहास कळविली, व त्याचा दिवाण प्रसिद्ध सलाबतखान याच्याही कानावर घातली. परंतु बंगाला फार दूर व त्या प्रांतांशीं दळण वळण जितक्यास तितकेंच असल्यामुळें त्याचा लागावा तसा छडा लागला नाहीं. तरी ज्यापेक्षां शाहाताहीर हा आपण निजामशाही वंशांतील आहें, असा बहाणा करीत आहे, त्यापेक्षां तो गादीस हक्क सांगून एखादे वेळीं बखेडा करील. यास्तव त्यास दौलताबादच्या किल्यावर कैदेंत ठेविलें. कांहीं दिवसांनीं ह्या गोष्टीची यथातथ्य हकीगत समजण्या करितां सलाबतखानानें शाहाजादा खुदबंदखानाच्या ओळखींतील इभ्रतीच्या गृहस्थांस बुऱ्हाण निजामशाहाकडे आग्र्यास पाठविलें. हा बुऱ्हाण, मूर्तिजा निजामशाहाचा (पुढें नगरच्या गादीवर बसला.) सख्खा बंधू असून त्यावेळीं **अकबर** पादशाहाच्या दरबारीं आग्र्यास होता. बुऱ्हाणानें **शाहा ताहीरची** गोष्ट अगदीं खोटी असून त्याचें सर्व थोतांड आहे, असें मत्यंतरपूर्वक दाखवून सांगितलें:—

शाहाजादा खुदबंद आपल्या घरीं मरण पावला असून त्याचीं मुलेंमाणसें सर्व आश्रयास मजजवळ आहेत. त्याचा पुत्र म्हणून जर कोणी तिकडे आला असेल तर तो तोतया असावा. या प्रमाणें त्या गृहस्थाची पक्की हकीगत आणविल्यानंतर सलाबतखानाची खात्री झाली; परंतु जर त्यानें खुदबंदखानाचा पुत्र असें प्रसिद्ध केलें आहे, तर त्याच्या लुच्चेगिरीविषयीं कदाचित् लोकर खातरी होणार नाहीं, व तो गादीस हक्क सांगून कदाचित् बखेडा करीत सुटेल. यास्तव त्यास कैदेंतच ठेवणें चांगलें, असा विचार करून तशीच व्यवस्था केली. पुढें तो थोड्याच दिवसांनीं अटकेंतच मरण पावला! त्याचा पुत्र अहंमद हाही मागें बापा प्रमाणेंच कैदेंत होता. त्यास मिआन मंजूनें पुढें करून गादीवर बसविलें.

अहंमदाची खरी हकीकत.

एकलासखान व दुसरे सरदार आणि हबशी लोक यांस जेव्हां अहंमदा विषयीं खरी माहिती समजली, तेव्हां त्यांनीं त्याचा पक्ष सोडिला. मंजू दक्षणी लोकांस घेऊन अहंमदनगरच्या किल्याजवळ कलबुतच्या मैदानांत तळ देऊन राहिला, व आपला पुत्र मिआन हुसेन यास सातशें स्वार देऊन एकलासखानानें जमविलेल्या लोकांस हांकून लावण्यास पाठवून आपण अहंमदास घेऊन एका सांडणीवर बसून गम्मत पहावयास गेला. दोहों पक्षांच्या लोकांची मोठी लढाई जुंपली. व फार वेळ झटपट चालली होती. इतक्यांत बंडवाल्यांकडील एकाची गोळी राजछत्रास लागली. तेणेंकरून किल्यांत फारच गडबड झाली. लोक बोलूं लागले कीं, अहंमद गोळी लागून मेला! ही बातमी फैलावतां फैलावतां इतकी पसरली कीं, ती सैन्यांतील लोकांस समजून मिआन हुस्सेन जो पळाला तो किल्यांत जाऊन आश्रयास राहिला. त्यावरोबर एकलासखानाच्या पक्षांतील लोकांस जास्त हुरूप येऊन त्यांनीं त्या किल्यास कडेकोट वेढा दिला. दुसऱ्या बुऱ्हाणाच्या वेळेपासून नेहंगखान हबशी व हबषखान मोलीद हे दौलताबादच्या किल्यांत कैदी होते. त्यांस मुक्त करण्याविषयीं एकलासखानानें किल्लेदारास हुकूम पाठविला. हे बंदमुक्त होतांच त्यानें चादवंदच्याही किल्लेदारास आज्ञा केली कीं, शाहाजादा बहादूर यास आपल्या स्वाधीन करावें. परंतु मिआन मंजूच्या संमतीशिवाय मी आपली आज्ञा जुमानीत नाहीं, असा एकलासखानास जबाब मिळाला. तेव्हां नगरच्या बाजारांतून बहादुराच्या वयाचा एक मुल-

एकलासखान व मंजू यामध्यें कलह.

गा धरून आणून तो निजामशाही वंशाचा अस्सल वारस आहे, असें प्रसिद्ध करून त्यानें दहाबाराहजार स्वार जमविले. त्याबरोबर हवशांचीअशी चढाई पाहून मंजूस भीति पडली. त्यानें अहंमदनगरचें राज्य हवा-

*मंजू अकबराच्या मुलाकडे कुमक मागतो.*

लीं करण्याच्या करारानें आपल्या मदतीस येण्याविषयीं शाहाजादा मुराद मिरझा अकबरपादशाहाचा पुत्र गुजराथेंत होता, त्यास पत्र लिहिलें. पादशाहानेंही संधि पाहून दक्षणेवर स्वारी करण्यासच त्यास गुजराथेंत पाठविलें होतें. यामुळें ही फुकटची संधि सांपडतांच त्यानें मंजूचें म्हणणें मान्य केलें. परंतु ति-

*शाहाजादा मुराद फौजेसह दक्षणेंत येतो.*

तक्यांतच इकडे हवशी सरदारांत कलह लागून एकलासरवानाच्या छावणींत बखेडा माजला. शेवटीं पुष्कळ दक्षणी लोक त्यास सोडून मिआनमंजूस मिळाले. त्यांजकडून त्यास एकलासरवानाच्या छावणींतील यच्चावत माहिती कळतांच त्यानें सन१५९५ सालीं मोहरमच्या २५व्या तारखेस एदग्यास कूच केलें आणि हबशांवर हल्ला करून त्यांची वाताहात करून सोडिली. ज्यांस मंजूनें कैद केलें होतें त्यांतच बाजारांतून आणून ज्या मुलास वारस म्हणून एकलासरवानानें पुढें केलें होतें तो होता. या नंतर कांहीं दिवसांनीं मुराद मिरझा, खानदेशचा राजा अलीखान, खान झनानसरदार असे तिघे सहा हजार मोंगल व रजपूत स्वारांनिशीं नगरास येऊन दाखल झाले. हबशांचा पराजय केल्यामुळें मिआनमंजूस बरेंच धैर्य आलें होतें; व सर्व गोष्टी आपल्या मनासारख्या करण्याची त्यास धमक होती. यास्तव शाहाजादा मुराद यास बोलाविल्याचा त्यास मागाहून पस्ताव झाला. परंतु त्यानें राजधानीचा बचाव करण्याचें मनावर घेतलें. किल्ल्यांत दारूगोळा व धान्यसामग्री भरपूर भरलेली होतीच. म्हणून चांदबिबीच्या हवालीं कारभार करून व किल्ल्याच्या बचावास अनसारखानास नेमून आपण अहंमदास बरोबर घेऊन आवशाच्या किल्ल्याकडे आदिलशाही व कुतुबशाही राजांकडून सहाय्य मिळविण्यास नि-

*चांदबिबी कारभार बळकाविते.*

घाला. मंजू जातांच किल्ला व शहर संरक्षणाचें काम स्वतः चांदबिबीनें चालविलें. आणि अल्पकाळांत अनसारखानाचा वध करवून बाहादूर शाहाच्या नांवानें द्वाही फिरविली; व स्वतः तिनेंसर्व कारभार महंमदाच्या मदतीनें चालविण्यास प्रारंभ केला.

आणि समशेरखान हबशी व अफझूलखान बोरिशी यांस व त्यांच्या पुष्कळ स्नेह्यांस अनुकूळ करून तिनें किल्यांत आणिलें.

शाहाजादा मुराद यानें अहंमदनगर किल्याच्या उत्तरबाजूस येऊन बहिस्ती बागेंत तळ दिला. व बुऱ्हाणाबादच्या+ लोकरक्षणार्थ एक जंगी पहारा पाठविला आणि लोकांस बिलकूल उपद्रव न देण्याविषयीं त्यांस सक्त ताकीद देऊन मोगलांवर विश्वास ठेवून जे लोक स्वस्थ राहतील, त्यांस कांहींएक शिलशिला पोहोंचणार नाहीं असा जाहीरनामा लाविला.

मुराद अहंमदनगरावर येतो.

दुसरे दिवशीं शाहाजादा जेव्हां फिरावयास निघाला, तेव्हां पाहाणीकारांच्या सल्यानें किल्यांत सुरुंग नेण्यास व भुयारें पाडण्यास कोणत्या ठिकाणीं जागा आहे. याची पाहाणी करून आपल्या सैन्यांतील निरनिराळ्या टोळ्यांस त्यानें जागा नेमून दिल्या. मोगलांकडे शाहाबाजखान म्हणून एक जुलमी व मोठा क्रूर सरदार होता. तो मुरादाचा हुकूम गुंडाळून ठेवून शिकारीच्या निमित्तानें बुऱ्हाणाबादेकडे गेला, आणि लुटण्याचा कित्ता आपण स्वतः घालून देऊन त्यानें आपल्या लोकांस टोळांच्या झुंडीप्रमाणें शहरांत सोडिलें. त्यांनीं एकातासांत अहंमदनगर व बुऱ्हाणाबाद हीं दोन्हीं शहरें उजाड करून टाकिलीं.

शहर लुटलें जातें.

हें वर्तमान मुरादास समजतांच त्यानें जे लोक लूट करीत असतांना सांपडले त्यांस पकडून आणून एकदम आपल्या छावणीसमोर सुळीं दिले. परंतु मुरादाच्या वचनावर ज्या लोकांचा विश्वास बसेना ते त्या रात्रींच दोन्हीं शहरें सोडून गेले होते. किल्यांतील चांदबिबीचे टोळीशिवाय निजामशाही लोकांच्या तीन फळ्या होत्या.

राज्यांतील फळ्या.

पहिली (मिआनमहंमद व अहंमदशाहाची. (मंजू आदिलशाही सरहद्दीवर इब्राहिमाची कुमक संपादन करण्यास गेला होता.) दुसरी— एकलासखानाची. त्यानें दौलताबादेनजीक आपला तळ ठेविला असून दुसरा मोती ह्या नांवचा मुलगा निजामशाही गादीचा योग्य वारस म्हणून प्रसिद्ध केलें होतें. तिसरी— नेहंगखान हबशी याची. हा पहिल्या बुऱ्हाणनिजामशाहाच्या दुसऱ्या शाहाअल्ली* नामक पुत्रास राज्य देण्यासाठीं

---

+ हें दुसऱ्या बुऱ्हाण निजामशाहानें वसविलेलें शहर होतें.

* ह्या शाहाअल्लीचें वय ह्यावेळीं ७० वर्षांचें होतें.

आणावयासी विजापुरचे मुलखांत गेला होता.

**एकलासखान** बाराहजार फौजेनिशी दौलताबादेहून नगरास येत असतां त्यास मोगलांकडील **दौलतखान लोदी** या सरदारानें सहा हजार स्वारांसह गांठून गोदातीरीं त्याचा पराभव करून **लोदी** पैठणास गेला, आणि त्यानें तें नांदतें व श्रीमान शहर लुटून फस्त केलें.

**बहादूर** निजामशाहाच्या नांवें **चांदबिबीनें** द्वाही फिरविली होती तरी तो अद्यापि चावंद किल्ल्यांत कैदेंतच होता. **मिआनमंजू अहंमदशाहास** घेऊन विजापूर हद्दीवर होता. **चांदबिबीनें नेहंगखान** व **शाहाअली** ह्यांस आपणांस येऊन किल्ल्यांत मिळण्याविषयीं पत्र लिहिलें. याप्रमाणें **नेहंगखान** बाराहजार लष्करासहीत अहंमदनगरापासून १२ मैलांवर येऊन उतरला आणि मोगलांनीं कोणकोणतीं नाकीं धरलीं आहेत व किल्ल्यांत आपला प्रवेश होण्यास मार्ग आहे किंवा नाहीं, त्याचा तल्लाष करण्यास त्यानें कितीएक हेर पाठविले. त्यांनीं बातमी आणली कीं, किल्ल्याचीं पूर्व बाजू मात्र मोकळी असून त्याच बाजूनें किल्ल्यांत प्रवेश होण्याचा संभव आहे. त्या ठिकाणापासून सुमारें तीन मैलांवर **नेहंगखान** येऊन पोहोंचल्यावर त्यास एक मोगलांची टोळी जातांना दिसली. ही किल्ल्यांत जाण्याची वाट **मुराद** पाहणी करीत असतां त्याच्या नजरेस आली होती. आणि त्यानें **खानखनाना** बरोबर तीन हजार लोकांचें एक पथक बहिस्ती बागेंतून तिकडे रवाना केलें होतें. **नेहंगखानानें** ही टोळी पाहिल्यावर मागें जाण्याचा विचार सोडून तींतून घुसून पुढें जाण्याचें ठरविलें. त्या लोकांवर त्यानें एकाएकीं छापा घालून त्यांतून पुष्कळांस तोडून काढिलें. इतक्यांत त्याच्या कुमकेस आणखी लोक येतांच थोड्या लोकांसह त्यानें किल्ल्यांत रिघाव केला. **शाहाअलीस** तें धैर्य न झाल्यामुळें तो मागें जाण्याचा यत्न करूं लागला. तेव्हां **दवलतखान लोदीनें** त्यास गांठून त्याच्या सुमारें सातशें लोकांची कत्तल उडविली!!!

चांदबिबीकडे किल्ल्यांत नेहंगखान जातो.

**विजापुरच्या आदिलशाहानें** ह्या पराभवाचें व मोगलांच्या प्रचंड सैन्याचें वर्तमान ऐकतांच आपल्या सरहद्दीवर शाहादुर्ग येथें **सोहलखानास** पंचवीस हजार स्वारांनिशी पाठविलें, आणि दुसरा हुकूम होईप

यैंत त्या तेथेंच राहावें, असें बजाविलें. तेथें त्यास मिआन मंजू व अहंमदशाहा येऊन मिळाले. एकलासखानही आपले सर्व खासगी विचार एकीकडे ठेवून केवळ स्वराज्यसंरक्षणेच्छेनें त्यांस तिकडे जाऊन मिळाला, आणि लौकरच महिंदीकुली सुलतान तुर्कोमन हाही सहा हजार कुतुबशाही स्वारांस घेऊन हैदराबादेहून येऊन मिळाला.

शाहादुर्गास आदिलशाही व निजामशाही फौज जमते.

शाहादुर्गास ही फौज जमल्याचें वर्तमान मुराद ह्यास समजतांच त्यानें पुढें काय करावें, हा विचार करण्यासाठीं दरबार भरविला. त्यांत असें ठरलें कीं तिकडील फौज कुमकेस येण्यापूर्वीच एकदम किल्ल्यावर हल्ला करावा. नंतर ताबडतोब सुरुंग उडविण्यास भुयारें खणण्याचा सपाटा लागला. आणि थोड्या दिवसांत किल्ल्याच्या एका बाजूच्या पांच बुरुजांखालीं पांच भुयारें पाडण्यांत आलीं. तीं दारूनें भरून व तोफा आंत नेण्याजोगी वाट राखून चुनेगच्ची दगडांनीं बांधून काढिलीं. आणि रज्जबच्या दुसऱ्या तारखेस सुरुंग उडविण्याचा नेम ठरला.

मुरादाची सुरुंग उडविण्याची तयारी.

आंतील लोकांनींही तिळभर देखील कसूर न करितां मोठ्या निकरानें युद्ध करण्याचा क्रम चालविलाच होता. परंतु त्यांस या सुरुंगांची बातमीही नसल्या कारणानें त्याच्या निवारणार्थ यांची तयारी नव्हती. त्यांचें धारिष्ट व दृढनिश्चय पाहून ते आतां सुरुंग उडतांच अकस्मात मरणार याची खवाजा महंमदखान यास करुणा येऊन त्यानें किल्ल्यांतील लोकांस सुरुंगांची खबर दिली. त्या सरशी चांदबिबी आपल्या लोकांस घेऊन भुयारांतील दारू काढून टाकण्यास एकसारखी रात्रभर खपली. व उजाडेपर्यंत तिनें दोन भुयारें रिकामीं केलीं, आणि तिसऱ्या भुयाराचा तपास करूं लागली.

चांदबिबी दोन भुयारें रिकामी करिते.

इतक्या संधीस शाहाजादा मुराद ह्यानें खानखनानास कळवितांच लष्कराची तयारी करून हल्ला करण्याचा निश्चय केला. किल्ल्यांतील लोक तिसऱ्या भुयाराचा तपास लावून त्यांतील दारू काढीत होते. हें भुयार फार मोठें होतें. यामुळें त्यांस बराच अवकाश लागला. इतक्यांत मुरादानें ते लोक दारू काढण्यांत अगदीं गर्क झाले आहेत, असें पाहून एकदम बत्ती दिवविली. या कारणानें तेथें असलेले पुष्कळ लोक त्या तडाक्यांत मा-

तिसऱ्या भुयारांतील सुरुंग उडतांच पुष्कळ लोक मरतात.

पडून तत्काळ मरण पावले, व बुरूज पडून तटास मोठी खिंड पडली. तेव्हां बहुतेक कामगारांनीं पळून जाण्याची तयारी चालविली आहे, असें चांदबिबीनें अवलोकन करून आंगांत चिलखत चढविलें, व तोंडावर बुरखा घेतला, आणि तलवार सरसावून ती त्या खिंडारापाशीं आली. "मी मरेपर्यंत शत्रूंचा किल्यांत शिरकाव होऊं देणार नाहीं." अशी तिनें प्रतिज्ञा केली. हें तिचें धारिष्ट अवलोकन करून जे भ्याड वगैरे लोक पाठीस पाय लावून पळत होते त्यांस फार शरम वाटली, व ते सारे मागें फिरले, आणि मोठ्या शौर्यानें तिच्याबरोबरच शत्रुसैन्याशीं लढूं लागले. मुरादानें आणखीं जीं भुयारें पाडलीं होतीं त्यांस बत्ती देऊन आणखीं खिंडी पाडल्यावर एकदम हुल्लड करून किल्यांत प्रवेश करावा, या दमावर तो स्वस्थ होता. या त्याच्या सुस्ताचा फायदा किल्यांतील लोकांस सहज सांपडला. त्यांनीं खंदकांतील अग्निबाण, दारू, लांकडें वगैरे जळाऊ पदार्थ काढून टाकून तो भरून काढिला व तेथें तोफा आणून उभ्या केल्या. शेवटीं दुसरे सुरुंग उडण्याची निराशा झाल्यावर मोंगलांनीं हल्ला केला. त्यावेळीं खिंडारांत मोठ्या निकरानें लढाई झाली. दोहों पक्षांचे लोक जिवाची आशा सोडून लढले. खिंडीपुढील खंदकांत मोंगलांचा जाळ केला व किल्यांतून तोफांचा भडिमार सुरू झाला. यामुळें मोंगलांचे भारी लोक पडले. खंदक मेलेल्यांनीं चिकार भरला!! तरी शाहाजादा मुराद याजकडील लोक टोळ्याटोळ्यांनीं हल्ले करीतच होते. हा प्रकार रात्रपडेपर्यंत चालला. परंतु बिबीनें तितक्यांसही मागें हटवून किल्यांत कोणाचा रिगाव होऊं दिला नाहीं. तिचें तें धारिष्ट, शौर्य, पराक्रम, हिम्मत व दृढ निश्चय पाहून आंतील लोकांनीं तोंडांत बोटेंच घातलीं. प्रत्यक्ष शत्रूच्या छावणींत सुद्धां चांदबिबी शाबास! शाबास!! धन्य आहे तुझी, वाहवा लढावें तर या प्रमाणें. स्त्री असून आज त्वां कमाल केली!!! असे उद्गार काढून लोक मोठ्यानें गर्जत होते. असो त्या दिवसापासून लोक तिला चांदबिबी न म्हणतां 'सुलताना' म्हणूं लागले. मोंगलांस मागें हटविल्यावर पुनः त्या रात्रीं जाऊन तिनें ती खिंड आपल्या देखत भरून काढविली व उजाडण्याच्या आंत तेथें सात आठ फूट उंचीचा तट चढविला, आणि दुसऱ्या दिवशीं बीड येथें दोन

(चांदबिबी किल्यांत शत्रूचा शिरकाव होऊं देत नाहीं.)

(चांदबिबीचें शौर्य.)

दक्षणी शाहांचीं सैन्यें होतीं, त्यांस आपली खरी स्थिति, किल्ल्यांतील लोकांचें दुःख, धान्याचा तोटा इत्यादि गोष्टी कळवून लौ... कर कुमकेस येण्याविषयीं पत्रें लिहिलीं. हीं पत्रें शत्रूचे ... सैन्यांतील लोकांनीं पकडून मुरादाकडे नेलीं. तेव्हां त्यानें 'होईल तितके लौकर या, तुम्हां सर्वांबरोबर एकदम लढावें असा माझा मनोदय आहे' अशा मतलबाचीं पत्रें देऊन तीं सर्व पुढें रवाना केलीं.

ती दक्षणी शाहांकडे कुमक मागते.

हीं पत्रें पोहोंचतांच बीडचें सैन्य मानिकडौन या घांटाच्या रस्त्यानें नगरास येण्यास निघालें. तें जसें जवळ येऊं लागलें तसें मोंगलांस दाणा वैरणीची टंचाई पडूं लागली त्यामुळें त्यांची फार धांदल उडूं लागली. तेव्हां मुरादानें तहाचें बोलणें लाविलें. आणि असें कळविलें कीं, "जर वऱ्हाड प्रांत व त्यावरील अम्मल मोंगलांस द्याल तर आम्हीं निघून जाऊं" प्रथम चांदबिबीनें ही गोष्ट नाकबूल केली. परंतु मागाहून विचार केला कीं, यदाकदाचित बिडाहून आलेल्या सैन्याचा मोंगलांनीं पराभव केला तर ह्या प्रकारचा तह ठरण्यासही मुष्कील पडेल. यास्तव बहादूरशाहाच्या नांवें तह ठरविल्यानंतर मोंगलांचें सैन्य दौलताबादच्या वाटेनें परत गेलें. मोंगल निघून गेल्यावर तीन दिवसांनीं सहाय्यकर्ते येऊन पोहोंचले. तेव्हां मिआनमंजूस वाटलें कीं, आतां अहंमदास बिनहरकत राज्यपद मिळेल. परंतु हें म्हणणें किल्ल्यांतील लोकांनीं स्पष्ट नाकबूल करून किल्ल्याचे दरवाजे बंद केले. आणि चावंद किल्ल्यांतून बहादूरशाहास आणण्याकरितां नेहंगखानानें फौज पाठविली. अहंमदनगरच्या राज्यांतील अंतर्गत गडबड व बखेडा मोडण्याच्या कामीं सहाय्य करण्याविषयीं चांदसुलतानानें आपला पुतण्या विजापूरचा इब्राहीम आदिलशाहा यास लिहिलें. त्यानें तिच्या मदतीस चार हजार स्वारांनिशीं मुस्तफाखान ह्या सरदारास पाठविलें व मिआन मंजूस पत्र लिहिलें कीं, 'अहंमदशाहाविषयीं आग्रह न धरितां तुम्हीं विजापुरास निघून या म्हणजे येथें सर्व गोष्टींचा विचार करूं' त्याप्रमाणें सोहल व मुस्तफाखान यांजबरोबर मंजू विजापुरास गेला. अहंमद हा निजामशाही घराण्यांतील पुरुष नव्हे. याजबद्दल इब्राहीम आदिलशाहानें मंजुची पक्की खात्री करून

मोगलांशीं तह ठरतो.

चांद सुलताना बहादूरशाहास आणण्यास फौज पाठविते.

अहंमदास नेमणूक करून देतात.

त्यास तहाहयात नेमणूक ठरवून मिआनमंजूस आपल्या पदरीं सरदारी दिली.

---

# बहादूर निजामशाहा

## आणि

# चांदबिबी सुलताना.

इ० स० १५९४ ते १६०० प०

बहादूर गादीवर बसतो, व महंमदखान दिवाण होतो.—— चांदसुलताना इब्राहीम आदिलशाहास बोलाविते.—— दिल्लीच्या बादशाहाशीं तह. —— मोंगलांवर जाण्याची तयारी.—— मोंगलांशीं मोठी लढाई.—— दक्षणी फौजेचा पराभव.—— अब्बूल फजलास अकबर दक्षणेंत पाठवितो.—— अहंमदनगरास कलह.——बिडावर हल्ला व मोंगलांचा पराभव.—— अकबर खानखनानास दक्षणेंत पाठवितो.—— अकबर स्वतः दक्षणेंत येतो.—— नेहंगखान पळून जातो. —— सुलतानास ठार मारितात.—— मोंगल नगर घेतात व आपला अंमल बसवितात.—— मूर्तिजास गादीवर बसवितात.

---

बहादूर गादीवर बसतो व महंमदखान दिवाण होतो.

चावंद किल्ल्यांतून बहादूरशाहास आणिल्यावर चांदसुलतानानें अहंमदनगर येथें त्यास मोठ्या समारंभानें राज्याभिषेक करवून आपला मित्र व मंत्री महंमदखान ह्यास पेशवा नेमिलें. तो थोड्याच दिवसांत आपले आप्त व स्नेही यांस दरबारांतील मोठमोठ्या जागा देऊं लागला. ज्यांनीं गेल्या लढाईंत तलवार गाजविली होती, त्यांस साहजीकच बढतीची आशा होती. आणि ते उगीच बसणार नाहींत हें जाणून नेहंगखान व समशेरखान या हबशी सरदारांस पकडून त्यानें कैदेंत ठेविलें. यामुळें इ-

तर सरदार भीतीनें राज्यांतून पळाले.

दिल्लीची फौज वऱ्हाडांतच होती. दिवसानु दिवस महंमदखानाचें प्रस्थ अधिकाधिकच वाढत चाललें. तेव्हां चांदसुलतानास भय पडलें कीं आपलें तेज फिक्कें पडणार! म्हणून तिनें इब्राहीम आदिलशाहास पत्र लिहिलें कीं, "आपण मध्यें पडून राज्यांत बंदोबस्त करण्यासाठीं बरीच फौज पाठवावी." त्याप्रमाणें त्यानें सर्व गोष्टी करण्याविषयीं हुकूम देऊन सोहलखानास लष्करासहीत पाठविलें. परंतु महंमदखानानें त्याचा किल्ल्यांत प्रवेशच होऊं दिला नाहीं. यामुळें त्यानें नगरास कडेकोट वेढा दिला. चार महिने झाले तरी महंमदखानास वेढा उठवितां आला नाहीं. त्यानें मोगलांचा सेनापति खानखनान वऱ्हाडांत होता. त्यास शेवटीं कुमकेस बोलाविलें. आणि दिल्लीच्या पादशाहाच्या अमलांतील मुलखाप्रमाणें अहंमदनगर समजलें जाईल. असें कबूल केलें. जेव्हां किल्ल्यांतील लोकांस हें महंमदखानाचें अविचारी व वेडेपणाचें कृत्य समजलें, तेव्हां त्यांनीं त्यास पकडून सुलतानाच्या स्वाधीन केलें. या कारणानें चांदसुलतानाची सत्ता पूर्ववत् चालूं लागली. तिनें नेहंगखान हबशीस बंदमुक्त करून पेशवा नेमिलें व सोहलखानास पोषाक आणि बक्षिसें देऊन विजापुरास जाण्यास निरोप दिला. तो जात असतां मार्गींत त्यास खबर लागली कीं, वऱ्हाडच घेऊन मोंगल स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं पाथ्री वगैरे शहरें लुटून फस्त केलीं आहेत. तेव्हां तेथेंच मुक्काम करून त्यानें इब्राहीम आदिलशाहास त्याविषयीं लिहिलें. इतक्यांत चांदसुलतानासही हें कृत्य समजल्यावरून तिनें विजापूर व गोवळकोंडें येथील शाहांकडे अहंमदनगरास कुमक करण्याबद्दल लिहिलें. आदिलशाहानें मोंगलांवर स्वारी करण्याविषयीं सोहलखानास कळविलें, व गोवळकोंड्याहून महंमद कुली सुलतानही त्यास येऊन मिळाला, आणि नगराहूनही वीस हजार फौज आली. ह्या एकंदर साठ हजार सैन्यानें वऱ्हाडाकडे चाल करून सोनपत शहरीं तळ दिला.

सुलतानें इब्राहिमास बोलाविलें.

दिल्लीच्या पादशाहाशीं तह.

मोंगलांवर जाण्याची तयारी.

ह्या समयीं शाहाजादा मुराद शाहापूर शहरीं असून मोंगलांचा सेनापति खानखनान जालन्यास होता. त्यानें आपली अवघी फौज

एकत्र केली आणि आतां पुढें कसा विचार करावयाचा ह्याचा निश्चय ठरविण्यासाठीं तो मुरादाकडे आला. तेथून खानदेशचा राजा अल्लीखान, जागा जगन्नाथ व दुसरे नामांकित सरदार घेऊन जालन्यास येऊन सर्व फौजेनिशी दक्षणच्या रोखानें निघाला. व गोदातीरीं पोहोंचल्यावर एक बळकट जागा पाहून त्यासभोंवती खंदक खणून त्यानें तळ दिला. पंधरा दिवसपर्यंत म्हणण्यासारखी मोठी लढाई झाली नाहीं परंतु उभयतांकडील स्वारांच्या तुरळक झटपटी मात्र चालल्या होत्या. आपणास दक्षणी शिपायांचें शौर्य व हिम्मत समजावी म्हणून मुद्दाम मोगलांनीं घाई केली नव्हती. परंतु पंधरावे दिवशीं म्हणजे सन १५९७ सालीं जानूआरी महिन्याच्या २६ व्या तारखेस मोगलांनीं हल्ला करण्याची तयारी केली.

मोगलांशी मोठी लढाई इसवी सन १५९७

ते सकाळीं प्रहर दिवसाच्या सुमारास दक्षणी फौजेवर चालून आले. संध्याकाळच्या प्रहर दिवसापर्यंत सरासरी चकमक उडाली व दोन्ही सैन्यें एकमेकांस येऊन भिडलीं. तेव्हां हातघाईसच प्रारंभ झाला. विजापूरच्या गोलंदाजांनीं खानदेशचा राजा अल्लीखान व राजा जगन्नाथ ह्यांस मारिलें. मोगलांच्या स्वारांचा कडक तडाका निजामशाही व कुतुबशाही सैन्यास असह्य होऊन ते अस्तमानाच्या सुमारास मागें हटले. तरी सोहलखान आपल्या जाग्यावर जशाचा तसा राहून खूब धिरानें एकसारखा लढत होता. शेवटीं आदिलशाही स्वारांनीं मोगलांत घुसून त्यांस शाहापुरापर्यंत मागें हटविलें. हें कृत्य अवलोकन करून शाहाजादा मुराद तळ सोडून जाणार होता इतक्यांत त्यास बातमी लागली कीं, खानखनानानें आपलें ठिकाण सोडिलें नसून शत्रूंस दाद दिली नाहीं. दक्षणी लोकांनीं आपणास जय मिळाला असें समजून वेडेपणानें रात्रींच लुटालुटीस प्रारंभ केला. सोहलखानानें हरतऱ्हा केल्या तरी त्यास ते लोक आवरेनात. असो ते लोक लुटालूट करून घेऊन आपापल्या राजधान्यांकडे निघाले. अंधार पडल्यामुळें जरी सोहलखान व खानखनान एकमेकांपासून गोळीच्या टप्प्या इतक्या अंतरावर होते तरी त्यांस कित्येक तासपर्यंत समजलेंच नाहीं. शेवटीं जेव्हां उभयतांस ही स्थिति समजली तेव्हां त्यांनीं आपली अस्ताव्यस्त झालेली फौज जमा करून उजाडतांच पाहिलें तों दोघेही एकमेकांवर ह-

ल्ला करण्यास आपापल्या ठिकाणीं सज्ज आहेत. खानखनानानें त्यां-चें बोलणें लाविलें. परंतु सोहलखानानें तें मुळींच न ऐकतां मोगलां-वर तोफा सुरू केल्या. यावेळीं पूर्वीपेक्षां मोठ्या कडाक्यानें लढाई झा-ली. त्यांत सोहलखानानें शिकस्त केली; तरी शेवटीं पराभव पावून थोड्या लोकांसह त्यास शाहादुर्गास प-ळून जावें लागलें. निजामशाही व कुतुबशाही फौजा रणांगणांतून प-ळाल्याच होत्या. त्याही नगर व हैदराबादेस गेल्या. आणि खानख-नान विजयी होऊन जालन्यास जाऊन त्यानें नरनाला व गावल हे दोन किल्ले सर करण्यास सैन्य पाठविलें.

दक्षणी फौ-जेचा पराभव.

शाहाजादा मुराद ह्याचें असें मत होतें कीं, आपली फौज एक-दम नगरास पाठवून त्या किल्ल्यास वेढा द्यावा. खा-नखनान म्हणे कीं अद्याप वऱ्हाडांतील बरेच बळक-ट किल्ले हातीं यावयाचे आहेत. याकरितां निजामशा-ही मांतावर पुढील सालपर्यंत स्वारी करूनये. ह्या म्हणण्यानें मुरादास फार राग आला, व त्यानें त्याजविषयीं अकबरपादशाहाकडे लिहिलें. आणि आपलें म्हणणें खरें वाटण्यासाठीं शाहापूर छावणींतील कित्ये-क सरदारांकडून त्यांच मजकुराचीं पत्रें पाठविलीं. तीं पाहून अक-बरानें खानखनानास परत बोलावून त्याच्या जागीं आपला प्रियदि-वाण अबुलफज़ल यास दक्षणेंत पाठविलें.

अकबर अबु-लफजलास दक्ष-णेंत पाठवितो.

बाहेर असा प्रकार चालला आहे तों नेहंगखानाचें अहंमदन-गरास फारच मस्थ माजत चाललें. तो हवा तसा बेफिकीर वागूं लाग-ला, व वाहील तें करूं लागला. चांदसुलतानास ध-रून कैद करावें, बालराजास आपलासा करून घ्यावा. आणि सारा कारभार आपल्या हातांत ठेवावा, अशी त्यानें मसलत चालविली. त्या-ची गुणगुण सुलतानास समजतांच तिनें किल्ल्याचे दरवाजे बंद कर-विले; व त्याचा बालराजाकडे प्रवेशच होऊनये अशी तजवीन करून सरकारी कामकाज शहरांत राहूनच करण्याविषयीं त्यास हुकूम दिला. नेहंगखानानें कांहीं दिवस कुरकूर न करितां तसें केलें. तरी लौकर-च त्याचें खरें स्वरूप उघडकीस येऊन त्यानें एकदम किल्ल्यावर हल्ला केला. किल्ल्यांतील व बाहेरील लोकांच्या सामान्य झटपटी उडाल्या.

नगरास कलह.

आणि इब्राहीम आदिलशाहानें दोघांचीही समजूत घालून भांडण तोडितों असें उभयतांसही सांगितलें; तरी दोघेंही ऐकेनात. सुलताना म्हणे खान मला शरण येऊन माझ्या स्वाधीन झाल्याविना मी ऐकणार नाहीं. खानाचें म्हणणेंही तसेंच होतें. असो नेहंगखानानें शहरांत राहून बरीच जमवाजमव केली होती. खानखनान गेला व आतां बरसातींत गोदावरीस अपरांपर पूर येऊन पलीकडून लष्कर आणण्यास उतार नाहीं अशी संधि पाहून नेहंगखानानें बिडावर चालकेली. त्यास प्रतिबंध करण्याकरितां तेथील मोंगलांचा सुभेदार शीरख्वाजा हा बारा मैल आलिकडे आला. परंतु दोघांच्या झालेल्या लढाईंत त्यास जखम लागून त्याचा पराभव झाला. व तो मोठ्या प्रयासानें बिडास येऊन पोहोंचला. त्याच्या मागोमागच निजामशाही फौज येऊन तिनें बिडास वेढा घातला. तेव्हां शीरख्वाजानें पादशाहास लिहिलें कीं, " आपणास मदत आली नाहीं यामुळें मोठा कठीण प्रसंग गुजरला आहे." हें पत्र पाहतांच अकबरानें अब्बुलफजलास परत बोलावून खानखनानास दक्षणेंत पाठविण्याचा ठराव केला होता. इतक्यांत शाहाजादा मुराद शाहापूर येथें मरण पावल्याची खबर आली! यामुळें अकबरानें आपला कनिष्ट पुत्र शाहाजादा डानिअल मिरझा यास खानखनानास बरोबर देऊन दक्षणेंत पाठविलें. ते सरहद्दीवर येऊन पोह्रेंचतात तोंच अब्बुलफजल ह्याच्या आग्रहास्तव स्वतः अकबर सन १५९९त दक्षणेंत येण्यास निघाला. तो जेव्हां ब्र्हाणपुरास आला, तेव्हां त्यानें दक्षणेंतील खरी स्थिति प्रथम समजून घेतली. चांद सुलताना व नेहंगखान यांचे कलह अद्याप न मिटतां निजामशाही राज्यांत बखेडे चालू आहेत, असें त्यास कळल्यावर त्यानें स्वतः अशीरगडास वेढा घातला; व शाहाजादा डानिअल आणि खानखनान यांस अहंमदनगरावर पाठविलें. तेव्हां नेहंगखान बीडचा वेढा उठवून पंधरा हजार स्वारांनिशी मोंगलांस अडविण्यासाठीं जयपूर कोतलीच्या घांटांत गेला. हे वर्तमान मोंगलांस त्यांच्या हेरांकडून कळतांच ते ती वाट सोडून मणुरीच्या गांवावरून फेरा घेऊन नगरास गेले. आपली हिकमत फसली असें पाहून नेहंगखानानें आपलें सर्व सामान सुमान जाळिलें आ-

बिडावर हल्ला व मोंगलांचा पराभव.

खानखनानास अकबर पुनः दक्षणेंत पाठवितो.

अकबर स्वतः दक्षणेंत येतो इ॰ सन १५९९.

णि नगरची वाट धरिली. तेथें राणीशीं सल्ला करण्याची खटपट करून जेव्हां ती कांहींच ऐकेना तेव्हां तो जुन्नरास पळाला. असो मोगलांची फौज बिन हरकत नगरास येऊन तिनें किल्ल्यास वेढा देऊन सुरुंग पाडण्याचा उद्योग आरंभिला. ह्या प्रसंगीं किल्यांतील लोकांपैकीं कोणावरच चांदबिबीचा असावा तसा विश्वास नव्हता. तरी तिनें हमीदखान खोजा या नांवच्या एका अधिकाऱ्यास आतां करें करावें? म्हणून मसलत विचारिली. तो म्हणाला 'लढाई करून किल्याचा बचाव करावा' कित्येक वर्षांच्या अनुभवावरून मला असें वाटतें कीं; तूर्त कोणावरच आपणास विश्वास ठेवितां येत नाहीं. करितां किल्ला मोगलांच्या हवालीं करून बालराजासह जुन्नरास जावें हें मला बरें वाटतें. असें सुलताना म्हणतांच हमीदखान फार संतापला व ती किल्ला स्वाधीन करण्याविषयीं मोगलांस आंतून सामील झाली आहे, असें रस्त्यांतून ओरडत फिरूं लागला. शेवटीं कित्येक अल्पदृष्टि व कृतघ्न दक्षणी लोकांस घेऊन तो सुलतानाच्या महालांत शिरला. आणि तिला त्यानें तेथेंच ठार केलें! फार थोड्या अवकाशांत मोगलांनीं बरींच भुयारें पुरीं करून व सुरुंग उडवून किल्यास पुष्कळ खिंडारें पाडिलीं आणि आंत शिरून तो सर केला. बहादूरशाहा व दुसरीं निजामशाही घराण्याचीं बायका पुरुषें व मुलें कैद केलीं आणि बालराजास निजामशाही छत्रचामरादि राजचिन्हें, जडजवाहीरसहीत अकबर पादशाहाकडे पाठविलें. तेव्हां खानदेश व दक्षण हे दोन्ही प्रांत शाहाजादा डानिअल याच्या हवालीं करून अकबर आग्र्यास गेला आणि बाहादूरशाहास ग्वाल्हेरच्या किल्यावर ठेविलें. इकडे निजामशाही सरदारांनीं शाहा अल्लीचा पुत्र मूर्तिजा ह्यास अहमदनगरच्या निजामशाही गादीवर बसवून परिंड्यास निजामशाही राज्याची राजधानी केली.

नेहंगखान पळून जातो.

सुलतानास ठार मारितात.

मोगल नगर घेतात व आपला अम्मल बसवितात.

मूर्तिजास निजामशाही गादीवर बसवितात. इसवी सन १६००

# मूर्तिजा निजामशाहा (दुसरा) व हुस्सेन निजामशाहा वगैरे.

## मलिकंबर व शाहाजी.

इ. स. १६०० ते १६३७ पर्यंत.

मलिकंबर व मिआन राजू.—— त्यांच्या ताब्यांतील मांत.—— मलिकंबराची मोगलाशीं लढाई.—— मलिकंबराचा पराभव व मोगलांशीं तह.—— आवशा किल्यावर हल्ला.—— विजापुरच्या शाहाजादीशीं डानिअलचें लग्न.—— राजू मलिकंबरावर हल्ला करितो.—— मोगलांच्या मदतीनें राजूचा पराभव.——मूर्तिजा व मलिकंबर यांची एकी.—— जुन्नरांवर स्वारी.—— जुन्नर घेऊन तेथें निजामशाही गादी स्थापितात.—— मलिकंबराची मूळ हकीकत.—— याच्या कारकीर्दींत मराठ्यांची सरशी — अहेमद नगरासह सर्व निजामशाही मांत मलिकंबर घेतो.—— त्याची सुधारणा.— मलिकंबरावर मोगलांची स्वारी.— अबदुल्लाखानाचा पाठलाग— शाहाजहान दक्षणेंत येतो.—— मलिकंबर त्यास शरण जातो व पूर्वीं घेतलेला मांत सोडतो.—— मलिकंबर पुनः मांत घेतो.—— शाहाजहान पुनः येऊन त्याचा पराभव करितो.— मोगलांशीं पुनः तह —— मलिकंबराचा मृत्यू.—— त्याचा पुत्र फत्तेखान कारभार पहातो.—— फत्तेखानास कैद करून मूर्तिजा स्वतः कारभार पहातो.—— लोदीस आश्रय देतो, व मोगलांची फौज पुनः चालून येते.— दक्षणेंत मोठा दुष्काळ.— फत्तेखान मुक्त होऊन दिवाण होतो.—— तो मूर्तिजास मतिबंधांत ठेवितो.—— मूर्तिजास ठार मारून हुस्सेनास गादीवर बसवितो.— शाहाजी नगर सोडून विजापुरास जातो.— दौलताबाद घेण्यास मोहबतखान येतो.— मोहबतखान किल्ला घेतो, व राज्य खालसा करितो.— फत्तेखानाची पुढील हकीकत.—— शाहाजी निजामशाही मुलूख हस्तगत करून एका मुलास निजामशाही गादीवर बसवितो.—— शहाजहान दक्षणेंत स्वतः येतो.— तो शाहाजीवर फौज पाठवितो.— शाहाजी त्याचें कांहीं चा-

लू देत नाहीं.— आदिलशाहाशीं तह.— शहाजी शाहाजहानास शरण येतो, व विजापुरीं नौकरी धरितो.— निजामशाही राज्याचा शेवट.

---

मलिकंबर व मिआन राजू.

**अकबर** पादशाहा दक्षणेंतून परत स्वदेशीं गेल्यावर दक्षणेंत आपल्या साहसानें व शहाणपणानें दोन पुरुष प्रसिद्धीस आले. एक **मलिकंबर** व दुसरा **मिआन राजू** दक्षणी. मोंगलांचें सैन्य जरी जिकडे तिकडे पसरलें होतें, तरी या उभयतांनीं सुमारें दहा बारा वर्षेंपर्यंत बहुतेक निजामशाही प्रांत आपल्या ताब्यांत ठेविला. कुतुबशाही आणि आदिलशाही सरहद्दीपासून म्हणजे उत्तरेस बीडपासून एक कोस व अहंमदनगरापासून चार कोस पर्यंत आणि दौलताबादेपासून आठकोसांच्या पुढें तें चौल बंदर आठ कोस राहीपर्यंत मधील सर्व मुलूख **मलिकंबराकडे** होता. दौलताबादेपासून उत्तरेस गुजराथ सरहद्दीपर्यंत आणि दक्षणेस अहंमदनगरापासून सहा कोसपर्यंत मुलूख मिआनराजूकडे होता. हे दोघेही बाह्यात्कारें दुसरा **मूर्तिजा** निजामशाहा याचे तावेदार व नौकर असें म्हणवीत असत. प्रथमतः त्यांणीं शाहास राहण्यास आवशाचा किल्ला दिला व त्याच्या खर्चासाठीं सभोंवतालच्या कांहीं खेड्यांचा वसूल लावून दिला. परंतु पुढें उभयतां एकमेकांचा हेवा करूं लागले व त्यांत वारंवार कलह माजूं लागला. त्यावेळीं अहंमदनगरास **खानखनान** हाच मोंगलांकडील सरदार असे. त्यास त्यांचा बेबनाव समजतांच तेलंगणच्या सरहद्दीवरील एक लहानसा प्रांत घेण्यासाठीं त्यानें वऱ्हाडांतून फौज पाठविली. त्यासरसा सात आठ हजार स्वार घेऊन **मलिकंबर** तिकडे गेला व त्यानें मोंगलांचा पराभव करून त्यांस हांकून काढिलें. तेव्हां **खानखनानानें** हा अपयशाचा कलंक काढून टाकण्याकरितां आपला मुलगा **मिरझा एरीच** ह्यास पांच हजार स्वारांनिशीं त्यांवर हल्ला करण्यास नेमिलें. **मलिकंबरास मिरझानें** नांदेड शहरापाशीं गांठिलें. तेथें उभय पक्षांची मोठी दारुण लढाई होऊन दोहोंकडील पुष्कळ मनुष्यें जायां झालीं, आणि दक्षणी लोकांचा पराभव होऊन **मलिकंबर** जखमी झाला. तेव्हां तो शत्रूच्या हातीं सांपडावयाचाच, परंतु त्याच्या इमानी लोकांनीं आ-

यांच्या ताब्यांतील प्रांत.

मलिकंबराची मोंगलांशी लढाई.

मलिकंबराचा पराभव.

पल्या प्राणहानीची पर्वा न करितां त्यास शत्रूंच्या हातीं लागूं दिलें नाहीं. त्याच्या जखमा वगैरे बऱ्या झाल्यावर, तो पुनः सैन्य जमवूं लागला. मलिकंबराच्या शहाणपणाची, साहसाची व त्यावर लोकांचें प्रेम असल्याची प्रचिति खानखनानास आलीच होती. यामुळें त्यास वाटलें कीं, जर याकडे पुष्कळ सैन्य जमलें, तर हा खचित मोंगलास खालीं पहावयास लावील. म्हणून त्यानें त्याशीं तहाचें बोलणें लाविलें. मलिकंबरास मिआनराजूच्या द्वेषाचें भय होतेंच. एतदर्थ त्यानें तें मान्य केलें. तशांत त्याचा आणखी असाही समज होता कीं, खानखनानास बहुधा राजूनेंच मजवर हल्ला करण्यास चेतविलें असावें. असो. निजामशाही व मोंगली प्रांताच्या सरहद्दी ठरून दोघांतही तह होऊन मलिकंबर व खानखनान या उभयतांत मित्रत्व जडलें.

मोंगलांशीं तह.

त्यास सुमारास **व्यंकटराव कोळी, फरहादखान मौलीद मलिक संदल खोजा** आणि दुसरे कांहीं कामगार **मलिकंबरास** सोडून आवशास **मूर्तिजा** निजामशहास जाऊन मिळाले. तेथें त्यांनीं फौज जमा करतांच **मलिकंबर** त्यांवर चालून गेला. त्यांत त्यांचा पराभव होऊन त्यांची जमलेली जूट फुटून गेली; **व्यंकटराव** कैदी झाला; बाकीचे कांही लोक पळाले; कांहीं किल्याचे दरवाजे बंद करून शहासह आंत राहिले. परंतु ते दुसऱ्याच दिवशीं कौलास आले, व शहाही **मलिकंबराच्या** स्वाधीन झाला. त्याच्या मनांत फार दिवसांपासून परिंडा किल्ला घेण्याचें होतें. याकरितां तो शहास घेऊन आवशाहून तिकडे गेला. परिंड्याचा किल्लेदार **मितनखान हबशी** ह्यानें शहास असा निरोप पाठविला कीं, तुम्हांस किल्यांत घेण्यास माझी मुळींच हरकत नाहीं, परंतु **मलिकंबरानें** मोंगलांशीं तह केल्यामुळें तो तत्पक्षीय झाला आहे. म्हणून त्याचा पाय मी किल्यास कधींही लागूं देणार नाहीं. त्याच्या उत्तरांत **मलिकंबरानें** सांगून पाठविलें कीं, "आपणावर जो नुकताच विकट प्रसंग आला होता; त्याच्या निवारणार्थ मला कांहीं काळ **खानखनाना**शीं स्नेह करणें भाग पडलें. परंतु मी निजामशाही घराण्याचा इमानी नौकर असून जिवांत जीव असेपर्यंत त्याची नौकरी बजाविण्यांत कधींही अंतर करणार नाहीं." **मलिकंबराच्या** इतक्या खटपटीनें व सांगण्यानें किल्लेदाराच्या कांहींच मनांत भरेना.

परिंडा किल्यावर हल्ला.

व तो त्यांचें ऐकेना. तेव्हां शाहानें मितनखानास जाऊन मिळूनये, म्हणून मलिकंबरानें त्यास घरेंच अटकेंत ठेविलें. शाहास कैदेंत ठेविल्याचें वर्तमान फरहादखान व मलिकसुंदल यांस समजतांच ते परिंड्यास कुमकेस गेले. मलिकंबरानें किल्यास वेढा घातला, व आंतील लोकांनीं एक महिना टिकाव धरिला. यामुळें मलिकंबराचा चालावा तसा कढाव चालेना. इतक्यांत मितनखानाच्या मुलानें लोकांवर कांहीं जुलूस केला, यामुळें ते बिघडून त्यांनीं त्यास ठार मारिलें, व मितनखानावरही ते उठले होते. या कारणानें त्यास फरहादखान व मलिकसुंदल यांसहीत किल्यांतून पळून जाणें भाग पडलें. ते विजापुरास गेले आणि आदिलशाही दरबारीं चाकरीस राहिले. तेव्हां आंतील लोक थोडेच दिवस मलिकंबराशीं लढले. परंतु मितनखान गेल्यावर मलिकंबरानें शाहास अगदीं मोकळीक दिली. तेव्हां शाहास किल्यांतील लोकांनीं आंत घेतलें; व मलिकंबर छावणी देऊन बाहेरच राहिला.

इब्राहीम आदिलशाहाच्या मुलीशीं लग्न करून घेण्याकरितां शाहाजादा डानिअल बऱ्हाणपुराहून दौलताबाद व नाशीक या शहरांवरून अहंमदनगराकडे येण्यास निघाला होता. तेव्हां मलिकंबराप्रमाणें मिआनराजूही आपलें सार्वभौमत्व कबूल करून आपणास सामोरा येऊन भेटेल, असें शाहाजाद्यास वाटलें होतें. परंतु तो आला नाहीं. म्हणून त्यास बोलावणें पाठविलें. तरीही तो दाद देईना! जरी डानिअलाबरोबर लढण्याचें त्याच्या आंगीं सामर्थ्य नव्हतें, तरी राजू आठ हजार स्वार घेऊन त्यास जिकडून तिकडून इतका उपद्रव पोहोंचवीत सुटला कीं, डानिअलास जालन्याहून खानखनानास बोलावणें भाग पडलें. तो तिकडून मोठी मजल करून एकटाच एका दिवसांत पांच हजार स्वार घेऊन आला. तेव्हां मुकाट्यानें राजू तो मुलूख टाकून मागें हटला. अहंमदनगराहून नवरीस घेऊन गोदातीरीं पैठणशहरीं शाहाजादा परत आला, आणि तेथें लग्नसमारंभ झाला. नंतर तो बऱ्हाणपुरास गेला, व खानखनान जालन्यास आला.

डानिअलचें विजापुरच्या शाहाजादीशीं लग्न.

आपल्यास मलिकंबर नीटपणानें वागवीत नाहीं अशाबद्दल मूर्तिजानिजामशाहानें मिआनराजूकडे कागाळ्या करतांच तो लागलाच परिंड्यास जाऊन शाहास भेटला. शाहानें मलिकंबराची खोड मोडून टाकण्याचा उद्योग करण्याचें वचन दिलें. तेव्हां राजू-

राजू मलिकंबरावर हल्ला करितो.

नें मलिकंबरावर हल्ला करून त्यास बरेंच जेरीस आणिलें, आणि मलिकंबरानें खानखनानास कुमक पाठविण्याविषयीं पत्रें लिहिलीं.

बीडचा सुभेदार हुस्सेन अलीबेग त्यास तीन हजार स्वार घेऊन मलिकंबराच्या मदतीस जाण्याबद्दल खानखनानानें हुकूम पाठविला. तो येतांच मलिकंबरानें राजूवर चाल करून त्याचा पराभव केला. तेव्हां तो दौलताबादेस पळाला.

मोंगलांच्या मदतीनें राजूचा पराभव.

याच सुमारास शाहाजादा डानिअल मरण पावून त्याच्या जागीं बऱ्हाणपुराहून जालन्यास खानखनान गेला. तेव्हां मलिकंबरास आपली सत्ता वाढविण्यास फुकटचीच सवड सांपडली. त्यानें फौज जमवून दौलताबादेस मिआन राजूवर कूच केलें, व तेथेंही त्याचा पराभव केला. शेवटीं खानखनानास आपल्या मदतीकरितां येण्याविषयीं राजूनें अर्ज करितांच तो आला, आणि त्यानें त्या उभयतांस सहा महिनेपर्यंत गप्प बसण्यास लाविलें. खानखनान आपल्या प्रतिपक्ष्यास अनुकूल आहे, असें पाहून मलिकंबरानें तह कबूल केला, आणि तो परिंड्यास आला. व खानखनान जालन्यास गेला. मूर्तिजा निजामशाहा हा मोठा खटपटी असून वारंवार उपद्रव देत असतो. असें मनांत आणून त्यास पदभ्रष्ट करून दुसरा कोणी तरी एखादा बाहुल्यासारखा राजा गादीवर बसवावा असा मलिकंबरानें विचार केला. याजबद्दल त्यानें इब्राहीम आदिलशाहासही सल्ला मसलत विचारिली. परंतु त्यानें ती गोष्ट अगदींच नापसंत केल्याकारणानें मलिकंबरानें तो नाद सोडून निजामशाहास अधिकच मान देऊं लागला. निजामशाहास स्वातंत्र्य व सुख प्राप्त होतांच उभयतांचींही मनें मोकळीं झालीं. सन १६०७ सालीं मूर्तिजानें दहा हजार स्वारांनिशीं मलिकंबरास घेऊन परांड्याहून जुन्नरावर स्वारी करून तो किल्ला हस्तगत केला, आणि तेथें निजामशाही गादी नेली. नंतर तेथून मिआनराजूवरही फौज पाठविण्यांत आली. तिनें त्याचा पराभव करून त्यास कैदी केलें. तेव्हां त्याच्या ताब्यांतील भाग मुलूख निजामशाही घराण्याकडे आला.

मूर्तिजा व मलिकंबर यांची एकी.

जुन्नरावर स्वारी.

जुन्नर घेऊन तेथें निजामशाही गादीची स्थापना.

फेरिस्तानें निजामशाही घराण्याचा येथवरच इतिहास लिहिला आहे. आणि पुढील वृत्तांत मोंगलांच्या व मुसलमानांच्या इतिहासांतून घेतला आहे. कारण निजामशाही घराण्याचा पुढील इतिहास कोणी मुसलमान इतिहासका-

रानें लिहिलेला निदान अद्याप आढळांत आला नाहीं. फेरिस्तानें निजामशाही घराण्याचें वृत्त संपवितांना त्यावेळच्या स्थितीविषयीं इतकेंच लिहिलें आहे कीं "मलिकंबराचें वजन व वर्चस्व दिवसेंदिवस वाढत आहे. शाहा अलीचा पुत्र मूर्तिजा निजामशाही घराण्याच्या गादीवर आहे. सर्व राज्यकारभार मलिकंबर मोठ्या हुषारीनें व दक्षतेनें चालवीत आहे. तरी तें राज्य लौकरच लयास जाण्याचीं चिन्हें दिसत आहेत; कारण दिल्लीचा पादशाहा तें काबीज करून आपल्या प्रचंड राज्यांत खालसा करण्यास चांगली संधि केव्हां मिळते हें पाहण्यात टपत बसला असून पुढें काय होईल तें ईश्वर जाणे."*

मलिकंबराचें मूळ वृत्त.

मलिकंबर हा जातीचा हबशी असून पहिल्या मूर्तिजा निजामशाहाचा इमानी दिवाण जो चंगीजखान त्याच्या दिमतीस नोकर असे, व त्याच्याच हाताखालीं तो राज्यकारभाराच्या वगैरे कामांत तरबेज झाला होता. अद्यापि अहमदनगर मोंगलांच्या ताब्यांत होतें. म्हणून दौलताबादेपासून सहा मैलांवर खडकी शहर वसवून तेथें मोठमोठे वाडे व हवेल्या उठवून तें त्यानें निजामशाही राज्याची राजधानी केली. मलिकंबर येथेंच राहून सर्व राज्याचा कारभार पहात असे. याच शहरास पुढें औरंगजेब पादशाहानें औरंगाबाद असें नांव दिलें. मलिकंबरानें आपल्या पदरीं पुष्कळ मराठे सरदार ठेविले होते.

याच्या कारकीर्दींत मराठ्यांची सरशी.

निजामशाहींत जाधवराव+ सिंधखेडचे देशमूख व मालोजी भोसले हे सरदार पूर्वीपासून होतेच. अहमदनगर व विजापूर ह्या दोन दरबारीं मराठे लोक लढण्याच्या कामीं तरबेज होऊन पुढें चांगल्या उदयास आले. अकबर पादशाहा जाहांगीरच्या बंडाकरितां उत्तरहिंदुस्थानांत गेल्यावर लौकरच मृत्यु पावला, आणि जाहांगीर गादीवर बसला. तेव्हां त्याचा वडील मुलगा खुसरू ह्यानें बंड उभारिलें. त्याप्रमाणें दिल्लीस

---

+याविषयीं बरीच माहिती आमच्या विजापूरच्या इतिहासांत आलीच आहे.

* निजामशाही राज्य आणखी कोणत्या कारणांनीं लयास गेलें, त्याविषयींची बरीच माहिती "विजापूरच्या आदिलशाही घराण्याचा इतिहास" नामक पुस्तकांत दिली असून ती पाहण्याबद्दल आम्ही वाचकांस शिफारस करितों. सदरहू माहिती 'बुसातिने सलातीन' या ग्रंथावरून घेतली आहे.

घालमेली चालल्याच होत्या. ही संधि मलिकंबरानें फुकट जाऊं दिली नाहीं. त्यानें लगेच फौज जमा केली, व निजामशाही प्रांत परत घेतला. मोंगलांचा सुभेदार खानखनान त्याच्या सहाय्यानें आपला प्रतिस्पर्धि मिआनराजू त्या-

सर्व निजामशाही प्रांत मगराम्हां मलिकंबर घेतो.

चा त्यानें पराभव केल्यावर खानखनान व त्याचे सरदार ह्यांमध्यें वेबनाव येऊन तंटे उद्भवल्याची संधि पाहून त्यानें मोंगलावरही हल्ला केला. आणि त्यांचा पराभव करून अहमदनगर परत घेतलें, व खानखनानाची पिछेहट करून त्यास बऱ्हाणपुरास घालविलें. तेव्हां दिल्लीपतीनें खानखनानाच्या जागीं खानजहान लोदीची स्थापना केली. असो. या प्रमाणें मोंगलास मलिकंबरानें निजामशाही प्रांतांतून घालविल्यावर तो लोकांस सुखी व आबाद करून राज्यव्यवस्था करण्याच्या कामास लागला. त्यांत त्यास इतकें सर्वोत्कृष्ट यश आलें कीं, त्या-

त्याची राज्यांत सुधारणा.

चें नांव व कीर्ति अद्याप दक्षणेंतील लोकांच्या तोंडीं गाजत आहे। जशी तोडरमल्लाची उत्तरहिंदुस्थानांत ख्याति आहे, तशी मलिकंबराच्या नवीन जमाबंदीची दक्षणेंत सर्वत्र प्रसिद्धि आहे. मक्त्यानें शेतें देण्याची चाल त्यानें अगदीं बंद केली. मुसलमान अंमलदारांच्या देखरेखीखालीं ब्राम्हण कारकुनांस वसुलाचें काम दिलें. सर्व शेतांचीपाहाणी व मोजणी केली. नंतर शेतांतील कांहीं वर्षे पीक कापून त्यांवरून उत्पन्नाची सरासरी बसविली, आणि कित्येक वर्षांच्या दरांच्या सरासरी करून प्रत्येक शेताचें नक्त देणें ठरविलें. तें सुद्धां जमिनीनें जें पीक केलें असेल, त्यामानानें बदलण्याची शिरस्त ठेविली. कित्येक वर्षांचे कौल देऊन कित्येक पडित जमिनीही त्यानें लागवडीस आणिल्या. त्या कारणानें व सरकारी देणें कायम ठरविल्यामुळें, कामदार लोक लबाडी करून रयतेस जें नागवीत तें बंद झालें, आणि रयत फार सुखी झाली. जरी त्याचा खर्च फार असे तरी वसूल नियमित वेळीं विनतक्रार येत असल्यामुळें त्याची फारशी फिकीर नसे.

दिल्लीस ज्या लटपटी चालल्या होत्या, त्या काळांत मलिकंबरानें आपल्या मुलखाची अशी उत्कृष्ट व्यवस्था केली कीं; राज्यांत जिकडे तिकडे शानदार स्वस्थता होऊन तो स्वतः मोंगलांच्या प्रांतावर स्वारी करण्यास सामर्थ्यवान व उद्युक्त झाला होता. परंतु इतक्यांत दिल्लीस स्थिरस्थावरता होऊन दक्षणेंत एकदम चोंहींकडून हल्ले करून मलिकंबरास जे-

**मलिकंबरावर मोगलांची स्वारी.**

गीस आणावें असा जाहांगीरशाहानें बेत केला. त्यांत गुजराथचा सुभेदार **अबदुल्लाखान** त्यानें आपल्या प्रांतांतून **मलिकंबराच्या** मुलखावर स्वारी करावी, व त्याच वेळीं शाहाजादा पर्वीज आणि **खानजहान लोदी** यांनीं राजा मानसिंग याची कुमक घेऊन खानदेश व वऱ्हाड प्रांतांतून चालू करावी, असा त्यांचा निश्चय झाला परंतु त्याप्रमाणें वर्तणूक न झाल्यामुळें सर्व बेत फुकट गेला. त्या स्वारीचें **एलफिन्स्टन**-कृत इतिहासांत असें वर्णन केलें आहे. "**अबदुल्लाखान** नेमलेल्या वेळापूर्वींच गुजराथेंतून आला. ही त्याची चूक पाहून **मलिकंबरानें** आपला कार्यभाग करून घेण्यास तीच संधि साधिली. मलिकंबरची युद्धपद्धति आलीकडील मराठे लोकांसारखी होती. आणि त्याच्या नजीक **युरोपियन** लोकांचीं बंदरें होतीं, या कारणानें तोफखान्याच्या आश्रयानें येऊन गहण्यास हमेष निकाण सांपडे. परंतु शत्रूंस प्रत्यक्ष दुःख देण्याचें मोठें साधन त्याचे घोडेस्वार होत. तेणेंकरून तो मोगलांची दाणावैरण वगैरे सामग्री छापे घालून पकडी व ते कूच करून जाऊं लागले म्हणजे त्यांस उपद्रव देई. त्यांनीं तळ दिला म्हणजे फौजें गर्भोवार घोरपाऱ्याच्या घिरट्या घाली. हल्ला करितों असें खोटेंच दर्शवून त्यांस भिववून त्यांची गाळण करी, आणि पुष्कळ वेळ छावणींत खरोखरच हल्ले करून भारी लूट नेई. शत्रूच्या सैन्यांत हमेष बखेडे उत्पन्न करून दबदबे पाडी. या प्रकारच्या लढाईनें **अबदुल्लाखान** इतका जेर होऊन गेला कीं, त्यानें लौकरच परत जाण्याचा निश्चय केला. तरी त्यानें शत्रूच्या समोरून हटून जातांना काय परिणाम होतील हें ताडिलेंच होतें परंतु त्याचा निरुपाय होता, त्यामुळें तो मागें वळला, व त्या दिवसापासून त्याचीं संकटें वाढत चाललीं. त्याच्या पिछाडीच्या पाहारेकऱ्यांचे **मलिकंबरानें** तुकडे तुकडे केले! म्हणून त्याचें कूच करणें एकीकडेस राहून पळण्याचा प्रसंग आला. शेवटीं तो अतीदौड करीत करीत बागलाण प्रांतांतील पहाडांत व जंगलांत आश्रयास गेला, आणि तेथून मात्र इजा न पोहोंचतां गुजराथेस आला. इतक्यांत दुसऱ्या फौजा समरंगणांत येऊन थडकल्या. परंतु आपल्या सहाय्यकर्त्यांचा पराजय करून **मलिकंबर** विजयी होऊन परत येत आहे, असें अवलोकन करून आपलीही त्याजकडून अशीच दुर्दशा न व्हावी एतदर्थ शाहाणपणा करून बऱ्हाणपुरास त्या जमावानें राहिल्या.

**अबदुल्लाखानाचा पाडाव.**

यानंतर सन १६१७ सालीं जहांगिरानें दक्षणेंत स्वारी करण्याकरितां शाहाजहान यास नेमिलें व समयविशेषीं कारण लागल्यास आपणच सहाय्य करावें अशा उद्देशानें तो कूच करून मांदू येथें आला. शाहाजहानानें विजापूरच्या पादशाहास वश करून मलिकंबराच्या स्नेहांतून फोडिला. तसेंच कितीएक मराठे सरदारही फितूर होऊन मोंगलांस जाऊन मिळाले. आपले स्नेही व मदतगार आपणास सोडून गेले, असें पाहतांच मलिकंबर शाहाजहानास शरण गेला आणि नगरचा किल्ला व त्या सभोंवतालचा मांत जो त्यानें पूर्वी परत घेतला होता तो सोडून दिला.

शाहाजहान दक्षणेंत येतो. मलिकंबर त्यास शरण जाऊन घेतलेला मांत सोडितो.

दक्षणेंतून शाहाजहान काश्मिरास गेल्यावर तेथें मोंगलांची सुस्ती पाहून त्यांवर पुनः मलिकंबरनें स्वारी केली, आणि फार आयास न पडतां सर्व गेलेला प्रदेश हस्तगत केला, व मोंगलांचा सरदार ब्रह्मणपुरास पळाला. तेथून त्यानें कुमक पाठविण्याविषयीं पादशाहाकडे जरूरीचीं पत्रें पाठविलीं. त्यावरोवर त्यानें पुनः शाहाजहानास मोठें लष्कर व द्रव्य देऊन दक्षणेंत पाठविलें. तो येऊन पोहोंचण्यापूर्वीच मलिकंबर देश लुटीत नर्मदा नदी उतरून मांदूशहरापर्यंत गेला होता. त्यानें तेथील वेशीच्या बाहेरचीं घरें जाळून पोळून व लुटून फस्त केलीं. परंतु शाहाजहान येतांच त्यानें त्यास नर्मदा पार घालविलें. मलिकंबरानें नेहमीच्या आपल्या पद्धतीप्रमाणें मोंगलांच्या सैन्याचें सामान सुमान येत असेल तें लुटावें, त्यांस दाणावैरण मिळूं देऊं नये, त्यांच्या लहान टोळ्या सांपडल्यास त्यांस कापून टाकावें, त्यांचें लष्कर चाललें असतां जवळपास राहून त्यांस त्रास द्यावा आणि एकाएकीं लांब लांब मजला करून त्यांवर एकदम छापे घालावे, अशा त्यानें हरतऱ्हा करून पाहाव्या. परंतु शाहाजहान सर्वकाळ सावध असे त्यामुळें मोंगलांचें फारसें नुकसान न होतां मलिकंबरास त्याशीं उघड मैदानांत सामना करून नशीबाची परीक्षा पाहणें भाग पडलें. त्यांत मलिकंबराचा सर्वथैव पराभव झाला. व आणखीं कांहीं मांत व द्रव्य देऊन त्यास मोंगलांशीं तह करणें भा-

मलिकंबर पुनः मांत घेतो.

शाहाजहान पुनः येऊन त्याचा पराभव करितो.

तो मोंगलांशीं पुनः तह करितो.

ग पडलें.

ह्यापुढें **मलिकंबर** मोंगलांशीं स्नेहानें वागला, आणि त्यानें दोस्तींत फारसें अंतर पडूं दिलें नाहीं. तसाच मोंगलांच्या फौजेनेंही त्यास उपद्रव दिला नाहीं. ह्या कारणानें त्यानें निजामशाही राज्याचें काम उत्तम रीतीनें चालविलें. मधून मधून विजापूर व गोंवळकोंडें येथील सुलतानांकडून त्यानें खंडण्याही घेतल्या! असो त्याप्रमाणें मोठ्या वैभवानें व उन्नतीनें आपलें काम संभाळून आपली कीर्ति व नांव अमर राहण्यासारखी **मलिकंबरानें** आपली शिस्त ठेविली. आणि तसाच त्यास लौकिकही मिळाला. तो आपल्या वयाच्या ८० व्या वर्षी सन १६२६ सालीं मरण पावला! त्यानें दौलताबादेस एक मोठा घुमट बांधिला होता, त्यांतच त्यास पुरिलें. त्याच्या कबरीच्या संरक्षणास ठेवलेल्या नोकरलोकांस ज्या जमिनी त्यावेळीं लाऊन दिलेल्या होत्या, त्या अद्याप त्यांच्या वंशजांकडे चालल्या आहेत. त्याच्या वेळच्या योध्यांत व मुत्सद्यांत त्याचा पहिला नंबर असून त्यानें दक्षणेंत जी जमाबंदीची पद्धत सुरू केली, त्याजबद्दल लोक अद्याप त्याची तारीफ करीत आहेत. न्यायीपणा, ईश्वरभक्ति, औदार्य, धार्मिकपणा, आणि शूरता ह्यांविषयींही त्याची फार आख्या असे.

मलिकंबराचा मृत्यु. इ.स. १६२६

**मलिकंबरास फत्तेखान** व **जंगीसखान** असे दोन पुत्र होते. परंतु त्यांतून एकाच्याही अंगीं **मलिकंबराचें** शहाणपण व गुण वसत नव्हते. **फत्तेखान** निजामशाही राज्याचें काम पाहूं लागला. परंतु त्या राज्याच्या पश्चिमेकडील प्रांत **शाहाजी भोंसल्याच्या** ताब्यांत होता. **खानजहान लोदी**, **शाहाजहाना** विरुद्ध बंड करून दक्षणेंत पळून आला, तेव्हां त्यास **शाहाजी** व दुसरे मराठे सरदार अनुकूल झाले. पुढें लौकरच **शाहाजीनें** त्याचा पक्ष सोडिला, आणि तो पादशाहास शरण गेला. तेव्हां त्यास पादशाहानें पांच हजार स्वारांची सरदारी दिली. शाहाजीचें सहाय्य जातांच **लोदी** विजापुरीं गेला, तरी तेथें त्यास आश्रय मिळाला नाहीं. तेव्हां तो पुनः अहंमदनगरास **मूर्तिजानिजामशाहाकडे** आला. तेथें त्यानें मात्र त्यास आश्रय दिला. या पूर्वीच **मूर्तिजानिजामशाहानें फत्तेखानास** दूर करून स्वत-

त्याचा पुत्र फत्तेखान कारभार पाहातो.

फत्तेखानास कैद करून मूर्तिजा स्वतःकारभार पहातो.

र किल्ल्यांत कैदेंत ठेविलें होतें, आणि तरवरीबरवानास दिवाण नेमून त्याच्या साहाय्यानें तो स्वतः कारभार पाहावयास लागला होता. लोदीस निजामशाही मुलखांत आश्रय मिळताच मोंगलांचें सैन्य तिकडे वळलें. निजामशहानें आपली फौज दौलताबादेस जमविली, व तो जवळील एका खिंडीमध्यें मजबूत ठिकाणीं ठाणें धरून राहिला. दोंहीं सैन्यांत जी चकमक झडली, तींत निजामशहाचा पराभव झाला, आणि मोंगलांनीं धारूरपर्यंत प्रांत ताब्यांत घेतला.

लोदीस आश्रय देतो व मोंगलीफौज चालून येते.

त्या प्रमाणें मोगलांशीं लढाई चालली असतां निजामशाही राज्यावर दुसरें एक अरिष्ट येऊन त्यानेंही देशाची दुर्दशा केली. याच सुमारास दक्षणेंत मोठा दुष्काळ पडला. प्रथम सन १६२९ त पर्जन्य पडला नाहीं, आणि दुष्काळास आरंभ झाला. पुढें दुसऱ्या वर्षीही अवर्षण पडल्यामुळें दुष्काळाची सीमा होऊन भयंकर परिणाम झाला. हजारों लोक गांव सोडून गेले. कित्येक सुपीक प्रांतांत जाऊन पोहोंचण्यापूर्वीच मेले. कित्येक जागच्या जागीं मरण पावले. प्रांताचे प्रांत ओसाड पडले. वैरण नाहींशी होऊन गुराढोरांचा पाठारा उडाला! त्यामागून पटकी उद्भवली. तेव्हां तर लोकांच्या विपत्तीचा कळसच झाला. तिकडे लढाईंत पराभव झाला, आणि इकडे अशा कृत्यांनीं देश ओस पडला! तेव्हां ही सर्व दुर्दशा आपल्या प्रधानाच्या मूर्खपणानें झाली असें मूर्तिजा निजामशहास वाटून त्यानें तरवरीबरवानास कामावरून दूर केलें. मलिकंबराच्या वेळीं जसा देश आबाद होता, तसा त्याचा मुलगा फत्तेरवान ह्यांच्या कारभारानें होईल, अशी त्यास आशा वाटली. शिवाय मूर्तिजाची आई ती फत्तेरवानाची बहीण असून फत्तेरवानास मुक्त करण्याविषयीं तिची मूर्तिजामागें एकसारखी टुमणी होतीच. त्या कारणानें त्यानें फत्तेरवानास बंदींतून मुक्त करून एकदम प्रधानगिरी दिली. आपल्या वंशपरंपरेच्या शत्रूचें असें नाक ठेंचलें गेल्यामुळें विजापूरचा राजा महंमद आदिलशाहा त्यास प्रथम आनंद झाला परंतु जेव्हां निजामशाही राज्याचें वाटोळें होण्याचा समय जवळ आला असें त्यास दिसूं लागलें, तेव्हां आपल्या शेजाऱ्याचा अगदीं निःपात झाल्यावर मोंगलांची धाड आपणावरही ख-

दक्षणेंत मोठा दुष्काळ.

फत्तेखान मुक्त होऊन दिवाण होतो.

चित येईल. याकरितां त्यानें **मूर्तिजा** निजामशाहाची भेट घेऊन त्याशीं तह केला. त्यांत निजामशाहानें सोलापूरचा किल्ला व त्याखालील प्रांत आणि कोंकणांतील कांहीं परगणे आदिलशाहास द्यावे, व आदिलशाहानें निजामशाहास मोंगलांविरुद्ध कुमक करावी, असें ठरलें. परंतु तिकडील फौज येण्यापूर्वींच निजामशाहानें अविचार करून **फत्तेखानास** एकदम मुक्त करून प्रधानपदाचीं वस्त्रें दिलीं. त्यामुळें दरबारांत मोठी गडबड उडाली. **फत्तेखान** मोकळा झाला, तेव्हां त्यास आलीकडील उपकारापेक्षां पूर्वींच्या अपकारांचें विशेष स्मरण राहून आपल्या बापाचा जो अधिकार होता तो सर्व आपणास मिळावा, असा त्यास लोभ सुटला. व **मूर्तिजानें** जी सर्व सत्ता त्यावर सोंपविली, तिचा उपयोग त्यानें त्याच्याच नाशार्थ केला. तशांत **मूर्तिजा** बुद्धिहीन असून लोकांस नावडता असे. असो **फत्तेखानाचें** प्राबल्य प्रजेंत लौकरच वाढत चाललें. तेव्हां आपणास पुनरपि दिवाणगिरीच्या कामावरून जाण्याचा प्रसंग येऊंनये, यासाठीं त्यानें **मूर्तिजा** निजामशाहा भ्रमिष्ट झाल्याचें मिष करून त्यास प्रतिबंधांत ठेविलें आणि राजाच्या मर्जींतील जे दुसरे वजनदार सरदार होते, त्यांपैकीं पंचवीस असामीस एका दिवसांत ठार मारून सर्व राज्याधिकार त्यानें आपल्या हातांत घेतला, आणि तावडतोब **शाहाजहानास** करभार पाठवून शरण येतों असें बोलणें लाविलें. निजामशाहा व दुसरे सरदार ह्यांनीं पादशाहाविरुद्ध बंड करूंनये म्हणून वरील कृत्य केलें. तेव्हां शाहाजहानानें त्याच्या सर्व कृत्यांस अनुमोदन देऊन प्रतिबंधांत असलेल्या निजामशाहास ठार मारण्याविषयीं आणि निजामशाही दरबारचे सर्व हत्ती, जडजवाहीर, खजिना हुजूर हजर करण्याविषयीं आज्ञा केली. विजापूरची फौज येऊन पोहोंचते, तोंच इतकी गडबड होऊन चुकली होती. ह्यामुळें मोंगली फौजेनें विजापूरच्या फौजेचा सहजींच पराभव केला. इकडे **फत्तेखानानें मूर्तिजा** निजामशाहास ठार मारून त्याच्या जागीं त्याचा दहावर्षांचा मुलगा **हुस्सेन** यास गादीवर बसविलें. परंतु निजामशाही हत्ती, खजिना, व जडजवाहीर इत्यादि **फत्तेखान** मोंगलांच्या हवालीं करीना. म्हणून पादशाहानें त्यावर सैन्य धाडिलें, तेव्हां तो पुनः **शाहाजहानास** शरण गेला, व आठ लाख रुपये नजर देऊन दरसाल खंडणी

मूर्तिजास प्रतिबंधांत ठेवितो.

मूर्तिजास ठार मारून हुस्सेनास गादीवर बसवितो.

देण्याचेंही त्यानें मान्य केलें. तेव्हां जो प्रांत त्याजकडे होता, तो पादशाहानें त्याचा त्याकडे राहू दिला.

ह्या कृत्याचा निजामशाही दरबारचा मराठा सरदार शाहाजी भोंसला ह्यास फार तिरस्कार आला. तो निजामशाही नोकरी सोडून विजापुरास गेला. त्यावेळीं त्या दरबारचा दिवाण मुरारपंत ह्या नांवाचा ब्राम्हण होता. त्याच्या मार्फत शाहाजीनें असें बोलणें आरंभिलें कीं, दौलताबादचा किल्ला घेण्यास ही संधि फार चांगली आहे. कारण किल्ल्यावर सामग्रीही फारशी नाहीं, त्यावरील लोकांची तयारी जितक्यास तितकीच आहे, तेथील सरदार अगदीं खेदित असून फत्तेखानाविरुद्ध सामील होण्यास एका पायावर तयार आहेत; सरकारच्या मर्जीस किल्ल्यावर हल्ला करण्याचें येत असल्यास मीही आपल्या चाकरीस राहून मोठ्या हिमतीनें व हिकमतीनें किल्ला हस्तगत करीन. ही शाहाजीची मसलत सुलतानास पसंत वाटून त्यानें दौलताबादेवर फौज पाठविली.

*शाहाजी नगर सोडून विजापुरास जातो.*

हें वर्तमान समजतांच फत्तेखान फार घाबरला. आपण कोणास आवडत नसून सर्व लोक आपणाविरुद्ध आहेत हें त्यास माहीत होतेंच. यास्तव त्यानें मोंगलपादशाहास असें सांगून पाठविलें कीं, दौलताबादचा किल्ला घेण्यास विजापूरची फौज येत आहे. तशांत आपणास वडिलांची अशी आज्ञा होती कीं, मोंगलांच्या पदरीं झाडलोटीची चाकरी करण्यास आलें तरी राहावें. परंतु विजापूर दरबारीं मोठी सरदारीसुद्धां पत्करूं नये! त्याकरितां दौलताबादचा किल्ला आपल्या स्वाधीन करण्यास मी फार खुषी आहें. तर तो ताब्यांत घेण्यास फौज पाठवावी. तेव्हां शहाजहानानें मोहबतखान नामक आपल्या सरदारास किल्ला हवालीं करून घेण्यास पाठविलें. मोहबतखान येण्यापूर्वींच आदिलशाही फौज येऊन थडकली होती. ती फौज मध्यें पडली, व मागून मोंगलांची फौज येऊन भिडली. परंतु तिला किल्ल्यांतील लोकांस मिळूं दिलें नाहीं. विजापूरच्या फौजेस मोहबतखानाशीं मोठा युद्धव्यापार करावा लागला. त्यांत शाहाजी मोठ्या हिमतीनें व शौर्यानें लढला. परंतु अखेरीस विजापूरच्या फौजेचा पराभव होऊन त्यांस दौलताबादेहून सोळा मैल मा-

*दौलताबाद किल्ला घेण्यास मोहबतखान येतो.*

गें हटावें लागलें.

हें काम पराक्रमानें तडीस जात नाहीं, असें चिन्ह दिसतांच कांहीं तरी युक्ति लढवून तें साध्य करून घ्यावें, असा विचार ठरून **फत्तेखाना**स निरोप सांगून पाठविण्यांत आला कीं; तुम्ही मोंगलांच्या हवालीं किल्ला केल्यास तुमचा सर्वस्वीं नाश होईल. **शाहाजीस** नोकरीत घेऊन किल्ला स्वाधीन कराल तर विजापूर दरबारची आपल्याशीं पूर्वीप्रमाणें दोस्ती राहील. आणि आम्ही तुम्हांस हरएक प्रकारें मोगलांविरुद्ध सहाय्य करूं! ही मसलत **फत्तेखाना**स रुचून त्यानें दौलताबाद किल्ला मोगलांच्या ताब्यांत देण्याचें नाकबूल केलें, आणि किल्ल्यांतून त्यानें व बाहेरून विजापूरच्या फौजेनें **मोहबतखानावर** तोफांचा मारा सुरू केला. त्या कृत्यानें मोहबतखान फारच संतापला व क्षणिकबुद्धीचा व विश्वासघातकी जो **फत्तेखान** त्याची पुरी खोड जिरवून निजामशाही राज्याचीच परिसमाप्ति करावी, असा त्यानें दृढ संकल्प केला. त्याजकडे पुष्कळ चांगली फौज असून उत्तमोत्तम बरेच सरदारही होते. त्या सर्वांशीं मसलत करून त्यानें आपल्या सैन्याचे तीन भाग करून एक विजापुरच्या फौजेवर, दुसरा आपल्या फौजेस सामग्री पोहोंचविण्याच्या कामावर आणि तिसरा किल्ल्यांत धान्य सामानसुमान इत्यादि न जाऊं देण्याच्या कामगिरीवर नेमून मुख्य भाग आपल्या ताब्यांत ठेवून स्वतः किल्ल्यास कडेकोट जंगी वेढा दिला. किल्ल्यांतील लोकही खूब नेटानें लढले, व त्यांनीं बरेच दिवस टिकाव धरिला. तरी अखेरीस धान्याचा तोटा पडून उपाशीं मरण्याची पाळी आली! शेवटीं अठ्ठावन दिवस मोठ्या पराक्रमानें युद्ध होऊन पुढें टिकाव लागणें कठीण असें दिसतांच किल्लेदारांनीं किल्ला मोंगलांच्या स्वाधीन केला, व **फत्तेखानही** मोंगलांस शरण आला. तेव्हां त्यांनीं त्याचा सर्व अधिकार काढून घेऊन त्यानें बसविलेल्या बालराजास कैद करून ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर पाठविलें, आणि निजामशाही प्रांत खालसा केला. त्याप्रमाणें **निजामशाही** वंशाची अहंमदनगर येथें संस्थापना झाल्यापासून १५० वर्षांनीं सन १६३३ त परिसमाप्ति झाली.

मोहबतखान किल्ला घेतो व निजामशाहास कैद करून राज्य खालसा करितो. इ. स. १६३३.

**फत्तेखान** शरण आल्यावर त्यास पादशाहाकडे दिल्लीस नेलें.

त्याची त्यावर कृपा होऊन त्याची जिनगी वगैरे चीजवस्त त्यास परत मिळाली. आणखी पादशाहा त्यास सरदारीही देणार होता. परंतु त्याच्या डोक्यास पूर्वी एक जखम लागली असून त्यामुळें त्याचा मेंदू बिघडून तो भ्रमिष्ट झाला. तेव्हां पादशाहानें त्यास दोन लक्ष पेनशन ठरवून लाहोरास राहण्याची परवानगी दिली. तेथें **फत्तेखान** मरेपर्यंत सुखानें राहिला. त्याचा धाकटा भाऊ **जंघीजखान** हा पूर्वींच मोगलांच्या नोकरीस राहिला होता. त्यास पादशाहानें "मनसूरखान" असा किताब देऊन दोन हजार स्वारांची अमीरी दिली.

फत्तेखानाची पुढील हकीगत.

ह्या प्रमाणें निजामशाही राज्याची समाप्ति झाल्यावर पुनः **शाहाजी**नें लौकरच त्याचा उदयकाळ आणिला. दौलताबाद मोगलांकडे गेल्यावर **शाहाजी** पश्चिमेकडील डोंगरी मुलखांत राहूं लागला. आणि तेथें बरीच फौज जमल्यावर आपल्या आंगीं सामर्थ्य आलेंसें वाटून त्यानें अहमदनगरच्या गादीवर एक आगंतुक बसविला. व कित्येक हुषार ब्राम्हण नोकरीस ठेवून त्यांच्या मसलतीनें निजामशाही राज्यांतील बरेच किल्ले व मुलूख ताब्यांत घेऊन नव्या शाहाच्या नांवानें आपण अंमल चालवूं लागला. असें करितां करितां सर्व कोंकणपट्टी आणि पूर्वेस अहंमदनगरापर्यंत, व निरेपासून चांदोरच्या किल्यापर्यंत मुलूख **शाहाजी**नें आपल्या ताब्यांत घेतला. दक्षणेंतील प्रांत पुनः सरकरण्याचा प्रथमचाच दिवस आला. असें पाहून **शाहाजहान** स्वतः सिद्ध झाला, त्यानें **शाहाजी**च्या पारिपत्याकरितां प्रथम फौज पाठविली. परंतु तिची डाळ **शाहाजी** शिजूं देईना! परिंड्यास मोगलांचा पराभव झाल्यापासून **शाहाजी**चें प्रस्थ दिवसानुदिवस अधिकाधीक माजत चाललें होतें. तेव्हां **खान डवरान** व **खान डावरान** या दोघां सरदारांस **शाहाजी**वर नेमिलें. परंतु त्यांचेंही त्यानें बिलकूल चालूं दिलें नाहीं! **शाहाजी**नें मोठें सैन्य जमा केलें असून त्यास विजापुरचा सुलतान, त्याचा दिवाण **मुरारपंत** आणि मुख्य सरदार **रणदुल्लाखान** यांची पुष्कळ मदत होती. असो, इकडे हे प्रकार चालले आहेत तों पादशाहा दक्षणेंत येऊन दाखल झाला. त्यानें प्रथमतः विजापुरकरांकडे वकील पाठवून बोलणें लाविलें कीं, "अहंमदनगरकरांचे किल्ले तुम्हीं

शाहाजी निजामशाही मुलूख हस्तगत करून एका मुलास निजामशाही गादीवर बसवितो.

शहाजहान स्वतः दक्षणेंत येतो.

घेतले आहेत, ते सरंजामसुद्धां स्वाधीन करावे. 'मुलुख मैदान' नामक जी जंगी तोफ तुम्हीं परिंड्याहून विजापुरास नेली आहे ती द्यावी, आणि मुख्यत्वें शाहाजीच्या पक्षास न मिळतां त्यास व त्याच्या तर्फेतील लोकांस बिलकुल सहाय्य करूं नये. ह्या प्रमाणें वागत असल्यास निजामशाहींतील सर्व कोंकणपट्टी, सोलापूर किल्ला व त्या खालील प्रांत तुम्हांस देऊं. नाहीं तर तुमचेंही राज्य निरवाळस बुडवूं." हें म्हणणें आदिलशाहानें मान्य केलें नाहीं. तेव्हां **शाहाजहानानें** आपल्या लष्कराचे चार भाग करून दोन **शाहाजीवर** आणि दोन विजापूरकरांवर नेमिले. पहिल्या दोहोंपैकीं एका भागावर **पाहिस्तेखान** हा सरदार असून त्याजकडे चांदोर, नाशीक आणि संगमनेर या शहरांजवळचे **शाहाजीचे** किल्ले घेण्याचें काम होतें. दुसऱ्या भागावर **खानजमान** सरदार असून त्यावर **शाहाजीस** मैदान प्रांतांतून हाकून काढण्याचें, त्याचा पाठलाग करून त्याचे कोंकणपट्टींतील किल्ले घेण्याचें आणि त्यास निजामशाही प्रांतांत कोठेंही थारा न देण्याचें काम सोंपविलें होतें. नाशीक व चांदोर ह्यांजवळचे **शाहाजीचे** सुमारें पंचवीस किल्ले मोगलांनीं घेतले, परंतु त्रिंबक, शिवनेरी व कोंडाणा हे **शाहाजीच्या** ताब्यांत होते. **खानजमानानें** कोंकणपट्टींतही **शाहाजीस** जेर करून सोडिलें. तेव्हां तो अहंमदनगरासमीप आला. तेथूनही त्यांनीं त्यास हांकून काढिलें. आपला चालावा तसा इलाज चालत नाहीं असें नजरेस येतांच तो चांभारगोंदें व बारामती यांमध्यें हटून राहिला. परंतु तेथेंही त्याच्या मागचा पाठलाग चुकला नाहीं. शेवटीं नीरेच्या पलीकडे विजापूरकरांच्या मिरज व कोल्हापूर प्रांतीं मोगलांनीं त्यास पिटाळलें. तेव्हां मात्र त्यास विजापूरच्या फौजेचें सहाय्य मिळालें. त्यासरशें त्यानें मोंगलांवर छापे घालणें, त्यांची रसद पकडणें, सावध राहून मोंगलांस आपल्या मागें न येऊं देणें इत्यादि प्रकारांनीं मोंगलांचें कांहींएक चालूं दिलें नाहीं. **खानजमानास शाहाजहानानें** मिरज, कोल्हापूर, रायबाग हे तिन्ही प्रांत उद्ध्वस्त करण्याविषयीं आज्ञा देतांच त्यानें कितीएक शहरें घेऊन त्यांचा अगदीं सत्यानास करून टाकिला, व शेंकडों लोकांस कैद करून नेले. इतक्यांत **खानडवरान** विजापुरास येऊन थडकला. तेव्हां आदिलशाहानें तहाचें बोलणें लाविलें, आणि त्यास अनु-

शाहाजीवर फौज पाठविली.

शाहाजीची फजे.


कूल असा नह ठरला. हें वर्तमान **शाहाजी**स समजतांच तो कोंकणांत गेला, व आपल्या किल्ल्यांचा बंदोबस्त करूं लागला. त्याच्या मागोमाग **खानजमान** येऊन त्याच्या पिच्छास लागला. असो नंतर फारच थोड्या अवकाशांत त्रिंबक, शिवनेरी व दुसरे कोंकणांतील **शाहाजीचे** किल्ले मोंगलांनीं घेतले. विजापूरचेंही पाठबळ नाहीं. हळू हळू आपल्या थोडथोडा मांत मोंगलांकडे जात चालला हें पाहून **शाहाजी** सन १६३१ त **शाहाजहाना**स शरण गेला आणि आपण बसविलेल्या आगंतुक राजासही त्यानें त्याच्या हवाली केलें, व त्यास नम्रतेनें विनंति केली कीं, माझ्या अपराधांची क्षमा करून मला तुमच्या चाकरीस ठेवावें. परंतु पादशाहानें हें मान्य न करितां विजापूरकरांच्या पदरीं मात्र चाकरीस राहण्यास परवानगी दिली; आणि त्यानें स्थापन केलेल्या बालराजास पहिले दोन मुलगे होते तेथें ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर पाठविलें. त्यावेळीं मात्र **बहिरी** वंशाचा व त्यानें स्थापित केलेल्या निजामशाही राज्याचा अखेर शेवट झाला खरा.

आदिलशाहाशीं नह.

शाहाजी शाहाजहानास शरण जातो, व विजापुरीं नोकरी धरितो.

निजामशाही राज्याचा शेवट.

# गोवळकोंडच्या कुतुबशाही घराण्याचा वंशवृक्ष.




+ ज्या पुरुषांच्या नांवापुढें कंसांत आंकडे घातले आहेत, ते पुरुष गादीवर बसले होते.

# कुतुबशाही घराण्याचा इतिहास.

## सुलतान कुली कुतुबशाहा.

इसवी सन १५१२ ते १५४३ पर्यंत.

कुलीकुतुबशाहाची मूळ हकीकत.——महंमदशाहावर गर्दी होते, व कुली त्याचा बचाव करितो.—— त्यास मलिककुतुबउल्मुल्क हा किताब मिळतो.——त्यास तेलंगणची सुभेदारी व अमीर उल् उमराव हा किताब मिळतो.—— तो गिलनीवर जातो.— तो स्वतंत्र होऊन गोंवळकोंड्यास राज्य स्थापितो —— तो राज्य वाढवितो — तो राजकोंडा घेतो.—— देवरकोंड्यावर हल्ला.—— पालनगडास वेढा.—— गणपुऱ्यास वेढा.—— कोविलकोंड्यास वेढा.—— कोवाउल्मुल्क कुतुबशाहावर चालून येतो.—— त्याचा पराभव.—— इमादशाहाशीं लढाई.—— बेलमकोंड्यावर हल्ला.—— हिंदुराजांशीं लढाई— कमामेट किल्ल्यावर हल्ला.—— हिंदु राजे कुतुबशाहावर येतात.—— त्यांचा पराभव.—— सनाद देवराजा तह करितो.—— कोंडविडास वेढा.—— शिवराय कुतुबशाहावर जातो.—— त्याचा पराभव व तो तह करितो——इस्माएल कुतुबशाहावर स्वारी करितो.—— लढाई होते व इस्माएल मागें हटतो.—— इस्माएल मरण पावतो व तह होतो.—— बेरिदावर स्वारी.—— बेरीद शरण येतो.—— हरिश्चंद्रावर स्वारी व तो कैद होतो.—— बुऱ्हाण निजामशाहाशीं तह.—— कुली कुतूब याचा मृत्यु.

---

कुलीकुतुबाची मूळ हकीकत.

**कुली कुतुबशाहा** इराणच्या एका मसुरव जातीचा पुरूष असून त्याचा जन्म हमदान प्रांतांतील सय्यदाबाद खेड्यांत झाला. याच्या जातीच्या शत्रूंनीं याचा अधिकार काढून घेतला. कारण त्याच्या शत्रूंचा अंमल इराणांत होता. **कुतूब** लहानपणीं फार हुषार व चलाख दिसे. ज्या जोतिष्यांनीं त्याची पत्रिका केली, त्यांनींहीं भाकीत केलें होतेंकी. " हा मोठा मरध्यात पुरुष होऊन जरी इराणांत नाहीं तरी हिंदुस्थानांत राज्यपद पावेल." हें भविष्य शाहाच्या कानीं पडतांच त्यानें **कुली कुतूबाचा** वध करण्याचा निश्चय केला. तेव्हां त्याचा चुलता **कुली कुतूबास** घेऊन

हिंदुस्थानांत आला. त्यावेळीं दक्षणेंत ब्राम्हणी राजाच्या दरबारीं त्याचा चांगला सत्कार झाला. तेथें कांहीं दिवस राहिल्यावर त्याच्या चुलत्यानें परत इराणांत जाण्याचा विचार केला. **कुली कुतुब** दक्षणी राजांचा थाटमाट व वैभव पाहून इतका भुलून गेला कीं, त्यास परत जाणें अगदीं आवडलें नाहीं. परंतु तो त्यावेळीं लहान असल्यामुळें त्यास एकटें ठेवून जाण्याचें त्याच्या चुलत्यास धैर्य होईना. ह्यामुळें तो त्यास घेऊन परत हमदानास गेला. तिकडे जातांच त्याच्या प्राणघातास इराणचा शाहा पुनः टपला. ह्या कारणानें दक्षणेंतील बाहामिनीशाहास चांगले चांगले घोडे व दुसरे कांहीं पदार्थ नजर घेऊन जाण्याचें **कुलीनें** पत्करिलें आणि तो व त्याचा चुलता हे पुनरपि हिंदुस्थानांत जावयास निघाले. ते सुरक्षितपणें बेदरास येऊन पोहोंचले. तेथें गेल्यानंतर दोन तीन दिवसांनीं **महंमद-शाहा** बाहामिनीची भेट घेऊन नजर नजराणे दिले. तेव्हां त्यांस राहण्यास जागा देववून शाहानें त्यांचा मोठा सन्मान केला. नंतर जेव्हां **कुलीकुतूबाचा** चुलता शाहाकडे निरोप मागावयास गेला, तेव्हां आपल्या दरबारीं राहण्याविषयीं शाहानें त्यास फार आग्रह केला. परंतु त्याच्या जातीचा शत्रु जो इराणच्या गादीवर होता तो मरण पावल्याची खबर त्यास लागल्यामुळें त्यानें तें कबूल केलें नाहीं. शेवटीं शाहानें '**कुली कुतूबास** तरी ठेवून जा. मी त्याचें पालन पोषण आपल्या पुत्राप्रमाणें करीन' असें वचनही दिलें. तेव्हां ही गोष्ट **कुलीनें** मान्य केली, आणि तो त्यास ठेवून परत गेला.

बाहामिनी राज्याधिपति **महंमदशाहा, कुलीकुतूबावर** फार प्रेम करी. आणि जेव्हां तो इराणच्या राजवंशांतील आहे असें त्यास समजलें, तेव्हांपासून तर तो त्यावर फारच ममता करूं लागला. परंतु हें कृत्य शाहाच्या इतर शाहाजाद्यांस विषम वाटून ते **कुतूबाचा** हेवा करूं लागले. ते बहुधा नाहीं नाहीं त्या कुरापती काढून त्याच्या कागाळ्या वारंवार शाहास सांगूं लागले.

एका रात्रीस **महंमदशाहा** बाहामिनी दरबारी मंडळीसहीत नृत्यगायनांत निमग्न असतां कित्येक दुष्ट हबशी व दक्षणी लोकांनीं त्यावर एकाएकीं हल्ला केला. त्यावेळीं **कुली कुतुब** व दुसरे दहा परदेशी लोकांनीं मोठी मर्दुमकी व शौर्य करून त्या दुष्टांच्या हातून सोडवून शिकस्तीनें शाहा-

स किल्यांत नेलें. आणि कुमक येईपर्यंत **कुळी कुतूब** व त्याचे दहा परदेशी यांनीं त्या लोकांवर एकसारखा तिरांचा वर्षाव करून शाहाचा बचाव केला. त्यांत पांच असामी तर ठार झालेच. नंतर जेव्हां मदत येऊन पोंहोंचली, तेव्हां त्या कृतघ्नांस पकडून योग्य शासन करण्यांत आलें. या प्रसंगीं **कुळी कुतूबानें** मोठ्या धैर्यानें, साहसानें व पराक्रमानें शाहाचा प्राण वांचविला. यास्तव **महंमदशाहा** बाहामिनी संतुष्ट होऊन त्यानें **कुळीस** "मलिक कुतुब उल्मुल्क" हा किताब दिला, व दुय्यम दिवाण नेमिलें. **कुळी**बरोबर जे पांच इराणी लढून बचावले, त्यांसही शाहानें किताब व बक्षिसें दिलीं.

महंमदशाहावर गर्दी व कुळी त्याचा बचाव करितो.

मलिक कुतुब उल्मुल्क किताब मिळतो.

बाहामिनी राज्य जसजसें निकृष्टावस्थेस येऊं लागलें, तसतसे फौजबंद सरदार हुजूरचा हुकूम मानीनासे होऊन हळू हळू स्वतंत्र होऊं लागले. त्यांपैकींच **मलिक दिनार** हाही एक होता. त्यावर **महंमदशाहानें** स्वारी करून त्यास कैद केलें. ह्या लढाईंत **कुळीकुतूबानें** युद्धकौशल्याची परमावधी केली म्हणून शाहानें खुष होऊन त्यास तेलंगणची सुभेदारी दिली. व 'अमीर उल् उमराव' हा आणखी किताब त्याच्या नांवास जोडिला, व त्याच्या जातीच्या तैनातीकडे कोनगीर व उदगीर हे दोन गांव दिले.

तेलंगणची सुभेदारी व अमीरउल् उमराव हा किताब मिळतो.

नंतर जेव्हां **बाहादूरखान** गिलनी कोंकण प्रांताचा सुभेदार स्वातंत्र्येच्छेनें बंडावा करूं लागला, तेव्हां त्यावर **महंमदशाहा** निघाला. त्यानें **गिलनीस** मिरजेच्या किल्यांत गांठिलें. शाहाबरोबर **कुतुब उल्मुल्क** फौजेनिशीं हजर होता. शाहाच्या फौजेनें मिरजेस वेढा देतांच **गिलनी**कडील सरदार **पोटानाईक** व त्याचा पुत्र **देवनाईक** यांनीं **कुळीकुतूबाच्या** सैन्यास एकीकडे घेऊन त्यावर मोठ्या फौजेनिशीं हल्ला केला. मुसलमान व हिंदु सकाळपासून संध्याकाळपर्यंत एकसारखे लढत होते, आणि त्यांत जिकडे तिकडे **देवनाइकाचीच** सरशी होत होती. अखेर अस्तमानच्या सुमारास **देवनाइकाची** खुद्द **कुतुबउल्मुल्काशीं** गांठ पडली. त्यांच्या झटापटींत **कुतुबउल्मुल्कानें** त्यास ठार मारिलें. पुत्र पडतांच **पोटानाईक** शरण आला. आणि, जरी **गिलनी** पन्हाळ्यास पळून गेला, तरी **पोटानाइकानें** कौलानें किल्ला शाहाच्या स्वाधीन

गिलनीवर कुतुब जातो.

केला. नंतर कुतुब उल्मुल्क तेलंगणास आपल्या सुभेदारीवर गेला. असो,

कुली कुतुब स्वतंत्र होऊन गोंवळकोंड्यास राज्य स्थापितो. इसवी सन १५१२.

असे जरी ,वरचेवर सरदार स्वतंत्र झाले तरी कुतुब उल्मुल्क महंमदशाहाशीं पुष्कळ दिवस एकनिष्ठेनें वागत असे. अखेर महंमदशाहाचा वजीर अमीर बेरिद याच्या उद्धटपणास त्रासून कुलीकुतुबानेंही इ० स० १५१२ त स्वातंत्र्य धारण करून आपल्या नांवास त्यानें 'शाहा' हा किताब जोडून आपल्या नांवानें तो खुतबा वाचवूं लागला, व गोंवळकोंडा शहर त्यानें आपली राजधानी केली.

तेलंगण प्रांतांतील जमीनदार जे बखेडे करीत ते मोडण्याकडे कुली कुतुबशाहाच्या सुभेदारींचीं पहिलीं वर्षें गेलीं. त्याची अशी शिस्त असे कीं; शत्रूच्या मुलखांत शिरून तेथील सर्व टेहळणी करावी, व मागें हटावें आणि दबा धरून मागें लागलेल्या शत्रु सैन्यास पाशांत पकडून मारून टाकावें. ही त्याची हिकमत सर्वदां सिद्धीस जात असे व त्यांतून शत्रु क्वचितच पार पडे. त्या युक्तीनें आपल्या सुभेदारीची हद्द वाढविण्याचा त्यास अतिशयच दम असे. बाहामिनी राज्य मोडकळीस येऊं लागल्यामुळें जो तो सुभेदार त्या राज्याचा सांपडेल तितका प्रांत हाताखालीं घालण्याचा सपाटा लावूं लागला. त्याच संधीस कुली कुतुबास ही कासीम बेरिद व इमाद उल्मुल्क हे तेलंगणच्या आसपास मुलूख हस्तगत करण्याविषयीं सुचवूं लागले. तेव्हां त्यानें त्यांस असें उत्तर पाठविलें. "मला जी जाहागिरी दिली आहे तेवढ्यांत मी संतुष्ट आहें. आणि मला जर राज्य वाढविण्याची इच्छा झाली, तर मी मुसलमानी धर्माचे शत्रु जे हिंदु जमेदार त्यांचा मात्र प्रांत घेऊन आपला प्रांत वाढवीन."

तो राज्य वाढवितो.

त्या प्रमाणें त्यानें वरंगूळच्या सरहद्दीपासून तहत मच्छलीपट्टण व राजमहेंद्रीपर्यंत सर्व हिंदु राजे व जमीनदार आणि त्यांच्या प्रांतांतील एकंदर ६०।७० किल्ले मणगटाच्या जोरानें जिंकिले, व त्या सर्वांत बारा इमामांचा धर्म चालू केला. जे किल्ले जिंकिले त्यांतीलच राजकोंडा, कोविल्लकोंडा, देवरकोंडा, पानगल, गणपुरा, जिरकोंडा, चेलगुंडल, मल्लणगड, एलगीर, मेदक, भागानगर बेल्लमकोंडा, वरंगूळ, कम्मामेट, इंद्रकोंडा, रामगड, कंडापिली, एलोर चिटकोल हेही होत.

आतां हा मुलूख कुली कुतुबानें कसा हस्तगत केला हें सांगूं. त्यानें सन १५१२ त 'शाहा' असा किताब धारण केल्याविषयीं वरती उल्लेख आलाच आहे. गोंवळकोंड्यांस राजधानी स्थापन केल्यानंतर यास आपण कुतुबशाहा असें म्हटलें आहे. गोंवळकोंड्याचा किल्ला दुरुस्त करून त्यास कुतुबशाहानें आपला आरंभीचा पुरस्कर्ता जो महंमदशाहा त्याच्या स्मरणार्थ 'महंमदनगर' असें नांव दिलें.

कुतुबशाही प्रांतावर राजकोंड्याच्या राजानें स्वारी केली. म्हणून कुली कुतुबशाहा आपल्या फौजेसहीत राजकोंड्यास गेला, आणि किल्यास कडेकोट वेढा देऊन कांहीं दिवस तोफांचा एकसारखा भडिमार करितांच त्यास खिंडारें पडलीं. तों पर्यंत आंतील लोक मोठ्या हिमतीनें लढत होते. परंतु नंतर हल्ला करून मुसलमानांनीं किल्ला घेतला. आणि तेथील व्यंकटनाईक राजास कैद करून गोंवळकोंड्यास पाठविलें. त्यांत मुसलमानांचेही लोक फार पडले. त्यानंतर कुतुबशाहानें देवरकोंडा घेतला. हा किल्ला डोंगराच्या शिखरावर बळकट जागीं होता, आणि पुष्कळ दिवस वेढा दिल्यावर हस्तगत झाला. कुतुबशाहाच्या आज्ञेनें तेथील सर्व देवालयें व वाडे जाळून त्याजागीं मशिदी बांधण्यांत आल्या.

राजकोंडा घेतला.

देवरकोंडा विजयानगरच्या राज्यांत होता. तो मुसलमानांनीं घेतला, हें वृत्त विजयानगरच्या कृष्णरायास समजतांच त्यानें तीस हजार स्वार व तीन लाख पायदळ बरोबर घेऊन कुतुबशाही प्रांतावर चाल केली व सरहद्दीवरील बराच प्रांत उजाड केला. इतक्यांत कुतुबशाहाही आपली छोटी फौज सुमारें पांच हजार स्वार आणि तीस हजार पायदळ घेऊन शत्रु पानगल मुक्कामीं होते, तेथें त्यांवर चढाई करीत गेला. मुसलमानांनीं हिंदु फौजेच्या पिछाडीवर एकाएकीं इतका घाला घातला कीं, ते घाबरून शस्त्रें देखील न उचलतां मागें हटून मुख्य फौजेस जाऊन मिळाले. त्या सरसा कृष्णरायानें लष्करास तयारीचा हुकूम देऊन मुसलमानांवर हल्ला केला. कृष्णराय आपल्या अफाट फौजेच्या घमेंडींत असे. त्याला वाटे कीं, आपल्या सेनासमुद्रास अवलोकन करूनच मुसलमान मागें हटतील. कुतुबशाहाची फौज जरी थोडी होती, तरी जास्त तरतरीत व तरबेज असून तो स्वतः

देवरकोंड्यावर हल्ला.

जिकडे तिकडे फिरून आपल्या लोकांस उत्तेजन देऊन नवा दम व हुरूप आणी. ह्या कारणानें त्याचे लोक मोठ्या उमेदीनें आणि छातीनें लढत. प्रातःकाळपासून सूर्यास्त होईपर्यंत जबर लढाई होऊन रक्ताचे पूर वाहावले. हिंदूच्या प्रचंड सैन्यापुढें मुसलमान कच खातात, असें दिसून येऊं लागलें. कुतुबशाहा चांगली पाणीदार अशी फौज ऐन अणीबाणीच्या प्रसंगात उपयोगीं पडावी म्हणून राखून ठेवून तसा विकट प्रसंग आल्याशिवाय तिला पुढें काढीत नसे. तसे ह्यावेळींही त्याजकडे निवडक पंधरा हजार स्वार होते. जेव्हां आपल्या मध्यभागीं शत्रु येऊन घुसले, आणि तेथील लोक घसरूं लागले, तेव्हां कुतुबशाहानें ते पंधरा हजार स्वार घेऊन शत्रु सैन्याच्या पिछाडीवर हल्ला केला. ह्या हुशार व ताज्या दमाच्या लोकांनीं हिंदु लोकांवर असा एक दिलानें हल्ला करून कत्तल करीत सुटले कीं, शत्रूंची एकच धांदल होऊन ते चारी दिशा पळूं लागले. पिछाडीच्या फौजेची अशी अवस्था होतांच साऱ्या लष्करानें हळू हळू मागें पाय घेतला. अंधारी रात्र असल्या कारणानें मुसलमानांस त्यांचा पाठलाग करण्यास जशी सवड सांपडावी तशी सांपडली नाहीं. तरी त्यांचें सर्व बाजारबुणगें व हत्ती कुतुबशाहास मिळालें.

दुसरे दिवशीं शाहानें पालनगडास वेढा दिला. हा किल्ला पहाडी असून त्याच्या सभोंवार गर्द झाडी होती. मुसलमानानीं वेढा दिल्यावर कांहीं दिवसांनीं लौकरच किल्ला हातीं येईल असा रंग दिसला. परंतु इतक्यांत पालनगडाच्या रक्षणार्थ कृष्णारायानें तीनशें स्वार व एक हजार पायदळ आणखी पाठविलें, व त्यास अशी सक्त ताकीद दिली होती कीं; "तुम्ही दिवसा गर्द झाडींत लपून असा आणि रात्रीचे एकाएकीं शत्रूंवर छापे घाला, आणि त्याच वेळीं किल्ल्यांतून आपल्या फौजेनेंही हल्ला करावा." ह्या हिकमतीमुळें किल्ला मुसलमानांच्या हातीं लौकर येईना. ते दोन महिने हाल सोसून प्रयत्न करून पाहात, न

पालनगडास वेढा.

+ कुतुबशाही घराण्याचा इतिहास महंमद कासम फेरिस्ता ह्यानें चांगलासा लिहिलेला नसून फेरिस्ताचा भाषांतरकार मि० ब्रीग ह्यांनही दुसऱ्याच एका बखरीचें भाषांतर आपल्या ग्रंथांत घेतलें आहे. आणि त्यांत तारीखवार वगैरे माहिती दिलेली नसल्यामुळें कुलीकुतुबशाहानें कोणत्या वेळीं कोणता किल्ला व प्रांत घेतला, हें बरोबर समजण्यास साधन नाहीं.

डगमगता होते. अखेर कृष्णरायानें तहाचें बोलणें लावून कौलानें मुसलमानांच्या हवालीं किल्ला केला. तेव्हां आंतील लोक निघून गेले. पालनगडाहून कुतुबशाहानें गणपुरा किल्ला घेण्यास कूच केलें. हा किल्ला पानगल व कोविलकोंडा यांमध्यें होता. तेथें पोहोंचतांच शाहानें किल्लेदारास तो स्वाधीन करण्याविषयीं निरोप पाठविला. परंतु ते उत्तरही न देतां मुसलमानांवर तोफांचा भडिमार करूं लागले. त्याबरोबर मुसलमानांनीं एकदम चढाई करून किल्लेदारांस पळवून लाविलें. आणि किल्ल्यास विशेष मजबुतीनें वेढा दिला. परस्परांची मधून मधून सतत दोन महिने लढाई चालली होती. त्यांत शाहाचे बहुतेक नामी नामी सरदार शिपाई पडले. किल्ला हस्तगत होण्याची आशाच खुंटली. गणपुरा हा किल्ला टेंकडीवर असून त्यावर जाण्याची एकच अरुंद वाट होती. तिच्या दोन्ही बाजूस खोल कडे तुटलेले होते. वाटेवर लाकडें दगड इत्यादि रचून रस्ता बंद केला होता. किल्ल्याच्या वेशीपाशीं दोन बुरूज होते. ते प्रथमतः शाहानें पाडिले. हें काम शेवटास जाण्यास महत्प्रयास लागले. नंतर त्यानें किल्ल्यावर लगट करून हल्ला केला, आणि किल्ला सर केला. त्या प्रसंगीं शाहाचे चांगले चांगले लोक फार मेले. असो. नंतर शाहानें कोविलकोंड्यावर हल्ला केला. तेथील लोक ही बरेच दिवस लढाई देत होते. मुसलमानांस त्यांनीं अगदीं जेरीस आणिलें. शेवटीं तटास खिंड पडल्यानंतर रात्रौ एकाएकीं शाहानें त्यांवर हल्ला केला तेव्हां किल्लेदार कौलानें किल्ला स्वाधीन करून निघून गेला. शाहानें आंत प्रवेश करून त्यांतील खजिना ताब्यांत घेतला. तिजोरींत फार द्रव्य सांपडलें. तें शाहानें त्याच जागीं आपल्या शिपायांस वांटून दिलें. नंतर तेथें एक मुसलमान कामगार नेमून कुतुबशाहा राजधानीस परत आला. त्यावेळीं शहरवासी सर्व लोक त्यास सामोरे येऊन त्यांनीं त्याचा जयजयकार केला.

गणपुऱ्यास वेढा.

कोविलकोंड्यास वेढा.

कुली कुतुबशाहा अशा स्वाऱ्यांत गुंतला असता बाहामिनी राज्यांकडील अंमलदार कोवामउल्मुल्क यानें कुतुबशाहाच्या उत्तरेकडील प्रांतावर हल्ला केला. बाहामिनी दरबारीं जी धांदल चालली होती, त्यांत हाही स्वतंत्र झालेल्या अंमलदारांपैकींच एक होता. एलगुंदल व मल्लुणगड हे किल्ले व कांहीं प्रांत ताब्यांत घेऊन सहा हजार स्वार व दहा हजा-

र पायदळ जमवून तो आसमंतांतील प्रांतांवर वारंवार स्वाऱ्या करूं लागला होता. त्यास कुली कुतुबशाहानें प्रथम पत्र पाठवून कळविलें कीं, "आमच्या प्रांतावर चाल केल्याबद्दल आम्हीं फार दिलगीर आहों. कारण सर्व मुसलमानांशीं दोस्ती ठेवावी अशी आमची इच्छा असून कुराणांतही असेंच सांगितलें आहे. सर्व मुसलमान बंधुवर्गीतील आहेत. यास्तव आमच्या प्रांतांतील जी जी मालमत्ता तुम्हीं लुटून नेली असेल ती ती सर्व परत द्यावी." या पत्राचा बिल्कुल जबाब न देतां त्यानें कुतुबशाही मुलखास उद्ध्वस्त करण्याकरितां बरेंच सैन्य पाठविलें. तेव्हां कुतुबशाहास स्वतः एलगुंडलाकडे कुच करणें भाग पडलें. कोवामउल्मुल्क त्या स्थलापासून एका मुक्कामावर कुतुबशाहाशीं सामना करण्यास चालून आला. दुसरे दिवशीं सकाळपासून दोन प्रहर दिवस येई तोंवर दोन्ही सैन्यांचें युद्ध होऊन कोवामाचा पराभव झाला, व त्यास एलगुंडल किल्यांत आश्रा घेणें भाग पडलें. त्यासरसा कुतुबशाहानें त्यास वेढा दिला. शत्रु सैन्याशीं आपला निभाव लागत नाहीं, असें पाहून इमादशाहाकडे वऱ्हाडांत मदत मागण्याकरितां कोवाम पळून गेला. नंतर तावडतोब कुतुब शाहानें किल्ला सर करून स्वनगरास गमन केलें. कोवामाचा पक्ष स्वीकारून त्यास सहाय्य करण्याचा इमादशाहाचा हेतु आहे असें कुतुबशाहास कळतांच त्यानें वकील पाठवून इमादास कळविलें कीं, "कोवामानें केवळ दुराग्रहीपणानें आपला नाश करून घेतला आहे. म्हणून त्यास इमादशाही प्रांतांत आश्रय न मिळेल तर चांगलें असें मला वाटतें तसेंच महंमदशाहानें सप्त तूप प्रांत आम्हांस दिले असतां ते नुकतेच इमादशाही फौजेनें आपल्या ताब्यांत घेतले आहेत, तेही परत देण्याची तजवीज करावी." यांतून एकही गोष्ट कबूल न करितां इमादशाहानें कुतुबशाहास राग येण्याजोगें उत्तर पाठविलें. तेव्हां तो फौजेची सिद्धता करून इमादशाही प्रांतावर निघाला. इमादशाहाही आपली तयारी करून एलिचपुराहून निघाला. उभय सैन्याची रामगीर येथें गांठ पडून लढाईस सुरुवात झाली. ती दोन प्रहर चालली होती. इमादशाही सैन्यानें कुतुबशाही लष्कराच्या फळ्या फोडून त्याच्या लोकांची दाणादाण क-

कोवामउल्मुल्क हल्ला करितो.

त्याचा पराभव.

इमादशाहाशीं लढाई.

रिताच ते भिऊन माघार घेऊं लागले. हें कुतुबशाहानें अवलोकनक-रून आपल्या शिलकी दोन हजार स्वारांनिशी लगट करून जो शत्रूवर ए-कदम हल्ला केला, तेणेंकरून शत्रु धावरून मागें फिरले. कुतुबशाहा-नें सत्तूत प्रांत ताब्यांत घेतला. तेथून गोवळकोंड्यास दाखल होतांच त्यास असें वर्तमान समजलें कीं, कमामेटचा राजा सीतापति यानें कुतुब-शाही सरहद्दीवरील कांहीं तालुके घेतले. याच्या ताब्यांत कमामेट, बेलम-कोंडा, वरंगूळ व दुसरे कितीएक किल्ले असून तिरदाजी व निशाण मारणें या कामांत उत्कृष्ट अशी बारा हजार फौज होती. कुतुबशाहानें प्रथम बेलमकोंड्यावर हल्ला केला हा किल्ला फार बळकट व दुर्धर होता. पुष्क-ळ दिवस खटपट केली तरीं हातीं लागेना. शेवटीं शिड्या लावून किल्ल्यांत प्रवेश करावा लागून छापा घालण्याचा प्रसंग आला तेव्हां तो स्वाधीन झाला. कुतुबशाहानें बेलमकोंडा घेतल्या-चें वर्तमान सीतापतीस कळतांच फौजेनिशी त्यावर चाल करून आला. परस्परांच्या युद्धप्रसंगांत पुष्कळ मुसलमान ठार झाले. शत्रूंकडून बाणांचा व गोळ्यांचा जो नेमका वर्षाव चालला होता, त्यानें पटापट शूर लोक मरूं लागले. मुसलमानांनीं बरेच वेळ त्यांवर चालून जाण्याचा प्रयत्न केला! पण तो व्यर्थ!! अखेर ते थकले!!! तेव्हां कुतुबशाही स्वारांनीं एकदम हल्लाक-रून त्यांची कत्तल उडवून पराभव केला. राजाचें सामान सुमान व द्रव्य घे-तल्यावर कुतुबशाहा गोवळकोंड्यास गेला.

*बेलमकोंड्यावर हल्ला.*

सीतापतीचा पराभव झाल्यावर तो कमामेट येथें पळाला व कंडापि-ली, इंद्रकोंडा, वरपल्ली, एतगीर इत्यादि शहरांच्या राजांस बोलावून त्यानें सांगितलें कीं, "कुतुबशाहानें सारा तेलंगण देश हस्तगत केला आहे. व तो रोज रोज नवीं नवीं हिंदूचीं राज्यें घेत असून त्यानें जर हा आ-पला क्रम असाच अबाधित चालविला, तर या देशांत लौकरच एकही हिंदु राज्य नाहींसें होइल. एतदर्थ आम्हीं सर्वांनीं एक होऊन त्याचें नि-वारण करणें भाग आहे." हें सांगणें जमलेल्या राजांस मान्य होऊन त्यांनीं आपापल्या फौजेस कमामेट येथें बोलाविलें. हा सर्व जमाव एकत्र जमल्यानंतर त्यांवर कुतुबशाहा-नें स्वारी केली. आणि तेथें मोठें युद्ध होऊन त्यांत मुसलमानांसच जय मिळाला. सीतापती पळून रामचंद्रदेव याजकडे आश्रयार्थ गेला. कु-

*हिंदुराजांशीं लढाई.*

तुबशाहाही इंद्रकोंडा व एतगीर घेऊन कमामेट घेण्यास गेला. हा किल्ला अवघ्या तेलंगण प्रांतांत बळकट म्हणून प्रसिद्ध असे. विनाकारण प्राणहानी होऊं नये म्हणून कुतुबशाहानें त्या किल्लेदारास सांगून पाठविलें कीं, "तुझ्या धन्याचा मुसलमानानीं पराभव केला आहे हें तूं जाणत असशीलच. करितां किल्ला आमच्या स्वाधीन करावा.' हें म्हणणें त्यांनीं नाकारिलें. तेव्हां मुसलमानांनीं पुष्कळदां हल्ले केले, आणि त्यांत बरेच लोक समरभूमीस समर्पण झाले, तरी किल्ला दाद देईना. शेवटीं शाहानें सर्व बाजूनीं त्यावर हल्ला केला. मुसलमानांनीं आपल्या डोक्यावर शिरस्त्राणें घातलीं, व तटावर चढण्यास भक्कम शिड्या लावून एकदम हल्ला केला. त्यांतही जरी मुसलमानांचा पाडाव होऊन त्यांस कच खावा लागला, तरी ते न डगमगतां तटाशीं जाऊन भिडले. किल्ल्यांत त्यांचा प्रवेश होतांच तो सर होण्यास त्यांस मुळींच अवधी लागली नाहीं. ह्या प्रसंगीं शाहाच्या लोकांनीं कोणास जीवदान म्हणून दिलेंच नाहीं! पुरुष, बायका, मुलें जें तडाक्यांत सांपडलें त्यांचा त्यांनीं चेंदा उडविला. फक्त सीतापतीच्या बायकांस मात्र शाहाच्या जनानखान्याकरितां शिल्लक ठेविलें.

*कमामेट किल्ल्यावर हल्ला.*

आपण वरतीं सांगितलेंच आहे कीं, सीतापती पराभव पावून रामचंद्रदेवाकडे गेला. देवाकडे तेलंगण, व ओढिया या दोन प्रांतांसुद्धां सर्व पूर्व किनारा थेट बंगाळच्या सरहद्दीपर्यंत असून कंडापिल्ली येथें राजधानी होती. सीतापतीनें त्यास सांगितलें. "कुतुबशाहानें बहुतेक तेलंगण प्रांत घेतला. आतां बहुधा त्याची धाड तुजवर खास येईल" त्याबरोबर रामचंद्रदेवाची खात्री होऊन त्यानें स्वसैन्याची सिद्धता आरंभिली. आसपासच्या स्नेही राजांसही निमंत्रण दिलें. यामुळें कंडापिल्ली येथें तीन लाख पायदळ आणि तीस हजार स्वार जमले. सीतापति, विडियाद्रि, हरिश्चंद्र व दुसरे कित्येक प्रसिद्ध हिंदुराजे त्यास येऊन मिळाले. ह्या सर्वांचा मारीन किंवा मरेन असा दृढ संकल्प होऊन ते कुतुबशाहावर निघाले. शाहानेंही आपल्या पांच हजार स्वारांनिशीं तयारी केली. पलेचीनुगरजीकच्या नदीवर दोन्ही सैन्यांची भेटाभेट झाली. शाहा हें अफाट हिंदु सैन्य पाहतांच प्रथमारंभीं बराच गडबडला. तरी लढाई विना

*ओढिया प्रांताचा व दुसरे हिंदु राजे कुतुबशाहावर येतात.*

आतां दुसरें गत्यंतरच उरलें नाहीं, असें त्यास वाटून आपला पुत्र हैदरखान यास पंधराशें स्वारांसह उजवीकडे आणि फत्तेखानास तिनश्यांत स्वारांनिशी डावीकडे उभें केलें, आणि आपण दोन हजार स्वार घेऊन मध्यभागीं राहिला. प्रथमतः तो घोड्यावरून खालीं उतरला, व त्यानें सर्वांच्या देखत गुडघे टेंकून "सर्व हिंदूंस तुझ्या भक्तांच्या स्वाधीन कर" अशी अल्लाची प्रार्थना केली, आणि पुनः घोड्यावर मांडी ठोकिली. ईश्वरीलीला किती चमत्कारीक आहे पहा. कुतुबशाहाकडून एकदम हल्ला जातांच त्याजकडील अवघ्या पांच हजार स्वारांनीं एवढ्या प्रचंड सेनासागरास आटवून टाकिलें. हिंदु सैन्य कोल्ह्यासारखें अष्ट दिशांनीं पळत सुटलें. रामचंद्र देव कैदी आला. विदीयाद्रीस हैदरखानानें मारिलें. त्याचे सर्व हत्ती व द्रव्य मुसलमानांस मिळालें; आणि समुद्रकिनाऱ्यापर्यंतचा प्रांत कुली कुतुबशाहाच्या ताब्यांत आला!! शाहानें तेथून कंडापिल्लीस जाऊन तें सर केलें. एल्लोर व राजमहेंद्रीकडे वळून एल्लोर घेऊन पुष्कळ हिंदूंस दुनयेंतून उठविलें. गोदावरीच्या कांठीं राजमहेंद्रीस पोहोंचल्यावर त्यास समजलें कीं, पुष्कळ हिंदु शिपाई गनीम हल्ला करण्याकरितां दाट जंगलांत व बिकट पहाडांत छपून राहिले आहेत. त्यांचा तलाश लावून कापून काढण्याकरितां फत्तेखान व रुस्तमखान यांस पाठविलें. त्यावेळीं हिंदुमुसलमानांत बऱ्याच चकमकी झडल्या. शेवटीं सुमारें दोन हजार हिंदु लोक धारातीर्थी ठार झाल्यावर बाकीचे पळाले, आणि मुसलमान यःकश्चित सैन्यानें विजयी झाले. असो.

त्यांचा प्रांत.

ह्याप्रमाणें रामचंद्रदेवाची पराभव वार्ता श्रवण करून बंगालच्या समुद्र किनाऱ्यावरील प्रांताचा राजा वसनाद देव+ यानें कुतुबशाहाकडे वकील पाठवून तह केला. त्यांत असें ठरलें कीं, गोदावरी पलीकडील सर्व प्रांत वसनाददेवाचा आणि अलीकडील मुसलमानांचा. ह्या तहास दोन्ही राजांची कबूली झाली, व उभयतांच्या हद्दी ठरून वसनाददेवानें एल्लोर प्रांत मुसलमानांस दिला.

वसनाद देवाशी तह करितो.

तेलंगण प्रांत हस्तगत करून कुतुबशाहा स्वनगरीं येतांच 'आपण तिकडे गुंतलों असतांना विजयानगरच्या कृष्णारायानें आपल्या प्रां-

+ यास गजपती असेंही म्हणत.

तांस उपद्रव दिल्याची हकीगत त्यास समजली. म्हणून त्यानें तत्काळ त्यावर स्वारी करण्याची तयारी केली. प्रथमारंभीं त्यानें कोंडवीड किल्यास वेढा दिला. परंतु विजयानगरच्या बेल्लमकोंडा आणि इणकोंडा ह्या किल्यांवरील लोकांनीं गनीमी अचानक छापे घालून मुसलमानांस जर्जर केलें. म्हणून कोंडविडास आपला पुत्र **हैदरखान** ह्यास ठेवून शाहा त्या दोन्हीं किल्यांकडे वळला. त्यानें प्रथम बेल्लमकोंडयास वेढा घातला, व तो सर करून तेथें आपला **सोहलखान** नामक अधिकारी ठेवून आपण कोंडविडाकडे मुलाच्या सहाय्यास निघाला. तेव्हां **कृष्णरायानें** आणखी पांच हजार स्वार व पन्नास हजार पायदळ देऊन आपल्या पुतण्यास कोंडवीड किल्याच्या संरक्षणार्थ पाठविलें. ह्या कुमकेनें बेल्लमकोंडयास वेढितांच **सोहलखानानें** तीन दिवसांत किल्ला स्वाधीन करण्याची मुदत घेऊन कुमक पाठविण्याविषयीं गुप्तपणें **कुतुबशाहाकडे** जासूद पाठविले. निरोप पोहोंचतांच शाहा मागें वळला, आणि एकदम विजयानगरच्या फौजेवर तुटून पडला. त्यानें सपाट्यासरशी कत्तल करण्यास सुरुवात करून त्याचें सर्व सामान सुमान, खजिना, हत्ती वगैरे तत्क्षणींच हस्तगत केलें. अशा रीतीनें ह्या नवीन सैन्याची वाट लावून शाहा कोंडविडाकडे गेला. तेव्हां तेथील किल्लेदारानेंही कौलानें किल्ला स्वाधीन केला.

कोंडविडास वेढा.

आपण पाठविलेल्या सैन्याची अशी दुर्दशा झाली व कोंडवीडही शत्रूच्या हातीं गेला. असें पाहून **कृष्णरायानें** पुनः आठ हजार स्वार आणि एक लक्ष पायदळ देऊन आपला जांवई **शिवराय** यास **कुतुबशाहावर** रवाना केलें. कोंडवीड किल्यावर ठेवण्यास शाहाकडे फौज नसल्यामुळें त्यानें तो कित्येक ठिकाणीं पाडला; आणि सर्व लष्कर घेऊन तो कंडापिल्लीकडे जात असतां कृष्णा तीरीं मुक्कामास उतरला. इकडे हिंदूंनी कोंडवीड ताब्यांत घेऊन दुरुस्त करून त्यावर फौज ठेविली. आणि ते शाहावर चढाव करून गेले. शाहानें ते बरेच जवळ येईपर्यंत बिलकूल हालचाल केली नाहीं. शत्रु अगदीं सन्निध आले अशी त्याची खात्री होतांच त्यानें त्यांवर एकदम घाला घालून त्यांचा पराभव केला. तेव्हां ते कोंडवीड किल्यांत गेले. त्यासही शाहानें वेढा दिला. परंतु किल्ला लढाई

शिवराय कुतुबशाहावर जातो.

त्याचा पराभव व तो तह करितो.

देण्याच्या उपयोगीं नाहीं, असें पाहून हिंदुलोकांस शरण जाणें भाग पडलें, व दरसाल तीन लाख होन देण्याच्या ठरावावर तह झाला. याप्रमाणें **कुतुबशाहा** विजयी होऊन गोवळकोंड्यास परत आला.

या प्रमाणें दोन वर्षें स्वाऱ्या करून सर्व तेलंगण प्रांत पादाक्रांत झाल्यानंतर विजयानगरच्या राजावरही आपला पगडा बसवून **कुली कुतुबशाहा** राजधानीस परत येत असतां त्यास मार्गांतच खबर लागली कीं, विजयानगरच्या **कृष्णारायाच्या** चिथावणीवरून विजापूरचा **इस्माएल** आदिलशाहा त्यानें कुतुबशाहींतील कोविलकोंडा किल्ला घेऊन देण्याच्या कामगिरीकरितां दोन लक्ष होन घेतले असून नंतर आदिलशाही फौज कुतुबशाहींतील प्रांत काबीज करण्यासाठीं त्याच्या प्रांतांत जिकडे कूच करील त्या दर मजलेस पन्नास हजार होन घ्यावे, असा ठराव करण्याकरितां विजयानगरचे वकील आदिलशाही लष्करांत टपून राहिले आहेत. कोविलकोंड्यास कुतुबशाहाचा आस **जाफरबेग** हा अधिकारी असून विजापूरच्या फौजेनें वेढा देऊन एक महिना झाल्यानंतर त्यानें शाहास लिहिलें कीं, "या उप्पर जर कुमक आली नाहीं तर खास किल्ला शत्रूच्या हातीं जाईल." असें समजतांच **कुतुबशाहानें** ताबडतोब कुमक पाठविण्याची तजवीज केली. आणि पुनः स्वतः स्वारीस निघावें, असा त्याचा विचार दिसला. तेव्हां प्रधानांनीं सांगितलें: 'तूर्त संग्रामोपयोगी असे अवघे तीन हजार स्वार आहेत व तेलंगणच्या दरसाल स्वारीनें बहुतेक लष्कर थकून आणि त्रासून गेलें आहे. हत्ती, घोडे इत्यादि जनावरें रोड झालीं आहेत. याकरितां **बुऱ्हाण** निजामशाहाकडे कुमक मागून ती आल्यावर स्वारीचा नगारा करावा, असें आम्हांस वाटतें.' ही मसलत शाहास पसंत पडली नाहीं. ज्या मुसलमान राजानें कारण नसतां आपल्या प्रांतावर चाल केली, त्यावर जाणें अवश्य आहे. असें मनांत आणून त्यानें तयारी चालविली. आणि कोविलकोंड्यास 'मदत येत आहे आपण बिलकूल डगूं नये' असा निरोप पाठविला. गणपुऱ्यास मुक्काम केल्यावर **कुतुबशाहानें इस्माएलाकडे** वकील पाठवून "हिंदूंच्या फुशारकीच्या गप्पांस भुलून मुसलमानांवर हल्ला करणें आपल्या सारख्यांस शोभत नाहीं." असें कळविलें. ह्याकडे त्यानें फारसें लक्ष न देतां कोविल-

इस्माएल कुतुबशाहावर स्वारी करितो.

कोंडयाच्या वेढ्याचें काम पुढें चालविण्यास थोडीशी फौज ठेवून आपण बाकी फौजेनिशी **कुतुबशाहावर** चालून गेला.

**कुलीकुतुबानें** आपल्या लष्करांतील सर्व विद्वान व काजी यांचा दरबार भरवून त्यांस विचारिलें कीं, **महंमदी**धर्माप्रमाणें एका मुसलमान राजानें दुसऱ्या मुसलमानावर शस्त्र धरणें अशास्त्र असतां **इस्माएल** आदिलशाहानें हिंदूंकडून लांच घेऊन तो असा अधर्म करण्यास प्रवृत्त झाला आहे. त्यावर शस्त्र धरणें सशास्त्र होईल किंवा नाहीं? तेव्हां सर्वांनीं "अशा मुसलमानास हिंदु समजून लढणें अगदीं सशास्त्र आहे." असें उत्तर देतांच **कुतुबशाहा** आपल्या छोट्याशा सैन्यास ईर्षा येण्याजोगें प्रोत्साहनपर भाषण करून विजापूरच्या सैन्याशीं सामना करण्यास निघाला. **ऐन उल्मुल्क** उजवे बाजूस, **फत्तेखान** डावीकडे, शाहाजादा **हैदर** मध्य भागीं अशी सैन्य रचना करून **कुतुबशाहा** शिल्की स्वार घेऊन स्वतंत्र राहिला.

**इस्माएल** आदिलशाहाचीही तयारी होतीच. उभय सैन्याची सकाळपासून संध्याकाळपर्यंत एकसारखी झटापट चालली होती. परंतु कोणाचाच जयापजय होईना. रात्र पडल्यावर दोन्ही सैन्यें आपापला युद्धव्यापार सोडून विसाव्यास राहिलीं. आगखीही दोन दिवस अशाच प्रकारच्या ससरी लढाया झाल्या, तरीही व्हावा तसा निकाल लागेना. तेव्हां आदिलशाहानें तीन हजार स्वार गोंवळकोंडें लुटण्यास पाठविले. हें वर्तमान **कुतुबशाहा**स हेरांकडून समजतांच तो आपलें बहुतेक अवजड सामान गणपुरा किल्यांत ठेवून त्या स्वारांवर छापा घालण्यास निघाला. दोन मोठ्या मजली करितांच त्यांची व यांची गांठ पडली, आणि **कुतुबशाहा**नें पहिल्या सपाट्यास त्या टोळीस कापून काढिलें! हें वृत्त श्रवण करितांच **इस्माएल** मागें कोविलकोंड्याकडे वळला. आणि तेथील वेढ्याचें काम जास्त जोरानें चालवूं लागला. त्याच्या मागोमाग **कुतुबशाहा**ही तेथें पोहोंचला, व विजापूरच्या फौजेवर रात्रीच्या वेळीं छापे घालूं लागला. त्यांस दाणावैरण वगैरे सामान सरंजाम न मिळूं देण्यास त्यानें चोंहीकडे स्वार पाठविले. गणपुरा शहरानजीक दोहों सन्यांत जी एक लढाई झाली तींत **कुतुबशाहा**+

(मार्जिन: लढाई होंत व इस्माएल मागें हटतो.)

---

+ ही जखम कुलीचा मुलगा जमशीद यास झाली. असें फेरिस्ता (पुढें चालू.)

स तोंडावर जखम झाली. त्यामुळें त्याच्या नाकाची बोंडी व गालाचा कांहीं भाग छाटून जाऊन तो जन्माचा कुरूप झाला. कोविलकोंड्यापाशीं उभय सैन्याची सतत अकरा महिने खटपट चालली होती. इनक्यांत सन १५२४ सालीं इस्माएल आदिलशाहा आजारी पडून मरण पावला. आणि त्याचा मुलगा मल्लु गादीवर बसला. ह्यामुळें तह होऊन विजापूरचें सैन्य माघारें गेलें. असो. अशी सतत तीन वर्षे मोठ्या विजयानें लढाई करून कुतुबशाहा गोंवळकोंड्यास आला, व त्यानें आपल्या सैन्यांतील अंमलदार व शिपायी यांस आपापल्या घरीं जाऊन विश्रांति घेण्यास परवानगी दिली.

इस्माएल आदिलशाहा मरण पावतो व तह होतो.

इसवी सन १५३० सालीं कुतुबशाहास इब्राहीम कुली हा मुलगा झाला. कुतुबशाहा, इस्माएल आदिलशाहाशीं लढत असतां बेदरच्या कासीम बेरीदशाहानें तेलंगणचे उत्तरेकडील प्रांत व शहरें लुटिलीं. ह्या कारणानें तो कांहीं दिवस विश्रांति घेऊन आपलें लष्कर ताजें तवानें होतांच बेदरावर गेला. तेथें परस्परांची लढाई होऊन त्यांत कुतुबशाहाच्या हातून कासीम बेरिदाचा पराभव होऊन त्याचे दीडशें हत्ती यास मिळाले. नंतर बेरीदशाही मुलूख जिकडे तिकडे उध्वस्त करण्यास त्यानें आपल्या स्वारांस पाठविलें. व कांहीं किल्ल्यांस स्वतः कुतुबशाहानें वेढिलें. जेव्हां त्याच्या निवारणार्थ कासीम बेरीद आला. तेव्हां निमे फौज वेढ्याच्या कामास लावून अर्ध्या फौजेनेंच शाहानें बेरिदास अडविलें. ह्या दोन्हीं सैन्याच्या तीन महिने चकमकी चालल्या आणि बेरीद शरण येऊन त्यानें कोहीर किल्ला कुतुबशाहाच्या हवालीं केला.

बेरिदावर स्वारी इ. स. १५३०

कासीम बेरीद शरण येतो.

बेरिदाचा समाचार घेऊन कुतुबशाहा गोंवळकोंड्यास आल्यानंतर लौकरच स्वसैन्य सिद्धता करून तो नळगोंडच्या राजावर स्वारी करण्यास निघाला. कारण शाहा वरील स्वारींत गुंतला असतां त्यानेंही तेलंगणास उपद्रव दिला होता. तेथें दाखल झाल्यावर प्रथमतः किल्ला स्वाधीन करण्या-

---

इतिहासकार म्हणतो परन्तु सदरहू गोंवळकोंड्याच्या इतिहासकाराचा लेख अधीक विश्वसनीय दिसतो.

विषयीं तेथील राजा **हरिश्चंद्र** यास त्यानें निरोप पाठविला. परंतु तो साहजीकच कबूल झाला नाहीं. तेव्हां शाहास वेढा देणें भाग झालें राजाच्या भावानें किल्यावरून **कुतुबशाहावर** हल्ला केला. त्यांत त्यास पकडून त्याच्या फौजेचाही शाहानें पराभव केला, तरी **हरिश्चंद्र** लढाई करीतच होता. दोहोंकडील लोक भारी लढले व बरेच जखमीही झाले. शेवटीं **हरिश्चंद्र** जेरीस येऊन दरसाल खंडणी देण्यास तयार झाला. तेव्हां शाहानें जाण्याचें ठरवून किल्ला न घेतां त्याच्या मालकाकडेच राहूं दिला. म्हणून तो कसा आहे हें पाहण्याची **कुतुबशाहानें** इच्छा दर्शविली. ती राजानें मान्य करून आपली सारी फौज खालीं ठेवून आपण एक दोन शिपायांसह किल्यावर यावें असें सांगितलें. तें शाहानें कबूल करितांच **हरिश्चंद्रानें** पकडून त्यास कैद करण्याचा बेत केला. तत्पूर्वींच **कुतुबशाहानें** आपल्या लोकांस सांगितलें होतें कीं, आपण किल्यांत शिरून तलवार म्यानांतून काढतांच साऱ्या फौजेनें वरती यावें. अशा ठरलेल्या संकेताप्रमाणें शाहानें दरवाजांत दाखल होतांच तेथील पहारेकऱ्यांस ठार करून खालच्या लोकांस इषारा केला. त्याबरोबर अवघें लष्कर वर येऊन व किल्ला सर होऊन राजा **हरिश्चंद्र** यास कैदी केलें, आणि कांहीं दिवस त्यास लोखंडी पिंजऱ्यांत कोंडून ठेवून नंतर त्याचा वध केला.

हरिश्चंद्रावर स्वारी व तो कैद होतो.

विजापूर येथें **मलु** आदिलशाहास पदच्युत करून त्याचा भाऊ **इब्राहीम** गादीवर बसला होता. इकडे **कुतुबशाहा कासीमबेरिदाचा** कोहीर किल्ला घेण्यांत गुंतला होता. तेव्हां **कासिमाच्या** फुशीमुळें **इब्राहिमानें** तेलंगण प्रांतावर स्वारी केली. सुलतान **कुली** पुनः फौज घेऊन निघाला. आणि त्यानें विजापूरकरांच्या एतगीर किल्यास वेढा देऊन **कासिमास** मेदक व कोकस हीं दोन शहरें त्याच वेळीं स्वाधीन करण्यास निरोप पाठविला. त्याच्या आंगीं **कुतुबशाहाशीं** टक्कर मारण्याचें सामर्थ्यच नव्हतें, आणि त्यानें त्याच लफड्यांत आदिलशाहासही गुंतविलें होतें. म्हणून **बुऱ्हाण** निजामशाहाकडे हें अरिष्ट टाळण्यास मदत करावी, असें बोलणें करण्यास वकील पाठविले. पूर्वीपासून **बुऱ्हाणाचें** आदिलशाहासीं सोलापूर परगण्याबद्दल भांडण लागलेंच होतें.

यास्तव कुतुबशाहाशीं तह करून आपला कार्यभाग साधून घेण्याचा विचार निजामशाहानें मनांत आणिला. आणि शाहा ताहीर नामक वकिलास त्यानें कुतुबशाहाकडे पाठवून त्यास आपला-सा करून घेऊन असें ठरविलें कीं, कासीमबेरिदानें फक्त मेदक शहर कुतुबशाहास देऊन कुतुबशाहानें त्याच्या मागील अपराधांची क्षमा करावी, आणि कुतूबानें सोलापूर घेण्यास मदत करण्याकरितां पांच हजार स्वार पाठवावे. ह्या प्रमाणें तह होऊन पर्जन्यकाळ समीप आल्याकारणानें एतगीरचा वेढा उठवून कुली कुतुबशाहा गोंवळकोंड्यास आला, तो पुनः बाहेर गेला नाहीं. ह्यावेळीं त्याचें वय नव्वद वर्षांचें झालें असून त्यानें स्वपराक्रमानें पुष्कळ प्रांत संपादन केला होता. ह्यापुढें आतां मुलूख काबीज करण्याचा विचार सोडून संपादन केलेल्या प्रांताची सुधारणा करण्यांत, राजधानींत मशिदी व वाडे बांधण्यांत आणि जेणेंकरून तिला शोभा येईल अशी व्यवस्था करून शांतता ठेवण्यांत कालक्षेप करण्याचा त्यानें निश्चय केला. गोंवळकोंड्यास एक मोठी भव्य व शोभिवंत मशीद बांधण्याचें काम त्यानें चालविलें असून त्याची देखरेख करण्यास तो गेला असतां, शाहाजादा जमशीद ह्याच्या सांगण्यावरून गोंवळकोंड्याचा कोतवाल मीरमहंमद हमदानी यानें जंबिया खुपसून सुलतान कुली कुतुबशाहास ठार मारिलें!!! राज्यलोभ किती कठीण आहे पहा? नाहीं तर जो कुली कुतुब इराणचा एक गृहस्थ असून त्यानें आपल्या बाहुबलानें प्रबल शत्रूंस जर्जर करून अबाधित साठ वर्षे तेलंगणावर अम्मल चालविला, व ज्याच्या वयास नव्वद वर्षे होऊन गेलीं, तो मनुष्य एखाद्या यःकश्चित कोतवाला सारख्याकडून मारला जावा! ज्याला चार दिवस सुखानें ईश्वर भजनांत काळ घालवावयासही सांपडूं नये, आणि राज्याशेनें प्रत्यक्ष पोटच्या पोरानें त्याचा वध करवावा काय!!!

बुऱ्हाण निजामशाहाशीं तह.

कुली कुतुबशाहा याचा वध.

तेलंगण प्रांतावर कुली कुतुबशाहानें एकंदर साठ वर्षे अम्मल केला, असें वरती सांगण्यांत आलें आहे. त्यांपैकीं १६ वर्षे बाहामिनी शाहाच्या वतीनें व बाकी ४४ वर्षे स्वतंत्रपणें त्यानें राज्य केलें, आणि आपल्या वयाच्या ९० व्या वर्षी तो मरण पाव[ला. त्या]ला एकंदर सहा मुलगे असून त्यासर्वांत पहिला हैदरखान हा [तो जी]वंत असतांच म-

रण पावला. दुसरा **कुतुबउद्दीन** यास आपल्या पश्चात गादीवर बसविण्याचें **कुली कुतुबशाहानें** योजिलें होतें. तिसरा पुत्र **जमशीद** हा बापास ठार मारवून व आपल्या वडील भावाचे डोळे फोडून गादीवर बसला. चौथा **अबदुल करीम** ह्यानें बंड केलें, आणि अखेर पळून गेला. पांचवा **दवलतखान** हा वेडसर असून **इब्राहीम कुतुबशाहाच्या** कारकीर्दींत मरण पावला, व सहावा **इब्राहीम** हा **जमशीदच्या** मागून गादीवर बसला.

जेव्हां **जमशीदास** कळलें कीं; आपला वडील बंधु **कुतुबउद्दीन** ह्यास **कुलीकुतुबशाहानें** आपल्या मागून गादीवर बसविण्याचा निश्चय केला आहे, तेव्हां त्यानें त्यास मारून गादी बळकाविण्याचा बेत केला. हें वर्तमान शाहास कळतांच त्यानें त्यास कैद करवून गोवळकोंड्याच्या एका अंधारकोठडींत कोंडून ठेविलें होतें. ह्यामुळें त्यानें आपल्या बापाचा वध करण्याचा संकल्प करून तो कोतवालाकडून वरती सांगितल्या प्रमाणें सिद्धीस नेला.

# जमशीद कुतुबशाहा.

## इसवी सन १५४३ ते १५५० पर्यंत.

जमशीद गादीवर बसतो, व इब्राहिमास धरण्याचा यत्न करितो.—— तो प्रथम बेरिदाकडे व नंतर रामराजाकडे आश्रय घेतो.—— रामराजाची मूळ हकीकत.—— विजापुरावर स्वारी.—— बेरीद जमशीदावर स्वारी करितो व तह होतो.—— जमशीद बेदरावर जातो.—— काशीम बेरिदाशीं लढाई व त्याचा पराभव.—— बेरीदशाही घांटून घेण्याचा बेत.—— ते काशीम बेरिदास कैद करितात —— जमशीद बेरिदास पुनः गादीवर बसवितो.—— जमशिदाचा मृत्यु.

---

मीर महंमद हमदानी ह्यानें कुली कुतुबशाहाचा वध केल्यानंतर तावडतोब गोवळकोंड्यास येऊन जमशीदास मुक्त केलें, आणि तेथून राजवाड्यांत प्रवेश करून शाहाजादा कुतुब उद्दीन जेथें राहात असे तेथें जाऊन त्यास पकडून अंध करून जमशिदास मोठ्या समारंभानें गादीवर बसविलें.

जमशीद कुतुबशाहा सिंहासनारूढ होतांच त्यानें देवरकोंड्याच्या किल्लेदारास असा हुकूम पाठविला कीं, आपला कनिष्ट बंधु इब्राहीम यास धरून हुजूर रवाना करावें. हें वृत्त शाहाजाद्यास समजतांच त्यानें बेदरास पळायन केलें. तेथें कासीम बेरिदानें त्यास आश्रय दिला, व फौज घेऊन त्याच्या मदतीसही निघाला. तो गोंवळकोंड्यापर्यंत विन हरकत येऊन पोहोंचल्यावर गोवळकोंड्याच्या एका शाहाजाद्यास बगलेंत मारून कासीमबेरिदानें तेलंगणावर स्वारी केली. हें दक्षणेंतील इतर शाहांस विषम वाटलें, म्हणूनच बुऱ्हाण निजामशाहा स्वतः फौज घेऊन जमशीदाच्या मदतीस गेला. तो आला तेव्हां कासिमानें कोहीर घेऊन तेथेंच मुकाम केला होता. त्यावर निजामशाहानें हल्ला करून किल्ला सर केला. तेव्हां निजामशाही व कुतुबशाही या दोन्ही फौजांबरोबर आपला टिकाव लागणार नाहीं असें पाहून कासीम बेरीद विजापुराकडे हटला, व शाहाजादा इ-

जमशीद गादीवर बसतो व इब्राहिमास धरण्याचा यत्न करितो.

तो प्रथम बेरिदाकडे व नंतर रामराजाकडे आश्रय घेतो.

ब्राहीम विजयानगरास पळून रामराजाच्या आश्रयास राहिला.

विजयानगरच्या रामराजाविषयीं गोंवळकोंड्याच्या इतिहासांत असें लिहिलें आहे:-रामराजा हा आरंभीं गोंवळकोंड्याच्या दरबारीं एक सरदार होता. जेव्हां विजयानगरच्या मुलखापैकीं कांहीं सरहद्दीवरील प्रांत कुली कुतुबशाहानें घेतला, तेव्हां रामराजास त्या प्रांतावर शाहानें नेमिलें. आणि ते प्रांत त्याच्या ताब्यांत देऊन शाहा गोंवळकोंड्यास आला. पुढें आदिलशाही फौजेनें त्या प्रांतावर हल्ला केला त्या वेळीं रामराजा पळाला, व शाहाकडे आला. तेव्हां कुतुबशाहानें हा त्याचा भित्रेपणा पाहून त्यास दरबारांतून घालविलें. नंतर तो विजयानगरास जाऊन कृष्णरायाकडे नोकरीस राहिला. त्यानें त्याची हुशारी पाहून त्यास आपली मुलगी देऊन लग्न केलें, आणि आपल्या दरबारीं मोठ्या योग्यतेस चढविलें. कृष्णरायाच्या मरणानंतर त्याचा मुलगा अल्पवयी असल्यामुळें रामराजाच कारभार पाहूं लागला. असें होतां होतां शेवटीं तर त्यानें ती गादीच बळकाविली! जेव्हां इब्राहीम कुतुबशाहा विजयानगरास पळून गेला, तेव्हां हा रामराजा गादीवर होता. त्यानें इब्राहिमास आश्रा देऊन त्याचा सत्कार केला.

रामराजाची मूळ हकीगत.

कासीम बेरीद विजापुराकडे मागें हटल्यावर जमशीद कुतुबशाहानें बुऱ्हाण निजामशाहाची स्वस्थपणें भेट घेतली. त्यावेळीं असें ठरलें कीं, जमशीद, बुऱ्हाण आणि वऱ्हाडचा इमादशाहा यांनीं एकत्र होऊन विजापुरावर स्वारी करावी. त्याप्रमाणें त्या तिन्ही राजांच्या फौजा एक होऊन सोलापुरावर हल्ला झाला. हें वर्तमान इब्राहीम आदिलशाहास समजल्यावर शत्रूंस सोलापुराहून घालविण्याकरितां तो कासीम बेरिदास घेऊन निजामशाही सरहद्दीवरील परिंडा किल्ल्यास गेला, व त्यास त्यांनीं वेढा घातला. तेव्हां तिघां राजांनीं सोलापुराहून परिंड्याकडे कूच केलें. इब्राहिमानें त्यांवर खासपूर गांवीं एकाएकीं छापा घालून लढाईस सुरुवात केली. तींत जमशीद हा फार मर्दुमकीनें लढला, आणि विजापुरच्या शाहाचा त्यानें अगदीं पराभव करून त्यानें सर्व सामानसुमान पकडलें. नंतर जमशीद कासिमाच्या पाठीस लागला, व त्याचा पिच्छा पुरवीत थेट बेदरपर्यंत गेला आणि बेदरशाही मुलूख लुटून फस्त करून गोंवळकोंड्या-

विजापुरावर स्वारी.

स परत आला.

जमशीद कुतुबशाहा गोवळकोंड्यास गेल्याचें वर्तमान कासीमबेरिदास समजतांच तो आठ हजार स्वार व पुष्कळ पायदळ घेऊन जमशिदावर स्वारी करण्यास निघाला. गोवळकोंड्यापासून चार कोसांवर मो येईपर्यंत जमशिदास त्याची दाद देखील नव्हती. ती कळतांच तो फार घाबरला, आणि थोडीशी फौज गोवळकोंड्याच्या संरक्षणार्थ ठेवून आपल्या कांहीं फौजबंद सरदारांसह बेदराकडे निघाला. जमशिद मार्गांत बेरिदशाहाचा प्रांत उजाड करीत चालला. ही बातमी कासिमास समजल्यावर तो गोवळकोंड्याचा वेढा उठवून बेदराकडे निघाला. त्यावर जमशिदानें पटणचेरू गांवापाशीं हल्ला केला, तेव्हां शेवटीं दोघांचीही समजूत होऊन ते आपापल्या राजधान्यास गेले.

बेरीद जमशिदावर स्वारी करितो व तह होतो.

गोवळकोंड्यास परत आल्यावर जमशीद पुनः द्रव्य व सैन्य जमवून बेदराकडे निघाला, आणि कोकस प्रांतीं पोंहोंचल्यावर त्यानें मुलूख लुटून उजाड करण्यास टोळधाडी प्रमाणें आपले लोक सोडिले. तेव्हां कासीमबेरीद आठ हजार स्वार व शिवाय पायदळ घेऊन जमशिदावर चालून आला. त्याकडील मराठा सरदार जगदेवराव नाईक यानें कोकस नजीक टेंकड्यांवर एक लहानसा किल्ला बांधून देण्याचें काम पत्करिल्यामुळें त्याजकडे थोडीशी फौज ठेवून बाकी फौजेनिशीं जमशीद कासिमावर चढाव करून गेला. दोघांच्या झटापटी चालल्या होत्या, इतक्यांत जगदेवरावानें किल्ला पुरा केल्याचें वर्तमान जमशिदास कळतांच थोड्या सैन्यासह तो कोकसकडे वळला तोंच कासिमानें त्याच्या छावणीवर एकदम छापा घालून जमशिदाच्या सैन्याचा अगदीं पराभव केला, परंतु कासिमाकडे तसेंच पुढें जमशिदावर चालून जाण्याचें सामर्थ्य नसल्याकारणानें तो परत बेदरास आला. ह्या भानगडींत जमशिदास कोकस, नारायणखेड, आणि आसनाबाद हे प्रांत मिळाले. त्यावर जगदेवरावाची नेमणूक करून तोही गोवळकोंड्यास गेला.

जमशीद बेदरावर जातो.

बुऱ्हाण निजामशाहाचें सहाय्य संपादन करून तो व कुतुबशाहा आवसें व उदगीर प्रांत घेण्यास आले, आणि निजामशाहा ते घेण्यास रा-

हून मेदकचा किल्ला घेण्याकरितां जमशीद निघाला. त्यानें त्यास कडेकोट जगी वेढा देऊन बरेंच दिवसांनीं एकदां हल्ला केला. तेव्हां किल्लेदारानें कौलानें किल्ला ताबीन केला. निजामशाहानेंही वरील दोन प्रांत घेतले. यावेळीं कासीम बेरिदाचा निरूपाय होऊन त्यानें इब्राहीम आदिलशाहाकडे कुमक मागितली. आदिलशाहानें पांच हजार स्वार एकलासखानाच्या ताब्यांत देऊन बेरिदाच्या मदतीस पाठविले. बेरीद एकलासखानासह कौकसकडे निघाला. त्यास नारायणखेड येथें जमशीदशाहानें अडविलें. तेथें दोन्ही सैन्याची चकमक झडण्यास प्रारंभ होऊन कुतुबशाहा मध्यभागीं उजवे व डावे बाजूस सैफखान, ऐनउल्मुल्क आणि जगदेवराव नाईक राहिले. इकडे कासीम बेरीद मध्यभागीं आणि एकलासखान व आपला भाऊ खानजहान यांस बेरिदानें डाव्या व उजव्या बाजूस उभें केलें. सैफखानानें मोठी शिकस्त करून शत्रु सैन्याची डावी फळी फोडिली.त्याबरोबर भयाभीत होऊन शत्रूंचा पराभव झाला. त्यांत बेरिदाचे चांगले शूर सरदार व शिपाई बहुत पडले आणि बरेच जखमी झाले. याप्रमाणें त्यांचा पराभव होऊन ते मागें हटतांच जमशीद विजयी होऊन गोंवळकोंड्यास आला.

कासीम बेरिदाशीं लढाई व त्याचा पराभव.

कासीम बेरिदाचा वरचेवर असा निष्कारणी उपद्रव होतो, हें बंद करण्यास दक्षणेंतील सर्व राजांनीं एक होऊन त्याचा फडशा पाडण्याची कांहीं हिकमत काढावी, असा जमशीद कुतुबशाहानें विचार चालवितांच प्रथम कासिमाचा स्नेही इब्राहीम आदिलशाहा ह्यास मित्रत्वांतून फोडून बेरीदशाही प्रांत वांटून घेण्यास त्यास सामील करून घेतलें पाहिजे. हा विचार जमशिदानें बुऱ्हाण निजामशाहास कळविला. त्यानें लगेच इब्राहीम आदिलशाहाकडे वकील पाठवून कळविलें. कीं, बुऱ्हाण निजामशाहानें बेरीदशाही प्रांत हातांखालीं घालावा, इब्राहिमानें साधेल तितका विजयानगरचा मुलूख घ्यावा.” त्या प्रमाणें ठरल्यानंतर बुऱ्हाण बेरीदशाही मुलुखांत घुसला, आणि त्यानें कंधारचा किल्ला छापा घालून घेतला. तेव्हां कासीम बेरीद घाबरून स्वसंरक्षणार्थ इब्राहिमाकडे गेला. त्याबरोबर त्यानें त्यास धरून कैद केलें! नंतर इब्राहिमानें दक्षणेकडे कूच करून विजयान-

बेरीदशाहीवांटून घेण्याचा बेत.

कासीम बेरिदास कैद करितात.

गरच्या राजाचा बराच मांत घेतला. तसाच विजापूरकरांनींही प्रकारकेला. हें कृत्य निजामशाहाच्या डोळ्यांत फार सलूं लागलें. आतां आदिलशाहा फार बलिष्ट होऊन सर्व दक्षणेंतील राजांस डोईजड होईल,ही गोष्ट इष्ट नाहीं म्हणून इब्राहीम दक्षणेकडे गुंतला असतां बुऱ्हाणशाहानें सोलापुरावर हल्ला केला. तेव्हां इब्राहीम ताबडतोब परतून सोलापूरच्या बचावास आला. दोघांही राजांनीं जमशीद कुतुबशाहाकडे मदत करण्याची विनंति करितांच कोणाकडे जावें हा त्यास विचार पडून एकासही तो वचन न देतां फौजेसह सोलापुरास गेला. तेथेंही कांहीं दिवस तो तिऱ्हाईतपणानेंच होता. इतक्यांत कासीमबेरिदाकडून त्यास गुप्त निरोप आला कीं, "जर माझी मुक्तता कराल तर मी बेरीदशाहीपैकीं जितका मागाल तितका मांत देईन" त्यावेळीं इब्राहिमाकडील वकिलास बोलावून जमशीदशाहानें सांगितलें. "कासीम बेरिदास मुक्त करून सुभा उलरवेड घोडा व नरंझ व चंचल हे दोन हत्ती आणून देईपर्यंत तुमचें कोणतेंही म्हणणें माझ्यानें ऐकवत नाहीं"! त्या प्रमाणें त्या वकिलानें कासीम बेरिदास हत्ती घोड्यांसह हजर केलें. परंतु त्याजबद्दल आभारप्रदर्शक उत्तर मात्र पाठवून नंतर कोणास मिळावें ह्याचा जमशीदानें विचार करून निश्चय केला कीं, "प्रस्तुत कोणासच मिळणें बरोबर नाहीं." नंतर तो बेरिदास घेऊन बेदरास गेला, आणि मोठ्या समारंभानें कासीमास त्यानें गादीवर बसवून गोवळकोंड्यास आगमन केलें.

जमशीद बेरिदास पुनः गादीवर बसवितो.

त्या वेळीं परत आल्यावर जमशीद कुतुबशाहानें सर्व सोडून देऊन क्रीडेमध्यें व जनानख्यान्यांत काळ घालविण्याचा क्रम सुरू केला. महिन्याचे महिने तो एकसारखा विषयांत निमग्न असे.त्याच्या दर्शनाचीही लोकांस पंचाईत पडूं लागली. असा कांहीं काळ ऐषआरामांत व ख्यालीखुशालींत गर्क झाल्यावर त्यास जबरदस्त दुखणें लागलें व ते बळावून सन १५५० त त्यास मृत्यूनें गांठिलें. त्यानें एकंदर सात वर्षें राज्य केलें. मरणानंतर जमशीद कुतुबशाहाच्या प्रेतास त्याच्या बापाच्या कबरे शेजारींच पुरिलें.

शाहाचा मृत्यु. इ. स. १५५०

# सुभानकुळी कुतुबशाहा.

इसवीसन १५५०.

सुभानकुलीस गादीवर बसवितात —— जगदेवराव दौलतखानास मुक्त करितो. —— सैफ उल्मुल्क कारभार करूं लागतो. —— जगदेवराव व दौलतखान यांस धरून कैद करितो. —— इब्राहीम परत येतो. —— सुभान कैद होतो, व इब्राहीम गादीवर बसतो.

---

सुल्तान जमशीद कुतुबशाहा मरण पावल्यानंतर दरबारच्या कित्येक सरदारांनीं त्याचा मुलगा सुभान कुळी सात वर्षांच्या वयाचा असतां त्यास गादीवर बसविलें, आणि राज्याचा कारभार पाहण्यास राणीनें सरदारांच्या व अमीर उमरावांच्या इतल्यानें सैफउल्मुल्कास नेमण्याचें ठरवून त्यास बोलावून आणण्याकरितां मनुष्य पाठविले. मागील राजानें घालवून दिल्यामुळें सैफ उल्मुल्क अहंमदनगरच्या दरबारीं जाऊन राहिला होता. त्या समयास अवघ्या सरदार मंडळांत जगदेवरावाचें वजन व धाकदरारा जास्त असून तोच सर्वांत मुख्य असे. मागील राजाचा धाकटा भाऊ दौलतखान त्यानें आपणास गादीवर बसवावें असें बहिरीखान व जगदेवराव त्यांकडे बोलणें काढिलें. परंतु तें त्यांस नापसंत पडून जगदेवराव फितुरी करीत आहे, असें ते प्रसिद्धपणें बोलूं लागले. तेव्हां आपली फौज जमवून जगदेवराव गोवळकोंड्याहून निघाला, आणि भवानगड किल्ल्यावर दौलतखान कैदेंत होता, त्याजकडे गेला. त्यानें तेथून त्यास मुक्त करून आसपासच्या नाईक लोकांस अनुकूल करून घेऊन भवानगडच्या आसमंतांत दौलतखानाचा अंमल बसविला.

सुभान कुळीस गादीवर बसवितात.

जगदेवराव दौलतखानास मुक्त करितो.

जेव्हां अहंमदनगराहून येऊन सैफखान कारभार पाहूं लागला तेव्हां त्यानें फौज जमा करून जगदेवरावाच्या बंदोबस्तास कूच केलें. त्यावरोबर आपल्या एकट्याचा लागावा तसा निभाव लागणार नाहीं म्हणून जगदेवरावानें वऱ्हाडचा कारभारी तोफालखान

त्यास कुमकेस बोलाविलें. तो येऊन त्यास मिळतांच सैफखानाबरोबर सिंयाम येथें मोठी लढाई झाली. त्यांत दौलतखानाच्या सैन्याचा पराभव होऊन तो व जगदेवराव भवानगडावर पळून गेले. सैफखानानें त्याही किल्ल्यास वेढा दिला तरी पुष्कळ दिवस किल्ला हातीं लागला नाहीं. शेवटीं किल्ल्यांत अन्नाचा दुष्काळ पडल्यावर जगदेवराव आणि दौलतखान स्वाधीन झाले. त्यानें दौलतखानास तेथेंच कैद करून जगदेवरावास धरून गोवळकोंड्यास कैदी करून ठेविलें.

सैफउन्मुल्क कारभार करूं लागतो.

जगदेवराव व दौलतखान यांस धरून कैद करितो.

हें बंड मोडल्यावर सैफखान अगदीं स्वतंत्र झाल्यासारखा झाला. सर्व सत्ता त्याच्या हातीं येतांच तो कोणासच जुमानीनासा होऊन मनस्वीक वर्तन करूं लागून सरदार लोकांची बेअदबी इतकी होऊं लागली कीं, ते फार त्रासले, आणि त्यांनीं माजी शाहाचा कनिष्ठ बंधु शाहाजादा इब्राहीम विजयानगर येथें होता. त्यास बोलावणें पाठविलें. त्यानें आपला आश्रयदाता रामराजा याचा निरोप घेऊन तो देत होता तें सैन्य न घेतां एकटाच निघून पानगलास आला. तेथें त्यास थोडेसे कुतुबशाहींतील सरदार मिळाले. आणि फार थोड्या अवकाशांत त्याजवळ तीन हजार स्वार व पांच हजार पायदळ इतकी फौज जमली. तसेंच कोविलकोंड्याचे नाईक त्यास अनुकूल झाले. तेव्हां तो तेथें गेला. त्यांनीं त्यास हा आपला धनी आहे, असें समजून नजरनजराणे दिले. तसतसे पुढें त्यास जास्त लोक मिळूं लागले. दोन महिन्यांत त्याजकडे उत्कृष्ट असे चार हजार स्वार जमतांच त्याजवर हल्ला करण्यास सैफखान निघाला. तो गोवळकोंड्याहून गणपुर्यापर्यंत बिनहरकत आला. हें वर्तमान इब्राहिमास समजल्यानंतर त्यानें लागेच कोविलकोंड्याच्या नाइकांपैकीं एकास गोवळकोंड्यास पाठविलें. त्या नाइकानें गोवळकोंड्याच्या नाईकांस सामील करून घेऊन जगदेवरावास तुरुंगांतून सोडविलें. नंतर त्याच्या साहसानें व पराक्रमानें सैफखानानें शहरच्या बंदोबस्तास नेमलेला जो जगतराव त्यास पकडून गोवळकोंड्याच किल्ल्यांत

इब्राहीम परत येतो.

सुभान कुली कैद होतो.

विडी घालून ठेविलें. सुभानकुली पक्षाच्या सरदार लोकांस पकडून त्यांस ठार मारिलें, व सुभान कुलीस बंदीवान बनविलें. ह्याप्रमाणें गोवळकोंडची हकीगत सैफरवान व इब्राहीम यांस समजल्यानंतर सैफरवान मोठ्या लीनतेनें इब्राहिमापाशीं क्षमा मागूं लागला. परंतु मी गादीवर बसेपर्यंत कोणच्याच प्रकारचें वचन देऊं शकत नाहीं, असें त्यास उत्तर मिळाल्यामुळें यदाकदाचित् पुढें आपल्यास धरून मारतील, असें पक्कें समजून तो आपले लोक घेऊन तेथून निसटला. त्याच्या मागें इब्राहीम न लागतां थेट गोवळकोंड्यास आला, आणि इसवी सन १५५० च्या जुलई महिन्याच्या २७ व्या तारखेस सिंहासनारूढ झाला.

इब्राहीम गादीवर बसतो. इसवी सन १५५०.

---

# इब्राहीम कुतुबशाहा.

## इ. स. १५५० ते १५८० पर्यंत.

इब्राहिमास इतर राजांकडून पत्रें येतात.—— रामराजाचें पत्र.—— विजापूरकरांबरोबर तह.—— रामराजाचे भाऊ बंड करितात, व कुतुबशाहाच्या मदतीनें तें मोडतें.—— जगदेवराव दिवाण होतो.—— त्याचा हस्तक रायराव यास शाहाठार मारितो.—— जगदेवराव वऱ्हाडांत पळून जातो व बंड करितो.—— जगदेवराव कुतुबशाही प्रांतांत शिरतो, व त्यावर मुस्तफाखान जातो.—— जगदेवरायाचा पराभव होतो व तो विजापुरीं जातो.—— हुसेन विजापुरावर स्वारी करितो.—— विजापूरकर रामराजास घेऊन नगरास वेढा देतात.—— कुतुबशाहा त्यांस मिळतो परंतु आंतून निजामशाहास मदत करितो.—— कुतुबशाहा युक्तीनें वेढा उठवितो.—— हुसनाच्या मुलीचें इब्राहिमाशीं लग्न.——कल्याणीस वेढा.——वेढा उठवून कुतुबशाहा माघारा येतो.—— माघारा आल्यावर शत्रूंवर सैन्य पाठवितो.—— जगदेवराव कुतुबशाहाचे कांहीं किल्ले घेतो.——तह होतो.—— तो गोवळकोंड्या-

स तटबंदी करितो. — नाईक लोकांचें बंड. — रफतखानास हिंदुराजांवर पाठवितो. — तो सितापतीस जिंकतो — राजमहेंद्रीवर हल्ला करून सर करितो. — कासीमकोंड्यावर स्वारी करून खंडणी घेण्याचें ठरवितात. — वेलप राजावर स्वारी व खंडणी घेण्याचें ठरवून तह. — वैजनाथ देवावर स्वारी. — लढाई होते. — राजाचा पराभव होऊन खंडणी देण्याचें कबूल करितो व तह होतो. — पांचही मुसलमान राजांचा हेवा व मत्सर. — निजामावर स्वारी करण्याचा बेत. — बेत सिद्धीस जात नाहीं. — निजामशाही व आदिलशाही फौजेचा कुतुबशाही मांतावर शिलशिला व त्याचें निवारण. — आदिलशाहाची विजयानगरावर स्वारी व विजयानगरच्या कुमकेस कुतुबशाहा जातो. — व्यंकटाद्री वगैरे तीन हिंदुराजांवर स्वारी— कोंडबिड किल्यास वेढा. — निजामशाहा व कुतुबशाहा विजापुरास वेढा देतात.— अमीर झैन काकती वगैरे मांत घेतो. — इब्राहीमकुतुबशाहाचा मृत्यु. — त्याच्या मरणाची हकीकत.

---

**इब्राहीम** कुतुबशाहा गोवळकोंड्याच्या गादीवर बसल्यानंतर त्यानें आपल्या राज्याची स्थिति समजून घेण्यांत, दरबारचें काम यथायोग्यरीतीनें चालविण्यांत, आस्थापूर्वक दाद घेऊन न्यायान्याय पाहण्यांत, राज्यव्यवस्था करून चांगले कायदे कानु करून रयतेस सुखी व आबाद ठेवण्यांत आपला काळ घालवूं लागला. दक्षणेंतील दुसऱ्या राजांस जेव्हां हा राजा गादीवर बसल्याचें समजलें तेव्हां स्वानंद मदर्शित करण्यास त्यास सर्वांनीं पत्रें व वकीलपाठविले. **हुस्सेन निजामशाहानें** मौल्यवान् नजराणे देऊन एका सरदारास **इब्राहिमाकडे** पाठवून "आपण राजा झालां हें ऐकून आम्हीं फार खुष झालों" असें कळविलें. नंतर कुतुबशाहानेंही **मुस्तफाखानास** अहंमदनगरीं पाठविलें. त्यावेळीं **मुस्तफानें हुस्सेनशाहाची** मुलाखत करून असें ठरविलें कीं, "उभय राजांनीं परस्परांची भेट घेऊन बेदर व कलबुर्गी मांत घेण्यास निघावें." त्याप्रमाणें दोघेही आपापल्या लष्कराची चांगली तयारी करून कलबुर्ग्यास आले, आणि त्या किल्यास वेढा देऊन एकसारखा महिनाभर यत्न चालविला. परंतु विजापूरच्या फौजेनें त्यांचें कांहींएक चालूं दिलें नाहीं. तरी अखेर पर्यंत आपल्या एकट्याचा या दोघांपुढें निभाव लागणार नाहीं, अ-

इब्राहिमास इतर राजांकडून पत्रें येतात.

सें समजून विजापूरच्या राजानें विजयानगरच्या राजाची मदत मागि-तली. तो फौज घेऊन निघाला, आणि त्यानें इब्राहीम कुतुबशाहास पुढील मजकुराचें पत्र पाठविलें.

"आज पुष्कळ वर्षें विजापूरकर आणि अहमदनगरकर यांच्या लढाया चालल्या आहेत. परंतु दोघांचीही जवळ जवळ स्थिति असल्यामुळें आजप-र्यंत एकाचाही दुसऱ्यावर पगडा बसला नाहीं. आपले पूर्वज या कलहांत

रामराजाचें पत्र.

कधींही पडले नसतां आपण त्यांत मन घालून यशाचें श-रडें हुस्सेन निजामशाहाकडे झुकवूं पाहात असून बिलकुल कारण नस-तां लढाईस उद्युक्त झालां आहां. म्हणून विजापूरवाल्यांनीं आमच्या सहा-य्याची अपेक्षा केली आहे. आज कित्येक दिवस आपल्या व आमच्या दर-बारांत स्नेहभाव चालत आला आहे, याकरितां आपल्यापुढें ह्या सर्व बि-ना मांडून लढाईतून आपलें अंग काढण्याविषयीं आपणास सल्ला दे-णें योग्य वाटल्यावरून कळविलें आहे" याच मतलबाचीं पत्रें आदि-लशाहाकडून कुतुबशाहाकडे आलीं. तेव्हां इब्राहीमकुतुबशाहानें राम-राजाची सुत्पारवत घेऊन आदिलशाही आणि निजामशाही सरकारांत

विजापूरकर व अहंमदनगरकर यांचा तह.

तह ठरविण्याचें जोखीम आपल्या अंगावर घेतलें, व त्याप्रमाणें परस्पर राजांकडून वर्तन व्हावें एतदर्थ दु-सऱ्या राजांनी जबाबदारी पतकरून जामीन राहावें असा विचार झाला. इतक्यांत असें वर्तमान आलें कीं, रामराजाचा भाऊ येल्-नमराज व विजापूरचे सरदार पानगलच्या आसपास देश उद्ध्वस्त करीत आ-हेत. तेव्हां कुतुबशाहानें हुस्सेनशाहास लिहून भींमा आणि कृष्णा या नद्यांच्या संगमावर त्यांच्या भेटी करवून त्यांचा तह केला. नंतर सर्व आ-पआपल्या राजधानीस परत गेले.

रामराजा इकडे गुंतला असतां त्याचे दोघे भाऊ तिमराज व गो-विंदराज अदोनीचे अंमलदार यांनीं बंड उभारून अदोनी प्रांतीं स्वतंत्र-

रामराजाच्या भावांचें बंड कुतुबशाहाच्या मदतीनें मोडतें.

पणें अंमल चालवूं लागले, आणि कांहीं फौज जमाक-रून आणखी कांहीं मुलूख त्यांनीं ताब्यांत घेतला. रा-मराजा विजयानगरास आल्यानंतर त्यास ही खानगी म-मजली. त्यानें आपल्या भावांस ह्या गैरशिस्त वर्तनाबद्द-ल पत्रें लिहिलीं. परंतु त्यांनीं आपल्या फौजेच्या बळावर तीं बिलकूल

गुमानलींच नाहींत. रामराजाच्या आंगीं त्यावेळीं त्यांस यथोचित शासन करून ताब्यावर आणण्याचें सामर्थ्य नव्हतें, म्हणून त्यानें कुतुबशाहाकडे कुमक मागितली. त्यानें सहा हजार स्वार व दहा हजार पायदळ देऊन आपला सरदार **कुबुलखान** यास रामराजाकडे पाठविलें. आणि **रामराजानें सिंदराज, तिमप्पा, नूरखान** व **बिजलीखान** ह्या सरदारांबरोबर आपली फौज देऊन त्यांस कुतुबशाही फौजेसुद्धां आपल्या कितूरी व उद्धट भावांवर रवाना केलें. तेव्हां त्यांनीं अदोनी किल्याचा आश्रय घेऊन सहा महिने लढाई दिली. अखेर धान्याचा अगदीं दुकाळ पडल्यावर ते शरण आले. **रामराजानें** त्यांस क्षमा करून फौज परत विजयानगरास नेली, व **कुतुबखानास** मोठ मोठ्या नजरा देऊन गोंवळकोंड्यास जाण्यास निरोप दिला. तो तेथें गेल्यावर त्यास कुतुबशाहानें "एैन उल्मुल्क" हा किताब दिला.

**इब्राहिमास** राज्यपद प्राप्त होण्याच्या कामीं **जगदेवराव** फार उपयोगीं पडला होता. ह्यामुळें त्याचे उपकार स्मरून शाहानें त्यास मोठ्या पदवीस चढवून आपला दिवाण नेमिलें. तेव्हां ते  जगदेवराव दि-
अधिकारमदानें इतका अनिवार झाला कीं, **इब्राहीम**  वाण होते.
कुतुबशाहास पदच्यूत करून त्याचा वेडगळ भाऊ **दौलतखान** यास गादीवर बसवून सर्व सत्ता आपल्या हातीं घेण्याचा त्यानें बेत केला. हा सिद्धीस नेण्यास त्याचा हस्तक **रायराव** ह्या मुसलमान सरदारांस तुच्छ मानून त्यांची बेआदबी करूं लागला. ह्यामुळें ते सरदार फार त्रासून एकदां राजाकडे त्यांची कानउघाडणी करण्यास जाऊन म्हणाले. "ह्या दोन हिंदु अधिकाऱ्यांवर सरकार फार भरंवसा ठेवीत आहे, याचा नीट विचार करावा. कारण लष्करांत सर्व नाईक लोक असून ते **जगदेवरावाच्या** केवळ मुठींत आहेत" शाहानें हें सर्व म्हणणें जरी ऐकून घेतलें, तरी त्याचा मुळींच विचार केला नाहीं. शेवटीं **रायरावाच्या** जुलमाविषयीं व क्रूर आणि उन्मत्त कर्माविषयीं जेव्हां फारच कागाळ्या त्याच्या कानीं येऊं लागल्या, आणि त्याच संधीस **व्यंकटराव, जगदेवरावाचा** बंधु राजाचा निरोप न घेतां आपल्या जाहागिरीवर गेला. तेव्हां आतां हे खरोखरच बंड करतील, अशी कुतुबशाहाची खात्री होऊन त्यानें रायरावास धरून त्यानें शीर उडविलें आपल्या हस्तकाची अशी अवस्था अवलोक-

न करून **जगदेवराव** घाबरला, व बरोबर दोनतीन हजार स्वार घेऊन गो-

त्याचा हस्तकरा-यराव यास मारतात.

वळकोंड्याहून एलगुडलाकडे गेला. तो तिकडील प्रांत उजाड पाडीत वऱ्हाडप्रांतीं दाखल झाला. त्याचें शौर्य व पराक्रम सर्व प्रसिद्ध असल्यामुळें **बुऱ्हाण** इमादशाहानें त्याचा सन्मानपूर्वक सत्कार करून दहा हजार स्वारांची सरदारी दिली, आणि खानदे-

जगदेवराव वऱ्हाडांत पळून जाऊन बंडाळी आरंभितो.

शाचा राजा **मीरान महंमदखान** याजबरोबर जी लढाई चालली होती, तिकडे पाठविलें. **जगदेवरावानें** खानदेशच्या राजाचा पुष्कळ वेळां पराभव करून अतोनात लूट मिळविली, व वऱ्हाड प्रांतांतील लहान सहान राजास आपल्या अमलाखालीं आणिलें. आणि आपल्या जहागिरींत तीन हजार स्वार, इराणी, हबशी व आरब लोकांचें बरेंच पायदळ जमवून वऱ्हाड व खानदेश या दोन्ही देशाच्या राजास तो जुमानीनासा झाला. त्या प्रसंगीं वऱ्हाडच्या राजानें “दीनासारखा आलास म्हणून मी तुला सरदारी देऊन आधार दिला, ते उपकार असे फेडण्यास तूं प्रवृत्त व्हावें, हें तुला नीट शोभलें काय? मला वाटतें असें केलेंस तर तुझ्या कृतघ्नपणास सीमाच राहणार नाहीं.” असें त्यास कळविलें. **जगदेवरावानें** आपल्या ताब्यांत वऱ्हाडांतील कोणताच किल्ला घेतला नव्हता. म्हणून निर्भयपणानें राहण्यास त्यास कोठेंच जागा नव्हती. एतदर्थ त्यानें “आपण मजवर जी मेहेरबानी केली, त्याबद्दल मी कधींही कृतघ्नपणा करणार नाहीं.” असें उत्तर पाठवून वऱ्हाडांतील एलगुडाकडे कूच केलें, आणि तेथून विजयानगरास जाण्याचा त्याचा बेत होता.

आरब, इराणी व हबशी असे पांच हजार लोक तीनशें हत्तीं, आणि शिवाय दक्षणी पायदळ अशी फौज घेऊन **जगदेवराव** एलगुडलाकडे आल्याचें वर्तमान कुतुबशाहास समजतांच त्यानें **मुस्तफाखानास** त्यावर पाठविलें. तेव्हां खानानें **जगदेवरावास** लिहिलें कीं, “तूं शरण येऊन शाहाकडे क्षमा मागशील तर तुला तुझी पूर्वीची जाहागिरी देखील मिळण्याचा संभव आहे.” परंतु तें न जुमानतां त्यानें आपल्या लोकांस लढाईस तयार होण्याचा हुकूम दिला. **मुस्तफाखानही** तयारींत होताच. दोघांमध्यें भयंकर युद्ध होऊन **जगदेवरावाचा** भाऊ **व्यंकटराव** पडला, तसेच त्याचे चार नामी आरब हुद्देदार ठार झाले. आणि पुष्क-

ळ लोक जखमी होऊन त्याचा पराभव झाला. तेव्हां सर्व सामान सुमान हत्ती घोडे वगैरे टाकून **जगदेवराव** विजापुरास पळून गेला. **कुतुबशाहानें** फक्त हत्ती आपल्या- करितां ठेवून बाकीची लूट शिपाईलोकांस वांटून दिली.

जगदेवराव पराभव पावून विजापुरीं जातो.

कृष्णा व भीमा या दोन नद्यांच्या संगमावर **इब्राहीम आदिलशाहा** व निजामशाहा ह्या दोघांमध्यें तह झाल्यानंतर आदिलशाहा मरण पावून त्याचा लहान मुलगा **अली** गादीवर बसला. ह्या अर्भकाच्या हातून आपणास अडथळा होण्याचा संभव नाहीं, असें समजून **हुस्सेन** निजामशाहानें विजापूर मुलखावर स्वारी केली. तेव्हां **अली** भयाभीत होऊन तेथून निघाला, आणि स्वतः विजयानगरास जाऊन **रामराजाची** कुमक घेऊन आला. विजापूरची व विजयानगरची अशा दोन्ही फौजा बेधडक अहंमदनगरास गेल्यावर **अली आदिलशाहा** व **रामराजा** ह्यांनीं मागील तहा प्रमाणें मदतीस येण्याविषयीं कुतुबशाहास पत्र लिहिलें. परंतु आपला पुराणा दोस्त निजामशाहा त्याशीं लढण्यास कुतुबशाहा खुष नव्हता. तहाविरुद्ध वर्तन करणें हें ठीक दिसणार नाहीं, आणि त्यामुळें यदाकदाचित् आपल्या प्रांतावर धाड येईल, म्हणून तो विजापूर व विजयानगरवाल्यांस कल्बुर्गा येथें जाऊन मिळाला. ह्या फौजेशीं लढाई करण्यास निजामशाहास छाती होईना. तेव्हां तो अहंमदनगरच्या किल्यांत मुबलक सामग्री व दारू गोळा भरून आणि संरक्षणास त्यावर फौज ठेवून दौलताबादेस निघाला. इतक्यांत कुतुबशाहाचें त्यास पत्र आलें कीं, "निरुपायास्तव मी तुझ्या शत्रूंस मिळालों आहें. परंतु खात्रीनें सांगतों कीं, मी तुला माझ्या हातानें होईल तितकी मदत करण्यास सिद्ध असून लढाई महकूब करण्याविषयीं होईल तितकी खटपट करीन." तसेंच अहंमदनगर किल्यावरील अधिकाऱ्यांसही त्यानें लिहिलें कीं, "मोठ्या दमानें व नेटानें किल्ला लढवा, आणि अखेरपर्यंत शत्रूंस शरण न जाण्याची हिंमत धरा. मी मजकडून होईल तितकी मदत करीन." असो. किल्यास शत्रूंनीं वेढा दिला, तो दोन महिने होता. तेव्हां शत्रूंचा दम हळू हळू सुटत चालला. ह्या संधीस कुतुबशाहानें विजयानगरच्या कित्येक सरदारांस अनुकूल करून फौज परत न्या-

हुस्सेन विजापुरावर स्वारी करितो.

विजापूरकर रामराजास घेऊन नगरास वेढा देतात.

कुतुबशाहा त्यास येऊन मिळतो.

परंतु तो आंतून निजामशाहास मदत करितो.

वी, असें आपल्या राजास सुचविण्याविषयीं शिकविलें. ते रामराजास म्हणाले, आता पर्जन्यकाळ समीप आला. आपल्या मुलखापासून आपण फार लांब आलों आहों. बरसात सुरू होऊन एकदां नद्या भरल्या म्हणजे येथें कुचंबत राहावें लागेल. ह्या सांगण्यावरून राजाची खात्री होऊन तो परत जाण्यास सिद्ध झाला. परंतु अल्ली आदिलशाहास "अहंमदनगर किल्यांत अगदीं दुष्काळ पडला आहे," अशी पक्की खानगी लागली होती. म्हणून तो रामराजाची भेट घेऊन किल्ला हस्तगत होईपर्यंत न जाण्याविषयीं त्याचें मन वळवून आणखी एक महिना राहिल्यास इंगळी मांत आपल्यास देईन; असें सांगूं लागला. त्यास रामराजा मान्य होऊन किल्याच्या वेढ्याचें काम अधिक जोमानें चालविलें, आणि कुतुबशाहाही आपल्या छावणींतून नगरच्या किल्यांत सामुग्री पोंचवूं लागला. दवलताबादेहून जे गोलंदाज आले, त्यांस आपल्या छावणींत ठेवून घेऊन कुतुबशाहानें त्यांस किल्यावर पोहोंचविलें. इतकें झालें तरी विजयानगर व विजापूरचे लोक लगट करून तटासमीप येऊन भिडले. आणि हे आतां निःशंक किल्यांत शिरून तो घेतात असें दिसूं लागतांच आणखी एकदां विजयानगरच्या फौजेस मागें हटविण्याचा यत्न करावा, असें कुतुबशाहानें मनांत योजून आपला सेनाधिपति मुस्तफखान यास रामराजाकडे पाठवून त्याजकडून आपली होती तितकी परकाष्टा करवून आतां गोवळकोंडची फौज माघारी गेली पाहिजे; यापुढें तिचें राहणें चांगलें नव्हे; बरसात सुरू होण्याचा समय आला; गुजराथ व बऱ्हाणपूर येथील राजे फौजा घेऊन हुस्सेनशाहाच्या कुमकेस येत आहेत; वगैरे शेंकडों कारणें परत जाण्याबद्दल दर्शविलीं. परंतु त्यांतून एकही रामराजा मानीना. शेवटीं फौज मागें न्याल तर कुतुबशाहा कंडापिली परगणा व कंडापिली किल्ला आपणास देतील, असें सांगतांच त्यानें रुकार दिला. मग त्यानें अल्ली आदिलशाहास निरोप पाठविला, व तीनही राजांस अहंमदनगराहून परतविलें.

कुतुबशाहा युक्तीनें वेढा उठविता.

आदिलशाहा व विजयानगरकर अहंमदनगराकडे गेले, तेव्हां कल्याणी किल्ला घेऊन तो विजापूरकरांनीं आपल्या ताब्यांत ठेविला होता. पुढें ते वर लिहिल्याप्रमाणें परतल्यावर हुस्सेन निजामशाहानें इब्राहीमशाहाकडे मौलाना इनायत उल्ला ह्या वकीलास पाठवून अहंमदनगरास

वेढा पडला असतां कुतुबशाहानें जें सहाय्य केलें, त्याबद्दल आभार मानून गोवळकोंड्यास सुरक्षीत पोहोंचल्याबद्दल आनंद प्रदर्शित केला. आणि हुस्सेनशाहानें आपली मुलगी इब्राहिमास देण्याचें ठरावून उभयतां कल्याणीनजीक येऊन लग्नसमारंभ मोठ्या थाटानें झाला.

हुसेनाच्या मुलीचें कुतुबशाहाशीं लग्न.

नंतर त्या उभयतांनीं विजापूरकरांकडून कल्याणी घेण्याचा बेत करून त्या किल्यास वेढा घातला. तेव्हां अल्लीआदिलशाहानें रामराजाचें सहाय्य मागितलें. म्हणून तो फौज घेऊन निघाला. तसाच बेदरचा अल्लीबेरीदशाहाही आदिलशाहाच्या बोलावण्यावरून आला. या प्रमाणें राजत्रय कल्याणीकडे चालले. शिवाय रामराजानें आपला बंधु व्यंकटाद्रि व जगदेवराव आणि ऐनउल्मुल्क यांस पंचवीस हजार स्वार व तीस हजार पायदळ देऊन तेलंगणच्या दक्षिण भागावर स्वारी करण्यास रवाना केलें.

कल्याणीस वेढा.

अशी दोहींकडून शत्रूशीं गांठ पडतांच इब्राहीम व हुस्सेन यांनीं विचार करून कल्याणीचा वेढा उठविला, आणि ते परत जाण्यास निघाले. परंतु इब्राहिमाची वाट शत्रूंच्या प्रांतातून होती, म्हणून हुस्सेनानें आपला मुलगा मूर्तिजा ह्यास तीन हजार स्वारांनिशी त्याबरोबर दिलें. इब्राहिमाच्या मागें विजापूरची फौज लागली तेव्हां तो शीरखान हसन, आरबखान, दौलतखान व शेख महंमद मुस्तुफा यांस त्यांच्या पथकासह आघाडीफौजेच्या बचावाकरितां पिछाडीस ठेवून चालला. पहिल्याच मुकामास अतिशय पाऊस पडून चिखल झाला, आणि तोफांच्या गाड्या चालण्याची मारामार पडली. तथापि पिछाडीच्या लोकांनीं विजापूरच्या फौजेस इतक्या चातुर्यानें गुंतविलें कीं, आघाडीची सर्व फौज सुरक्षित गोवळकोंड्यास पोहोंचली. पिछाडीपैकीं अरबखान व मुस्तफाखान हे शत्रूकडे पाडाव झाले, व कुतुबशाहाच्या साऱ्या तोफा मागें राहिल्या.

इब्राहीम परत आल्यावर त्यानें व्यंकटाद्रि जगदेवराव यांवर मुझाहीदखानास फौज देऊन पाठविलें. त्यांची तोरंगलासमीप लढाई जुंपून बरेंच दिवस चालली होती. तरी अमक्याचा जय झाला, असें म्हणतां येईना.

व्यंकटाद्री व जगदेवराव यांवर मुझाहीद ख्वानास पाठवितो.

रामराजानें कोंडबीडचा राजा सिंदराज तिमप्पा यास पन्नास हजार स्वारांनिशी कंडापिली व मच्छलीपट्टण घेण्यास अ-

पला जांवई तुमराज यास वीस हजार स्वारांसह देवाककोंडा आणि इंद्रकोंडा घेण्यास पाठविलें, व आपण गोवळकोंड्याच्या आसपास लुटालूट करूं लागला. ही गडबड जरी सतत चार महिने चालली होती, तरी कुतुबशाहींतील एकही किल्ला हस्तगत झाला नव्हता. शेवटीं जगदेवरावानें नाईक लोकांस फितवून पानगल, कोविलकोंडा, व गणपुरा हे किल्ले घेतले आणि काशीरावानें इंद्रकोंडा रामराजाकडील सरदारांच्या स्वाधीन केला.

जगदेवराव कांहीं कुतुबशाही किल्ले घेतो.

त्याप्रमाणें सर्व कुतुबशाही प्रांतांत जरी शत्रु शिरले; आणि कुतुबशाहा आपल्या राजधानींत कोंडून राहिला, तरी आतां असें राहणें नीट नव्हे, यापासून चांगला परिणाम होणार नाहीं, असें जेव्हां त्यास वाटलें, तेव्हां त्यानें नारापल्ली येथें शत्रूंवर हल्ला करून त्यांशीं लढाई करण्याचा बेत ठरविला. इतक्यांत अल्ली बेरीदशाहानें गुप्तपणें इब्राहीमशाहास निरोप पाठविला कीं, "तुम्हीं आपला प्रधान मुस्तफाखान ह्यास तहाचें बोलणें लावण्यास पाठवावें." मुस्तफाखानास आंतून कुतुबशाहानें सांगितलें कीं, "तूं प्रथम जगदेवरावास वश करावेंस. आणि तसें झाल्याशिवाय आपणास फायदेशीर अशीं तहाचीं कलमें कधींही ठरणार नाहींत. त्या प्रमाणें मुस्तफाखानानें त्यास अनुकूल करून घेऊन त्याच्या विद्यमानें त्यानें अल्ली आदिलशाहाची भेट घेतली, आणि अल्ली त्यास घेऊन रामराजाकडे गेला. शेवटीं गणपुराव पानगल हे दोन किल्ले आपणास घेऊन त्यानें मोठ्या खुषीनें लढाई तहकूब करण्याविषयीं रुकार देऊन सर्व राजे आपआपल्या राजधानीस गेले.

तह होतो.

इतकें अरिष्ट टळल्यावर इब्राहीम कुतुबशाहा विचार करूं लागला कीं, जर शत्रूंनीं गोंवळकोंड्यासच वेढा दिला असता, तर आपली दशा काय झाली असती? कारण गोंवळकोंड्यास तटबंदी वगैरे मजबुती नव्हती. तेव्हां त्यानें त्यासभोंवार भक्कम चुनेगच्ची दगडी तट बांधण्यास प्रारंभ केला, आणि सर्व सरदारांस त्याच्या आंत वाडे बांधण्यास लाविलें.

गोवळकोंड्यास तटबंदी होते.

ह्यानंतर गोवळकोंड्याच्या फौजेंतील नाईक लोकांनीं कुतुबशाहा शिका-

रीस गेला आहे अशी संधि पाहून किल्याचे दरवाजे बंद केले, आणि बंडाचा बावटा उभारून मुसलमानांची कत्तल करण्यास प्रारंभ केला. तितक्यांत दोघे ज्ञान मुसलमान तटावरून उडया मारून कुतुबशा- नाईक लोकांचें हास हें वर्तमान कळविण्यास गेले. त्यासरसा तो माघारा बंड. फिरून किल्यास वेढा देऊन राहिला. तेव्हां "मुस्तफारवानानें आम्हांस फार छळिलें असून जर त्यास आमच्या स्वाधीन केलें जाईल, तर आम्हीं शरण येतों;" असें नाइकांनीं बोलणें लाविलें. मुस्तफारवानही सरकारच्या हितास प्राण देण्याकरितां तयार झाला. परंतु शाहानें ती गोष्ट नाकारून लढूनच नाईकलोकांस कैलास आणिलें, आणि शेवटीं त्या सर्वांस ठार मारून दुसरीकडील त्या जातीच्या लोकांवर इब्राहीमशाहानें आपली दहशत बसविली.

कुतुबशाहा, निजामशाहा व आदिलशाहा हे तिन्ही राजे एकत्र होऊन त्यांनीं रामराजावर स्वारी करून त्याचा सन १५६५च्या जानेवारी महिन्याच्या २५ व्या तारखेस तालिकोटच्या लढाईत पराभव करून विजयानगरचें राज्य कसें रसातळास नेलें, त्याविषयींचें वर्णन आमच्या विजापूरच्या व अहंमदनगरच्या इतिहासांत आलेंच आहे. पुढील सालीं (सन १५६६ त) कुतुबशाहास अहंमदकुली मुलगा झाला.

विजयानगरचें राज्य मुसलमानांनीं रसातळास नेल्यावर त्यांस दक्षिणेकडून स्वारी येण्याचें मुळींच भय उरलें नाहीं. इब्राहीमकुतुबशाहास राजमहेंद्रीकडील हिंदु राजे जिंकून त्यांचा मांत घेण्याचा उद्योग निर्वेध चालविण्यास अवकाश सांपडला. तालीकोटच्या लढाईपूर्वींच रफतरवान लारीऊर्फ मलिक नायब ह्यास राजमहेंद्रीकडील मांत जिंकण्यास कुतुबशाहानें पाठविलें होतें. परंतु रामराजावर जेव्हां कुतुबशाही लष्कर निघालें, तेव्हां रवान येऊन त्यास मिळाला. आणि इकडील काम आटोपतांच इब्राहिमानें त्याकडे दहा हजार स्वार देऊन पुनः राजमहेंद्रीकडे रवाना केलें. रफतरवानानें दवलेश्वरास पोहोंचल्यानंतर राजमहेंद्रीवर हल्ला केला, परंतु पटापूर व राजकुंडी ह्या दोन परगण्याचा राजा सीतापति हमेष रात्रौ राजमहेंद्रीस फौज व सामग्री पाठवूं लागला. ह्यामुळें रफतरवानाचा तेथें साधावा तसा लाग साधेना. म्हणून त्यानें प्रथम सीतापति राजावरच हल्ला करण्याचा बेत करून पटापुराकडे कूच केलें. मार्गांत त्या-

स शत्रूंनीं गांठितांच युद्धास सुरुवात झाली. तींत हिंदूंचा पराभव होऊन ते पट्टापूरच्या किल्ल्यांत रक्षणास गेले. त्यांच्या पाठीस मुसलमान लोक लागून त्यांनीं तटास शिड्या लावून किल्ल्यांत प्रवेश केला, आणि किल्ला सर झाला तेव्हां सीतापति राजा आपल्या कुटुंबाचीं माणसें घेऊन जंगलांतून राजपुंडी किल्यावर गेला. तिकडे दुसरेच दिवशीं मुसलमान त्याच्या पिच्छास लागले. जरी रस्ते फार अरुंद व झाडी फार दाट होती यामुळें त्यांस लौकर पोहोंचतां आलें नाहीं, तरी रफतखानानें किल्ला घेतल्याशिवाय मागें फिरावयाचें नाहीं, असा निश्चय केला. आणि वाटेंतील झाडी तोडून जाळण्याचा सपाटा चालविला. तरीही मुसलमानांस दर दिवस दोन मैलांहून जास्त मजल करितां येईना? शत्रुपक्षाकडील लोक त्या झाडींतील रस्त्याच्या दोन्ही बाजूंस लपून होते. त्यांच्या उपद्रवानें मुसलमानांचे शेंकडों लोक पाडाव होऊं लागले. शेवटीं अशा बहुविध अडचणी सोसून मुसलमान लोक राजपुंडीस पोहोंचले, आणि त्यांनीं किल्यास शह लाविला तेव्हां सीतापति किल्यांतून उठून जंगलें तुडवीत राजमहेंद्रीस पळून गेला, व तेथील विदियाद्रि राजास मिळाला. रफतखानानें राजपुंडी ताब्यांत घेऊन तेथील यथोचित बंदोबस्त केला आणि राजमहेंद्रीकडे चाल केली. तेथें विदियाद्रीच्या कुमकेस कासीमकोटचा राजा फौजेसह आला होता. ह्यामुळें विदियाद्रीपाशीं तीस हजार स्वार व तीस हजार पायदळ इतकी फौज जमली. त्यांनीं प्रथमदर्शनींच मुसलमानांवर हल्ला करून त्यांची दाणादाण उडविली. परंतु शिलकी फौज त्यांच्या मदतीस येतांच त्यांनीं पुनरपि चढाव करून हिंदूंचा पराभव केला. विदियाद्रि व सीतापति फौजेसुद्धां राजमहेंद्रि किल्यांत पळून जातांच त्यांस मुसलमानी सैन्यानें वेढा घातला, परंतु चार महिनेपर्यंत त्यांवर चालावा तसा कटाव चालेना. अखेरीस जेव्हां कुतुबशाही तोफांनीं किल्यास मोठमोठीं भगदाडें पडलीं, आणि आतां आंत शिरून मुसलमान हल्ला करणार अशी पूर्णपणें खात्री झाली, तेव्हां किल्यांतून तहाचें बोलणें लावण्याबद्दल आपली सतीषा दर्शविण्यास निशाण पाठवून कौलानें किल्ला सोडून जाण्यास राजी आहों, असा निरोप आला. रफतखानानें आपल्याकडून तह-

रफतखानास हिंदु राजांवर पाठवितो.

तो सीतापतीस जिंकितो.

राजमहेंद्रीवर हल्ला करून सर करितो.

चीं कलमें ठरविण्यास येलू पंडित नामक ब्राम्हणकारकुनास पाठविलें. त्यांत " किल्ला मुसलमानांच्या स्वाधीन करून विदियाद्रि व सीतापति ह्यांनीं आपलीं कुटुंबाचीं माणसें घेऊन पाहिजे तिकडे जावें" असें ठरून विदियाद्रि कासीमकोट्यास आणि सीतापति विजयानगरास गेला. राजमहेंद्रि सन १५६७ सालीं मुसलमानांनीं आपल्या ताब्यांत घेतली.

रफतखानानें राजमहेंद्री सर केल्यावर कासीमकोंड्यास मुसलमानांचा अधिकार स्थापन करण्यास निघण्याचा विचार करून ओढिया प्रांताकडे सैन्यासह कूच केलें. तिकडे समुद्रकिनाऱ्याकडून न जातां पहाडांतील जंगलांतून व दऱ्या खोऱ्यांतून जाण्याचा त्याचा निश्चय कासीमकोट्या-
झाल्या कारणानें त्यांस त्या दाट व किर्र झाडींतून जा- वर स्वारी.
ण्यास मोठी अडचण व भयास पडले. तरीं तीं भयंकर व गर्द जंगलें त्यानें तोडून व जाळून मजला मारण्याचा क्रम चालविला. त्याप्रमाणें खान हाल व विपत्ति सोशीत निघाला असतां मार्गांत त्यास गांठण्यास व्यंकटराज वीस हजार पायदळ घेऊन एका झाडींत छपून बसला होता. त्याशीं लढाई करण्याचा प्रसंग येतांच रफतखानानें त्याचा पराभव करून नजीकचे गोपाळ पिली व वीरगुत्तम हे दोन्ही किल्ले आपल्या ताब्यांत घेतले. आणि तेथून ते बेधडक कासीमकोट्यावर गेले. तेथें सूर्वराज व त्याचा भाऊ बिलंदर असे दोघे अंमलदार राज्य करीत होते. रफतखानानें राजमहेंद्रि इत्यादि अनेक किल्ल्यांची व तेथील अधिकाऱ्यांची काय काय दुर्दशा केली, हें कर्णोपकर्णीं ऐकून आपल्यावरील आलेलें हें महत्संकट टाळण्याकरितां तहाचें बोलणें लावण्यास खंडणी घेण्या-
वकील पाठविले. तेव्हां भाई बुलंदर ह्यानें कासीमको- चा तह.
ट्यास राहून राज्याचा कारभार पहावा, व नियमित खंडणी द्यावी, आणि धाकटा बंधु सूर्वराज यानें गोवळकोंड्यास येऊन राहावें. असा तह ठरला. तेथून गोपाळउरीय ह्याचा प्रांत घेण्यास रफतखान निघाला. त्याबरोबर तो घाबरून बंगाल्यांत पळाला. ह्या कारणानें शस्त्रदेखील न उचलतां त्याचा मुलूख मुसलमानांस सहजच ताब्यांत घेतां आला. नंतर विदियाद्रीच्या वेलपराजाकडे कांहीं प्रांत होता, तो घेण्यास खान निघाला. हें वर्तमान श्रवण करून वेलपराजा देवपुराल ह्या पहाडी किल्ल्यांत स्वसंरक्षणार्थ गेला. हा किल्ला समुद्रकांठीं असून त्या-

च्या सभोंवार इतकी गर्द झाडी व दाट जंगल होतें कीं, शत्रूंचा रि-
वेलपराजावर स्वारी.
घाव होण्यास अतिशय मारामार पडावी. तेथून वेल-
पराजानें मुसलमानांशीं लढण्यास किल्यारवाली वीस
हजार लष्कर पाठविलें. जेव्हां त्यांचा पराभव झाला, तेव्हां ते त्याच कि-
ल्यांत पळून गेले. त्या किल्यास मुसलमानांचा चार महिने जंगी वेढा पड-
ला तरी किल्ला दाद घेईना. इतक्या शिकस्तीस जेव्हां मुसलमान जुमानी-
नना, तेव्हां वेलपराजाही टेंकीस येऊन खंडणी देण्यास कबूल झाला. आ-
णि त्याकडे जो राजमहेंद्रीच्या विदियाद्रीचा प्रांत होता तो गोंवळकोंड-
करांच्या त्यानें स्वाधीन केला. पुढें रफतखान चंदूरवाराकडे फिरला. त्या-
ठिकाणीं नरसिंग आणि सूरसिंग असे दोघे बंधु राज्य चालवीत अ-
सत. तिकडे जाण्याच्या वाटेंत एक फार बळकट किल्ला होता, आ-
णि तेथें दहा हजार सैन्य होतें. त्यानें किल्यासभोंवती खंदक खणू-
न बुरुजावर तोफा चढविल्या व मुसलमानांशीं लढाई देण्याची त-
खंडणी घेण्या-
चें ठरवून तह.
यारी केली. तेव्हां रफतखानानें विचार केला कीं, त्यां-
शीं तोफा आल्याशिवाय युद्ध करणें बरोबर नव्हे. म्ह-
णून तो त्या येईपर्यंत विसावा घेऊन नंतर हल्ला करून त्यानें किल्ला
घेतला, आणि दोघांही भावांस कैद केलें. त्याप्रमाणें त्याचाही प्रांत ह-
स्तगत झाला.

जरी राजमहेंद्रीकडील बहुतेक प्रांत सर झाला, तरी तिकडे वैजनाथ-
देव ह्या नांवचा एक बलाढ्य राजा होता. त्याचा पराभव करण्याकरितां
रफतखानानें कूच केलें. प्रथम त्यानें पांडूरचा पहाडी व मजबूद किल्ला
वैजनाथदेव या-
वर स्वारी.
घेतला, आणि तेथें असलेला वैजनाथदेवाचा बंधु यास
कैद केलें. नंतर कंडूदेवपल्ली म्हणून एक दुसरा जवळचाच
किल्ला घेण्याच्या कामीं रफतखान गुंतला असतां वैजनाथदेवानें ति-
तक्या अवकाशांत आपल्या फौजेची तयारी करून पांच हजार स्वार
पन्नास हजार पायदळ आणि ५०० हत्ती असें जंगी संग्रामोपयोगी
सामानसुमान जमवून रफतखानानें तो किल्ला घेतांच त्यावर चढाई
केली.. परंतु त्यावेळीं मुसलमानांची सद्दीच जोरावर होती, किंवा परमे-
श्वराची त्यांवर पूर्ण कृपा असून त्यांची भरभराट करण्याचाच त्यांचा हेतु
होता! काय असेल तें असो. वैजनाथाकडे इतकें सैन्य असतां रफ-

नरवानाच्या थोड्याशा लष्कराकडून त्याचा पराभव होऊन राजास पळ काढीत आपल्या राजधानीस यावें लागलें! नंतर त्यानें आपल्या ज्येष्ठपुत्रास तह ठरविण्याकरितां रवानाकडे पाठविलें. आणि दरसाल वैजनाथीं राजा गोवळकोंडच्या शाहास तीस हजार होन खंडणी देईल, ही शर्त जर आपण आतांच कबूल करीत असाल, तर चाळीस उत्तम हत्ती नजर करील, असें बोलणें केलें. तें लागलींच खानानें मान्य केलें. कारण त्याच्या फौजेंतही बरीच बेकैद झाली होती. त्याचे लोक आज कित्येक दिवस रानावनांतून व पहाड डोंगरांतून एकसारखे मजला मारीत लढायां देत चालले होते. ह्यामुळें त्यांस कधींही मिळावा तसा विसावा मिळाला नसून ते फार कावून व थासून राहिले होते. आणि त्यांनीं पूर्व किनाऱ्यावरील बहुतेक प्रांत काबीजही केला होता.

लढाई होते.

राजाचा पराभव होऊन खंडणी देण्याचें कबूल करितो व तह होतो.

तालीकोटच्या संग्रामप्रसंगांतून हुस्सेन निजामशाहा परत आल्यावर सन १५६५ सालीं मरण पावला, आणि त्याचा ज्येष्ठपुत्र मूर्तिजा गादीवर बसला. तो बहुधां ऐषआरामांत व ख्याली खुशालींत निमग्न असून त्यानें सर्व राज्यसूत्रें चांदबिबी सुलताना इच्या हवालीं केलीं होतीं. त्या कारणामुळें राज्यांत सारी अंदाधुंदी झाली. अल्ली आदिलशाहानें अहमदनगर प्रांतावर स्वारी केली, तेव्हां मूर्तिजा निजामशाहाचे डोळे उघडून त्यानें इब्राहीम कुतुबशाहाच्या सहाय्यानें विजापूरच्या फौजेस मागें फिरविलें. चांदसुलतानास धरून कैद केल्यावर तिचे दोघे भाऊ कर्ते होते, तेही पळून गेले. मूर्तिजास कारभार आवरेना, आणि पुनः सर्व अव्यवस्था झाल्यावर पुनरपि आदिलशाहानें जी स्वारी केली, त्यावेळींहीं निजामशाहानें इब्राहीमकुतुबशाहास कुमकेस बालाविलें, व तो आला. इतक्यांत तह ठरविण्यास विजापूरकरांकडून सय्यद मूर्तिजा ह्या नांवचा एक वकीलही येऊन पोहोंचला. त्याच्या सांगण्यावरून निजामशाहानें केवळ अविचार करून कुतुबशाहाकडील जे लोक त्याच्या मदतगारीस आले होते; त्यांवर त्यानें हल्ला केला. तेव्हां त्यांनीं स्वसंरक्षण करून गोंवळकोंड्यास गमन केलें. ह्या विश्वासघाताबद्दल कुतुबशाहास फार नवल व साहजीकच विशेष वाईट वाटलें. त्यानें त्यांचा सूड उगविण्याचा निश्चय करून प्रथम वऱ्हाडच्या तोफालखानास व मागा-

इून बेदरच्या बेरीदशाहास फौजेसह सामील केलें. एकदां इब्राहीम शिकारीच्या निमित्तानें बेदराकडे गेला; तिकडे त्यास बेरीदशाहा व तोफालखानाचा पुत्र समशेर उत्मुल्क हे येऊन मिळाले. तेथून ह्या त्रयीनें अल्ली आदिलशाहाकडे आपणास येऊन मिळण्याविषयीं त्यास प्रवृत्त करण्यासाठीं वकील पाठविले. त्यास अनुमोदन देऊन अल्ली फौजेसह त्यांस मिळण्यास निघाला. इतका सारा थाट माट लौकरच निजामशाहास कळला, व त्यानें आपला वकील जंगीझखान ह्याकडे पुष्कळ मौल्यवान नजराणे देऊन आदिलशाहाचें मन वळवून त्यानें आपल्यास कुमक करावी, अशी खटपट करण्यास पाठविला. आणि अखेरीस त्यास इतकेंही बजाविण्यास तो चुकला नव्हता कीं; निदान अल्ली आदिलशाहा जरी वश झाला नाहीं, तरी त्याच्या सरदारांस मुबलक लांच देऊन ते तरी आपलेसे करून घ्यावे. मूर्तिजाच्या ह्या घालमेलीपूर्वीच अल्ली आदिलशाहा विजापुराहून फौज घेऊन निघाला होता. त्यास जंगीजखानानें नळदुर्ग येथें गांठिलें, आणि अनेक प्रकारें होती तितकी मेहनत घेऊन त्यानें त्याचें मन वळवून प्रथम तिकडे न जातां मूर्तिजा निजामशाहाची अगोदर भेट घ्यावी, असें ठरविलें. हा प्रकार इब्राहीम कुतुबशाहास जेव्हां कळला, तेव्हां त्यासही दिसलें कीं; ह्या दोन राजांच्या मिलाफापुढें आपलें मुळींच तेज पडावयाचें नाहीं. म्हणून ते तिघेही राजे आपल्या राजधानीस कूच करिते झाले. जातांना यदाकदाचित बेदरावर स्वारी झाली तर त्यास कुमक करण्याचें अश्वासन कुतुबशाहानें बेरीदशाहास दिलें, आणि तो गोवळकोंड्यास पोहोंचतांच त्यानें तेथें आपली नाईकवारी (नाईक लोकांची फौज) जमा करून गोवळकोंड्यापुढील मैदानांत तंबू देऊन युद्धसिद्धता केली. निजामशाहा व आदिलशाहा यांच्या भेटींत "उभयतांनीं तेलंगण व बेदर हीं दोन्हीं राज्यें आपल्या बाहुबलानें बुडवावीं," असा संकेत होऊन प्रथम त्यांनीं बेदराकडे आपला मोहरा फिरविला. अल्लीआदिलशाहाची फौज कांहीं अंतरावर राहिली, व मूर्तिजा निजामशाहाच्या सैन्यानें बेदरास वेढा दिल्याची बातमी समजतांच इब्राहीमकुतुबशाहानें आपली फौज गोवळकोंड किल्ल्यांत नेऊन बुरजावर

याचही मुसलमानराजांचा हेवा मत्सर.

निजामशाहीवर स्वारी करण्याचा बेत.

बेत सिद्धीस जात नाहीं.

तोफा सज्ज करून बचावाची तजवीज चालविली, आणि °आपल्या सलाबतखान त्या नांवच्या सरदाराकडे चार हजार स्वार व दहा हजार पायदळ देऊन बेदरास वेढा घातलेल्या फौजेच्या आसपास टेहळणीवर राहून त्यांवर रात्री अचानक छापे घालण्यास रवाना केलें. हें काम सलाबतखानाच्या लोकांनीं इतक्या उत्कृष्ट सफाईनें चालविलें कीं, ते दर रात्रीस शत्रूंचीं चारशें नाकें व कान कापून आणूं लागले!! त्या बहादुरी व शिताफीबद्दल प्रत्येक नाकास एक होन आणि प्रत्येक कानास एक परतीब अशीं बक्षिसें कुतुबशाहा देत असे. स्वारांनीं दिवसा त्यांस लुटावें, त्यांची रसद बंद करावी असा उद्योग आरंभिला. ह्याप्रमाणें त्यांचा कांहीं दिवस क्रम चालल्यावर लोक फार त्रासले. रात्री झोंप नाहीं, दिवसा स्वस्थपणा नाहीं; दाणापाणी मिळेना. अशा त्रिविध तापांनीं परिपीडित होऊन वेढा उठवून माघारें जाण्याचा त्यांनीं बेत केला.परंतु आपली फाटाफूट होतांच इब्राहीम आपणावर कदाचित् हल्ला करील ही त्यास जबर भीति होती. म्हणून तो आल्यास त्यास अडवून धरण्याकरितां किंवा तें नच साधल्यास निदान आपल्या वाटेस तरी त्यानें न येण्याकरितां गुंतवून धरण्यासाठीं आदिलशाहानें कमीलखानास पंधरा हजार स्वारांनिशी आणि निजामशाहानें मिरझा यादगीर यास पंधरा हजार स्वार देऊन कोकस येथें ठेवून निजामशाहा तोफालखानानें इब्राहीमशाहास मदत केल्याबद्दल शासन करण्यास निघाला, आणि आदिलशाहा विजयानगर पैकीं बंकापूर इत्यादि कांहीं हिंदु राज्यें घेण्यास दक्षिणेकडे गेला. तेव्हां त्यानें आपलीं बायका मनुष्यें बरोबर होतीं त्यांस विजापुरीं पोहोंचविण्याकरितां यशवंतराव, भोजनाईक आणि देवनाईक ह्या तिघां मराठे सरदारांच्या हवालीं केलीं. त्यांबरोबर सहा हजार बर्गी स्वारांची टोळी होती. ह्याच गमजारवालीं त्यांनीं विजापूरचा रस्ता मुकाट्यानें धरावा, तो न धरितां कुतुबशाही मांतांत लुटालूट चालविली. त्यासरसा

---

+ एक सोन्याचें नाणें होतें. आणि त्याची किंमत रुपयाच्या जवळ जवळ होती. सदरहू माहिती व्यवहारदर्पण भाग दुसरा इंदुप्रकाश छापखान्यांत छापलेल्या पुस्तकाचे शेवटीं पहावी, अशी वाचकांस शिफारस करितों.

गोवळकोंडच्या सलाबतखानानें त्यांवर हल्ला करून त्यांचा सर्वथै-व पराभव केला. व फत्तेजंग आणि फत्तेलष्कर असे दोन उत्कृष्ट ह-त्ति आणि त्यांचें निशाण घेतलें. त्या झटापटींत आदिलशाही लो-कांची फटफजीती होऊन अखेरीस यशवंतराव, अल्ली आदिलशा-हाच्या बायकोस घेऊन मोठ्या प्रयासानें विजापुरास आला.

निजामशाही व आदिलशाही फौजेचा कुतुबशाहीस शिलशिला व तिचें निवारण.

मूर्तिजानिजामशाहा व अल्ली आदिलशाहा त्यांनीं कोकस येथें जी फौज ठेविली होती, तीही स्वस्थ न रहतां तेलंगण प्रांतांत लूटफाट करूं लागली तेव्हां कुतुबशाहानें मीरशाहा महंमद अंजूस आठ हजार स्वार देऊन तिजवर पाठविलें. आणि मिरझा हुस्सेनबेग त्यास आपल्या चार हजार तुर्की लोकांसह अंजूस मिळण्याची परवानगी दिली. कोकस व बंगलूर यांच्या दरम्यान वेंगलूरचा सुभेदार सय्यद हैदर त्यानें आपल्या तीन हजार स्वारांसहीत कुतुबशाही टोळीवर हल्ला केला. परंतु त्यांचा पराभव होऊन त्या तुकडीनें तो किल्ला तात्काळ घेतला. तेथून अंजू पुढें चाल करून बंगलूर व कंधार त्यांच्या मधील एका मैदानांत छावणी ठोकून उतरला. त्या ठिकाणापासून जवळच शत्रूचा तळ होता. त्यांकडील टोळींत पिछाडीस मराठी बर्गी स्वार असून त्यांतून विश्वासराव, बसवंतराव व कोळीराव ह्या तिघांनीं आपआपल्या सहा हजार स्वारांसह कुतुबशाही तुकडीवर हल्ला केला. त्यांस हुस्सेनबेग व त्याच्या तुर्की स्वारांनीं मागें हटविलें. त्यांत पुष्कळ कोळी लोक पडले. दुसरे दिवशीं दुसरी एक टोळी त्यांच्या आंगावर आली. तीवरही मिरझा हुस्सेन बेग गेला. आणि त्याच्या कुमकेस सलाबतखान आफशार यास तीन हजार स्वारांनिशी पुढें रवाना केलें. अंजू मागाहून चालला. लौकर एक मोठी लढाई झाली. परंतु तींत जयापजय कोणास आला, हें ठरवितां आलें नाहीं. दुसरे दिवशीं रात्रौ ठाणें सोडून निजाम व आदिलशाही फौज निघाली तेव्हां कुतुबशाही लोक त्यांच्या मागें लागले, आणि जवळ जवळ तळ देऊन उतरूं लागले. त्यांवर मिरझा यादगीर यानें दहा हजार निवडक स्वार घेऊन हल्ला केला. परंतु त्याचेंही हुस्सेनबेग व सलाबतखान त्यांनीं निवारण करून कांहीं एक चालूं न देतां याद

गिरास मागें हटविलें, तरी ते प्रत्यहीं हल्ले करीत. एक महिनाभर तेथेंच होते. शेवटीं एक मोठी लढाई होऊन तींत निजामशाही व आदिलशाही सैन्याचा अगदीं पराभव झाला, आणि त्यांचें सर्व सामान सरंजाम घेऊन कुतुबशाही लोक गोवळकोंड्यास गेले.

आदिलशाहाची विजयानगरवरस्वारी व विजयानगरच्या कुमकेस कुतुबशाहा जातो.

बेदराहून निघाल्यानंतर अल्ली आदिलशाहा विजयानगरचा प्रांत सर करण्यास गेला होता. विजयानगरच्या आसपासचा प्रांत श्रीरंगरायाच्या ताब्यांत असून त्यावर अल्लीनें हल्ला करून विजयानगरास शह दिला. विजापूरच्या फौजेशीं सामना करण्याचें सामर्थ्य श्रीरंगरायाच्या आंगीं नव्हतें. म्हणून त्यानें गोवळकोंड्यास इब्राहिमाकडे वकील पाठविला. अल्लीचें व इब्राहिमाचें वैमनस्य असल्याबद्दल त्यास माहीत होतेंच. असो. श्रीरंगरायाचा वकील दरबारांत दाखल होतांच इब्राहिमानें कुमक पाठवून त्याचा बचाव करण्याचें वचन देऊन वकिलास निरोप दिला. आणि शाहा महंमद अंजू ह्याकडे थोडीशी फौज देऊन विजयानगरच्या सरहद्दीवरील आदिलशाही प्रदेश लुटावयास पाठवून आपण स्वतः श्रीरंगरायाच्या मदतीस जाण्याच्या तयारीस लागला, व त्यास विजयानगरच्या सरहद्दीवरच मिळाला. इतक्यांत अंजूही थोडासा प्रदेश उजाड करून येऊन दाखल झाला. ह्या प्रमाणें श्रीरंगरायास इब्राहीम कुतुबशाहा आणि त्याचा शूर सरदार अंजू मिळाल्यावर अल्ली आदिलशाहा विजयानगरचा शह उठवून स्वदेशीं चालता झाला.

व्यंकटाद्रि वगैरे तीन हिंदुराजांवर स्वारी.

कुतुबशाहानें कोंडबीडचा किल्ला घेतल्यावर व्यंकटाद्रि, कस्तुरी तिमराज व नरसिंगराय हे कुली कुतुबशाहाच्या कारकीर्दीपासून गोवळकोंड्याच्या दरबारास दरसाल दोन लक्ष होनांची खंडणी देत होते. परंतु कुतुबशाहा दक्षणेंतील दुसऱ्या मुसलमान राजांशीं लढाईत गुंतला आहे असें संधि पाहून त्यांनीं कांहीं वर्षे खंडणी दिली नाहीं. आणि कृष्णानदीच्या अलिकडे येऊन कंडापिल्ली किल्ल्यावर हल्ला करून आसपासचा बराच प्रदेश लुटला. म्हणून त्यांजकडून कोंडबीडचा किल्ला परत [illegible] करितां इमाद उद्दीन महंमद शिराझी (हैदर उल्मुल्क) यास जंगी फौजेसह रवाना केलें.

त्यानें कृष्णा उतरून प्रथम इणकोंड किल्ला घेतला. आणि तेथून तो क्याचलकोट किल्ला घेण्यास गेला. त्या किल्यावर कस्तुरी रंगय्या व मुदनाचनय्या असे दोघे दहा हजार फौज घेऊन होते. परंतु मुसलमान येतांच ते किल्ला सोडून निघून गेले. ह्यामुळें बिन तक्रार मुसलमानांनीं रिकामा किल्ला कबजांत घेतला. नंतर कमप किल्ला घेऊन त्यानें तेथें कांहीं फौज ठेविली. आणि तो कोंडविडाकडे वळला. तेथें कुंडी तिमण्णा, मुदनाचनय्या व कस्तुरी रंगय्या असे तिघे तीस हजार फौज जमवून तयारीनें होते. इकडे मुसलमान येतात असें त्यांस कळतें तोंच हैदरउल्मुल्क तेथें येऊन भिडला. त्यांनीं त्यावर हल्ला केला परंतु मुसलमानांनीं त्यांचाही पराजय करून गुरमपर्यंत पिच्छा पुरवून गुरम व बेलमकोंडा हे दोनही किल्ले घेऊन नंतर मुसलमान कोंडबिडाकडे वळले. त्यांनीं पुष्कळ दिवस त्या किल्यास शह देऊन ठेविला. परंतु किल्ला हातीं लागला नाहीं. शेवटीं आणखी कुमक पाठविण्याविषयीं त्यानें इब्राहिमास लिहिलें आणि सय्यदशाहा तुर्की (अमीरशाहामीर) यास कुतुबशाहानें मोगली व इराणी फौज देऊन पाठविलें. त्यानेंही शिड्या वगैरे लावून किल्ला सरकरण्यास पुष्कळ यत्न करून पाहिले. परंतु दाद लागेना शेवटीं जेव्हां तटानजीकच्या टेंकड्यांवर तोफा चढवून त्यास खिंडारें पाडिलीं. व एके रात्री खिंडींतून व दरवाजावरून एकदम हल्ला झाला तरी किल्यांतील लोक मोठ्या हिमतीनें त्यांवर तुटून पडले. त्या कारणानें मुसलमानांचे भारी लोक मेले. तथापि मागें न हटतां हत्तीवरून दरवाजावर मोर्चे लावून दरवाजे पाडून मुसलमान आंत शिरले. तेव्हां महत्प्रयासानें कोंडबीड किल्ला सन १५८९ सालीं सर झाला. तेथें प्रसिद्ध रामराजाचा जामात कंपुरी तिमराज हा मुसलमानांच्या हातीं सांपडला. असे कोंडबीड व आसपासचे लहान मोठे किल्ले आणि दोन तीन बंदरें मुसलमानांच्या अमलाखालीं आलीं. आणि समुद्र किनाऱ्यापासून विजयानगरच्या सरहद्दीपर्यंत त्यांनीं कुतुबशाही अम्मल बसवून कंपुरी तिमराज त्यास घेऊन मोठ्या विजयानें अमीरशाहामीर गोवळकोंड्यास आला.

कोंडबीड किल्यास वेढा.

मूर्तिजा निजामशाहानें बेदरचा किल्ला व मुलूख घेण्यास उद्युक्त होऊन गोवळकोंड्यास वकील पाठवून तिकडून अमीरशाहामिरासह दहा हजार स्वार कुमक मिळविली. तेव्हां अलीबेरीदशाहानें विजा-

पुरास अल्ली आदिलशाहाकडे कुमक मागितली. त्यानें ती अमकारखोज्या दिल्यावर देण्याचें मान्य केलें. परंतु तो रखोजा खुषी नसतां बेरीदशाहानें त्यास जबरीनें पाठविलें, म्हणून त्यानें अल्ली आदिलशाहास विजापुरीं पोहोंचल्यानंतर पहिल्याच मुक्काखतींत गर मारिलें. ह्या कारणानें विजापुरास अवघी अव्यवस्था झाली. तेव्हां निजामशाहानें विजापूर प्रांतावरही स्वारी करण्याचा बेत केला आणि निजामशाही व कुतुबशाही अशा दोन्ही फौजा नळदुर्गाकडे गेल्या. परंतु तेथील सर्व फौज विजापुरीं गेल्यामुळें त्यांनीं विजापुरास वेढा दिला. त्यांशीं आदिलशाहीकडून एकलास व दिलावरखान हे मोठ्या पराक्रमानें लढून त्यांनीं निजामशाही फौजेचा बहुतेक पराभव केला. परंतु कुतुबशाही स्वारांच्या चातुर्यानें त्यांचा बचाव झाला. असो. किल्यास वेढा दिल्यावर आंतील लोकांस समजलें कीं, नाकवी, कल्लूर व काकनी हीं ठाणीं घेण्याकरितां पाठविलेली कुतुबशाही तुकडी घेऊन अमीरझैन विजापुराकडे येण्यास निघाला आहे. ती तुकडी अडवून इकडे न येऊं द्यावी म्हणून इब्राहीम आदिलशाहानें नुरुद्दीन निशापुरी यास पांच हजार स्वार देऊन पाठविलें.

कुतुबशाहा व निजामशाहा विजापुरास वेढा देतात.

काकनी कल्लूर आणि नाकवी हे प्रांत सुलतान कुली कुतुबशाहानें हिंदु राजांपासून घेतले होते. परंतु सुभानकुलीच्या तुटपुंज्या कारकीर्दींत ते अल्ली आदिलशाहानें घेतले. आणि इब्राहीम कुतुबशाहा आजवर दुसरीकडे गुंतला असल्याकारणानें ते परत घेणें तसेंच पडून राहिलें होतें. ते आतां माघारे घेण्यासाठीं कुतुबशाहानें अमीरझैनाकडे मोठी फौज देऊन पाठविलें होतें. यास दौलतखान व मीर अनबुद्दु ह्यांनीं प्रथम अडथळा केला. परंतु त्यानें त्यांचा पराभव करून त्यांस हांकून लावितांच काकनी, कर्नुल, व नाकवी हे तिन्ही प्रांत अमीरझैनाच्या हातीं आले. तेव्हां तो तिहींमध्यें थोडी थोडी फौज ठेवून कल्लूरच्या किल्याकडे गेला. तोही किल्ला अनायासें प्राप्त झाल्यावर त्यास वर्तमान समजलें कीं, इब्राहीम आदिलशाहाचे दीडशें हत्ती सागराहून विजापुरास जात आहेत. म्हणून त्यानें ते हस्तगत करण्याचा बेत ठरवून तिकडे चाल केली. परंतु ते हत्ती विजा-

अमीरझैन काकनी वगैरे प्रांत घेतो.

पुरास न नेतां मालकानें ही गुणगुण ऐकून परत सागर येथें नेले. तेथील सुभेदार **सय्यद अश्रफ** तीन हजार मराठे स्वार घेऊन कुतुबशाही टोळीवर चालून आला. परंतु इतरांसारखीच **अमीरझैनानें** त्यांची दशा उडवून त्यास कैद केलें. आणि सागर शहरास अग्नि लावून मंदुरगी किल्ला व एतगीर हें त्यानें घेतलें. असो ह्याप्रमाणें कुतुबशाही सरकारानें पूर्वी जितका प्रांत सर केला होता, त्यांतून जेवढा प्रांत आदिलशाहानें वळकाविला होता. तितकाही परत सर करून **अमीरझैन** एक लाख होन खंडणी आणि दहा हजार खंडी धान्य घेऊन विजापुराकडे कुतुबशाही फौजेस मिळण्यास निघाला. तेव्हां नवलगुंद, कलबुर्गी व सागर येथील सुमारें पन्नास हजार लोकांनीं **झैनावर** हल्ला करून धान्य व द्रव्य विजापुरीं न जाऊं देण्याकरितां यत्न केला. परंतु त्यांचाही **अमीरझैनानें** पराभव केला, आणि दोन हजार लोकांस ठार मारिलें. पुनः तीस हजार दुसऱ्या स्वारांनींच त्यावर चाल करून त्यांस घांस मिळूं नये असें केलें. तथापि त्या सर्व अडचणींतून **अमीर झैन** पार पडून विजापुरीं येऊन आपल्या फौजेस मिळाला. इतक्याच संधीस गोवळकोंड्याहून कुतुबशाहा मरण पावल्याचें वर्तमान आल्याकारणानें अवघी **इब्राहिमाची** फौज एकाएकीं राजधानीस चालती झाली.

इब्राहीम कुतुबशाहा मरण पावतो इ.स.१५८०.

**इब्राहीम कुतुबशाहाच्या** मरणाची गोष्ट फार चमत्कारीक लिहिली आहेः— दक्षणेंतील सरहद्दीवरील बंदोबस्त करून मुसलमान राजांवर आपला सेनाधिपति **अमीरशाहामीर** त्यास त्यानें पाठविलें तेव्हां दिवाणाचें काम पाहण्यास **मुरारराव** या नांवच्या मराठी ब्राम्हणास नेमिलें होतें. आणि त्याच्या तैनातीस सुलतान **इब्राहीम** कुली कुतुबशाहानें दहा हजार पायदळ देऊन नोबतही दिली होती. ह्याप्रमाणें हा **मुरारराव** सर्व राज्यांत केवळ अग्रगण्य झाला होता. **इब्राहिमाच्या** राज्याच्या अखेरीस तो फौज घेऊन अदोनीच्या प्रसिद्ध देवस्थानाकडे गेला. तिकडील लोकांसच त्यानें केवळ लुटून सोडिलें असें नाहीं. देवाचें जडजवाहीर व सोन्यारुप्याचें डागदागिने देखील लुटले. व लोकांवर चार लाख होनाची

मरणाची गोष्ट.

खंडणी बसविली. तिकडून रत्नजडित मूर्ति घेऊन **मुरारराव** गोवळकोंड्यास आला. त्या मूर्ति पाहतांच **इब्राहीम कुतुबशाहाची** प्रकृति बिघडली! व तो इसवी सन १५८० च्या जून महिन्याच्या दुसऱ्या तारखेस मरण पावला!!! त्यावेळीं त्याचें वय ५१ वर्षांचें असून त्यानें एकतीस वर्षें राज्य केलें. त्याच्या प्रेतास लंगरबागेंत पुरलें. त्याला एकंदर तीस मुलें झालीं असून सहा मुलगे व तेरा मुली जिवंत होत्या. वडील मुलगा **अबदुल कादर** त्यास देवरकोंडा येथें कैदेंत ठेविलें होतें. तेथेंच तो मरण पावला! दुसरा **मिरझाहुस्सेन कुली** एका तळ्यांत स्नान करीत असतां बुडून मेला! तिसरा **महंमद कुली** पुढें गादीवर बसला. चौथा **मिरझा अबदुल फत्ते** हा तेरा वर्षांचा होता आणि पुढें पंधरा वर्षांनीं मेला। पांचवा **मिरझामहंमद खुदबंद** हा बंड करून कैदेंत मरण पावला. **मिरझा महंमद अमीन** हा सर्वांत लहान असून आपल्या वयाच्या पंचविसावे वर्षीं मृत्यु पावला. ज्या ज्या लढाईंत स्वतः **इब्राहीमकुतुबशाहा** सैनाध्यक्ष असे, त्या त्या लढाईंत त्यानें कधींही जय संपादन केल्याशिवाय सोडिलें नाहीं. मोहिमेस गेल्यावर देखील त्याच्या लष्करांत जे विद्वान् असत त्यांच्याशीं तो कायद्यासंबंधीं संभाषण करी. त्याच्या राज्यांत त्यानें इतका सर्वोत्कृष्ट बंदोबस्त व व्यवस्था ठेविली होती कीं एखाद्या म्हाताऱ्या बायकोनें देखील डोईवर सोन्याचें भांडें घेऊन गोवळकोंड्याहून बंगाल्याकडे, विजापुराकडे किंवा अहंमदनगराकडे निर्भयपणें जावें. जरी तेलंगी चोर सर्वत्र प्रसिद्ध आहेत तरी त्यांवर यानें विलक्षण वचक बसवून त्यांस निरुपद्रवी करून सोडिलें होतें. त्याच्या राज्यास जे मुलूख नवीन मिळाले त्यांत कासीम कोटा, राजमहेंद्री, कोंडवीड हे मुख्य होत. यानें ही ज्या अनेक सुंदर व भव्य इमारती उठविल्या त्यांपैकीं मुख्य गोवळकोंड्याची नदबंदी, इब्राहीमबाग, फुलबाग, लंगर (भिक्षागृह) बारा इमामाचें, इब्राहीमपट्टन येथील तलाव, हुस्सेनसागर नामक तलाव, बडवळ येथील बांध, गोवळकोंडा येथील काळा चबुत्रा. यांशिवाय पुष्कळ मशीदी व शाळा **इब्राहीमशाहाच्या** कारकीर्दींत केवळ मिसरदेशाप्रमाणें झाल्या. गोवळकोंड्यास व्यापाराची भरभराट होऊन सर्व पृथ्वीतील माल तेथें उत-

रूं लागला. अरबस्थान, तुर्कस्थान व इराण येथील व्यापारी खरेदीक-रितां तेथें येत असत. सारांश पृथ्वीवरील कोणत्याही देशाची चीज गो-वळकोंड्यास विकत नव्हती असें नव्हतें. इब्राहीमशाहाच्या वेळीं प्रजे-ची जितकी आस्थापूर्वक दाद लागत असे तितकी इतर मुसलमानांच्या राज्यांत क्वचितच लागत असेल. न्यायान्यायाच्या कामींही त्याचें उत्तम ल-क्ष असे. परमसमर्थ परमेश्वरानें त्याकडे जो इतका विस्तीर्ण मांत दिला होता, आणि त्याच्या हाताखालीं लक्षावधी लोक वास्तव्य करीत होते. त्यांच्या सुखदुःखाकडे तो चांगलें लक्ष पुरवी. केवळ अधिकारम-दानें धुंद होऊन त्यानें कधींही अन्यायाचरण केलें नाहीं. चांगल्या गु-णापैकीं बरेच गुण ह्याच्या आंगीं वसत होते, असें म्हणण्यास बि-लकुल हरकत नाहीं.

---

# महंमद कुली कुतुबशाहा.

## इसवी सन १५८० ते १६११ पर्यंत

महंमद कुली गादीवर बसतो.—— नळदुर्गास वेढा.—— आदिलशाही सैन्याचा हल्ला व तह.—— अलीखान व त्याचें बंड.—— गोवळकोंडें व विजापूर या दरबारचा शरीरसंबंध व दोहोंची एकी.—— भागानगर ऊर्फ हैदराबाद शहराची वसाहत.—— शहरास पाण्याचा पुरवठा.—— शहरांतील इमारती.—— कृष्णानदीच्या कांठचे किल्ले घेण्यास शाहा जातो.—— पेणकोंड्यास वेढा.—— वेढा उठवून शाहा जातो.—— उरीय राजा कोंडविडावर हल्ला करितो.—— त्याचा पराभव.—— हिंदु गंडिकोठ किल्ल्यास वेढा घाल-तात.—— मुसलमानी लष्करांत धांदल.—— मुसलमानांचा पराभव.—— हिंदूंवर पु-नः फौज जाते.—— नरसुदराजाचा पराभव.—— शाहाच्या जमेदारांचें बंड.—— शा-हासाहेब तोतया.—— मुकुंदरायाचें बंड.—— मुकुंदराज बंगाल्यांत पळून जातो व शाहा त्या-चा मुलूख खालसा करतो.—— व्यकटपतीवर शाहा फौज पाठवितो.—— रेडिवड

लोकांचें बंड —— वैजनाथ देवाचें बंड व तो तह करितो— किस्थनरांव व मुकुंदराव— इराणचा वकील येतो ——शहरांत मोगलांचा दंगा —— दक्षणी लोकांची लुटालूट ——खुदवंदाचें बंड —— कुली कुतुबाचा मृत्यु.

---

महंमदकुली कुतुब व गादीवर बसणें.

**इब्राहिमाच्या** मागून त्याचा तिसरा मुलगा **महंमद कुली कुतुब** सिंहासनारूढ झाला. त्यावेळीं कुतुबशाही सैन्य नळदुर्गास जंगी वेढा देऊन राहिलें होतें. तिकडे प्रथमारंभीं तो आणखी कुमक घेऊन गेला. तेथें ज्या बाजूस अगदीं कोरडा खंदक होता तिकडून कुलीकुतुबशाहानें किल्ल्यांत प्रवेश करण्याचा यत्न केला. परंतु आंतील किल्लेदारानें त्यास जवळच येऊं दिलें नाहीं, आणि दुसरीकडून तर साधावा तसा लाग साधेना.

नळदुर्गास वेढा.

शेवटीं होईल तितकी खटपट करून तटास एखादें तरी भगदाड पाडल्यावांचून आंत शिरकाव खास होत नाहीं, असें दिसतांच त्याच्या सैन्यानें लहानशी एक खिंड पाडून एकदम हल्ला करून किल्ला घेण्याचा यत्न केला. परंतु आंतील लोकांनीं दारूनें भरलेलीं जळकीं पोतीं व लहान मोठे दगड फेंकण्याचा सपाटा लाविल्यामुळें, त्यांची कोठेंच चालावी तशी हिकमत चालेना. ह्याप्रमाणें त्यांची मति अगदीं कुंठित झाली आहे,

आदिलशाही सैन्याचा हल्ला.

इतक्यांत विजापुराहून दोन हजार मराठे स्वार **इब्राहीम** आदिलशाहानें छावणींत लुटालूट करण्यास पाठविले. तेव्हां या नव्या अरिष्टापासून आपला बचाव करण्यास कुतुबशाही फौज गुंतल्याकारणानें तीस किल्ल्याच्या हल्ल्याचें काम विशेष जोमानें व हिमतीनें पुढें चालवितां आलें नाहीं. असो. असे दोन्ही राजे पेंचांत पडल्यानंतर **इब्राहिमानें** तहाचें बोलणें लाविलें.

तह.

त्यास कुतुबशाहानेंही तत्क्षणींच रुकार दिला. आणि तह होऊन कुतुबशाही व आदिलशाही लष्करें आपापल्या राजधानीस गेलीं.

माजी कारकीर्दींत कोणी **अलीखान लारी** या नांवचा एक हलकट मनुष्य स्वपराक्रमानें मोठ्या योग्यतेस चढून सरदारी पावला होता. त्यास कोंडबिडा नजीक जें कुतुबशाही सैन्य होतें, त्यावर नेमिलें, आणि त्याप्रमाणें तो तिकडे गेला. तेथील ब्राम्हण सुभेदार **रायराव** त्याच्या मर्जीप्रमाणें त्यास खर्चाकरिता मुलूख तोडून देईना. म्हणून तो रुसून विजया-

नगरच्या राजाकडे गेला, व त्यावरोबर त्याचे कांहीं लोकही होते. त्यानें फौज घेऊन कोंडबिडावर हल्ला करण्याचें आपल्या आंगीं सामर्थ्य

अलीखानच्या- चें बंड.

आहे, असें विजयानगरच्या राजास दर्शवितांच त्याजबरोबर आपला जामात मीकरतिम्मा त्यास तीस हजार पायदळ कांहीं स्वार व पन्नास हत्ती इतकें सैन्य देऊन कोंडविडावर चढाव करण्यास लारीस हुकूम देता झाला. त्या समरप्रसंगांत रायरावानें लारीचा बिनतोड पराभव करून त्यास मागें हटविलें. त्या युद्धांत विजयानगरचे जखमी व ठार झालेले लोक एक हजार असून चार हत्ती होते. कित्येक डंके, नौबती पाडाव करून शत्रूनीं नेले, आणि अलीखान व मिकरातिम्मा मोठ्या शर्थीनें विजयानगरास पळून गेले. पुढें, अलीखान हिकडे तिकडे फौज जमा करण्याकरितां हिंडला, व सरासरी भरतीचे मनुष्य जमवून कंडापिल्ली प्रांतांत लुटालूट करीत चालला. तेव्हां त्यावर कुतुबशाहानें रहीमदाद व ताहीर महंमदखान पठाण अशा दोघां सरदारांस फौजेसह पाठविलें. अलीखानास हें वर्तमान समजून त्यानें आरंडीगच्या किल्यांत आश्रय केला. परंतु ती जागा निर्भय आहे असें त्यास न वाटून थोडीशी फौज त्यानें तेथें ठेविली, आणि आपण जाऊन पहाडांत लपला. पठाणानें आरंडीगचा किल्ला सर करून आंतील साऱ्या लोकांची कत्तल उडविली! व ते अलीखानाच्या पिच्छास लागल्यानंतर त्यानें एका खिंडींत दबा धरून राहून कुतुबशाही सैन्यावर छापा घालून पुष्कळ मुसलमानांस ठार केलें. तरीही त्यांनीं त्याचा पराभव करून सुमारें एक हजार लोकांस कैद केलें. त्याच समयास त्यास अफझुलखान हवालदार एक हजार स्वारांनिशीं येऊन मिळाला. अलीखान तेथून निगापटम बंदरीं जाऊन तेथील श्रीमान व्यापाऱ्यांस व सावकारांस लुटून थेट कोंडविडावर गेला. तेथें कुतुबशाहाकडून किश्वरखान ह्या नांवचा सरदार लहानशा सैन्यासह होता. त्यासही लुटून पुनः माघार घेऊन अनंबोलु येथें असलेल्या अफझुलखानावर अचानक छापा घालून त्यासही लुटीत चालला. शेवटीं ह्या लुटारू अलीखानास रहीमदाद ह्यानें पकडून ठार मारिलें. तेव्हां त्याचें बंड मोडून रहीमदाद परत गोवळकोंड्यास आला.

त्याच समयास **महंमद कुली कुतुबशाहाचें अमीर शाहामीर** याच्या कंन्येशी लग्न झालें. विजापूरचा दिवाण **दिलावरखान** त्यानें सुमार पाहिला कीं; मस्तुत कुतुबशाहाच्या स्नेहसंपादनानें विजापूरचें फार हीत होण्याचा संभव आहे. म्हणून त्यानें **महंमद कुतुबशाहाकडे** वकील पाठवून कुतुबशाहाची बहीण **मलिका झुमान** हिचें **इब्राहीम आदिलशाहाशीं** लग्न व्हावें व उभय राजांमधील स्नेह कायम व्हावा, असा ठराव केला. त्या प्रमाणें नळदुर्ग येथें कडाक्यानें व थाटमाटानें लग्नसमारंभ होऊन परस्पर स्नेहाचीं वचनें कायम झालीं व दोन्ही शाहा आपआपल्या प्रांतीं गेले.

गोवळकोंडें व विजापूर या दरबारचा लग्नसंबंध व दोहोंची एकी.

गोवळकोंड्यास वस्ती फार दाट झाली असून हवा अतिशय खराब झाली होती. पाण्याचाही पुरवठा असावा तसा नव्हता. त्या कारणानें सन १५८९ सालीं तेथून पांच कोसांवर **मुशी** नदीच्या कांठीं एक स्थळ पाहून तेथें नवीन राजधानीस्थापन करण्याचा उद्योग **महंमद कुली कुतुबशाहानें** आरंभिला. त्याची **भागावती** या नांवची एक आवडती स्त्री होती. तिच्या स्मरणार्थ या नवीन स्थापित राजधानीस **भागानगर** असें नांव दिलें. मराठे ह्या शहरास भागानगर असेंच म्हणत असत. आणि **हैदराबाद**चे सावकार वगैरे लोक अद्यापही भागानगर असेंच म्हणतात. पुढें ती गेल्यावर त्या शहरांचें नांव त्याचा पुत्र **हैदर** त्या नांवावरून **हैदराबाद** असें पडलें. त्या शहरच्या रस्त्याच्या दोहोंबाजूस झाडें वगैरे लावून आणि ते सरळ व रुंद धरून घरें बांधविलीं होतीं. त्यामुळें त्यास चांगलीच शोभा आली. तसाच गोवळकोंड्याच्या वरच्या बाजूस नदीला बांध घालून पाण्याचा नळ भागानगरांत आणून सर्व शहरभर पाणी खेळविलें होतें. तेव्हांपासून जो त्या शहरास पाण्याचा भरपूर पुरवठा आहे, तो अद्याप तसा आहे. शाहानें शहरांत पुष्कळ सुंदर इमारती उठविल्या. एक भव्य व शोभिवंत **जुमामशीद** बांधविली. त्याशिवाय शहराच्या मध्यभागीं **चारमिनार** त्या नांवची शानदार इमारत उठविली. तिच्या मध्यभागीं घुमट असून त्याखालीं उत्कृष्ट कारंजा आहे. तसेंच चोहोंबाजूंस चार उंच मनोरे असून

भागानगर उर्फ हैदराबाद शहराची वसाहत.

शहरास पाण्याचा पुरवठा.

प्रत्येकांमध्यें काजी व त्याचे शिष्य ह्यांच्या बैठकीकरितां पुष्कळ खोल्या व दिवाणखानेही आहेत. ह्यांशिवाय कित्येक वाडे, दवाखाने, हमामखाने, पाठशाळा व भिक्षा-गृहें हीं त्याच्याच कारकीर्दींत बांधलीं गेलीं. दवाखाने व हमामखाने चालण्यास मोठ मोठ्या नेमणुका करून दिल्या. ह्या शाहाचा कित्ता दरबारच्या व इतर लोकांनीं घेऊन मोठमोठे टोलेजंग वाडे बांधिले. शाहास बागबगीच्याची विशेष आवड असे, आणि त्यास मुबलक पाणी मिळण्याचाही पुरवठा उत्तम झाला होता. खुद्द राजानें पुष्कळ उपवनें उठविलीं होतीं. तशीच सरदार, अमीरउमराव व बडेलोक आणि सावकार व सधन गृहस्थ ह्यांनीही त्या कामीं चांगली ईर्षा धरिली असून जोतो चढाओढीनें आपलें काम नामी दिसण्याकरितां होईल तितकी मेहनत घेत असे. ह्याही कारणानें लौकरच तें शहर शोभिवंत दिसूं लागलें. व वसाहत अतिशय वाढल्यामुळें घराच्या जाग्याचा फाळा इतका वाढला कीं, फक्त भागानगरच्या घरफाळ्याचें उत्पन्न दरसाल चार लाख होन येत असे. महंमदशाहानें शहर रचना चांगली करून व योग्य कायदे कानू ठरवून आपला अम्मल उत्तम बसविला होता.

शहरांतील इमारति.

कुतुबशाहानें लढाईस जाण्याचा निश्चय केल्यानंतर तो प्रथम कृष्णा नदी वलांडून मुसलमुरु किल्यावर गेला. तेथील लोकांनीं जरी त्यावर तोफांचा व बंदुकांचा भडिमार केला तरी त्यांचे कांहींच न चालतां किल्ला सर झाला. तेथून नंदिमल व कुलगुड हे किल्ले घेण्यास शाहा निघाला. हे दोन्ही किल्ले माजी रामराजाचा जामात बसवंतराज व त्याचा पुतण्या नरसिंगराय ह्यांजकडे असून मुसलमानांचा हल्ला येतांच थोडक्या दिवसांनीं उभयतांनीं खंडणी देण्याचें कबूल करून ते स्वाधीन केले. ह्या नंतर आसपासचेही जमीनदार आपण होऊन खंडणी देण्यास कबूल झाले. तेव्हां जमूलमुरत जुद्दीचरवल, नंदात कोटा, चिन्नूर, आणि गंडीकोट येथील जमीनदारही साहजीक मांडलिक झाले.

कृष्णानदीच्या कांठचे किल्ले घेण्यास शाहा जातो.

विजयानगरच्या राजाचा वारस व्यंकटपती ह्यानें आपली राजधानी कुतुबशाही प्रांताच्या सरहद्दीवर पेणकोंडा येथें नेली होती. आणि तेथून कुतुबशाही प्रांतावर तुरळक तुरळक स्वाऱ्या करण्याचें काम चा-

लविलें होतें. त्यामुळें कुतुबशाहास आपलें सैन्य घेऊन पेणकोंड्यावर चालू-
न जाणें भाग पडून त्यानें किल्ल्यास वेढा दिला. व्यंकटपतीनें आपला दि-
वाण गोपराज तिम्मा आणि सेनापति पर्दा आत्रिट्टी त्यास कुतुबशाहा-
कडे वकील पाठवून तहाचीं कलमें ठरविण्यास अवका- पेणकोंड्यास
श सांपडावा म्हणून छोटासा तह करून लढाई तहकूब वेढा.
केली. मुसलमानांची फौज वेढा उठवून आपल्या छावणींत राहतांच हिं-
दूंनी तीन दिवस बराच टिकाव निघाला इतकें धान्य व इतर सामग्री कि-
ल्ल्यांत चढविली; आणि चवथ्या दिवशीं प्रसिद्ध जगदेवराव, गुलरंग
शेटी, मणूपराज आणि पांपीय्या स्वामी तीस हजार स्वार व पायद-
ळ आणि चार हजार बंदूकबारदार असें सैन्य घेऊन किल्ल्यांत गेले.
हें कृत्रिम जेव्हां शाहानें पाहिलें, तेव्हां त्यानें पुनः पेणकोंड्यास वेढा
दिला. परंतु तेथें कांहीं लाग साधेना. पर्जन्यकाळ समीप आला. कृष्णे-
स पूर आला म्हणजे मागें जाण्यास किंवा गोवळकोंड्याहून कुमक अ-
गर धान्य वगैरे आणावयास सांपडणार नाहीं. त्याकरितां वेढा उठवून कु-
वेढा उठवून जाणें चांगलें, असा निश्चय करून कृष्णेच्या तुबशाहा जातो.
दक्षिणेकडील प्रांताच्या बंदोबस्तास थोडीशी फौज ठेवून तो बाकी फौजेसह
गोवळकोंड्यास गेला. परंतु गंडीकोट्यास संजलखान, मुसलमुरु येथें असि-
राव, नंदीयल येथें जगतराव आणि कृष्णेच्या दक्षिणेकडील मुलखांत मु-
र्तिजाखान असे अंमलदार फौजेसह मागें राहिले होते. कुतुबशाही सैं-
न्य पेणकोंड्यास आलें तेव्हां कोंडबीडच्या व्यवस्थेकरितां राहावी तित-
की फौज राहिली नव्हती. ही संधि फुकट दवडूं नये असें मनांत आणू-
न व्यंकटपतीनें कांहीं सैन्य पाठवून उदगेरी दुर्गाचा राजा कुवलनंद त्या
स कोंडबीड प्रांतावर हल्ला करून तो प्रांत दहन कृष्णेपर्यंत उजाड क-
रण्यास लिहिलें. कुवलनंदानें व्यंकटपतीकडील व आपली फौज दे-
ऊन आपला जांवई उरियराज यास तो बेत सिद्धीस नेण्यास दवडिलें.

उरियराजानें कोंडबीड प्रांत लुटण्यास जरी सुरुवात केली. तरी तेथी-
ल सुभेदार अफझुलखान त्याकडे सैन्य नसल्या कार- उरियराजा कों-
णानें त्यास व्यत्यय आणितां आला नाहीं. म्हणून त्या- डविडावर हल्ला
नें प्रांतांतील शिलेदार, जमीनदार व जाहागीरदार यां- करितो.
स त्यांच्या सर्व स्वारांसह घेऊन अनगलच्या वाटेनें उदगीरदुर्ग प्रांतावर

स्वारी केली. तेव्हां आपोआप हिंदूंचें सैन्य आपल्या स्वतःच्या बचावाकरितां मागें फिरलें आणि **अफझुलखानास** गांठून गराडा दिला. तेव्हां आतां आपला सर्व प्रकारांनीं घात होतो असें मानून **खान** फारच निराश व खिन्न झाला! इतक्यांत **अजदरखान** पांच हजार स्वारांनिशी त्याच्या कुमकेस आला, आणि आपण आलों हें शत्रूंस कळण्यापूर्वींच त्यानें त्यांच्या पिछाडीवर हल्ला केला त्याबरोबर सर्वच प्रकरण एकदम फिरलें जाऊन **उरीयराजाचा** अगदीं पराभव होऊन जखमी, ठार व पाडाव मिळून तीन हजार लोक निकामी झाले! व त्यांचें सर्व सामान आणि बाजारबुणगें मुसलमानांस मिळालें.

त्याचा पराभव.

पुढें जेव्हां मुसलमानांची फौज गेली, आणि नद्या भरल्या तेव्हां **व्यंकटपतीनें** सावकाश फौज जमा करून एक लाख सैन्य जमविलें आणि त्यावर एलतमराज, **गुलरंगशेटी,** व **मनूपराज** यांस नेमून **संजरखाना**पासून गंडीकोट किल्ला घेण्यास रवाना केलें. त्यानें तडाक्यासरसा कोटास वेढा घातला. तेव्हां आंतील पुष्कळ लोकांनीं त्यांवर हल्ला केला. परंतु हिंदूंनी नेटानें वेढ्याचें काम तसेंच पुढें चालविलें. इतक्यांत **मूर्तिजाखानानें** कुर्पपर्यंत जाऊन त्या शहरांतील प्रसिद्ध देवालय पाडून त्यांतील मूर्तींचे तुकडे तुकडे करून शहरास आग लाविली! हें वर्तमान **व्यंकटपतीस** कळतांच त्यानें **एलतमराज** व **मनूपराज** ह्यांकडे दहा हजार स्वार देऊन **मूर्तिजाखानावर** पाठविलें. त्या लढाईंत हिंदूंचा पराभव झाला. परंतु त्यांनीं पलायन करून आपला बचाव करून घेतला.

हिंदु गंडीकोट किल्यास वेढा घालतात.

**महंमदकुली कुतुबशाहास** दक्षिणेकडील अहवाल याप्रमाणें असल्याचें कळल्यावरून त्यानें तेव्हांच अटकळ केली, कीं तिकडे आपली फौज थोडी आहे. तीस मदत पाठविणें भाग आहे. नंतर त्यानें **रुस्तुमखान** ह्याजकडे पांच हजार स्वार देऊन **मूर्तिजाखानाच्या** कुमकेस पाठविलें, आणि तिकडील सर्व सैन्याचें आधिपत्य त्यासच दिलें. **मूर्तिजाखान** सतत तीन महिने हिंदूंशीं टक्कर देत होता. शेवटीं हळू हळू हिंदूंची फौज इतकी वाढली कीं, मुसलमानांस त्यांच्याशीं मैदानांत लढाई देतां येईना! म्हणून ते होईल तितकी मेहनत घेऊन लुटालूट व रसद बंद करण्यांत आपला काळ घालवूं लागले. ह्याच संधीस **रुस्तु-**

मरवान तेथें येऊन पोहोंचला. मूर्तिजारवानाची खात्री होती कीं, हिंदूंशीं मैदानांत लढाई करून आपणास फायदा होणार नाहीं. त्याकरितां त्यानें रुस्तुमरवानास असें सुचविलें कीं, आपण अर्ध्या फौजेस विर्जयानगरच्या+ राज्यांत पुंडावा करण्यास पाठवून बाकी सैन्यासह येथेंच लुटालुटीचा क्रम आरंभावा. रुस्तुमाकडे सर्व सेनाधिपत्य असल्यामुळें त्यास आपल्या हाताखालील मूर्तिजारवानाचे विचार व सल्लामसलत पसंत पडली नाहीं. तो कृष्णा नदी उतरून पलीकडे गेला. आणि जेथें नुकताच पर्जन्य पडला होता अशा एका काळ्या मातीच्या मैदानांत तळ देऊन उतरून, एकदम हल्ला करण्यास निघाला नाहीं. मुसलमानांस कुमक आल्याचें वर्तमान हिंदूंस कळल्यावर त्यांनीही त्यांशीं लढाई करण्याची घाई केली नाहीं. त्या दिवशीं बेंद्री पौर्णिमा पडली. तेव्हां कावेनें लाल रंगविलेला अंगावर रंगीबेरंगी पट्टे ओढलेला, शिंगें सोनेरी वर्खानें मढविलेला, असा एक मोठा धिप्पाड बैल गळ्यांत व पायांत घांटा व घुंगुर बांधून मुसलमानांच्या गोटावर सोडण्यांत आला. त्या वेळचे तसेच हल्लींचे मुसलमान हिंदु लोकांस व त्यांच्या धर्मकृत्यांस इतके तुच्छ मानितात कीं, त्यांस त्यांबद्दल कांहींएक माहीत नसतें. असो. असा तो चित्रविचित्र बैल गोटांत येतांच रुस्तुमरवान फार घाबरला आणि आपल्यावर हें काय अरिष्ट आलें कोण जाणें! असें समजून पिछाडीस गेला. आणि सर्व लोकांसही त्यावस्तुबद्दल घाबरे करून त्यानें आपल्या फौजेची उठावणी केली. मुसलमान घाबरले असें समजतांच हिंदूंनीं त्यांची धांदल पाहून लगेच बरकंदाज लोकांकडून त्यांस घेरविलें, व चोहोंकडून त्यांवर पायदळ घालविलें. मुसलमानांची सर्व भिस्त काय्रतीं त्यांच्या स्वारांवर असे. परंतु पर्जन्यानें जमीन चिकट झाल्यामुळें त्यांस आपले घोडे यावे तसे पळवितां येईनात. म्हणून ते हिंदूंच्या एका मागून एक गोळ्या लागून पटापट पडून प्राण सोडूं लागले. जेव्हां सर्वच मुसलमान पळूं लागले, तेव्हां त्यांस हिंदूंनीं गराडलें असल्यामुळें सर्वांचा फडशा उडत होता.

मुसलमानांचे लष्करांत धांदल.

---

+ आतां जरी पेणकोंड्यास राजधानी नेली होती, तरी मुसलमान इतिहासकारांनीं विजयानगर ह्याच नावाचा उपयोग केला आहे.

री मूर्तिजारवानानें थोडेसे लोक एका बाजूस काढून तो शत्रूच्या लोकांत मधूनच घुसून पार पडला, आणि जे मुसलमान पळत होते त्यांचा बचाव करून सुरक्षित गोवळकोंड्यास जाऊन पोहोंचला. मुसलमानांचें सर्व सामान सुमान हिंदूंस मिळालें व हजारों मुसलमान पाडाव झाले. रुस्तुमरवान हैदराबादेस परत गेल्यावर शाहानें त्यास स्त्री वेष देऊन रस्त्यांतून त्याची धिंड काढवून हद्दपार केलें, आणि मूर्तिजारवानास मोठे किताब देऊन त्याचा सन्मान केला.

मुसलमानांचा पराभव.

ह्या प्रमाणें जेव्हां आपल्या सैन्यास अपयश आलें तेव्हां पैशाकडे व लोकांच्या जिवाकडे न पाहतां हिंदूंशीं लढाई करून त्यांची खोड जिरवावयाची असा शाहानें निश्चय ठरविला. त्यानें लागलीच कोंडबीडचा हवालदार एतेबाररवान येजदी ह्यास सर्व फौज जमा करून विजयानगराकडे कुच करावें, आणि मार्गांत जीं शहरें लागतील तीं बेषक जाळून पोळून राख करावी असा हुकूम केला. मुसलमान जवळ येतांच हिंदूंचीं जिकडे तिकडे फाटाफूट होऊन ते डोंगरांत दऱ्यांत व खोऱ्यांत दडून राहिले. परंतु अनंतगीरचा राजा नरसुनंदराज हा पन्नास हजार पायदळ व तीन हजार स्वार घेऊन रात्रौ छापे घालून मुसलमानांस उपद्रव देण्यास निघाला. एके दिवशीं त्यानें दहा हजार बाणदार घेऊन मुसलमानास गराडा घातला. इतक्यांत असा मोठा पर्जन्य पडला व वादळ सुटलें कीं, तेणेंकरून त्यास शत्रूंवर हल्ला करून आपला हेतु पूर्ण करवेना! हिंदु इतके समीप आहेत, असें अवलोकन करितांच मुसलमानांनीं हुल्लड करून त्यांवर हल्ला केला, तेव्हां बरीच मोठी लढाई होऊन तींत बरेच युद्धनिपुण मुसलमान पडले. परंतु अखेरीस त्यांनींच संधि साधून हिंदूंचा पराभव केला व त्यांच्या सर्व कुटुंबाच्या मनुष्यांस कैदी करून त्यांचें सर्व सामानसुमान पकडलें. एतेबाररवान

हिंदूंवर पुनःफौज जाते.

---

१ ह्या शहरास पुढें मूर्तिजारवानापासून मूर्तिजानगर असें म्हणूं लागले, व तेंच नांव अजूनही चाललें आहे.

* पेणकोंड्याकडे.

क्यालिस्टी शहरास पोहोंचल्यावर त्यानें तेथील हिंदूंच्या मूर्ति फोडून त्याच देवळांत हिंदूंकडून निमाज पढविले. त्या शहरांत इतक्या अत्युत्तम इमारति होत्या कीं, त्यांची बरोबरी चीनच्याच इमारति करूं शकतील! सौंदर्य, कुसरी, कारागिरी ह्यांत त्याच कांहीं जास्त म्हटल्यास फिकीर नाहीं. असो ह्याप्रमाणें त्यानें जिकडे तिकडे धुमाळी उडविली. इकडे कित्येक वर्षेंपर्यंत मुसलमानांची सेना गुंतली असून तिणें आपला दक्षिणेकडे पूर्ण अंमल बसविला. त्या समयास अमीर उल्मुल्क हा कुतुबशाहाचा मीरजुमला किंवा प्रधान झाला. कितीएक जाहागीरदारांकडे जकातीबाबद उत्पन्नाची बाकी बरेच दिवस तुंबली होती, ती वसूल करण्यास कामगार पाठविण्यांत आले. परंतु ही मागणी फार दिवस न केल्यामुळें त्यांसही नवीनच बाब आपणावर बसली जात आहे असें वाटून त्यांनीं बंड करण्याचा बेत केला. परंतु अमलखान पठाण, खानखनान, साबाजी मराठा व बाळाराव ह्यांनीं त्या कामगारांस हरकत करून "देत नाहीं" असें साफ सांगितलें; आणि विजयानगरच्या (पेणकोंड्याच्या) राजाकडे शाहाचे फौजेविरुद्ध कुमक मागून कोंडबीडच्या आसपास लुटालूट सुरू करून बंडाचा झेंडा उभारिला. कोंडबीडचा सुभेदार (हवालदार) यानें लागलीच त्यांची नकशीर हुजूर जाहीर केली. आणि अमीर उल्मुल्काची आज्ञा झाल्यास मी त्यांची खोड मोडण्यास सिद्ध आहें, असेंही आणखीं कळविलें. तो दहा हजार स्वार घेऊन हैदराबादेहून निघाला. तो कोंडबिडापाशीं येतांच तेथील सुभेदार कुवलनंद याची गांठ पडली. तेव्हां यानेंच लुच्चेगिरी करून दुसऱ्यांस चेतवून उठविलें, असेल असा तर्क करून एकदम सुळीं दिलें! तेणेंकरून दुसऱ्या बंडखोर सरदारांवर चांगली दहशत बसली. जरी त्यांनीं सात हजार स्वार व दहा हजार पायदळ इतकी फौज जमविली होती; व आरंडीगचा किल्ला दारुगोळा व सामानसुमान चढवून तयार केला होता, तरी ते घाबरून इकडे तिकडे गेले, आणि बहुतेक विजयानगरच्या राजास जाऊन मिळाले. तेव्हां अमीर उल्मुल्क त्यांच्या पिच्छास लागून त्यांच्या जाहागीरी जप्त करून लुटून परत कोंडबिडास गेला. त्यानें तेथें बंडखोरांस सामील असलेल्या दोनशें नाइकांस पकडून फांशीं दिलें, व परत हैदराबादेस गमन केलें.

नरसुंदराजाचा पराभव.

शाहाच्या जमेदारांचें बंड.

याच संधीस कोणी शाहासाहेब नांवच्या ढोंग्यानें कुतुबशाही राज्यांत फार धांदल उडविली. इब्राहीम कुतुबशाहाचा वडील मुलगा अबदुल कादर हा अतिशय धार्मिक असून धर्मपरायण असे. म्हणून

शाहासाहेब तोतया.

त्यास लोक शाहासाहेब म्हणजे साधु असें म्हणत. बेदर येथील शाहा खलील उल्ला ह्या कुलीन सय्यद घराण्याच्या कुळांतील एका स्त्रीशीं त्यानें लग्न केलें. पुढें त्याच्या बापानें त्यास देवरकोंडा किल्ल्यांत कैदेंत ठेविलें होतें. तो आपल्या वयाच्या एकविसाव्या वर्षी मरण पावला. तेव्हां त्याचें प्रेत तेथून गोवळकोंड्यास आणून राजकबरींत पुरिलें. नंतर त्याची बायको बेदरास आपल्या आईबापाकडे गेली. असें असतां त्या शाहाजाद्याचा लहानपणचा एक स्नेही मीच शाहासाहेब म्हणून जिकडे तिकडे सांगत बेदरांत फिरूं लागला. तो दिसण्यांत कांहींसा शाहासाहेबासारखा दिसत असल्या कारणानें त्याच्या बायकोच्या आप्तांची खात्री होऊन हाच शाहासाहेब पुनः जिवंत होऊन आला, असें त्यांनीं ठरविलें. महंमद कुतुबशाहास ही बातमी लागतांच आपला वडील भाऊ मरण पावला तेव्हां त्याच्या सन्निध जे होते त्यांस बोलावून आणून त्यांजकडून त्यांस वीस वर्षांपूर्वी मृत्यु आला? आणि खात्रीपूर्वक पुरिलें? असे नाना प्रश्न विचारून आपली पक्की खात्री करून घेतली. व अली बेरीदशाहास त्यास कैद करण्याविषयीं लिहिलें. ह्या प्रमाणें तो तोतया बंदिवान होऊन पडल्यावर काजी लोकांनीं त्याची मुक्तता करवून त्यास सुखरूपपणें विजयानगरास पोहोंचविलें. तेथें त्यास कुतुबशाहींतील हद्पार केलेले व नाखुष असलेले बरेच लोक मिळाले. त्यांत दर असे कोंडबंदरखान हबशी व विजापूरच्या दिलावरखानाचा पुतणेर अलीखान हे होते. नंतर तो तीन चार हजार स्वार जमवून आपण गोवळकोंड्याच्या गादीचा खरा वारसदार आहें, असें प्रसिद्ध करून कृष्णेच्या कांठीं छावणी देऊन राहिला. तेलंगणांतील नाईक सरदारांस तेथूनच त्यानें पत्रें पाठवून आपणास येऊन मिळण्याबद्दल लिहिलें, व गोवळकोंड्यास आपले हेर पाठवून तेथील सरदारांसही अनुकूल करून घेण्याचा उद्योग चालविला. जे कोणी त्यास सामील झाले त्यांपैकीं बहुतेकांनीं त्याजबद्दल शासन भोगिलें. शाहास ह्या तोतयाची

रवबर समजतांच त्यानें त्यावर **एतेबाररवानास** कोंडबिडांतून जाण्याचा एकदम हुकूम केला, व गोवळकोंड्याहूनही पानगळास फौज रवाना केली. इतक्या अवकाशांत त्या तीनयानें बराच पुंडावा माजविला. म्हणून गोवळकोंड्याच्या फौजेची वाट न पाहतां एतेबाररवानानें दोन हजार स्वारांसह त्यावर हल्ला केला. तीनयाकडे सहा हजार स्वार असून शिवाय पायदळ होतें, आणि त्यांत **कोंडबंदरवाना**सारखा सरदार होता. तरी त्याचा पराभव होऊन **कोंडबंदरवान** कैद झाला. तीनया मोठ्या शिकस्तीनें पळाला. तो विजापुरीं जाऊन **इब्राहीम** आदिलशाहाकडे राहिला. यापुढें त्यानें कुतुबशाही गादीस आपला कधींही हक्क सांगितला नाहीं.

मुकुंदरायाचें बंड.

कासीमकोंड्याचा राजा **भाई बुलंदर** नियमित वेळीं रवंडणी देत असे. तो ह्याच सुमारास मृत्यु पावून त्याचा मुलगा बारावर्षांचा **मुकुंदराय** या नांवचा होता. त्यास **महंमदशाहानें** वारस कबूल करून राजधानीस बोलावून पोषाख देऊन सन्मान केला, आणि परत पाठविलें. असें असतां त्यानें येतांच आपला आप्त **विदियाद्री** ह्याच्या फुशीवरून आपला भाऊ **देवराज** ह्यास ठार मारिलें आणि कांहीं कालानंतर त्या प्रांताचा मुसलमान सुभेदार **बिरलासरवान** यास धरण्याविषयीं यत्न करूं लागला, आणि रवंडणी पाठवीनासा झाला. तो जेव्हां आपल्या जंगलांच्या, पहाडांच्या व सैन्याच्या घमेंडीवर असा मगरूरपणा करूं लागला तेव्हां शाहास त्याचा विचार करणें भाग पडलें.

कुतुबशाहानें आपला सेनाधिपति **मीरझैन उल्मुल्क अबिदीन रुसुमदार** (रवंडणी वसूल करणारा) ह्यास **मुकुंदराजावर** कूच करण्याची आज्ञा दिली. तो प्रथम जेव्हां कासीमकोंड्यास आला, तेव्हां त्यानें एक कारकून **मुकुंदराजाकडे** रवंडणीची मागील बाकी आणि पुढील नियमित वेळीं देण्याबद्दल जामीन मागण्यास पाठविलें. परंतु **मुकुंदराजानें** त्यास उत्तरच दिलें नाहीं. आपल्या मागणीप्रमाणें पैसा वसूल करण्या जोगी फौज नव्हती. म्हणून **मीरझैन अबिदीनानें** शाहाकडे कुमक पाठविण्यास लिहिलें. त्यानें आपला **अमीर जुमला** (प्रधान) **अमीर उल्मुल्क** ह्यास आणरवीं फौज घेऊन जाण्याविषयीं व सर्व सेनाध्यक्षत्व पत्करण्याविषयीं हुकूम केला. **अमीर जुमला** बरोबर माजी **भाई बुलंदर** ह्याचा पुतण्या **शंकरराज** हा होता. ह्या प्रमाणें मुसलमानांची जोडी

तयारी पाहतांक्षणीच मुकुंदराज घाबरला आणि शेजारच्या राजांस मदत पाठविण्या विषयीं त्यानें लिहिलें. तसेंच कोंडबिडावर हल्ला करण्यास ही उत्तम संधि आहे, असें विजयानगरच्या व्यंकटपती राजास लिहून तिकडे कूच करण्यास त्यास प्रवृत्त करून आपण राजमहेंद्रीकडे शाहाच्या फौजेवर तीन हजार स्वार व तीस हजार पायदळ घेऊन निघाला मुकुंदराजाकडे जीही लढाई जुंपली तींत शंकरराज पडला, व बहुतांशीं मुसलमानांचा पराभव झाला. त्यांचे चांगले चांगले शूर वीर रणभूमींत पतन पावले, व बरेच घायाळही झाले. परंतु इतक्यांत अमीर जुमलानें आपल्या शिलकी स्वारांस पुढें आणून एकदम हुल्लड करून हल्ला चालविला. तेणेंकरून हिंदूंच्या पायदळास मागें हटून अष्ट दिशा पळावें लागलें. मुकुंदराज आपली फौज घेऊन जो निसटला. तो कासीमकोंड्यास जाईपर्यंत मध्यें कोठें थांबला सुद्धां नाहीं. तेथें गेल्यावर त्यानें बिरलासखान व गझनफरवेग आणि दुसरे मुसलमानी कामगार त्यांस आपल्या समोर भुलथापा देवून आणविलें. आणि समक्ष शिरें उडविलीं! हा प्रकार जों इकडे असा युक्तीनें चालला आहे तोंच मुसलमानांचें लष्कर त्याच्या मागोमाग कासीमकोट्यास येऊन धडकलें. तेव्हां तो भदवाड व चिकाकोलकडे पळाला. उल्मुल्क त्याचे मागें लागत तिकडे पोहोंचला. आणि त्यानें वाटेंतून जातां जातां जीं जीं शहरें लागलीं तीं तीं लुटून फस्त करून जमीनदोस्त केलीं! हळू हळू मुकुंदराज मुसलमानांस चुकविण्याविषयीं निराश होत चालला. तरी त्यानें पेटापुराकडे गमन केलें. तेथेंही जेव्हां त्याचा टिकाव लागेना तेव्हां ह्या खेड्यांतून त्या खेड्यांत आणि ह्या जंगलांतून त्या पहाडांत असे दिवस लोटण्याचा क्रम चालविला. परंतु मुसलमानांनींही त्यास एक दिवसदेखील कोठेंच स्वस्थ विश्रांति घेऊं दिली नाहीं. तेव्हां तो त्या भागांतील प्रसिद्ध जो रामचंद्रराज त्याकडे आश्रा घेण्यास गेला. रामचंद्रराजानें आपल्या देशावरील धाड मागें हटविण्यास बंगालच्या सरहद्दीवरील प्रदेशाचा राजा माधवसिंग ह्यास लिहिलें. तो पुष्कळ रजपूत लोक घेऊन अकबर पादशाहाच्या दरबारीं नौकरीस असे. उल्मुल्क त्या राजाच्या मुलखांत पळपट्या राजाच्या मागें लागला असतां त्याच्या सहाय्यास रामचंद्रदेवाच्या विनंतिवरून माधवसिंग गेला. परंतु उल्मुल्काची मजबूत तयारी पाहून आ-

पणास जय प्राप्त होणें मुश्कील पडेल असा रंग पाहून माधवसिंग बंगाल्यांत गेला. तेव्हां रामचंद्रास कुतुबशाहाचा मांडलिक होण्याशिवाय दुसरा उपायच राहिला नाहीं. मुकुंदराजास आश्रय मिळण्याची पंचाईत पडल्यावर तो बंगाल्यांत गेला. तेव्हां उल्मुल्कानें आपल्या इच्छेप्रमाणें तेथील व्यवस्था करून सरहद्दीवरील बंदोबस्तास अलमखान, अशीराव आणि दुसरे दोन कामगार ठेविले. आणि कासीमकोंड्याकडे जाऊन तेथेंही कांहीं सैन्य ठेवून राजधानीस पोहोंचून तो प्रधानकीचें काम पाहूं लागला.

मुकुंदराज बंगाल्यांत पळून जातो, व शाहा त्याचा मुलूख खालसा करितो.

वर सांगितलें कीं, मुकुंदराजाच्या चिथावणीवरून व्यंकटपतीनें कोंडबीड प्रांतावर स्वारी केली. मुकुंदराजाच्या सांगण्याशिवाय कुतुबशाही प्रांतावर स्वारी करण्याचें व्यंकटपतीस दुसरेंही कारण होतें. तें इतकेंच कीं, अहंमदनगरच्या राज्यावर मोगलांनीं स्वारी केल्याकारणानें तिकडे बरीच कुतुबशाही फौज गेली होती. म्हणून व्यंकटपतीनें दोन लक्ष स्वार व पायदळ आणि एक हजार हत्ती घेऊन कोंडबिडावर स्वारी केली. ही बातमी कुतुबशाहास समजतांच त्यानें एदिलखान बंगीस मोठी फौज व दोनशें हत्ती आणि तोफा इत्यादि सामग्री देऊन व्यंकटपतीवर पाठविलें. खान कोंडबिडाकडे लौकरच पोहोंचला. परंतु तोफा येईपर्यंत त्यास तेथेंच मुक्काम करावा लागला. अद्याप व्यंकटपतीनें सरहद्द उल्लंघन केली नव्हती. आणि जेव्हां मुसलमानांचें प्रचंड सैन्य जंगी तयारीनें आलेलें पाहिलें तेव्हां तो गर्भगळित झाला. आणि मौल्यवान नजरनजराणे देऊन त्यानें कुतुबशाहाकडे वकील पाठविला. आणि कोंडबिडाकडे येण्याचा आपला स्वाभाविक हेतु कमम सरोवर पाहण्याशिवाय अन्य कांहींच नव्हता, असेंही त्यास कळविण्यास सांगितलें. कमम सरोवर सोळा मैल परीघाचें असून त्यास पुष्कळ ओढे वाहात जाऊन मिळतात. व गुन्ना कमम म्हणून नदी ह्यांतूनच उगम पावून अनगोळावरून मुगापिलीपाशीं समुद्रास मिळाली आहे. असो इतका प्रकार झाल्यावर बंगीस हल्ला न करण्याविषयीं शाहानें हुकूम पाठविला. परंतु त्यास कोंडबिडासच त्वां राहावें असें बजाविलें.

व्यंकटपतीवर शाहा फौज पाठवितो.

जेव्हां राजमहेंद्री व बेंगळूर येथील अवघी सेना कासीमकोंड्यास **मुकुंदराजा**च्या स्वारीवर गेली होती, तेव्हां **रेडीवड** लोकांनीं तिकडे लुटालूट करण्याचा उद्योग आरंभिला होता. त्यांनीं निरडोळ, वेळूर व पारचली हीं शहरें लुटून उध्वस्त केलीं. म्हणून त्यांतील लोक जंगलांत पळून गेले. हें वृत्त शाहास कळल्यावर **एदिलखानास** त्यानें **रेडीवडांवर** जाण्यास लिहिलें. त्याबरोबर जरी त्यानें त्यांस एकदा हांकून लाविलें तरी ते पुनः एका मजबूत ठिकाणीं सर्व जमले. तशांत आसपास भयंकर अरण्यें असल्यामुळें त्यांचा करितां यावा तसा पाठलाग करितां येईना. ज्याएका नदीचे कांठीं ते दोन हजार लोक जमून राहिले होते; ती नदी ते मुसलमानांस उतरूं देईनात. तेव्हां राजमहेंद्रीहून तोफा व बाण आणविण्याची तजवीज झाली. तिकडून **झैनउल अबिद्दीन** व **करीमखान** असे दोघे सदरील सामग्री घेऊन आल्यावर नदी उलंघिल्याविना तिचा कांहींच उपयोग होण्याचा संभव दिसेना. उताराची जागा शत्रूंनीं अडवून धरिली होती. म्हणून दुसरी तशी जागा शोधण्यास मनुष्य पाठविले. तेव्हां **बाबाजीराव** आणि **धर्माजीराव** ह्यांणीं छावणीपासून दहा मैलांवर एक उताराची जागा काढिली. आणि तेथून उतरून **रेडीवड** लोकांच्या पायदळावर हल्ला केला. ह्यांचा जमावही तितकाच व तयारीही तशीच. मग पराभवास उशीर कसचा! ते पराजय पावून जंगलांत पळाले. त्यांच्या पाठीस मुसलमान लागून त्यांनीं त्यांस त्राही त्राही करून सोडिलें. शेवटीं जेव्हां त्यांनीं **कुतुबशाहा**कडे क्षमा मागितली, तेव्हां मुसलमानी फौज मागें फिरली. **एदिलखान** गोवळकोंड्यास गेला व **झैन उल् अबिद्दीन** कासीमकोंड्यास आला.

रेडिवड लोकांचें बंड.

प्रथमारंभीं **मुकुंदराजा**नें मुसलमानांवर शस्त्र धरिलें तेव्हां भाई **बुलंदरा**चा पुतण्या **शंकरराज** व भाऊ **हरिश्चंद्र** हैद्राबादेस होते. **अमीन उल्मुल्का**बरोबर **मुकुंदराज** गेला व **शंकरराज** राजमहेंद्रीच्या लढाईंत पडला. **अमीना**बरोबर **राउतराव** ह्या नांवचा एक शूर हिंदु सरदार होता. त्यास **अमीना**नें कांहीं भलताच हुकूम केल्यामुळें राग आला, आणि निरोप न घेतां तो छावणी सोडून गेला.

त्यानें हरिश्चंद्रासही बरोबर नेलें व फौज जमा करून हरिश्चंद्रास त्याच्या वडिलोपार्जित कासीमकोंड्याच्या राज्यावर स्थापन करण्याचा यत्न चालविला. एके दिवशीं रात्रीचा राउतराव दहा हजार पायदळ घेऊन एकाएकीं मुसलमानांवर चालून आला. त्यांत मुसलमानांची फारच दाणादाण व धांदल झाली. आणि त्यांस पहाडांत व जंगलांत आश्रय घेणें भाग झालें. त्यांच्या मागें राउतराव लागला व जी पुढें लढाई झाली तींत राव पडून त्याच्या सैन्याचा पराजय होऊन हरिश्चंद्र पळून वैजनाथ देवराजाकडे संरक्षणार्थ गेला. देवानें त्याचा पक्ष स्वीकारून मुकुंदराजास जुरजुराकिल्यावर हल्ला करण्यास लिहून पाठविलें. त्याप्रमाणें मुकुंदराजानें कामगिरी बजावून फार शिकस्त केली. इतक्यांत तेथें इंग्लीजखान मदतीस आल्यामुळें मुसलमानांनीं मुकुंदराजास मागें हटविलें. तितक्याच संधीस वैजनाथ देव व हरिश्चंद्र यांनीं कासीमकोंड्याचा सुभेदार मीर झैन उल्ल अबिद्दीन याजवर हल्ला केला त्यावेळीं त्याजकडे पांच हजार स्वार व तीस हजार पायदळ होतें. परंतु त्या लढाईंत त्यांचा पराभव होऊन देव वीरसगोटा किल्यांत पळाला, व मुसलमान नारायणपट्टण येथें छावणी ठोकून राहिले. वैजनाथ व हरिश्चंद्र यांनीं मुसलमानांशीं बऱ्याच लढाया केल्या. त्या सर्वांत त्यांस अपयश येऊं लागलें. म्हणून त्यानें हरिश्चंद्राच्या नादीं लागणें योग्य नव्हे, असा देवानें निश्चय करून कुतुबशाहाकडे तीस हजार होन व पंनास हत्ती नजर पाठवून तह केला. आणि दरसाल इतकीच खंडणी देण्यास कबूल होऊन कुतुबशाहाचा मांडलिक बनला.

वैजनाथ देवाचें बंड.

तह करितो.

मुकुंदराजानें जलमूर प्रांत हस्तगत करून तेथे आपलें ठाणें घातलें. तेथूनही त्यास मुसलमानांनी हाकून लाविलें. तेव्हां तो पुनः बंगाल्यांत गेला. तिकडे असतांना राउतरावाचा मुलगा किस्थनराव यानें थोडीशी फौज जमा करून मुकुंदरावास बंगाल्यांतून बोलाविलें. आणि या उभयतांनीं पाटूर व मदवाड हीं दोन्हीं शहरें घेतलीं व ते पुढें सरले. तों त्यांस मुसलमानांनीं मागें हटविलें, परंतु त्यांचा समूळ नाश होईना. आणि उपद्रवाचें बीज मोडावें नसें मोडेना. तेव्हां एकवार असा विचार निघाला,

किस्थनराव व मुकुंदराव

कीं, जो कुतुबशाहाचा मांडलीक होईल, त्यास मदवाडचा किल्ला व परगणा द्यावा? परंतु ही गोष्ट कित्येकांस पसंत पडली नाहीं. मुकुंदराजाशीं चाललेल्या लढाईत त्याचाही पुष्कळ वेळ मोड झाला. आणि तो त्रासानें बंगाल्यांत गेल्यानंतर कासीमकोंडा मांतांत बरीच स्वस्थता झाली.

इराणचा वकील येतो.

कुतुबशाहानें या समयास मीरमहंमद अमीन यास आपला मीरजुमला करून दोन लाख होनाची नेमणूक ठरविली. सन १६०२ सालीं इराणच्या शाहाकडून वकील येऊन त्याचा कुतुबशाहानें मोठ्या आदरानें सन्मान केला आणि आपला वकील इराणच्या दरबारीं पाठविला.

सन १६०७ च्या सुमारास आग्रा, लाहोर, दिल्ली वगैरे ठिकाणाहून पुष्कळ लोक येऊन हैदराबादेंत राहिले होते. त्यांपैकीं कांहीं मोंगल लोक परवानगी न घेतां नौबद घाटावरील वाडे व बागबगीचे पाहावयास गेले. दारू पिऊन धुंद झालेले ते लोक टेंकडीवर चढून तेथील ख्वोजे पाहारेकरी त्यांस राजमंदिरांत जाण्यास मतिबंध करीत असतां त्यांस न जुमानून ते आंत घुसले. तों ख्वोजांनीं त्यांजबद्दल शाहास वर्दी दिली. शाहानें अल्ली आका कोतवालास हुकूम केला कीं, तिकडे जाऊन त्यांस हाकून लावून यथास्थित बंदोबस्त करावा. तेव्हां आकानें सांगितलें, दिल्लीहून मोंगली फौज दक्षणेंत आल्या दिवसापासून भारीच रिकामटवळे लोक शहरांत भटकत असतात. ते कांहींएक उद्योग करीत नसून बेसुमार दारू पिऊन रांडांचीं घरें फिरतात, आणि नगरवासी जनास त्यांपासून निष्कारणी अतिशय त्रास सोसावा लागतो. त्यासरसा शाहानें " जे परदेशी मोंगल लोक उद्योग धंदा न करितां शहरांत वास्तव्य करून असतील, त्यांनीं आतांच्या आतां शहर सोडून चालतें व्हावें." असा जाहीरनामा

शहरांत मोंगलांचा दंगा.

प्रसिद्ध करण्याविषयीं हुकूम केला. परंतु अल्ली आका हा तरूण व अप्रौढ बुद्धीचा कोतवाल असून गर्वानें अतिशय फुगला होता म्हणून त्यानें असा जाहीरनामा प्रसिद्ध केला कीं, "सर्व परदेशी लोकांनीं मगते मोगल, इराणी, आरबी तार्तरी अगर पठाण असोत, शहर सोडून चालतें व्हावें." हा हु

कूम अमलांत आणण्यास त्यानें आपल्या शिपायांस असें सांगितलें कीं, "'त्यांस हांकून लावा किंवा कैद करा." मोगल लोकांनीं नौबदघांटावर केलेला दंगा ऐकून शाहा त्याजबद्दल मोठें शासन करील, असें पूर्वीं त्यांनीं भाकीतच केलें होतें. तितक्यांत तो जाहीरनामा प्रकट होतांच त्यांची पांचांवर धारण बसली. इतके परदेशी लोक बाहेर गेले म्हणजे त्या हद्दपार केलेल्या लोकांच्या जिंदग्या दक्षणी लोकां- लुटण्यास फुकटची चांगली संधि मिळेल, असें पा- ची लुटालूट हून दक्षणी लोकांनीं आपापले धंदे सोडून परदेशीय व्यापारी, सावकार सरदार इत्यादि लोकांच्या घरावर दरवडे घालून त्यांची मालमत्ता लुटण्याचा सपाटा चालविला. तेव्हां आपल्या जिंदगीचा बचाव करितांना शेंकडों खून होऊं लागले. आणि शहरच्या लोकांत अशी एकच धुमाळी माजली!! हें वर्तमान **मीर जुमला** यास कळतांच तो हातांतील काम एकीकडे टाकून राजवाड्यांत गेला. तेव्हां जरी शाहाची स्वारी निजली होती, आणि पहारेकऱ्यांनीं त्यास न उठविण्याविषयीं सांगितलें, तरी तें न ऐकतां दरवाजा फोडून तो आंत गेला, व शहरांत जो दंगा व धांदल चालली होती, ती त्यानें शाहाच्या कानावर घातली. आणि आपल्यास अझूनही शंका असेल तर खिडकींतून बाहेर नजर फेकून पाहावें अशी विनंति केली. शाहानें ती अव्यवस्था व दंगल पाहतांच त्याची खात्री होऊन त्यानें **अली आका**स बोलावून आणिलें व सांगितलें कीं, 'जर ह्या क्षणांत दंगा बंद न केलास तर तुला हत्तीच्या पांयाखालीं घालून आंतांच्या आंतां ठार मारीन.' तसेंच शहरांतही प्रसिद्ध करविलें कीं, 'जर कोणी ही मोंगलांच्या अगर दुसऱ्या कोणाच्या चीजवस्तूस हात लावील तर त्यास तांबडतोब देहांत शासन होईल.' ह्या प्रमाणें खरमरीत हुकूम होतांच कोतवाल, शिपाई घेऊन शहरांत गेला, आणि आपण केलेलें काम त्यानें मोठ्या प्रयासानें पुष्कळ लोकांचे प्राणहरण झाल्यावर निस्तरिलें व शहरांत स्वस्थता केली.

सन १६०९ त **महंमद कुली कुतुबशाहा**चा कनिष्ठ बंधु **मिरजा महंमद खुदबंद** यानें बंड केलें आणि त्याच्या पक्षासही बरेच लोक मिळाले. शिया लोकांची कत्तल करून **महंमद कुली**स पदच्युत

करावे, व खुदबंदास गादीवर बसवावें, हा त्या बंडाचा मुख्य उद्देश होता. परंतु शाहास त्याची बातमी योग्य वेळीं समजली, तेव्हां त्यानें प्रमुख बंडखोरांस जिवें मारिलें व खुदबंदास गोंवळकोंडच्या किल्यांत अटकेंत ठेविलें. तेथें तो सन १६११ सालीं मरण पावला.

खुदबंदाचें बंड.

जेव्हां दिल्लीच्या गादीवर जॉहांगीर बसला तेव्हां त्यानें शाहाजादा पर्वीज (त्यास पुढें शाहाजहान हा किताब मिळाला.) ह्यास दक्षणेंतील मुलूख काबीज करण्यास पाठविलें. तेव्हां दक्षणेंतील हिंदु मांडलीक राजांस पुनः आपला मुलूख मिळविण्यास उत्तम संधि सांपडली. त्या प्रमाणें वैजनाथदेवानें प्रथमतः कामीमकोंड्यावरील मुसलमानांवर हल्ला केला. दुसरेही हिंदु मांडलिक वैजनाथाचा कित्ता गिरवूं लागले. तरी त्या सर्वांची मुसलमानांनीं खोड मोडून आपला पूर्णपणें अंमल बसविला. त्या दंग्यांत वैजनाथदेव मरण पावला! व त्याचा मुलगा किस्थनराज त्यास मोठ्या सन्मानानें वैजनाथ देवाच्या स्थानीं स्थापन केलें.

इसवी सन १६११ च्या अखेरीस सुलतान महंमद कुली कुतुबशाहा एकाएकीं आजारी पडून मरण पावला! त्यावेळीं त्याचें वय ४९ वर्षांचें असून त्यानें एकंदर चौतीस वर्षें राज्य केलें.

महंमदकुलीचा मृत्यु. इ. स. १६११

महंमद कुलीच्या कारकीर्दीत पुढील कामें झालीं:— इल्लीमहालचा वाडा व बाग, महंमदी बाग, नौबत घाटचा वाडा, कुहटूरचा वाडा, नद्दी महालचा वाडा, बारा इमामाचें लंगर नांवाचें भिक्षागृह, जुम्मा मशीद, पाठशाळा, खासगी मशीद, दवाखाना, ह्याशिवाय आणखी पुष्कळ मशिदी, हमामखानें, शाळागृहें, इत्यादि सुलतान महंमद कुली कुतुबशाहा ह्याच्या कारकीर्दीत एकंदर अठ्याहात्तर लाख होन लोकोपयोगी कामाकडे खर्च झाले. तो जे दरसाल साठ हजार होन भिकाऱ्यांस धर्मादाय देत असे, त्यापैकीं मोहरमच्या महिन्यांत बारा हजार खर्च होत असत.

# अबदुल्ला हुस्सेन कुतुबशाहा.+

अबदुल्ला हुस्सेन गादीवर बसतो व शाहाजहानाशीं तह करितो. —— मीरजुमला वजीर. —— त्याच्या मुलास शाहा कैद करितो. —— मीरजुमलाच्या कागाळीवरून पादशाहा हुकूम पाठवितो. —— मोगलांची फौज गोवळकोंड्यावर येते. — मोगलांशीं तह.

---

महंमद कुली कुतुबशाहाचा पुत्र अबदुल्ला कुतुबशाहा गादीवर बसला. शाहाजहानानें अहंमदनगरचें निजामशाही राज्य बुडविलें आणि विजापूरच्या राजाशीं खंडणीविषयीं ठराव केला. त्याच सुमारास गोवळकोंडच्या राजास भेवडावून त्याजकडून शाहाजहानानें इराणच्या बादशाहाचें नांव निमाजामधून काढवून टाकून नियमानें खंडणी देण्याचें कबूल करविलें होतें. (१६३६). त्याप्रमाणें अबदुल्ला नियमानें खंडणी देत असे. आणि शाहाजहानाची मर्जी चांगली राखिल्यामुळें त्यास उपद्रव देण्याविषयीं त्याच्या मनांत कधींही येत नसे. परंतु सन (१६५६) सालीं एक विशेष गोष्ट घडून आल्यामुळें मोंगलांस गोवळकोंड्यावर फौज पाठविणें भाग पडलें.

अबदुल्ला गादीवर बसतो व शाहाजहानाशीं तह करितो.

अबदुल्ला कुतुबशाहाचा मुख्य वजीर मीरजुमला नामें होता. तो पूर्वी जव्हेरी असे, आणि त्यास वजिरी प्राप्त होण्यापूर्वीच तो मोठा संपत्तिमान व हुषार असल्यामुळें सर्व दक्षणेमध्यें त्याची प्रख्याति होती. वजिरीचें काम त्याच्या केवळ हुषारीवरूनच त्यास मिळालें होतें. त्याणें औरंगजेबाशींही स्नेह केला होता, व तो त्याजवर मेहेरबा-

मीरजुमला वजीर.

---

+ फेरिस्ताच्या ग्रंथांत कुतुबशाही घराण्याचा इतिहास नाहीं. दुसऱ्या एका फारशी ग्रंथावरून या घराण्याचा इतिहास दिला आहे. परंतु त्यांत महंमद कुली कुतुबशाहाच्या अखेरीपर्यंतच इतिहास आहे. या घराण्याच्या शेवटल्या दोन शाहांचा इतिहास अद्याप उपलब्ध झाला नाहीं. यास्तव मोंगलबादशाहांच्या इतिहासांतून वरील मोटक (पुढें चालू).

नी करीत असे. मीरजुमल्याचा मुलगा महंमद अमीन हा बदफैली व व्रात्य असे. मीर जुमला पूर्व तेलंगणांत एका स्वारीवर गेला होता; त्या-

त्याच्या मुलास शाहा कैद करितो.

समयीं महंमद अमीनानें अबदुल्ला कुतुबशाहास फार राग येण्याजोगें वाईट कृत्य केलें. यामुळें त्यास त्यानें कैदेंत टाकिलें व मीरजुमल्यावर कुतुबशाहाची इतराजी झाली. मीरजुमलानें स्वारीहून परत आल्यावर त्यास सोडविण्याबद्दल कुतुबशाहापाशीं बरीच खटपट केली. परंतु ती सर्व व्यर्थ गेली. तेव्हां त्यानें मोंगलांच्या आश्रयास जाण्याचा निश्चय केला. शाहाजहान व औरंगजेब या उभयतांस त्याची पूर्वींची माहिती होती. औरंगजेब हा स्वाभाविकच मसलती असल्यामुळें गोवळकोंड्याच्या राज्यांत हात घालण्यास आयतीच ही चालत आलेली संधि दवडूंनये म्हणून त्याणें मीरजुमल्याच्या कागाळींची दाद घ्यावी, अशी बादशाहास खूब शिफारस केली. ही गो-

मीरजुमल्याच्या कागाळीवरून पादशाहा हुकूम पाठवितो.

ष्ट शाहाजहानाच्या मनांत भरून त्याणें लागलाच आपल्या प्रधानाचें गाऱ्हाणें ऐकून त्यास दाद द्यावी, असा अबदुल्ला कुतुबशाहास दराच्याचा हुकूम पाठविला. परंतु या गोष्टीनें आपल्या स्वतंत्रतेवर हल्ला झाला, असें पाहून त्यास अधिक क्रोध आला. आणि त्यानें महंमद अमीनास अधीक बंदोवस्तानें बंदींत ठेवून त्याचा बाप मीरजुमला याची सर्व मालमत्ता जप्त केली. तेणेंकरून शाहाजहानास कोप येऊन बाहुबलानें आपला हुकूम अमलांत आणावा, अशी त्याणें औरंगजेबास आज्ञा केली. औरंगजेब याचीच वाट पाहात होता. हा हुकूम हातीं पडतांच मोठ्या उत्साहानें व मसलतीनें हें काम तडीस नेण्याचें त्यानें मनावर घेतलें. औरंगजेबाचा भाऊ शाहाजादा सुजा हा त्यावेळीं बंगालचा सुभेदार होता. त्याच्या मुलीशीं आपला मुलगा सुलतान महंमद याचें लग्न करून देण्याकरितां त्याच्या बरोबर इतमामाकरितां बंगाल्यास जावयाचें आहे असें निमित्त करून दुसरा कांहीं उद्देश बाहेर न दाखविता त्याणें त्याजबरोबर एक निवडक फौज पाठवून दिली. तीस वाटेंत गोंडवणचीं रानें न लागावीं म्हणून औरंगाबादेवरून बंगाल्यास जाव-

---

हकीगत घेतली आहे.

यास मच्छलीपट्टणाच्या हेरूपट्याच्या वाटेनें जावें लागलें. त्यामुळें सहजच गोंवळकोंड्याची राजधानी हैदराबाद तिजपासून थोडक्या पल्ल्यावर तो शाहाजादा आला. त्याचा सत्कार करण्याकरितां **अबदुल्ला शाहा** मेजवानीच्या तयारींत आहे. तों अकस्मात तो शाहाजादा शत्रूप्रमाणें त्यावर चालून आला. तेव्हां **अबदुल्ला** बेसावध असल्यामुळें त्यास शहरापासून तीन चार कोशांवर गोवळकोंड्याचा पहाडी किल्ला आहे, तेथें पळून जाण्यास मात्र फुरसत सांपडली. इकडे हैदराबाद मोगलांच्या हातांत सांपडून त्यांचें लष्कर फैदंत येईपर्यंत सर्वच लूट होऊन अर्ध्या शहराचें जळून भस्म झालें. या पूर्वींच कांहीं खुसपट काढून **औरंगजेबानें** आपल्या सुभ्यांतील अति नजीकच्या ठिकाणावर फौज जमा केली होती. आणखी माळव्यांतून फौज येऊन तीस मिळाल्यावर गोवळकोंडें येथें कुमक पाठविण्यास त्याजवळ पुष्कळ लोक झाले. कांहीं वेळानें **मीरजुमला**ही जवळ येऊन ठेपला. आणि आपल्या धन्याचेंच लष्कर घेऊन त्यावरच उलटण्यास तयार झाला. **अबदुल्लाशाहा** प्रथम किल्यावर पळून गेला. तेव्हांच त्याणें **महंमद अमीना**स मोकळा करून त्याचा जप्त केलेला मालही सोडून दिला होता. नंतर योग्यरीतीनें बंदोबस्त होईल तसा करून घेण्याचें बोलणें लावण्याविषयीं त्याच्यानें झालें तितकें त्याणें केलें. इतकें करून एकीकडे विजापूरकरांकडून सहाय्य मिळविण्याविषयीं होईल तितका प्रयत्न करण्यास तो चुकला नाहीं. इतकेंही केलें तथापि त्यास सहाय्य मिळालें नाहीं. आणि मोंगल लोक आपला हेका घेऊन बसले तेव्हां किल्याचा वेढा बळजोरीनें उठविण्याचे पुष्कळ केलेले प्रयत्न फुकट गेल्यावर त्यास मोगलांनीं ठरविलेले सक्त करार ओवटीं कबूल करणें भाग आलें. तें असें कीं "त्याणें सुलतान **महंमदा**स आपली मुलगी देऊन कांहीं मुलूख व द्रव्य आंदण द्यावें. आणि वर्षास एक कोट रुपये खंडणी देण्याची ठरवून त्यांतून पहिला हप्ता एक कोटि रुपयांचा आतांच द्यावा. आणि पूर्वींच्या देण्याची बाकी दोन वर्षांत पुरी करून द्यावी."

मोगलांची फौज गोवळकोंड्यावर येते.

मोगलांशीं तह.

**शाहाजहानानें** याहून सोपे करार कबूल केले असते. आणि वास्तवीक पाहूं जातां पुढें जे पैक्याच्या बाबतींत करार होते त्यांत त्या-

णें पुष्कळ सूट दिली; परंतु बाकीचें अमलांत आणून औरंगजेब औरंगाबादेस परत आला. मीरजुमला हा पुढें मोंगलांच्या चाकरीस राहिला. आणि पुढें औरंगजेबाच्या मोठ्या मर्जींतील वजीर होऊन त्याचे महत्वाकांक्षी बेत तडीस नेण्यास अतिशय उपयोगीं साधन झाला.

हा तह झाल्यापासून अबदुल्लाशाहा मोगल बादशाहाच्या पदरचा एक मांडलिक राजा बनला, व मरेपर्यंत नियमानें खंडणी पोहोंचविण्यास चुकला नाहीं. औरंगजेबच्या कारकीर्दीसच हा मरण पावला.

---

# अब्बूहसन कुतुबशाहा.

अब्बूहसन व मदनपंत वजीर. — मोगल गोंवळकोंड्यावर हल्ला करितात.— त्याचें लष्कर फितूर होतें व मोगल हैदराबाद लुटतात. — तह होतो — पुनः औरंगजेब स्वारी करितो व हें राज्य खालसा करितो.

---

अबदुल्लाच्या मागून त्याचा जांवई अब्बूहसन हा गादीवर बसला. हा जरी आळशी व विलासी होता तरी राज्य चांगलें चालवून रयतेस सुख देण्याविषयीं नेहमीं तत्पर असे, यामुळें त्यावर लोकांची प्रीति असे. याणें आपली वजिरी मदनपंत नामें एका ब्राम्हणास दिली होती. त्याणें महसुलाचा व इतर राज्यकारभाराचा बंदोबस्त मोठ्या हुषारीनें ठेविला होता. शाहाचा यावर पूर्ण विश्वास असे, व याच्या विरुद्ध मुसलमानाच्या कागाळी अगदीं ऐकत नसे. ही गोष्ट स्वाभाविकच मुसलमानांस आवडत नव्हती. त्यांत मुख्यत्वें करून इब्राहीमखान नामक सेनापतीस या व्यवस्थेचा फारच राग आला होता. कारण मदनपंतास प्रधानकीचीं वस्त्रें दिलीं नसतीं तर त्याच्या हातांत सर्व अधिकार आला असता. यास्तव तो नेहमीं हवालदील राहात असे. याच सुमारास गों-

अब्बूहसन व मदनपंत वजीर.

वळकोंडच्या राजानें संभाजीशी परस्परांच्या बचावासाठीं एक तह केला. त्याचा **औरंगजेबास** राग येऊन त्याणें **खानजहानाबरोबर** गोवळकोंड्यावर स्वारी करण्याकरितां जेव्हां फौज पाठविली, तेव्हां गोवळकोंड्याचा सरदार **इब्राहीमखान** यानें मोगलांशीं लढून त्यांस मागें हटविलें. जेव्हां मोगलांचें कांहीं चालेना तेव्हां सभोंवतीं खंदक खणून एका आसऱ्याच्या ठिकाणीं **खानजहान** छावणी देऊन राहिला, आणि बादशाहास कुमक पाठविण्याविषयीं त्यानें पत्र पाठविलें. बादशाहानें शाहाजादा **मोअझीम** यास त्याच्या कुमकेस रवाना केलें. जर **इब्राहीमखान** बेमानपणा न करितां तसाच शौर्यानें **खानजहानाशीं** लढला असता तर त्याणें शाहाजादा येऊन पोहोंचण्यापूर्वीच **खानजहानाचा** फडशा उडविला असता. परंतु कर्मवशात त्यास दुर्बुद्धि होऊन त्याणें आपलें पथक एकीकडे काढिलें, आणि **शाहाजादा** व **खानजहान** या उभयतांच्या सैन्यास कांहीं प्रतिबंध न करितां हैदराबादेस जाऊं दिलें. आणि अखेरीस आपल्या बहुतेक लष्करासुद्धां फितूर होऊन मोंगलांस जाऊन मिळाला. त्याबरोबर शहरांत एकच धांदल होऊन **मदनपंत** प्राणास मुकला. आणि **अब्बूहसन** गोवळकोंड्याच्या पहाडी किल्ल्यावर पळून गेला. मग मोंगल लोकांनीं हैदराबाद शहर बळकावून एकसारखें तीन दिवस लुटलें; व मोगलांची फौज अगदीं बेकैद झाली. आपल्या फौजेंतील बेकैद मोडण्याकरितां मोगलांनीं आपली वेशर्थ केली. याप्रमाणें आपला प्रधान मेला, आपली फौज आपणास सोडून गेली, आणि आपण किल्ल्यांत कोंडले गेलों, अशी आपली अवस्था पाहून मोंगलांनीं जीं कलमें सांगितलीं तीं सर्व कबूल करून तह करणें प्राप्त पडलें. या तहांत **अब्बूहसनानें** दरसाल दोन कोट रुपये खंडणी द्यावी. आणि शिवाय जडजवाहीर व रोकड नजर करावी, असें सन १६८६ त ठरविलें.

*मोंगल गोवळकोंड्यावर हल्ला करितात.*

*त्याचें लष्कर फितूर होतें, व मोंगल हैदराबाद लुटतात.*

*तह होतो.*

यानंतर लौकरच विजापूरचें राज्य **औरंगजेब** याणें रसातळास नेलें; व त्यानंतर लागलाच गोवळकोंड्याच्या राजाचा एकदम फडशा उडविण्यास अवकाश लागला नसता. परंतु वर सांगितलेला तह शाहाजादा **मोअझीम** यानें केल्यामुळें त्यास एकदम तसें करितां आलें नाहीं.

तथापि आपले अंतर्गत हेतु सिद्धीस नेण्याकरितां विश्वासघाताचे व नीच असे उपाय योजण्याचा विचार औरंगजेबानें केला. इसवी सन १६८७ सालीं औरंगजेब, सय्यद जिसुदुराज या नांवाच्या प्रसिद्ध साधूच्या कबरेस जाण्याच्या मिषानें मोठी फौज घेऊन कलबुर्ग्यास निघाला, व त्याच वेळीं दक्षणेकडून कुमक मिळण्याचें खुंटविण्याकरितां गोवळकोंड्याच्या दक्षणेस स्वारांची जंगी फौज पाठविली. पादशाहा जवळ आला, असें कळतांच गोवळकोंड्याच्या शाहानें जवाहीर व नानाप्रकारच्या देणग्या पाठविल्या. आपलें कितीही नुकसान झालें तरी औरंगजेबाची मर्जी राखावी आणि त्याची दया आपणावर व्हावी, याकरितां तो फार झटत असे. तथापि औरंगजेब आपली मसलत तडीस नेण्याकरितां गोवळकोंड्याच्या प्रधानाशीं मसलत करून तेथील लष्करच्या लोकांस फितूर करण्याचा उद्योग औरंगजेबानें चालविला. आपले हेतु सिद्धीस जाण्याचा समय येतांच गोवळकोंड्याचा शाहा बदफैली व विषयी आहे, ब्राम्हणास प्रधानाची जागा दिली आहे, व संभाजीशीं दोस्ती केली आहे, व पाखंडी लोकांस आश्रय देतो, अशीं कुभांडें घालून त्याणें जाहीरनामा लाविला. आणि शाहाजादा मोअज्झीम याणें तह केलेला एकीकडे गुंडाळून ठेवून गोवळकोंड्याच्या राजाबरोबर लढाई करण्याची तयारी केली, आणि गोवळकोंड्यास वेढा दिला. कुतुबशाहाच्या लष्करचे लोक बरेच फितूर झाले होते. तरी मोठ्या शौर्यानें सात महिने लढून किल्ल्याचें रक्षण केलें, तथापि शेवटीं फितुरानें तो किल्ला पादशाहाच्या हस्तगत झाला. तेव्हां विजापूर घेतल्यावर एकच वर्षाच्या आंत सन १६८७ सालीं सपटंबर महिन्यांत अब्बूहसनास पदच्युत करून त्याचें सर्व राज्य औरंगजेबानें खालसा केलें. अब्बूहसनास कैद करून दौलताबादच्या किल्ल्यावर पाठविलें, व तेथेंच तो मरेपर्यंत कैद भोगीत होता. अब्बूहसन हा फार लोकप्रिय होता. यामुळें त्याची सर्व रयत त्यास विनाकारण पदच्युत केल्याबद्दल फार हळहळली. त्याच्या सौजन्याविषयीं व शौर्याविषयीं शेंकडो गोष्टी लोकांच्या तोंडून अद्याप त्या भांतीं ऐकूं येतात व त्या वेळच्या त्याच्या रयतेचे वंशज त्या-

(पुनः औरंगजेब स्वारी करितो व गोवळकोंड्याचें राज्य खालसा करितो.)

ची कीर्ति अद्याप गातात. या प्रमाणें कुतुबशाही घराण्याची समाप्ति झाली. या घराण्यानें सन १५१२ पासून सन १६८७ पर्यंत १७५ वर्षे गोवळकोंड्यास राज्य केलें. कुतुबशाही राजांनीं बांधलेल्या शेंकडों सुंदर इमारति व त्यांचीं दुसरीं शेंकडों सार्वजनिक कामें मागें राहिलीं आहेत. तीं अद्यापपर्यंत त्या वेळच्या वैभवाची साक्ष देतात.

# बेरीदशाही घराण्याचा

# इतिहास.

## राजांचीं नांवें

१. कासिम बेरीद.
२. अमीर बेरीद.
३. अली बेरीद.
४. इब्राहिम बेरीद.
५. कासीम बेरीद (दुसरा.)
६. मिर्झा अली बेरीद.
७. अमीर बेरीद (दुसरा)

---

१ **कासीम बेरीदः—** यास ख्वाजा शाहाबुद्दीन अली येझदीनें बेदरास आणून सुलतान महंमदशाहा लष्करी बाहामिनी यास गुलामाप्रमाणें विकलें, व त्यानें त्यास आपल्या गुलाम नोकरांत ठेविलें. जेव्हां पैठण आणि चाकण यांच्या दरम्यान मराठ्यांनीं बंड केलें, तेव्हां तें मोडण्यासाठीं महंमदशाहानें कासिमास पाठविलें. कासिमानें मोठ्या शौर्यानें तें बंड मोडून साबाजी मराठ्यास ठार मारिलें. यामुळें महंमदशाहा त्यावर संतुष्ट होऊन साबाजीचा सर्व मुलूख त्यानें त्यास दिला, आणि साबाजीच्या मुलीचें कासिमाचा मुलगा अमीर बेरीद याशीं लग्न करून दिलें. साबाजीच्या फौजेंतील सुमारें ४०० मराठे क़ासिमापाशीं नोकरीस राहिले, व बहुतेकांनीं महंमदी धर्माचा स्वीकार केला. या मराठ्यांवर त्याची फार मेहेरबानगी व विश्वास होता. त्याच्या मुलखांत यांचें वजनही चांगलें असलें. या कारणास्तव दुसऱ्या सरदारांप्रमाणें हाही आपल्या मुलखीं स्वतंत्र होण्याची इच्छा करूं लागला. आदिलशाहा, निजामशाहा आणि इमादशाहा यांच्या मसलतीनें याणेंही आवशा, कांडहार आणि उदगीर हे किल्ले ताब्यांत घेऊन बाहामिनी शाहास फक्त बेदर शहर व बेदर किल्ला मात्र ठेविला. याप्रमाणें झाल्यावर जरी त्यानें शाहा हा किताब धारण केला नाहीं, तरी खुतबा आपल्या नांवानेंच वाचण्या-

स व नाणें आपल्या नांवानें पाडण्यास सुरुवात केली. बळकावलेल्या मुलखावर बारा वर्षे अमल करून कासीम बेरीद सन १५०४ मध्यें मरण पावला.

२. अमीर बेरीदः– (इ.स.१५०४-४९) कासिमाचा पुत्र अमीर बेरीद हा बापाच्या मागून राज्य करूं लागला. याच्यावेळीं महंमदशाहा मरण पावला आणि ब्राम्हणी वंशांतील शेवटचा पुरुष कलीम उल्लाशाहा बाहामिनी बेदर सोडून अहंमदनगरास पळून गेला. परंतु याच संधीस बेदरशहर इस्माएल आदिलशाहानें घेतलें. परंतु पुढें त्यानें तें अमीरबेरिदास परत दिलें. याबद्दल हकीकत विजापूरच्या इतिहासांत आलीच आहे. पुढें अल्लाउद्दीन इमादशाहा आणि खानदेशचा मिरान महंमदखान यांनीं फूस दिल्यावरून गुजराथच्या बाहादूरशाहानें दक्षणेवर हल्ला केला. तेव्हां इस्माएल आदिलशाहानें अमीरबेरिदास विजापुरीं बोलावून १२००० परदेशी स्वारांनिशी बुऱ्हाण निजामशाहाच्या मदतीस पाठविलें, वगैरे हकीकत मागेंच आली आहे. शेवटीं बुऱ्हाणशाहाच्या कुमकेस आणखी एका प्रसंगीं जात असतां मार्गांतच त्याची प्रकृति एकाएकीं बिघडली. आणि दौलताबादेस तो सन १५४९ सालीं निवर्तला. त्याचें प्रेत त्याचा भाऊ खवाजा जहान याणें बेदरास आणून पुरिलें. याणें एकंदर ४५ वर्षे राज्य केलें.

३. अल्ली बेरीदशाहाः–(इ. स. १५४९ – ६२ अल्ली बेरिदानेंच प्रथम शाहा म्हणजे राजा हा किताब धारण केला. जेव्हां बुऱ्हाण निजामशाहानें आपला दिवाण शाहा ताहीर यास अल्ली बेरिदास गादी प्राप्त झाल्याचा आनंद प्रदर्शित करण्यास त्याजकडे पाठविलें, तेव्हां अल्लीनें त्याची धर्मसंबंधीं मतभेदावरून निर्भर्त्सना केली. त्याचा ताहिरास अतिशय राग आला, व निरोप न घेतां दरबारांतून परत अहंमदनगरास गेला, व आपली जी बेअदबी झाली तिजविषयीं निजामशाहास कळवून बेदरावर एकदम फौज घेऊन जाण्याविषयीं एकदम सल्ला दिली. अल्ली बेरिदानें कल्याणीचा किल्ला इस्माएल आदिलशाहास देऊन त्याची कुमक मिळविली. परंतु विजापुराहून कुमक येण्यापूर्वीच बुऱ्हाणशाहानें आवशा, कंधार आणि उदगीर हे किल्ले घे-

तले. येणेंकरून बेरीदशाहाकडे इतका थोडा मुलूख राहिला कीं, त्याचा सारा वसूल ४,००,००० होन मात्र येण्याजोगा होता. पुढें सन १५७९ सालीं मूर्तिजा निजामशाहानें बेरीदशाहींतील राहिलेल्या मुलखावर स्वारी करून बेदरशहरासही वेढा घातला. तेव्हां अल्लीबेरिदानें अल्ली आदिलशाहाकडे कुमक मागितली. आपण मागूं ते दोन खोजे आपणास दिल्यास कुमक करूं, असें आदिलशाहानें सांगितलें. ती गोष्ट अल्लीबेरिदानें कबूल केल्यावर आदिलशाहानें २,००० स्वार कुमकेस रवाना केले. या संधीस अहंमदनगर येथें मूर्तिजाचा भाऊ बुऱ्हाण याणें अहंमदनगरास बंड केलें. या वातमीवरोवर जेव्हां विजापूरची फौज येत आहे, असें कळलें तेव्हां गोवळकोंड्याहून आलेल्या फौजेसह मिरझा यादगर यास वेढ्याचें काम पुढें चालविण्यास मागें ठेवून मूर्तिजा निजामशाहा अहंमदनगरास गेला. परंतु विजापूरची फौज समीप येतांच तोही वेढा उठवून निघून गेला. याप्रमाणें वेढा उठल्यावर अल्ली बेरिदानें अल्लीआदिलशाहाच्या स्वाधीन त्यानें मागितलेले दोन खोजे केले. ते एका राजास सोडून दुसऱ्या राजाकडे जाण्यास फार नाखुष होते. परंतु त्यांस जुलमानें घालविलें. यामुळें त्वेष येऊन त्यांपैकीं एकानें अल्ली आदिलशाहाचा वध केला. यानंतर लौकरच अल्ली बेरीदशाहा सन १५६२ सालीं मरण पावला.

४. इब्राहीम बेरीदशाहाः- (इ. स. १५६२-६९.) अल्ली बेरिदाचा पुत्र गादीवर बसला. याणें एकंदर सात वर्षे राज्य केलें.

५. कासीम बेरीद [दुसरा]:- (इ. स. १५६९-७२.) इब्राहिमाचा धाकटा भाऊ काशीम गादीवर बसला, आणि तीन वर्षे राज्य करून मृत्यु पावला.

६. मिरझा अल्ली बेरीदः- कासिमाचा पुत्र गादीवर बसला. हा त्यावेळीं लहान होता. म्हणून त्याचा एक आप्त अमीर बेरीद याणें राज्य बळकाविलें. आणि मिरझा अल्लीस भावनगरास हांकून दिलें.

७. अमीर बेरीद (दुसरा):- हा फेरिस्ता मरण पावला तेव्हां बेदरास राज्य करीत होता.

# वऱ्हाडच्या इमादशाही घराण्याचा इतिहास.

| राजांचीं नांवें | इसवी सन. |
|---|---|
| १. फत्तेउल्ला इमादशाहा. | १४८४. |
| २. अल्लाउद्दीन इमादशाहा. | १५०४. |
| ३. दुरिया इमादशाहा. | १५२९. |
| ४. बुऱ्हाण इमादशाहा. | १५६०. |
| ५. तोफलखान. | |

फत्तेउल्ला इमादशाहाः— इमादशाही वंशाचा मूळ पुरुष फत्तेउल्ला हा विजयानगरच्या एका तेलंगी ब्राम्हणाचा पुत्र होता. विजयानगराशीं ज्या लढाया चालल्या होत्या, त्यांमध्यें हा कैद झाला, आणि वऱ्हाडचा सुभेदार व सेनापति खानजहान यानें त्यास आपल्या खालकीलमध्यें नोकरीस ठेविलें. तो जसा मोठा झाला तसें धैर्य, शौर्य व शाहाणपण हे त्याच्या आंगचे गूण त्याच्या पुरस्कर्त्याच्या नजरेस आले.व त्यावर त्याची इतकी मर्जी बसली कीं त्यानें त्यास मोठ्या पदवीस चढविलें. खानजहान मरण पावल्यावर तो बेदरास गेला. तेथें त्यावेळचा बाहामिनी दरबारचा दिवाण महंमदगवान याची मेहेरबानी संपादून महंमदशाहा बाहामिनीकडून 'इमादउल्मुल्क' हा किताब त्यानें मिळविला. आणि पुढें लौकरच त्यास खानजहानाचे जागीं वऱ्हाडांतील फौजेवर सेनापति नेमिलें. सन १४८४ मध्यें त्यानें स्वतंत्र शाहा हें पद धारण केलें; व पुढें तो लौकरच मरण पावला.

अल्लाउद्दीन इमादशाहाः— फत्तेउल्लाच्या मागून त्याचा वडील पुत्र अल्लाउद्दीन हा वऱ्हाडचा अधिकारी झाला. बाहामिनी राज्यांतील दुसऱ्या कित्येक सरदारांप्रमाणें यानेंही शाहा म्हणजे राजा हा किताब धारण क

करून आपणास अल्लाउद्दीन इमादशाहा असें म्हणवूं लागला. त्याणें गावल येथें आपली राजधानी केली. जेव्हां अमीर बेरिदाच्या जाचास त्रासून महंमूदशाहा बाहामिनी बेदराहून पळाला, तेव्हां त्यास पुनश्च गादीवर बसविण्याकरितां आपलें सर्व सैन्य घेऊन अल्लाउद्दीन इमादशाहा बेदरास गेला. ब्राम्हणी वंशाची बेदरास पुनः स्थापना होऊं नये, म्हणून बुन्हाणनिजामशाहा अमीरबेरिदाच्या कुमकेस गेला. परंतु लढाईच्या ऐन भरांत आपला पुरस्कर्ता इमादशाहा यास सोडून महंमूदशाहा अमीर बेरिदाकडे कसा गेला हें मागें सांगितलेंच आहे. (बाहामिनी राज्याचा इतिहास पान २३७ पहा.)

या कारणानें अल्लाउद्दीन आणि अमीर बेरीद यांमध्यें चुरस पडली. सन १५१६ मध्यें अमीर बेरीद बेदराहून निघाला. त्यानें प्रथमतः माहूरचा किल्ला घेतला. नंतर त्यानें रामगडावर हल्ला करून एकाएकीं छापा घालून किल्ला हस्तगत करून घेतला. आणि तेथचा सुभेदार कोंडवणखान+ यास मारिलें. जेव्हां फत्ते उल्ला इमाद उल्मुल्क यास कोंडवणखानाच्या मृत्यूचें वर्तमान समजलें, तेव्हां कोंडवणखानाच्या घराण्याचा बचाव करण्यासाठीं अल्लाउद्दीन इमादशाहानें आपलें सैन्य जमवून कूच केलें. इमादशाहाशीं लढाई करण्याचें चुकविण्यासाठीं व त्याचा उपद्रव बेदराकडे न होण्यासाठीं, त्यानें कोंडवंदखानाच्या मुलाकडे त्या सुभ्याचें स्वामित्व देऊन त्यास अल्लाउद्दीन इमादशाहाचे ताब्यांत दिलें. परंतु त्या किल्ल्यानजीक गेल्यावर विश्वासघातानें अल्लाउद्दीन इमादशाहानें ते दोनही किल्ले आपल्या ताब्यांत घेतले. तेव्हां कोंडवणखानाचे पुत्र बुन्हाणाकडे पळून गेले, आणि त्याजपाशीं त्यांनीं आश्रा घेतला. अल्लानें त्यांवर आपले सुभेदार नेमून आपली फौज ठेविली. हे दोन किल्ले अल्लाउद्दीनानें हाताखालीं घातल्यामुळें निजामशाहास राग आला. आणि निजामशाहा व इमादशाहा यांमध्यें लढाई जुंपली. या लढाईंत इमादशाहाचा अगदीं पराभव होऊ-

---

+ जेव्हां फत्तेउल्ला इमादउल्मुल्क यास एलिचपूर, गावल आणि वऱ्हाडचा उत्तरभाग याची सुभेदारी मिळाली त्याच वेळीं कोंडवणखान हबशास रामगड, माहूर आणि वऱ्हाडचा दक्षिणभाग याची सुभेदारी मिळाली होती.

न त्यास गावल येथे पळून जावें लागलें. अल्लाउद्दिनानें पूर्वींच इस्माएल आदिलशाहाच्या मुलीशीं लग्न करून त्या दरबारची दोस्ती संपादिली होती, परंतु इस्माएल यावेळीं विजयानगरच्या राजाशीं लढाई करण्यांत गुंतला असल्यानें त्यास आपला जांवई व दोस्त जो वऱ्हाडचा शाहा त्यास मदत देण्यास सवड झाली नाहीं. तेव्हां निजामशाहानें इमादशाहाचे माहूर आणि रामगड हे दोन्ही किल्ले घेतले.

नंतर खानदेशचा राजा मिरान महंमदखान याशीं दोस्ती करून त्यासहवर्तमान अल्लाउद्दीन, बुऱ्हाणशाहावर चालून गेला. परंतु त्या उभयतांचीही डाळ शिजूं न देतां निजामशाहानें त्या दोघांचा पराभव करून त्यांचे सर्व हत्ती व तोफा घेऊन त्यांस त्यांच्या राजधान्याकडे हांकून दिलें. तेव्हां मिरान महंमदखानानें गुजराथच्या बहादूरशाहापाशीं सहाय्य मागितलें. त्यास आपला अंमल वाढविण्याची फार इच्छा होती. त्यानें ही संधि पाहून लागलेंच मोठें सैन्य घेऊन दक्षणेकडे निघाला. अल्लाउद्दिनानें त्याच्या मनांतील हेतु ताडिला. तेव्हां कांहीं जिकीर न करितां अल्लानें आपल्या मुलखाचें स्वामित्व बाहादूरशाहास खुषीनें आपण होऊन दिलें. आणि त्याच्या नांवानें खुतबा वाचण्याची सुरुवात केली. नंतर मिरानमहंमदखानानें बाहादूरशाहास फार आग्रह केला कीं, एकदम स्वारी करून निजामशाही घराण्यासही शरण येण्यास लावावें. बाहादूरशाहानें दौलताबादेवरून अहंमदनगरास कूच केलें, आणि तिकडे अंमल बसवून आपल्या नांवचें नाणें पाडविलें. नंतर सर्व आपापल्या मुलखीं गेले. पुढें लौकरच अल्लाउद्दीन निवर्तला, आणि त्याचा ज्येष्ठ पुत्र गादीवर बसला.

**दुरिया इमादशाहाः-** अल्लाचा पुत्र **दुरिया इमादशाहा** हा गादीवर बसल्यावर त्यानें आपली कन्या **बिब्बी दौलत** हिचें हुस्सेन निजामशाहाशीं लग्न केलें. दक्षणेंतील दुसऱ्या राजांशीं याच्या कारकीर्दींत कांहीं तंटा उपस्थित न होतां यानें स्वस्थपणानें राज्य केलें, असें दिसतें.

**बुऱ्हाण इमादशाहाः-** **दुरिया इमादशाहाच्या** मागून त्याचा पुत्र **बुऱ्हाण इमादशाहा** हा गादीवर बसला. परंतु हा अगदीं लहान बाळ होता. राजा सांगा होण्यापूर्वींच खानदेशचा राजा आणि

निजामशाहा यांच्या सहाय्यानें तोफलरवानानें सर्व अधिकार बळकाविला. बालराजास बिडी घालून नरनाळा किल्ल्यावर कैदेंत ठेविलें आणि **तोफलरवानानें** शाहा हा किताब धारण केला.

**तोफलरवानः—** ज्यानें दुसऱ्यांचा अधिकार बळकाविला आहे. त्याची वृद्धि होऊन यशः प्राप्ति होण्यास जे दोन गूण धाडस व धूर्तता अवश्य ते **तोफलरवानाच्या** अंगीं पूर्णपणें वसत होते. यास्तव त्याची फार लौकर भरभर होऊन तो बलाढ्य झाला. तेव्हां विजापूर आणि अहंमदनगरचे राजे त्याच्या नाशास उद्युक्त होऊन त्या उभयतांनीं फौजांसह त्याजवर कूच केलें. **तोफलरवानानें** पाहिलें कीं, या दोघांपुढें आपला टिकाव लागणार नाहीं; म्हणून त्यानें **अल्ली आदिलशाहा** आणि त्याचा दिवाण यांस मोठीं उंच व मौल्यवान् रत्नें लांच देऊन परत लाविलें. याची बातमी **मूर्तिजा निजामशाहास** समजतांच तोही अहंमदनगरास परत गेला. परंतु पुढें सन १५६८ सालीं नरनाळा येथें कैदेंत ठेविलेल्या इमादशाही घराण्याच्या राजपुत्रास मुक्त करण्याचें ढोंग करून पुनः त्यानें **तोफलरवानावर** स्वारी केली.

या प्रसंगीं **तोफलरवानास** मोठें भय पडलें. आणि गोवळकोंड्याच्या **इब्राहीम कुतुबशाहाकडे** मदत मागण्यास त्यानें वकील पाठविला. त्याजकडून कुमक आल्यावर अहंमदनगरचा पेशवा **चंगीजरवान** यावर **तोफलरवानानें** हल्ला केला. यांत **तोफलरवानाचा** अगदीं पराभव होऊन त्यास पळावें लागलें. त्याच्या मागें अहंमदनगरची फौज लागली. तिनें त्याचा पिच्छा धरून त्यास नरनाळा किल्ल्यांत कोंडिलें, व त्याच्या पुत्रानें गावलगडावर जाऊन आश्रा घेतला. नरनाळा किल्ला डोंगराच्या माथ्यावर बळकट व दुर्धर जागीं असल्यानें सहज हातीं लागण्याजोगा नव्हता. म्हणून त्यास उगाच कांहीं दिवस वेढा दिल्यावर **मूर्तिजा** निजामशाहा अहंमदनगरास परत जाण्याचा विचार करूं लागला. परंतु **चंगीजरवानानें** किल्ल्यांतील कांहीं लोकांस फितूर करून आपल्याकडे आणिलें, व त्यांस त्यानें खूब बक्षीस देऊन तृप्त केलें. किल्ल्यांत हळू हळू धान्याचाही तोटा पडूं लागला. व दुसरे लोकही **चंगीजरवानास** येऊन मिळूं लागले. या प्रमाणें होतां होतां किल्ल्यांत तोफा चालविण्यास मारे १२ लोक उरले. किल्ल्यांतून आलेल्या

लोकांकडून किल्याची बित्तिमबातमी काढिली, आणि युक्तीनें एक तोफ डोंगरावर चढवून एका बुरुजावर लागू होण्याजोगी जवळ नेली. नंतर एके दिवशीं रात्रीं २८ शिपाई एक शिंग्या व एक कामगार यांनीं तोफ चालू करून खिंड पाडिली, आणि खिंडींतून तटावर चढून शिंग्याकडून शिंग फुंकविलें. **तोफलखाना**स वाटलें कीं, पुष्कळ लोकांचा किल्यांत प्रवेश झाला. आपणापाशीं तर फारच थोडे लोक उरले आहेत. असे पाहून किल्याचा बचाव करण्याचें टाकून शेजारच्या झाडींत तो पळून गेला. दुसरे दिवशीं किल्यांतील जें कांहीं घेण्याजोगें होतें तें सर्व घेऊन निजामशाहानें किल्यास व शहरास अग्नि लाविला. **तोफलखाना**च्या मागें **सय्यद हुस्सेन आस्त्राबादी** लागला होता. त्याणें खानास तिसरे दिवशीं पकडून निजामशाहाकडे आणिलें. थोड्या दिवसांत गावलचा किल्लाहीकौलानें स्वाधीन झाला, आणि **तोफलखाना**चा पुत्र **शमशीर उल्मुल्क** यास कैद केलें. निजामशाहानें कैदेंत असलेल्या इमादशाही घराण्याच्या पुरुषास गादीवर न बसवितां त्यास **तोफलखाना**स व त्याच्या पुत्रास निजामशाहींतील एका किल्यांत कैदेंत ठेविलें. असें सांगतात कीं त्या तिघांसही निजामशाहाच्या हुकमानें गळे दाबून मारिलें. कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, त्या त्रिवर्गांच्या कुटुंबांचीं एकंदर ४० माणसें एका रात्रींत त्या किल्यावर मरण पावलीं. कारण किल्लेदार त्यांजपाशीं त्यांच्या पोटगीच्या नेमणुकींतून पैसे मागूं लागला. ते देण्याचें त्यांनीं नाकबूल केल्यामुळें भर उन्हाळ्यांत त्या सर्वांस त्यांनीं एका लहान अंधार कोठडींत कोंडिलें. तेणेंकरून उजाडण्याचे आंत सर्व गुदमरून मेलीं. या प्रमाणें इमादशाही घराण्याचा व **तोफलखाना**च्या घराण्याचा निर्वंश झाला.

# विजयानगरचा इतिहास.

दक्षिणहिंदुस्थानांत **विजयानगरचें** राज्य मोठ्या भरभराटींत व वैभवांत अगदीं अर्वाचीन काळापर्यंत होतें. व त्याचा अम्मल सर्व दक्षिणहिंदुस्थानांत रामेश्वर व कन्याकुमारीपर्यंत असून दक्षणचा भाग सरासरी बेळगांवापर्यंत त्याच्याच अमलाखालीं होता. मुसलमानांचा अम्मल उत्तर व मध्य हिंदुस्थानांत बसून **अल्लाउद्दिनाच्या** स्वारीनंतर दक्षणेंत व गुजराथेंतही मुसलमानी अम्मल बसून त्यांचा हिरवा झेंडा जिकडे तिकडे फडकत असतां दक्षिणहिंदुस्थानांत विजयानगरास मात्र एक हिंदु राज्य होतें. व तेथेंच कायतो हिंदुविद्वानांस आश्रय मिळत असे. **माधवाचार्य, अपय्यादिक्षित** यांसारखे मध्यकालिन पंडित याच दरबारच्या आश्रयानें प्रसिद्धीस आले. या शिवाय दुसरीकडे कोठें गाई, ब्राम्हण, पुरातन विद्या, विद्वान, शास्त्री, पण्डित यांस थारा नव्हता. या इमामशाहीच्या कारकीर्दींत जे प्राचीन ग्रंथ राहिले. त्यांस हें राज्य बऱ्याच अंशीं कारणीभूत झालें येथील राजांच्या दक्षणेंतील मुसलमानी राजांशीं एकसारख्या लढाया चालल्या होत्या. त्यांचा उल्लेख मागील इतिहासांत पुष्कळ वेळ आलेला आहे. यानींच दक्षिणहिंदुस्थानांत सन १५६४ पर्यंत मुसलमानांचा प्रवेश होऊं दिला नाहीं; व या माळीं दक्षिणेंतील सर्व मुसलमान राजांनीं आपल्या फौजा एकत्र करून विजयानगरच्या राजास जिंकावें लागलें. असें हें बलाढ्य राज्य दक्षिण हिंदुस्थानांत सव्वा दोनशें वर्षें होतें व त्याचा अम्मल दक्षणेंत बराच असून तो मुलूख दक्षणच्या मुसलमान राजांस बरेच दिवस लढाई करून घ्यावा लागला. यास्तव या राज्याविषयीं चार शब्द लिहिल्याशिवाय दक्षणचा इतिहास पुरा होणार नाहीं. म्हणून पुढील संक्षिप्त हकीकत दिली आहे.

विजयानगरचा व्हावा तसा इतिहास अद्याप उपलब्ध झाला नाहीं. या राजांच्या पदरीं शेकडों विद्वान असत, व त्यांनीं अनेक रूपांनीं राज्यकारकीर्दींच्या हकीकती लिहून ठेविल्या असतील यांत संशय नाहीं. जें राज्य दोनशें वर्षांवर चाललें होतें, त्यांच्या कागदपत्रांवरूनही त्यांच्या इ-

तिहासाचीं साधनें मुबलक मिळालीं असतीं. परंतु त्या सर्वांचा अलेक्झांड्रियाच्या लायब्ररीप्रमाणें मुसलमानांच्या धामधुमींत व जाळपोळींत नाश झाला असावा. यामुळें या राज्याचा इतिहास अद्याप समग्र तयार झाला नाहीं. तथापि ज्या हजारों इमारतींवर, देवळांवर व शिलालेखावर त्यांचा कटाव चालला नाहीं त्यांचे अवशेष शिल्लक आहेत; यांच्या बांधणीवरून, शिलालेखांत राजांचीं नांवें व शक आढळतात, त्यांवरून कांहीं माहिती कळते. हाही उद्योग व्हावा तसा अद्याप झालेला आढळत नाहीं. सन१८३६ सालीं एशियाटिक रीसर्चीस या नांवाच्या पुस्तकांत विजयानगरचे १५ शिलालेख व एक वंशावळ प्रसिद्ध झाली. व त्यांवरून जो इतिहास उपलब्ध झाला तो त्यांत दिलेला आहे. त्यानंतर अलीकडे विजयानगरसंबंधीं कांहीं माहिती प्रसिद्ध झाल्याचें आढळत नाहीं. तीच माहिती येथें मुख्यत्वें घेतली आहे.

सदरशिवाय दक्षणेंतील राजांच्या इतिहासांत विजयानगरच्या राज्यांविषयीं व त्यांच्या वैभवाविषयीं वगैरे अनेक उल्लेख आले आहेत. ते मागील इतिहासांत नमूद आहेतच. त्याशिवाय पोर्तुगीज लोक हिंदुस्थानांत आल्यावर सुमारें ५० वर्षें हें राज्य होतें. यामुळें त्यांच्या लेखांत व त्यावेळीं युरोपांतून जे प्रवासी हिंदुस्थान पाहण्यास आले, त्यांच्या लेखांतही कांहीं माहिती आढळते. सदराशिवाय विजयानगरच्या राजाचे वंशज कोठें कोठें दक्षिण हिंदुस्थानांत अद्याप आहेत. त्यांजकडे कांहीं दंतकथा मिळतात. वास्तव हा उद्योग मद्रासेकडील किंवा म्हैसुरांतील कोणी विद्वानानें केल्यास सफल होणार आहे. या उद्योगास म्हैसूरच्या महाराजांनीं उत्तेजन दिल्यास त्यांस भूषणावह होणार आहे.

**विजयानगर** शहर तुंगभद्रेच्या दक्षिण तीरावर होतें. उत्तरेस **अनिगोंदी** हें छोटें शहर होतें. हें शहर अद्याप बरेंच मोठें असून याच नांवाखालीं जुनें व नवें अशीं दोन्ही शहरें मोडतात. यांस **अलपट्टन** असेंही म्हणतात. विजयानगर शहरापैकीं असंख्य देवळांचे अवशेष मात्र राहिले असून त्यांवर जंगल वाढलें आहे, व त्यांत माकडें व वानर यांची वस्ती आहे. नदी किनाऱ्यावरून जो रस्ता जातो. त्याच्या पश्चिमेस मुख्य देवळें आहेत त्यांपैकीं एक **पितळाचें** आहे. त्याची बांधणी व सौंदर्य वेरूळच्या लेण्याची बरोबरी करितें. सुंदर खोदीव न-

क्षीचें काम केलेलें असें एकाच दगडाचें १४ पासून २० हात उंचीचें याना- इट दगडाचें खांब असून त्यांवर त्याच दगडाच्या फरशांची गच्ची आहे. **पंपपती विरूपाक्षाचें** दुसरें एक भव्य देवालय आहे. याची दुरुस्ती ब्रिटिशसरकारानें केली आहे. दुसरी याच नमुन्याची **वीरभद्र** व **गणपती** यांचीं देवळें आहेत. गणपतीच्या देवळापुढें २० हात उंचीची नारसिंहाची मूर्ति आहे. या शिवाय राजवाड्याचे व हत्तीमहालाचेही अवशेष आहेत. तसेंच तुंगभद्रेवर बांधलेल्या पुलांच्या दगडांच्या राशी आहेत.

युरोपांतून जे हिंदुस्थानांत पहिलेच प्रवाशी आले, त्यांनीं विजयानगरच्या राज्यास **नरसिंगरायाचें** राज्य व देशास **नरसिंग देश** असें म्हटलें आहे. **ओडोआर्डो बार्बेसा** यानें आपल्या प्रवासाचें संक्षिप्त वर्णन सन १५१६ सालीं प्रसिद्ध केलें. त्यांत विजयानगर शहराचें असें वर्णन केलें आहे. " हें शहर फार दाटवस्तीचें व विस्तीर्ण असून तेथें व्यापाराची मोठी घडामोड चालते. हिंदुस्थानांतील हिरे, इराणच्या अरवातांतील मोत्यें, ब्रम्हदेशांतील माणकें, चीन व आलेक्झांड्रिया देशांतील रेशमी व जरतारी कापड, आणि मिसरदेशांतील बनात यांचा लाखों रुपयांचा व्यापार चालत असून शिवाय निरनिराळ्या ठिकाणाहून आलेले रससिंदूर, अफू, कोरफड, चंदन, कापूर इत्यादि जिन्नस आणि मलबारांतून आलेलीं मिर्च्यें कस्तुरी वगैरे जिन्नस यांचाही मोठा व्यापार चालतो. राजापाशीं ९०० हत्ती असून त्यांपैकीं २०० लढाऊ आहेत. त्याशिवाय २०,००० स्वार व लक्षावधि पायदळ अशी जंगी फौज आहे. दक्षणेंतील मुसलमान राजांशीं व ओरिया प्रांतांतील हिंदु राजांशीं विजयानगरच्या राजाच्या एकसारख्या लढाया चालतात. राजा व त्यांचे सरदार यांचे वाडे व घरांतील असंख्य देवळें दगडाचीं मोठीं भव्य बांधलेलीं आहेत. परंतु गोरगरीब लोक मातीच्या व गवताच्या झोंपड्यांत राहतात. या राज्यांत तेलंगण, कानडा, कारोमांडल, द्रवीड या सर्व प्रांतांचा समावेश होतो." यावरून असें दिसतें कीं, सोळाव्या शतकाच्या आरंभीं विजयानगरच्या राज्यांत कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांच्या दक्षणेस असलेल्या दक्षिणहिंदुस्थानांतील सर्व मुलखाचा व मलबार प्रांताचा समावेश होत होता.

विजयानगर राज्याच्या स्थापनेविषयीं दक्षणेंत अनेक दंतकथा आ-

दळतात. एका दंतकथेंत असें सांगितलें आहे कीं, प्रसिद्ध विद्वान् व मुत्सद्दी असा जो **माधवाचार्य** ऊर्फ **विद्यारण्य** यास भुवनेश्वरी देवीचा दृष्टांत होऊन त्यास मोहोरांनीं भरलेला मोठा हांडा सांपडला, व त्या द्रव्यानें त्यानें **विद्यानगर** हें शहर वसविलें. व त्याचेंच नांव पुढें **विजयानगर** असें पडलें. तेथें त्यानें स्वतः राज्य केलें, आणि त्या मागून कुरुवंशाचे राजे राज्य करूं लागले. दुसऱ्या दंतकथेंत असें सांगितलें आहे कीं, **माधवाचार्यानें** विजयानगर शहर वसवून तो तपश्चर्या करीत असतां त्याजवळ जो **बुक्क** नांवाचा मेषपाळ होता, त्यास त्यानें तेथें राज्यावर बसविलें. तिसऱ्या दंतकथेंत असें आहे कीं, मुसलमान राजांनीं वरंगूळचें राज्य घेतल्यावर तेथील **बुक्क** आणि **हरिहर** हे दोघे राजपुत्र दक्षणेंत पळून आले. व अरण्यांत **माधवाचार्य** स्वामीची गांठ पडली. त्यानें विजयानगर शहर वसवून त्या शहराचें आधिपत्य त्यांस दिलें. चौथी एक दंतकथा अशी आहे कीं, **बुक्क** आणि **हरिहर** हे मूळचे **अल्लाउद्दिनाचे** सरदार असून त्यांस वरंगूळचा प्रांत जिंकल्यावर म्हैसूरच्या **बल्लाळ राजांवर** स्वारी करण्याकरितां दक्षणेंत पाठविलें होतें. त्यांचा बल्लाळ राजांनीं पराभव केला. तेव्हां ते अरण्यांत पळून गेले. तेथें **विद्यारण्याची** गांठ पडली, व त्यानें त्यांस नवी फौज ठेवण्याकरितां द्रव्य दिलें. ती फौज घेऊन जाऊन त्यांनीं **बल्लाळ** राजांस जिंकलें. आणि नंतर विजयानगर हें नवीन राज्य विद्यारण्याच्या सहाय्यानें व सल्ल्यानें स्थापन केलें.

या सर्व दंतकथांची एका गोष्टींत एकवाक्यता दिसते. सर्वांत **बुक्क** आणि **हरिहर** यांनींच विद्यारण्याच्या सहाय्यानें विजयानगरचें राज्य स्थापन केलें, असें म्हटलें आहे. यावरून तेवढ्या विषयीं कांहीं शंका राहात नाहीं.

**विद्यारण्य** किंवा **माधवाचार्य** याची संस्कृत विद्येंत मोठी प्रसिद्धि आहे. धर्म, नीति, तत्व, न्याय, व्याकर्ण, इत्यादि शास्त्रांवर यांनीं केलेले मोठमोठे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. वेद व उपनिषदें यांवरील प्रचंड भाष्य यांचा बंधू सायनाचार्य यानें केल्याविषयीं प्रसिद्ध आहे. **माधवाचार्य** हा त्याच्या नांवानें मोडणाऱ्या ग्रंथांचा वास्तविक कर्ता नसून कदाचित् आश्रयदाता असावा, व अशी गोष्ट इकडे

असाधारण होती, असें दिसत नाहीं. परंतु जे पुष्कळ ग्रंथ त्याच्या भावाच्या नांवानें किंवा त्यानें लिहिलेले म्हणून मोडतात, त्यांत यांचीं नांवें, विद्वत्ता व गुणदोष यांचें वर्णन असून त्यांत माधवाचें असें वर्णन आहे कीं, "कंप या नांवाचा एक राजा दक्षिणहिंदुस्थानांत राज्य करीत असून त्याचा अम्मल दक्षिण, पूर्व व पश्चिम समुद्रापर्यंत चालत होता. त्याचा पुत्र जो संगम त्याचा प्रधान माधवाचार्य होता." त्यांतच पुढें असें वर्णन आहे कीं, "संगमाचे पुत्र जे बुक्क आणि हरिहर यांचाही माधवच प्रधान होता." या गोष्टीस विद्यानगर येथील कित्येक शिलालेखांतही आधार आहे. संगमाच्या राज्यविस्ताराविषयीं कवीची वरील कदाचित् अतिशयोक्ति असेल, परंतु बल्लाळ किंवा कल्याणचे चालुक्य राजे यांचा कदाचित् संगमराजा हा मांडलिक असावा, व दक्षणेंतील कांहीं प्रांतावर याचा अम्मल चालत असावा, असें स्पष्ट दिसतें. आणि चालुक्यांचें राज्य लयास गेल्यावर आणि बल्लाळांचा अम्मल मोडत चालल्यावर संगमानें किंवा त्याच्या पुत्रांनीं विजयानगरास स्वतंत्र राज्य स्थापन केलें असावें हें जास्त संभवनीय दिसतें.

विजयानगरच्या राजांच्या कुलगुरुंच्या वंशजांकडून मिळालेली जी एक वंशावळ प्रसिद्ध झाली आहे, तिजमध्यें या राजांची मूळ उत्पत्ति चंद्रवंशांतील आहे असें सांगून पंडूपासून नंदापर्यंत ८६ पिढ्या दिलेल्या आहेत, आणि नंदाच्या बापावर अमित्र व दुर्मित्र या राजांनीं स्वारी करून त्यास आपल्या वडिलांच्या राज्यांतून हांकून लाविलें. तेव्हां त्यानें अंध्र किंवा तेलंगाण प्रांतांत येऊन अम्मल बसविला. आणि शालिवाहनशक ९५६ किंवा इसवीसन १०३४ या सालीं त्याचा पुत्र नंद यानें नंदपुरी हें शहर वसविलें, व ५०० ब्राम्हणांस अग्राहार दिलें. या वंशावळींत असेंही ध्वनित आहे कीं, यानें गोदावरीपासून रामेश्वरापर्यंत सर्व मुलूख जिंकिला. परंतु शिलालेख व स्थानिक दंतकथा यांवरून जो दुसऱ्या राजघराण्यांचा इतिहास उपलब्ध होतो त्याशीं हें वर्णन जुळत नाहीं. नंदाच्या मागून कल्याणचा चालुक्यराय हा गादीवर बसला; व त्यास विजय, विजल व विष्णुवर्धन असे तीन पुत्र होते. त्यांपैकीं एक विजयराय हा विजयानगरास राज्य करीत होता. पुढें भूपरायापर्यंत चार पिढ्या विजयानगरास झाल्या. व शे-

वटला भूपराय शालिवाहन शके ११९६ म्हणजे इसवी सन १२७४ सालीं निपुत्रिक मरण पावला. तेव्हां शेजारच्या **जंबूक** नांवाच्या एका राजाचा गुरु जो **विद्यारण्य** त्यानें या राजाचा पुत्र जो **बुक्कराय** त्यास विजयानगच्या गादीवर बसविलें, व त्याचा अंमल सर्व दक्षणेंत चालत होता.

पूर्वोक्त उपलब्ध दंतकथांवरून विजयानगरच्या राज्याच्या स्थापनेविषयीं जे निरनिराळे प्रकार मागें सांगितले, त्याहून ही माहिति भिन्न आहे. परंतु त्यापेक्षां ही किती जास्त विश्वसनीय आहे, याचा निर्णय करतां येत नाहीं. तथापि **बुक्करायाच्या** वडिलांच्या नांवाविषयीं व त्याच्या काळाविषयीं वंशावळींतील माहिती चुकीची असावी असें वाटतें. कारण या वंशावळींत दिलेल्या काळानंतर सुमारें १०० वर्षांनीं **बुक्कराय** विजयानगरास राज्य करीत होता, असें शिलालेखांवरून स्पष्ट समजतें. दंतकथांवरून विजयानगरची स्थापना इसवी सन १३३६ सालीं झाली असें होतें. आणि ज्या राज्यक्रांतीमुळें विजयानगरास राज्यस्थापन झालें, तिच्याशीं हा काळ बराच जुळतो. मुसलमान राजांनीं म्हैसूरच्या **बल्लाळ** राजांची राजधानी **द्वारसमुद्र** घेतल्यावर त्यांचा अम्मल इसवीसन १३१०।११ या सुमारास अगदीं फिका पडत जाऊन नष्ट झाला, आणि मुसलमानांनीच वरंगूळ आणि तेलंगण हीं दोन्हीं राज्यें इसवी सन १३२३च्या सुमारास जिंकलीं. पुढें **अल्लाउद्दिनाच्या** मरणानंतर उत्तर हिंदुस्थानांत ज्या घालमेली झाल्या, व बंडें झालीं, आणि दक्षणेंत व गुजराथेंत **बाह्मिनी** व दुसरीं राज्यें स्वतंत्र झालीं त्यामुळें मुसलमानांस म्हैसूरच्या पुढें आपला अंमल बसविण्यास सवड झाली नाहीं. याकरितां दक्षणेंत दुसऱ्या कोणा हिंदु राजाचा एक-सद्दा अंमल नसल्यामुळें विजयानगरास इसवी सन १३३६ च्या सुमारास नवीन राज्याची स्थापना होऊन त्याचा अंमल सररास बसला असावा, हें फार संभवनीय दिसतें.

विजयानगरच्या राजांच्या दक्षिण हिंदुस्थानांत ज्या वंशावळी उपलब्ध होतात त्यांमध्यें आणि शिलालेखांवरून जी राजवंशाची सरणी व काल निघतात, त्यांमध्येंही बरीच असंबद्धता दिसते. वंशावळीवरून **बुक्करायापासून** तिसऱ्या **श्रीरंगरायापर्यंत** इसवी सन १३२८ पासून १६६५ पर्यंत एकंदर २७ राजे झाले, असें दिसतें. आणि अ-

नेक शिलालेखांवरून इसवी सन १३७०पासून १६२६ पर्यंत फक्त १४ च राजे झाले असें निष्पन्न होतें. कुलगुरूंकडून मिळालेल्या वंशावळींत बुक्कराया पासून तिसऱ्या श्रीरंगरायापर्यंत २० राजे दिलेले आहेत. व त्यांचे काल इसवीसन १२७४पासून १७व्या शतकाच्या मध्यापर्यंत असें ध्वनित केलें आहे. या तिहींची तुलना केल्यानें बाह्यात्कारी दिसणारी कांहीं असंबद्धता दूर होऊन मेळ घालण्यास मार्ग होईल. असें समजून तिन्ही वंशावळी खालीं दिल्या आहेत. फेरिस्ताच्या इतिहासावरून जीं राजांचीं नांवें कळतात, तींहीं दिलेलीं आहेत. यांचाही तीहींपैकीं एकीशींही सर्वत्र मेळ बसत नाहीं या सर्वांची तुलना करून जी माहिती मिळते ती खालीं दिली आहे.

## पुस्तकें व दंतकथांवरून.

| | राजांचीं नावें. | | कारकीर्द. |
|---|---|---|---|
| १. | शुक्क... ... ... .. | इ. स. १३१३ | — १३२७ |
| २. | हरिहर... ... ... | ” | — १३४१ |
| ३. | विजय... ... ... .. | ” | — १३५४ |
| ४. | विश्वदेव... ... ... | ” | — १३६२ |
| ५. | रामदेव... ... ... | ” | — १३६९ |
| ६. | विरूपाक्ष... ... .. | ” | — १३७४ |
| ७. | मल्लिकार्जून... ... | ” | — १३८१ |
| ८. | रामचंद्र... ... .. | ” | — १३९० |
| ९. | शाल्वगंड... ... | ” | — १३९७ |
| १०. | देवराय... ... .. | ” | — १४१२ |
| ११. | कुंभय्या... ... | ” | — १४१७ |
| १२. | कुमार... ... ... | ” | — १४२१ |
| १३. | शाल्वगंड (दुसरा) | ” | — १४२८ |
| १४. | शाल्व नरसिंग | ” | |
| १५. | इमादी देव.... ... | ” | — १४८८ |
| १६. | वीरनरसिंह... ... | ” | — १५०९ |
| १७. | कृष्णदेव... ... ... | ” | — १५२९ |
| १८. | अच्युत... ... ... | ” | — १५४२ |
| १९. | सदाशीव... ... | ” | — १५६४ |
| २०. | त्रिमल... ... ... | ” | — १५७२ |
| २१. | श्रीरंग... ... ... | ” | — १५८६ |
| २२. | व्यंकटपति... ... | ” | — १६१५ |
| २३. | श्रीरंग (दुसरा).. | ” | — १६२८ |
| २४. | व्यंकट... ... ... | ” | — १६३६ |
| २५. | रामदेव... ... ... | ” | — १६४३ |
| २६. | अनगुंदीव्यंकटपति | ” | — १६५५ |
| २७. | श्रीरंग (३ रा.)... | ” | — १६६५ |

## कुलगुरूकडील वंशावृक्षावरून.

| | राजांचीं नांवें. | | कारकीर्द. |
|---|---|---|---|
| १. | बुक्क.. ... ... | इ. स. १२७४ | — १३३६ |
| २. | हरिहर...... ... | ” | — १३६७ |
| ३. | देवराय... ... .. | ” | — १३६१ |
| ४. | विजय... ... ... | ” | — १४१९ |
| ५. | पुंडूदेव... ... | ” | — १४२४ |
| ६. | रामचंद्र... ... .. | ” | — १४५१ |
| ७. | नरसिंह... ... | ” | — १४७२ |
| ८. | वीरनरसिंह... .. | ” | — १४९० |
| ९. | अच्युत. ... ... | | |
| १०. | कृष्ण... ... | ” | — १५२४ |
| ११. | राम... ... ... | ” | — १५६४ |
| १२. | श्रीरंग | ” | — १५६५ |
| १३. | त्रिमल. | | |
| १४. | व्यंकटपति. | | |
| १५. | श्रीरंग (दुसरा). | | |
| १६. | रामदेव. | | |
| १७. | व्यंकटपति. | | |
| १८. | त्रिमल. | | |
| १९. | रामदेव. | | |
| २०. | श्रीरंग तिसरा. | | |
| २१. | व्यंकटपति. | | |

## शिलालेखांवरून.

| | राजांचीं नांवें. | कारकीर्द. |
|---|---|---|
| १. | बुक्क ... ... .. | इ.स. १३०० — १३८१ |
| २. | हरिहर ... ... | „ १३८५ — १४२९ |
| ३. | देवराज ... ... .. | „ १४२६ — १४५८ |
| ४. | मल्लिकार्जुन ... ... | „ १४५३ — १४६५ |
| ५. | विरूपाक्ष ... ... | „ १४७३ — १४७९ |
| ६. | नरसिंह ... ... . | „ १४८७ — १५०८ |
| ७. | कृष्ण ... ... .. | „ १५०८ — १५३० |
| ८. | अच्युत ... ... .. | „ १५३० — १५४२ |
| ९. | सदाशीव .. ... | „ १५४२ — १५७० |
| १०. | रामराज ... ... | „ १५४८ — १५६२ |
| ११. | त्रिमल्ल .. ... | „ १५६० — १५७१ |
| १२. | श्रीरंग ... ... | „ १५७४ — १५८४ |
| १३. | व्यंकटपति ... ... | „ १५८७ — १६०२ |
| १४. | वीरराम .. ... | „ १६२२ — १६२६ |

## फेरिस्ताच्या इतिहासावरून.

| | राजांचीं नांवें. | कारकीर्द. |
|---|---|---|
| १. | कृष्णराय ... .. | इ.स. १३५८ — १३७७ |
| २. | देवराय .. ... | १३९७ — १४२० |
| ३. | शिवराय . . | „ १४३१ — १५५९ |
| ४. | अजितराय ... | „ १४५९ — १४६२ (४ व ५ दोघांची) |
| ५. | कृष्णराय ... | |
| ६. | तिमराज(प्रधान) | „ १४६२ — १४६३ |
| ७. | रामराज. | |
| ८. | भोजतिरमल्ल. | |
| ९. | रामराज . | इ.स. १५३० — १५६४ |

दंतकथा व कुलगुरू यांपासून उपलब्ध झालेले काळ शिलालेखांनीं बरेच दुरुस्त करितां येतात. शिलालेखांवरून असें दिसतें कीं, दुसऱ्या दोहोंतही बुक्कराजाचा काळ ४० किंवा ५० वर्षे अगोदर घातलेला आहे. याच्या मागून झालेल्या राजाच्या नांवचे शिलालेख इसवी सन १३८५ पासूनचे सांपडतात. यास्तव बुक्क राजानें इसवी सन १३८१ च्या पुढें फार वर्षे राज्य केलें नसावें, असें सहजीं दिसतें. आणि जरी त्यानें फार दिवस राज्य केलें असलें, तथापि विजयानगरच्या स्थापनेच्या दंतकथांवरून इसवी सन १३४६ हा जो काळ निघतो. याच्या पूर्वी तो गादीवर बसला नसावा. असें स्पष्ट दिसतें. दंतकथांवरून त्यानें १४ च वर्षे राज्य केलें, असें निष्पन्न होतें. याचा अर्थ असा होतो कीं, त्यानें देणग्या देण्यास राज्याच्या आरंभापासूनच सुरू केलें. अशा पक्षीं विजयानगरच्या स्थापनेचा जो काळ साधारण समजतात, तो खरा असेल तर बुक्करायाः

नें विजयानगर स्थापन केलें नाहीं असें होतें. दुसऱ्या माहितीवरूनही बुक्कराय विजयानगरचा पहिला राजा नव्हता, असें दिसतें.

सर्व हकीगतींची खालील गोष्टींविषयीं एक वाक्यता आहे. बुक्कराय हा मोठा धाडसी व विजयी राजा असून त्यानें आपला अधिकार बराच वाढविला होता. त्यावेळची स्थितिही त्याचा विजय होण्यास अनुकूल होती. मुसलमानांच्या स्वाऱ्या होऊन त्यांचा परिणाम यास फायदेकारक झाला. याशिवाय धर्मसंबंधानें जे तंटे लागले होते, त्यांपासूनही बुक्करायानें आपलें हित साधून घेतलें. त्यानें हवा तो पंथ स्वीकारण्यास आपल्या प्रजेस मोकळीक दिली. तेणेंकरून त्याच्या राज्याची भरभराटी झाली. त्याचा प्रधान विद्यारण्य हा शैव होता. त्याच्या सरदारांपैकीं एक सरदार इरगुपु हा जैन होता. बुक्क आणि हरिहर यांनीं प्रसिद्ध केलेल्या एका जाहिरनाम्यांत असें आहे कीं, "जैन आणि वैष्णव यांमधील धर्मवादाचा निवाडा करण्यास यांस पंच नेमिलें होतें. आणि दोहों पंथांत कांहीं भेद नाहीं, असा यांनीं निर्णय दिला."

बुक्करायाचा भाऊ हरिहर हा त्याजबरोबर राज्य करीत होताच. आणि त्या दोघांच्या मागून बुक्करायाचा पुत्र हरिहर हा गादीवर बसला. व याच्या देणग्यांचे लेख इ० स० १४२९ पर्यंत आढळतात.

फेरिस्ता यानें बाहामिनी राज्याचा जो इतिहास लिहिला आहे त्यांत बाहामिनी घराण्यांतील महंमदशाहाच्या व मुजाईतशाहाच्या विजयानगरच्या राजांशीं लढाया झाल्याचें जें वर्णन केलें आहे. त्यांत विजयानगरच्या राजाचें नांव कृष्णरायँ असें दिलें आहे. महंमदशाहानें इ० स० १३५८ पासून १३७५ पर्यंत आणि त्याच्या पुत्रानें १३७८ पर्यंत राज्य केलें, ही गोष्ट निर्विवाद आहे. व फेरिस्तानें या गोष्टी घडल्यावर सुमारें १०० वर्षांनींच बाहामिनी राजांचा इतिहास लिहिला, व तो इतिहास फार काळजीपूर्वक माहिती मिळवून लिहिला अशी प्रसिद्धी आहे. जेवढें खरें कळेल, तेवढें समजून घेण्याविषयीं तो फार खबरदारी घेत होता. विजयानगरच्या राजांचीं नांवें त्यास त्यावेळीं खरी कळण्याचा जास्त संभव होता. बुक्कराया मागून कृष्णराय हा विजयानगरास महंमदशाहा बाहामिनीच्या वेळीं राज्य करीत होता. असें दिसतें. इतकेंच नाहीं तर महंमदशाहाच्या मागून जो मुजाईतशाहा बाहामिनी गादीवर बसला, त्याचीही याच कृष्णरायाा-

शीं लढाई झाली, असें वर्णन केलेलें असून त्यानें तर नहत विजयानगरापर्यंत चाल करून खुद्द विजयानगर शहरांत प्रवेश केला होता, व तेथें शाहाचें एका हिंदूशीं द्वंद्वयुद्धही झालें होतें. म्हणून **कृष्णराय** या दोन शाहांच्या कारकीर्दींत विजयानगरास राज्य करीत होता, असें मानण्यास **फेरिस्ताचा** इतिहास हें एक मोठें सबळ प्रमाण आहे.

आतां याचा शिलालेखांत व वंशावळींत आढळणाऱ्या **बुक्क** व **हरिहर** यांशीं मेळ मुळींच नाहीं. **कृष्णराय** याचें नांव **फेरिस्ताच्या** इतिहासांत इ. स. १३५८ पासून तहत १३७७ पर्यंत आढळतें. जर कदाचित् कृष्णराय हा यांचा या काळांत प्रधान असला व तोच मुख्यत्वें मुसलमानांबरोबर लढण्यास जात असल्यावरून **फेरिस्तानें** राजा म्हटलें असेल, एवढाच संभव दिसतो. **बुक्काचें** नांव मुसलमानी इतिहासांत मुळींच नाहीं. **अल्लाउद्दीन** याप-हिल्या बाहामिनी शाहानेंही विजयानगरचे रायचूर व मुदगल हे किल्ले घेतले होते. परंतु त्या ठिकाणीं राजाचें नांवच दिलें नाहीं. असो. शिलालेख, वंशावळी व **फेरिस्ताचा** इतिहास यांचा मेळ घालण्याचा यत्न आमचे मद्रासकर बंधु करतील अशी आशा आहे. आतां **फेरिस्ताच्या** इतिहासांत या काळची जी विजयानगरची माहिती आहे, तिचा सारांष देतों.

**महंमदशाहा** बाहामिनीनें ३०० गवयांस बिदागीबद्दल विजयानगरच्या खजिन्यावर वरात दिली, व तिचा विजयानगरच्या **कृष्णरायानें** अनादर करून वरात घेऊन येणाराची धिंड काढिली, व त्यानें लढाईची तयारी केली. **कृष्णराय** ३०,००० स्वार, ३००० हत्ती, व १००,००० पायदळ इतकी फौज घेऊन मुसलमानाच्या मुलखांत शिरला. मुदकलच्या किल्यास वेढा देऊन तेथील ६०० मुसलमानांस कापून काढिलें. त्यावरून एक लाख हिंदूंस मारण्याची महंमदशाहानें प्रतिज्ञा केली. नंतर जी लढाई झाली, तींत हिंदूंचा पराभव होऊन त्यांचे ७०,००० लोक मारले गेले. व हत्ती, घोडे व तोफा मुसलमानांनीं पाडाव केल्या. पुढें विजयानगरचा सेनापति **भोजमल्ल** यानें शाहाचें डोकें आणण्याची प्रतिज्ञा केली, व त्यानें ४०,००० स्वार व ५,००,०० पायदळ घेऊन मुसलमानांवर हल्ला केला. त्यांत त्यास यश आलें नाहीं. व मुसलमान विजयी होऊन त्यांनीं कृष्णरायास राजधानींत कोंडिलें; आणि अखेर वराती प्रमाणें गवयांस बिदागीचा पैसा देऊन तहक-

रावा लागला. वगैरे वर्णन **महंमदशाहा** बाहामिनीच्या इतिहासांत मागें आलें आहे. (बाहामिनी घराण्याचा इतिहास पृष्ठ २५-४४ पहा.)

पुढें **मुजाईतशाहा**च्या कारकीर्दींत कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांमधील किल्ले व मुलूख यांवरील दुतर्फी अमलाविषयीं कटकटी उत्पन्न होऊन पुनः **कृष्णाराया**बरोबर मुसलमानांची मोठी लढाई झाली, यावेळीं विजयानगरच्या राज्यविस्ताराची स्थिति कशी होती, याविषयीं **फेरिस्तानें** वर्णन केलें आहे. त्यावरून सर्व कर्नाटक प्रांतावर कोकणांत गोकर्णापासून तहत गोव्यापर्यंत व दक्षणेंत बेळगांवापर्यंत विजयानगरचा अंमल होता, असें दिसतें. (मुजाईतशाहा बाहामिनी पृष्ठ ५०, पहा.) या लढाईतही अखेर विजयानगरचा पराभव होऊन मुसलमानांनीं खुद्द विजयानगरास वेढा घातला. परंतु शहरावर कटाव चालेना. तेव्हां तह करून मुसलमान परत गेले. वगैरे वर्णन मागें सांद्यंत आलें आहे. (मुजाईत शाहा पृष्ठ ५२-६० पहा.)

यानंतर विजयानगरास **देवराय** राज्य करीत होता. याविषयीं **फेरिस्ता**, शिलालेख व कुलगुरूची वंशावळ यांचा बराच मेळ आहे. मात्र दंतकथांवरून काढलेल्या वंशावळींत यापूर्वी बरेच राजे दिलेले आहेत. दुसरा आधार नसल्यामुळें यावर विश्वास ठेववत नाहीं. **देवरा**याच्या कालाविषयीं मात्र थोडा फरक दिसतो.

**फेरोजशाहा**, **अहंमदशाहा** व **अल्लाउद्दीनशाहा** या तीन बाहामिनी शाहांशीं ज्या विजयानगरच्या लढाया झाल्या त्या या **देवरा**याशीं झाल्या असें **फेरिस्तानें** लिहिलें आहे. व यांपैकीं **फेरोजशाहानें** तर आपल्याबरोबर **देवरायास** आपल्या मुलीचें लग्न करावयास लाविलें. इ. स. १३९७ सालीं **देवरायानें** दोआब प्रांतावर स्वारी करून रायचूर व मुद्कल हे किल्ले घेण्याचा यत्न केला. त्यावरून **देवरा**यावर **फेरोजशाहा** चालून आला. त्यावेळीं कोणी **कासी सिराज** या नांवाच्या मुसलमानानें सोंग घेऊन **देवरायाच्या** मुलास विश्वासघातानें मारिलें, व अखेर हिंदूंचा पराभव झाला. तेव्हां ११,००,००० होन देऊन **देवरायास** तह करावा लागला. पुढें याच शाहाच्या कारकीर्दींत **निहाल** या नांवाच्या मुदकल येथील सोनाराच्या अतिसुंदर कंन्येस धरून नेण्यासाठीं **देवराय** मुदकलास आला; व कंन्या सि-

ळाली नाहीं म्हणून त्वेषानें शाहाचा मुलूख त्यानें उद्ध्वस्त केला, त्याबरोबर शाहानें देवरायावर इ. स. १४०६ सालीं स्वारी केली, व थेट विजयानगरापर्यंत जाऊन विजयानगरास वेढा दिला. व त्यावेळीं देवरायास आपल्या एका कन्येचें शाहाशीं लग्न करून द्यावें लागलें. व शिवाय १०,००० होन ५. मण मोत्यें ५० हत्ती व २,००० गुलाम, गवई, कलावंतिणी व कांहीं बजवय्ये असे नजर देऊन तह करावा लागला. वगैरे साद्यंत वर्णन फेरोजशाहाच्या इतिहासांत मागें आलें आहे. (फेरोजशाहा बाह्मासिनी पृष्ठ ८६–१०१पहा.) पुनः इ. स. १४२२।२३ सालीं अहंमदशाहा वाहामिनी बरोबर आणि इसवीसन १४४३ सालीं. अल्लाउद्दीनशाहा बाहामिनीबरोबर देवरायाच्याच लढाया होऊन दोहोंतही विजयानगरच्या देवरायास मुसलमानांशीं तह करावे लागले. याचें वर्णनही त्या त्या शाहांच्या इतिहासांत आलें आहे. (अहंमदशाहा पृष्ठ ११३–११७ पहा, आणि अल्लाउद्दीनशाहा पृष्ट १३८–१४१ पहा.)

यापुढें बाहामिनी राजांच्या विजयानगराशीं कांहीं लढाया झाल्या नाहींत, व दुसऱ्या प्रकारचेंही फारसें दळण वळण नव्हतें. यामुळें बाहामिनीशाहांच्या बाकी इतिहासांत विजयानगरचें किंवा तेथील कोणा राजाचें नांव आलेलें नाहीं. परंतु पुढें बाहामिनी राज्य मोडून विजापूर, गोवळकोंडें व अहंमदनगर वगैरे स्वतंत्र राज्यें झाल्यावर पुनः विजयानगराशीं दळण वळण सुरू झालें. विजयानगरास मुसलमानांचा उपद्रव सुमारें ५० वर्षें न झाल्यामुळें त्या काळांत तें राज्यही जास्त बलाढ्य होऊन त्याचें प्रस्थ इतकें माजलें कीं, कोणा एका मुसलमान राजास विजयानगरकर फार भारी झाले. कोणी मुसलमान राजा शिरजोरपणा करूं लागला म्हणजे बलहीन राजा विजयानगरची कुमक मागत असे.

देवरायानंतर नरसिंहरायापर्यंत मध्यें झालेल्या राजांविषयीं फारशी माहिती उपलब्ध नाहीं. नरसिंहरायाच्या पूर्वीच्या मल्लिकार्जुन व विरूपाक्ष या दोन राजांचे शिलालेख सांपडतात. परंतु याच सुमारास शिवराय नांवाचा राजा विजयानगरास राज्य करीत होता, असें फेरिस्तानें लिहिलें आहे. परंतु नरसिंह राजा पंधराव्या शतकाच्या अखेरीस व सोळाव्या शतकाच्या आरंभीं विजयानगरास राज्य करीत होता, यास अनेक प्रमाणें आढळतात. (१) त्याच्या नांवचे शिलालेख सांपडतात. (२) युरोपांतून जे प्रवासी यावेळीं हिंदुस्थानांत आले त्यांनीं आपल्या प्र-

वासाच्या हकीगतींत विजयानगरास नरसिंगराय राज्य करीत होता, असें लिहिलें आहे. (३.) फेरिस्तानें जरी हा विजयानगरचा राजा असें स्पष्ट लिहिलें नाहीं तरी नरसिंगराय हा तेलंगणचा राजा असून याणें विजयानगरच्या राज्यांतील बहुतेक भाग बळकाविला, असें लिहिलें आहे. (४.) कृष्णदेव चरित्र म्हणून तेलंगी भाषेंत एक काव्य आहे. त्यांतही नरसिंहदेव विजयानगरास राज्य करीत होता असें आहे, व त्यांत त्याचा प्रधान आपाजी असें दिलें आहे. व पुढें तिमप्पा असें म्हटलें आहे. हीं दोन्हीं नांवें एकच असावीं. आणि शिवरायाच्या मागून जे राजे झाले, त्यांचा प्रधान तिमराज असें फेरिस्तानें विजापूरच्या इतिहासांत सर्वत्र म्हटलें आहे तो नरसिंव्हराजाचाच प्रधान असावा. फेरिस्तानें विजापूरच्या इतिहासांत नरसिंव्ह राजाचें नांव न देतां तिमराज या प्रधानानेंच तेवढें नांव दिलें आहे.

फारशींतील तिमराज या नांवाचा कित्येक हिमराज असाही उच्चार करितात. स्काट यानें आपल्या भाषांतरांत हिमराज असेंच लिहिलें आहे. ब्रिग्स यानें तिमराज असें लिहिलें आहे. याविषयीं फेरिस्तानें असें लिहिलें आहे कीं विजयानगरच्या राजास केवळ नामधारी करून सर्व राज्य हिमराज या प्रधानानें बळकाविलें आहे. यास्तव कदाचित् हिमराज हाच नरसिंहराय असेल. कारण विजापूरच्या शाहानें हिमराजाशींच स्वतंत्र तह केल्याचें लिहिलें आहे.

नरसिंहराजाच्या वेळीं विजयानगरचें राज्य बरेंच जास्त भरभराटीस आलें. दक्षणच्या मुसलमान राजांचा त्याणें कटाव चालूं दिला नाहीं आणि दक्षणहिंदुस्थानांत सर्वत्र आपला करडा अंमल बसविला. व कारोमांडल किनाऱ्यापासून तहत ओडिसापर्यंत यानें आपला अंमल गाजविला.

नरसिंहरायास वीरनरसिंह व कृष्णादेव असे दोन पुत्र होते. वीरनरसिंह गादीवर बसला व त्याचा भाऊ कृष्णादेव प्रधानाचें काम करूं लागला. वीरनरसिंह लौकरच मरण पावला, त्यास तीन पुत्र होते. ते लहान असल्यामुळें कृष्णादेव राज्यकारभार करीत होता. परंतु कृष्णादेवानें आपल्या भावाच्या हयातींतसुध्दां मुख्य सत्ता बळकाविली होती.

**कृष्णराय**चरित्रांत असें लिहिलें आहे कीं, **कृष्णदेव** हा **नरसिंहदेवाच्या नागंबी** या उपस्त्रीच्या पोटचा मुलगा होता. हा फार हुषार व चलाख होता म्हणून हा कदाचित् **वीरनरसिंहास** गादी मिळण्यास प्रतिबंधक होईल या भीतीनें त्याच्या आईनें त्यास मारून टाकण्याविषयीं राजाचें मन वळविलें. परंतु प्रधानानें त्यास छपवून त्याचा जीव वांचविला. राजाच्या अंतकाळीं **कृष्णदेव** जिवंत असल्याचें समजतांच व दुसरे सरदार त्याच्या गुणामुळें त्यास अनुकूल असल्यानें राजानें त्यासच आपला वारस करून त्यानें गादीवर बसावें, असें ठरविलें. **कृष्णदेव** गादीवर बसतांच **वीरनरसिंह** दुःखानें मरण पावला.

**नरसिंहानें** आरंभिलेलें काम **कृष्णदेवानें** पूर्णपणें शेवटास नेलें. विजापूरच्या आदिलशाही राजांचा अगदीं पराभव करून कृष्णेच्या दक्षिण किनाऱ्यापर्यंत आपला अंमल बसविला. याचा प्रधान **तिमराज** किंवा **हिमराज** याचेंच मुख्यत्वें नांव विजापूरच्या इतिहासांत आढळतें, व याच्याशीं तह झाले आहेत. याचें कारण **कृष्णराय** कारोमांडल किनाऱ्यावर आपला अंमल बसविण्यांत गुंतला असावा व इकडे दक्षणेंत प्रधानास पाठविलें असावें. पूर्वेस कोंडवीड व वरंगूळ हे प्रांत घेऊन कटकापर्यंत यानें अंमल बसविला. आणि **गजपती** राजाच्या कन्येशीं लग्न केलें. पश्चिमेस मलबार किनाऱ्यावरील सर्व राजांनीं याचें आधिपत्य कबूल केलें होतें. **कृष्णरायाच्या** कारकीर्दी इतकी विजयानगरच्या राज्याची मर्यादा कधीं वाढली नव्हती.

**कृष्णराय** विद्वानांचा मोठा पोशिंदा होता. व याच्या पदरीं अनेक जाडे विद्वान होते. त्यांपैकीं आठ महाविद्वानास **दिग्गज** ही संज्ञा होती. यांपैकींच प्रसिद्ध **आप्पया दिक्षीत** हे एक होते.

असा हा प्रसिद्ध राजा असतां **फरिस्तानें** आपल्या विजापूरच्या इतिहासांत याचें नांव न लिहितां केवळ प्रधानाचेंच नांव लिहिलें आहे, याचें आश्चर्य वाटतें. यास्तव याविषयीं खरा निर्णय झाला पाहिजे.

या काळाविषयीं **फेरिस्ताच्या** व **बुसातिने सलातीन** या दोन फारसी ग्रंथकारांच्या इतिहासांत जी विजापुराविषयीं हकीकत मिळते ती विजापूरच्या इतिहासांत साद्यंत दिलीच आहे. तथापि तिचा सारांश येथें दिल्यानें ताबडतोब समजेल. करितां खालीं सारांश दिला आहे.

इ. स. १४८९ सालीं युसफ आदिलखानानें विजापुरास स्वतंत्र राज्याची स्थापना केली, तेव्हां नामधारी बाहामिनीशाहाचा प्रधान कासीम-बेरीद यास विषम वाटून विजयानगरच्या राजाचा प्रधान तिमराज (हिमराज) यास मुदकल व रायचूर हे दोन किल्ले आदिलखानाकडून घेतल्यास कायमचे बाहामिनीशाहाकडून देववीन, असें वचन देवून त्यांवर हल्ला करण्यास चेतवून दिलें. तेव्हां लागलीच तिमराजानें तुंगभद्रा वलांडून हे दोन्ही किल्ले घेतले. तरी त्यानें पुढें चाल करूनये, म्हणून आदिलखानानें ते त्यास देऊन त्याशीं तह केला. याच ठिकाणीं असेंही म्हटलें आहे कीं, तिमराजानें विजयानगरच्या राजास नामधारी करून सर्व सत्ता बळकाविली होती.

पुढें तिमराजानें सर्व अधिकार बळकाविला. हें इतर सरदारांस न आवडून विजयानगरास कलह माजले. ही संधि साधून आदिलखानानें वरील किल्ले परत घेतले. इतक्यांत तिमराजानें घरगुती तंटे मिटवून मोठें सैन्य घेऊन तिमराज तुंगभद्रा उतरला. आदिलखानानेंही तयारी केली, परंतु त्यांत तिमराजाची प्रथम सरशी झाली. परंतु तो बेसावध असतां त्यावर आदिलखानानें छापा घालून त्याचा पराभव केला. तेव्हां तिमराजास नामधारी अल्पवयी राजास घेऊन विजयानगरास पळून जावें लागलें. राजास जखम लागली होती त्याणें तो मेला, तेव्हां तिमराजानें दुसऱ्यास गादीवर न बसवितां सर्वच सत्ता आपल्या हातीं ठेविली. तें इतर सरदारांस न आवडून पुनः विजयानगरास कलह माजले. ही संधि साधून इस्माएल आदिलशाहानें सदरचे किल्ले घेण्यासाठीं चाल केली. इतक्यांत तिमराजानें विजयानगरास थावराथावर करून ५०,००० सैन्य घेऊन तो आदिलशाहावर चालून आला. व कृष्णानदीच्या उताराच्या सर्व जागा अडविल्या. तेव्हां इस्माएल आलीकडे उतरला. एके दिवशीं यथेच्छ सुरापान करून सुरेच्या भरांत एकदम नदी उतरण्याचा त्यानें निश्चय केला. जेमतेम २,००० फौज नदी उतरली, तेव्हां तिजवर हिंदु फौज तुटून पडतांच तिचा फडशा उडाला; व नदी पार पळून जाण्याकरितां ज्यांनी नदींत घालून घेतलें, त्यांपैकीं आदिलशाहा व दुसरे ६ असामी शिवाय सर्व बुडून मेले. याच वेळीं आदिलशाहानें किल्ला घेईपर्यंत सुरापान करणार ना-

हीं अशी शपथ घेतली. पुढें निमराज (हिमराज) मरण पावला. व त्याचा मुलगा रामराज विजयानगरास सत्ताधिकारी झाला. ही गोष्ट तेथील लोकांस न आवडून त्यांनीं बंडें केलीं व विजयानगरास एकच गोंधळ झाला. ही संधि साधून इस्माएलानें रायचूर व मुदकल या किल्यांस तीन महिने वेढा घालून किल्ले घेतले. (विजापूरचा आदिलशाही घराण्याचा इतिहास पृष्ठें ८-६, १७, २९-३०, ४२-४३ पहा.)

कुलगुरूकडून मिळालेल्या वंशावळींत कृष्णादेवानें विजयानगरचा अम्मल खालीं लिहिल्याप्रमाणें वाढविला, असें लिहिलें आहे. महानद किंवा अनंदसेन, कांची, पंडुदेश, (मदूरा) तंजावर, श्रीरंग (त्रिचनापल्लीनजीक) दुदर देश, अर्काट, नेलोर, श्रीरंगपट्टण म्हैसूर, अहंमदनगर, बिदनूर, चितळदुर्ग, कडाप्पा, यादगिरि, रायचूर, मुदगल, गोडवळ, कर्नूल, सागर, पपदेमाळ, कल्याणदुर्ग, कलबुर्गा, कोंवळकोंडा, गुजराथ, वेंकटगिरी, परिंडा आणि रामगड. यापुढें कृष्णादेवानें ज्या जाहागिरी दिल्या त्यांची यादी आहे.

कृष्णादेवाच्या मागून त्याचा मेहुणा रामराजा विजयानगरच्या गादीवर बसला. नंतर मुसलमान राजे एकत्र होऊन त्यांनीं विजयानगरावर स्वारी केली, आणि रामराजास जिंकून मारिलें. (इ. स. १५६४) एवढेंच कायतें रामराजाविषयीं लिहिलें आहे.

कृष्णादेवानंतर अच्युतरायाचे शिलालेख १५३० पासून १५४५ पर्यंत आढळतात. व रामरायाचे १५४७ पासून सांपडतात. परंतु त्यावेळीं सुद्धां रामराय अगदीं स्वतंत्र नसून गादीवर सदाशीव हा राजा नांवाचा तरी होता. कारण रामरायाखेरीज कांहीं शिलालेख याच्या नांवचेही सांपडतात. परंतु त्या वेळच्या सर्व इतर कागदपत्रांत रामरायाचेंच नांव आढळतें. यावरून राजे केवळ बाहुली असून सर्व सत्ता रामराजाच्या हातींच होती यांत संशय नाहीं.

यानंतर थोडक्याच दिवसांनीं सीझर फ्रेडरीक या नांवाचा एक युरोपांतील प्रवासी विजयानगरास गेला होता. त्यानें आपल्या हकीगतींत विजयानगराविषयीं असें लिहिलें आहे. "विजयानगरच्या राजाचा पराभव करून त्यास इ. स. १५६५ सालीं मारल्यापूर्वी सुमारें ३० वर्षें तिघां मुलमी भावांनीं सत्ता बळकाविली, व खऱ्या राजास कैदेंत ठे-

विलें होतें, व वर्षांतून एकवार मात्र त्यास लोकांस दाखवीत असत. हे राजाच्या बापाच्या वेळीं मोठे कामगार होते. आणि राजा मरण पावतांच त्याच्या अर्भक मुलास बाहुलें करून त्यांनीं सर्व अधिकार बळकाविला. यांपैकीं वडील **रामराय** होता, व हा गादीवर बसला, व यासच विजयानगरचा राजा म्हणत. दुसरा भाऊ **तेमराज** (यास फेरिस्तानें यलतमराज म्हटलें आहे.) हा होता, व तो कारभार करी, व तिसरा भाऊ **वेंकटराय** हा सेनापति होता. तालीकोटच्या घातक लढाईपासून पहिला व तिसरा हे नाहींसे झाले. व नंतर ते मेले किंवा जिवंत आहेत याविषयीं कोणास कांहीं कळलें नाहीं."

आतां **फेरिस्ता** व **बुसातिनेसलातीन** यांच्या विजापुरच्या इतिहासांत **रामदेवानें** कशी गादी मिळविली, याची जी हकीकत दिली आहे तिशीं ही हकीकत मुख्य गोष्टींत जुळते. ही हकीकत विजापूरच्या आदिलशाही घराण्याच्या इतिहासांत साद्यंत दिली आहे. (विजापूरच्या आदिलशाही घराण्याचा इतिहास पृष्ठ ५२-५५ पहा.) "सुलतान **अहंमद** व **अल्लाउद्दीन** बाहामिनी यांच्या कारकीर्दींत **शिवराय** सन १४३१ सालीं गादीवर बसला व २८ वर्षे राज्य करून मरण पावला. त्यानंतर त्याचा अल्पवयी पुत्र **अजितराय** गादीवर बसला. तोही लौकर मेल्यावर त्याचा धाकटा भाऊ **कृष्णराय** गादीवर बसून तोही मेला. त्याचा तीन महिन्याचा पुत्र यास गादीवर बसवून **तिमराज** (हिमराज) हा मुख्य प्रधान होऊन त्याणें सुमारें ४० वर्षे अधिकार चालविला. अर्भक राजा मोठा होतांच त्यास मारून दुसऱ्यास गादीवर बसविलें. पुढें त्याचीही तीच दशा करून तिसऱ्यास बसविलें. असा क्रम चालवून सर्व राज्यसूत्रें त्याणें आपल्या हातीं गरिविलीं. पुढें **तिमराज** मरण पावल्यावर त्याचा पुत्र **रामराज** हा त्याचें काम पाहूं लागला. यानें एका राजकन्येशीं लग्न करून **शिवराया**च्या घराण्याचा समूळ नाश करून राजकिरीट स्वमस्तकीं धारण कर-

---

+ सदर बाहामिनी राजांच्या कारकीर्दींत देवराय हेंच नाव आहे व पुढें फेरिस्तानें **शिवराय** दिलें आहे. बुसातिनेसलातीनमध्यें शिवराय सन १४२१ सालीं गादीवर बसला असें आहे.

ण्याच्या उद्योगास उद्युक्त झाला. परंतु ही गोष्ट इतर सरदारांस रुचत नाहीं, असें पाहून राजघराण्यांतील एका स्त्रीच्या पोटच्या एका अर्भकास गादीवर बसवून त्याचा मामा **भोज तिरमल्ल** या अर्धवट व वेडगळ मनुष्यास त्याचें पालन पोषण करण्यास नेमिलें, व सर्व सत्ता आपल्या हातीं ठेविली. नंतर हळू हळू ज्या सरदारांनीं आपणास सिंहासनारूढ होण्यास हरकत केली होती त्यांचा नाश करून व शहरच्या बंदोबस्तास व भांडारखान्यावर एका गुलामास ठेवून **रामराजा** दूरच्या स्वारीस गेला. तेव्हां **भोजमल्ल** गुलामास मारून त्याचें काम पाहूं लागला. हें कळतांच **रामराजा** परत आला. परंतु त्याचे सरदार त्यास सोडून **भोजमल्लास** मिळाले. तेव्हां तह करून तो आपल्या जाहागिरीस गेला. पुढें **भोजमल्लानें** राजास मारिलें व तो गादीवर बसला, व क्रूर व जुल्मी झाला. तेव्हां सर्व लोक कंटाळून त्यांनीं रामराजास बोलाविलें. त्यावरोबर **भोजमल्लानें** खंडणी देऊन मांडलीक होण्याच्या व स्वारी असेपर्यंत रोज तीन लाख होन देण्याच्या करारावर विजापूरच्या **इब्राहीम** आदिलशाहाची कुमक मागितली, व त्याप्रमाणें तो फौज घेऊन आला. हें अरिष्ट घालविण्यासाठीं लोक **भोजतिरमल्लास** शरण आले, व त्याकडून **इब्राहिमास** ५० लक्ष होन देववून त्याची रवानगी करविली. मुसलमानी फौज जातांच सर्वांनी राजघातकी **भोजमल्लास** ठार मारण्यासाठीं वाड्यांत घेरिलें. तेव्हां **भोजमल्ल** अगदीं वेडा झाला, आणि हत्ती घोड्यांच्या शेंपट्या कापून त्यांचे डोळे फोडिले व जामदारखान्यांतील हिरे, माणकें, पाच वगैरे रत्नें गोळा करून त्यांची दळून व कुटून पूड केली, व जिकडे तिकडे उधळून टाकून आत्महत्या केली. तेव्हां सर्वानुमतें **रामराजा** विजयानगरच्या गादीवर बसला. (विजापूरचा इतिहास पृष्ट ५२-५६ पहा.)

यानंतर रामराजाचा सरराम अमल बसला, व त्याचा एक भाऊ **यलतमराज** कारभार पाहूं लागला, व दुसरा **वेंकटराय** सेनापती झाला. राज्यांत व्यवस्था करून व आसपास करडा अम्मल बसवून, आणि विजापूर, अहंमदनगर, व गोवळकोंडें या ठिकाणच्या मुसलमान राजांकडून आपल्या सरहद्दीवरील सर्व प्रांत घेऊन त्यांवर यानें इतकी छाप बसविली कीं ते त्याचें वारंवार सहाय्य मागूं ला-

गेले. असें याचें प्रस्थ माजत गेल्यानें रामराजा फार गर्विष्ट व धुंद झाला. आणि ज्याज्या वेळीं मुसलमान सुलतानांच्या सहाय्यास जाई, तेव्हां तेव्हां मुसलमानांचाच कित्ता घेऊन मुसलमानांच्या मशिदी पाडून व बाटवून, स्त्रियांची विटंबना करून, देश जाळून व उद्ध्वस्त करून सूड घेण्यास कधीं कसी करीत नसे, व तें मुसलमान राजांस निमूटपणें सोसावें लागे. येणेंकरून याचा मुसलमान राजांस तिटकारा येऊन ते एकच झाले, व त्यांनीं तालीकोटच्या लढाईंत याचा फडशा उडविला. विजापूरच्या व तसेंच अहंमदनगर व गोवळकोंडें यांच्या इतिहासांत याबद्दलची भरपूर हकीकत आली आहे, ती वाचकांनीं अवश्य वाचावी, अशी शिफारस करितों (विजापूरच्या आदिलशाही घराण्याचा इतिहास पृष्ठ ३६, ६२, ६३, ६८-७०, ८१-९४) त्यांतील सारांश खालीं दिला आहे.

१भोजमल्लाच्या सहाय्यास आलेला **इब्राहीम आदिलशाहा** परत जात असतां रायचूर येथें त्यास विजयानगरच्या बंडाचें वर्तमान कळलें त्याबरोबर त्यानें उदोनीस वेढा घातला. परंतु **रामराजानें** आपला भाऊ **वेंकटाद्रि** यास मोठ्या फौजेनिशीं पाठवून त्यास हांकून दिलें. पुढें **बुऱ्हाण निजामशाहानें रामराजाशीं** तह करून त्यास विजापुरावर उठविलें. तेव्हां **रामराजानें वेंकटाद्रीस** पाठवून रायचूरचा किल्ला घेतला. या प्रमाणें आपणास विजयानगरचा वरचेवर उपद्रव होऊं लागला, तेव्हां **इब्राहिमानें रामराजाशीं** स्नेह तह करून त्याचा शिलशिला दूर केला. पुढें त्याचा मुलगा **अल्ली आदिलशाहा रामराजाची** भेट घेण्याकरितां विजयानगरास गेला. या भेटीचें वर्णन मनोवेधक केलेलें आहे. (वि· इ· ८१-८३) तिकडून **रामराजास** घेऊन अहंमदनगरच्या **बुऱ्हाणशाहावर अल्लीनें** स्वारी केली. याच स्वारींत **रामराजानें** व त्याच्या लोकांनीं मुसलमानांस फार उपद्रव दिला. व विजापूरच्या सुलतानाची सुद्धां परवा बाळगिली नाहीं. (वि· ८३-८४) पुनः **अल्लीनें रामराजास** व कुतुबशाहास घेऊन **बुऱ्हाणाचा पुत्र हुस्सेन निजामशाहा** यावर स्वारी करून खुद्द अहंमदनगरास कडेकोट वेढा दिला. याचेळीं तर **रामराजानें** मुसलमानांच्या मशिदी पाडणें, घरें लुटणें, मशिदींत अचकट विचकट नृत्य गायनादि प्रकार करणें, मुसलमानांचीं घरेंदारें जाळणें, व मुसलमान सुलतानांस तुच्छ मानणें, इत्यादि गोष्टींची कमाल केली. (वि· ८५-८७). यानंतर **रामराजानें** खुद्द आपला दोस्त आदिलशाहा याच्या मुलखावर स्वा-

री केली. तेव्हां त्यास यादगीर व बागलकोट हे किल्ले देऊन त्यास वाटेस लावावें लागलें. नंतर त्याणें आपला मोर्चा कुतुबशाही मुलखावर फिरविला; तेव्हां त्यास गावळकोंडें, पानगल, व गंटूर हे किल्ले व त्याखालील मुलूख देऊन आपल्या मुलखावरील धाड कुतुबशाहास घालवावी लागली.

ऱ्या प्रमाणें दिवसें दिवस रामराजाचें फारच प्रस्थ माजून कुलगुरूच्या वंशावळीनें कृष्णादेवानें घेतलेलीं म्हणून लिहिलेलीं सर्व स्थळें याणें ताब्यांत घेतलीं व भारी शिरजोर झाला. मुसलमान राजांचे यांच्या दरबारीं जे वकील असत, त्यांचीही मानखंडणा फार करूं लागला. (वि० ८७ पृ० पहा.) येणेंकरून स्वाभाविकच मुसलमान राजांस याचा विचार करावा लागला. परंतु एक दोघांस यास जिंकण्याचें सामर्थ्य नव्हतें म्हणून सर्व मुसलमान राजांनीं दोस्ती करून यावर जाण्याचा निश्चय केला. लढाई करण्यास कांहीं कुरापत काढण्यासाठीं अल्ली आदिलशाहानें रामराजाकडे वकील पाठवून एतगीर, मुद्गल, रायचूर व बागलकोट किल्ले परत मागितले. त्यावरून रामराजानें वकीलांची निर्भत्सना करून हांकून दिलें. तेव्हां सन १५६४ सालच्या जमादिलावल महिन्याच्या २० व्या तारखेस बेरीदशाहा, निजामशाहा, कुतुबशाहा व आदिलशाहा या चारी मुसलमान राजांच्या फौजा विजापुरास एकच जमल्या, व निघाल्या आणि तालीकोटास येऊन दाखल झाल्या.

याप्रमाणें धाड रामराजावर आली तरी तो मुसलमान वकीलांस बोलला कीं, तुम्हां यःकश्चित् पोरांच्या हातून काय व्हावयाचें आहे. आपला कनिष्ट बंधु यलतमराज यास २०,००० स्वार, ५०० हत्ती व १००,००० पायदळ देऊन कृष्णा तीरीं नाकेबंदी करण्यास व उतारांच्या जाग्यांवर पाहरे ठेवण्यास पाठविलें. वेंकटाद्रीस सैन्य देऊन लढाईच्या तयारीस रवाना केलें, आणि आपण स्वतः सर्व राज्यांतील फौजा गोळा करून जाऊन मिळाला. मुसलमान युक्ति लढवून नदी उतरले, आणि हिंदुंशीं मैदानांत लढाई करण्याची त्यांनीं तयारी केली. उजव्या फळीवर आदिलशाहा, डाव्या फळीवर बेरीदशाहा, व कुतुबशाहा आणि मध्यभागीं निजामशाहा, अशी व्यवस्था करून आघाडीस तोफा व हत्ती ठेविले. रामराजानेंही उजव्या फळीवर यलतमराजास कुतुबशाहाबरोबर लढण्यास, डाव्या फळीवर आदिलशाहाबरोबर लढण्यास वेंकटाद्रीस ठेवून रामराजा मध्यभागीं राहिला; आणि आघाडीस १,००० तोफा व २०० लढाऊ हत्ती उभे केले. आरंभीं तोफांचा भडिमार हिंदूंनीं सुरू केला,

व नंतर उजव्या व डाव्या फळ्यांवर अशा नेटानें हल्ला केला कीं, मुसलमानांत धांदल उडून आदिलशाहा व कुतुबशाहा मागें हटण्याच्या विचारांत होते. इतक्यांत निजामशहानें हिंदू फौजेच्या मध्यभागीं रामराजावर अशा जोरानें घालून घेतलें कीं; त्याची फळी फुटून निजामशाहाच्या मस्त हत्तीनें खुद्द रामराजाच्या पालखीवर मोहरा केला. त्याबरोबर भुई पालखी टाकून पळाले व रामराजा मुसलमानांच्या हातीं सांपडला. त्यांनीं त्याचें शीर उडवून हिंदु फौजेचा फडशा उडविला व खूब लूट मिळविली. चलतमराजाची दशाही रामराजासारखीच झाली असावी. वेंकटाद्रि मात्र रणांतून पळून एका दूरच्या किल्ल्यांत आश्रा घेऊन राहिला. मुसलमान तसेच पुढें मुलूख घेत व लुटीत थेट अनिगोंदीपर्यंत गेले. आघाडीची फौज थेट विजयानगरास पोहोंचली. तिनें शहरांत शिरून शहर लुटिलें, इमारति पाडिल्या, लोकांवर जुलूम केला, व जिकडे तिकडे उजाड करून मोडिलें. याप्रमाणें विजय संपादून व तृप्त होऊन मुसलमान राजे परत रायचुरास आले व आपआपल्या ठिकाणीं गेले.

रामराय व त्याचे भाऊ यांचीं कुटुंबें पळून गेलीं होतीं तीं सुमारें एक वर्षानें परत आलीं. त्यांबरोबर रामरायाचा भाऊ वेंकटाद्रि होता. परंतु पाहतात तों सर्व शहर उजाड व लोक शहर सोडून दुसरीकडे गेले. वेंकटाद्रीनें तेथेंच पुनः शहर वसवून राज्य स्थापण्याचा यत्न केला. परंतु सफल झाला नाहीं. याप्रमाणें विजयानगरच्या राज्याचें या लढाईच्या वेळीं असें मातेरें उडालें कीं; त्यास पुनः कधीं मान वर काढतां आली नाहीं. शहराचें प्राचीन वैभव जाऊन सर्वस्वीं नाश झाला. आतां त्या ठिकाणीं विजयानगरच्या राजांनीं बांधलेल्या हजारों पडक्या इमारती मात्र असून तेथें जंगल माजलें आहे. तरी त्याही अद्याप पाहण्यालायख असून त्या पडक्या इमारतींवरूनसुद्धां त्या राज्याच्या वैभवाची व संपत्तीची अटकळ होते. हे अवशेष हंपेविरूपाक्षानजीक आहेत.

मांडलीक राजांनीं सर्व राज्य वांटून घेऊन आपापल्या ठिकाणीं स्वतंत्रपणें अधिकार चालवूं लागले. विजयानगरास पुनः अधिकार स्थापण्याची निराशा झाल्यावर सन १५६७ सालीं वेंकटाद्रि तेथून सात दिवसांच्या मजलीवर पेनकोंड्यास गादीची जागा करून लहानशा प्रदेशावर राज्य करीत होता. येथें कांहीं पुरुषांनीं राज्य केल्यावर वेंकटपति राज्य करीत असतां त्यावर मोंगलांची धाड आली. तेव्हां ते चंद्रगिरीस पळून गेले.

त्याचा मुलगा रामराव पुनः परत आला, व अनिगोंदी आणि विजयानगर यांच्या आसपासचा कांहीं मुलूख हस्तगत करून त्यानें पुनः अधिकार स्थापन केला. तो सात पिढ्या चालला. पुढें सन १५५६ सालीं तिरमलराय अधिकारापन्न असतां त्यावर टिपू सुलतानानें हल्ला करून तो प्रदेशही ताब्यांत घेतला. पुढें तिरमलरायानें तो मुलूख पुनः घेतला. नंतर कंपनी सरकार व निजाम यांनीं टिपूचें श्रीरंगपट्टण घेतल्यावर तिरमलरायाचा मुलूख कंपनी व निजाम यांनीं वांटून घेतला व तिरमलरायास दरमहा १५०० रुपये पेनशन करून दिलें. परंतु या वेळेपासून अनिगोंदी शहर व सभोंवतालचा प्रदेश निजामानें याजकडे जाहागिरीदाखल चालविला. तिरमलरायाचा पुत्र रामराय लहान असतां सन १८२१ सालीं मरण पावला, व दुसरा वारस नसल्यानें निजामानें दिलेली जाहागीर खालसा केली व कंपनीनें पेनशनही खालसा केली, आणि विजयानगरच्या घराण्याचा मागमूसही नाहींसा झाला!! याबद्दल फारसें वाईट वाटण्यास कारण नाहीं. दुसऱ्या ज्या पांच मुसलमानी राज्यांचा इतिहास लिहिला त्यांचीही हीच अवस्था झाली. वास्तव उत्पत्ति, स्थिति, आणि लयहीं सर्वांच्या मागें सारखीं लागलेलीं आहेत.

असो या प्रमाणें विजयानगराच्या राज्याविषयीं जी जी माहिती उपलब्ध होती, ती ती एकत्र करून एक कथा करून ठेविली आहे. हिला इतिहास हें तर नांव मुळींच शोभणार नाहीं. याविषयीं जास्त माहिती मिळवून इतिहास रचणारास कांहीं उपयोग झाला तर होईल. तथापि मराठी वाचकांस दक्षणेंतील मुसलमानी पांच राज्यांविषयीं जो अंधार होता तो घालविण्याविषयीं थोडासा यत्न करून त्यांचे समकालीन जें विजयानगरचें राज्य त्याविषयींही थोडासा प्रकाश पाडण्याचा यत्न केला आहे.